॥ श्री गणेशाय नमः ॥

Astro • Puja • Vastu

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

## ज्योतिष आणि वास्तु सल्लागार

योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 95944 28749

निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 86524 02078

।। श्री शंकर प्रसन्न ।।

ह.भ.प. संतकवी श्री दासगणू महाराज कृत

# श्री गजानन विजय ग्रंथ

## ।। प्रारंभः ।।

# अध्याय पहिला प्रारंभ

श्रीगणेशायनमः ।। जयजयाजी उदारकीर्ती । जयजयाजी प्रतापज्योती । जयजयाजी हे गणपती ! गौरीपुत्रा मयूरेश्वरा ! ।। १ ।। कार्यारंभीं तुझें स्मरण । करित आले जन । मोठमोठाले विद्वान । साधुसंत सत्पुरुष ।। २ ।। तुझ्या कृपेची अगाध शक्ती । विघ्ने अवघीं भस्म होतीं । कापुसाचा पाड किती । अग्नीपुढें दयाघना ! ।। ३ ।। म्हणून आदरें वंदना । करीतसे मी तुझ्या चरणा । सुरस करवी पद्यरचना । दासगणूच्या मुखानें ।। ४ ।। मी अज्ञान मंदमती । नाहीं काव्यव्युत्पत्ति । परी तूं वास केल्या चित्तीं । कार्य माझें होईल हें ।। ५ ।। आतां आदि माया सरस्वती । जी ब्रह्माची होय प्रकृती । जी कविवरांची ध्येयमूर्ती । ब्रह्मकुमारी शारदा ।। ६ ।। त्या जगदंबेकारण । असो माझे साष्टांग नमन । मी लेकरूं आहे अजाण । अभिमान माझा धरावा ।।७ ।। तुझ्या कृपेची अगाध थोरी । पांगळाही चढे गिरी । मुका सभेमाझारीं । देई व्याख्यान अस्खलित ।।८ ।। त्या तुझ्या कीर्तीला । कमीपणा न आणी भला । साह्य दासगणूला । ग्रंथरचनेस करी या ।। ९ ।। आतां हे पुराणपुरुषा । पांडुरंगा पंढरीशा । सच्चिदानंदा रमेशा । पाहि माम् दीनबंधो ।।१०।। तूं सर्वसाक्षी जगदाधार । तूं व्यापक चराचर । कर्ता करविता सर्वेश्वर । अवघे कांहीं तूंच तू ।। ११ ।। जग, जन आणि जनार्दन । तूंच एक परिपूर्ण । सगुण आणी निर्गुण । तूंच कीं रे मायबापा ।। १२ ।। ऐसा तुझा अगाध महिमा । जो न कळे निगमागमा । तेथें काय पुरुषोत्तमा । या गणूचा पाड असे ।। १३ ।। रामकृपा जेव्हां झाली । तेव्हा माकडां शक्ति आली । गोप तेही बनलें बली । यमुनातीरीं गोकुळांत ।। १४ ।। तुझी कृपा व्हाया जाण । नाहीं धनाचें प्रयोजन । चरणीं होतां अनन्य । तूं त्यातें साह्यकरिशी ।। १५ ।। ऐसा संतांनीं डांगोरा । तुझा पिटला रमावरा । म्हणून आलो तुझ्या द्वारां । आतां विन्मुख लावूं नको ।। १६ ।। हे संतचरित्र रचावया । साह्य करी पंढरीराया । माझ्या चित्तीं बसोनिया । ग्रंथ कळसा नेई हा ।। १७ ।। हे भवभवान्तक भवानीवरा । हे नीलकंठा गंगाधरा । ओंकाररूपा त्र्यंबकेश्वरा । वरदपाणी ठेवा शिरीं ।। १८ ।। तुझें साह्य असल्यावर । काळाचाही नाहीं दर । लोखंडासी भांगार । परीस करून ठेवीतसे ।। १९ ।। तुझी कृपा हाच परीस । लोखंड मी गणूदास । साह्य करी लेंकरास । परतें मजला लोटूं नको ।। २० ।। तुला अशक्य कांही

नाहीं । अवघेंच आहे तुझ्या ठायीं । लेंकरासाठीं धांव घेई । ग्रंथ सुगम वदवावया ।। २१ ।। माझ्या कुळीची कुलदेवता । कोल्हापुरवासिनी जगन्माता । तिच्या पदी ठेवितों माथा । मंगल व्हाया कारणें ।। २२ ।। हे दुर्गे तुळजे भवानी । हे अपर्णे अंबे मृडानी । ठेवी तुझा वरदपाणी । दासगणूच्या शिरावर ।। २३ ।। आतां वंदन दत्तात्रया । पाव वेगीं मसी सदया । गजाननचरित्र गाया । प्रसादासह स्फूर्ति दे ।। २४ ।। आतां शांडिल्यादि ऋषीश्वर । वसिष्ठ गौतम पाराशर । ज्ञाननभीं जो दिनकर । त्या शंकराचार्या नमन असो ।। २५ ।। आतां अवघ्या संतमहंतां । नमन माझें सर्वथा । दासगणूच्या धरून हाता । ग्रंथ करवा लेखन ।। २६ ।। गहिनी निवृत्ति ज्ञानेश्वर । श्रीतुकाराम देहूकर । हे भवाब्धीचें तारूं थोर । त्या श्रीरामदासा नमन असो ।। २७ ।। हे शिर्डीकर साई समर्था । वामनशास्त्री पुण्यवंता । दासगणूसी अभय आतां । तुमचें असो द्या संत हो ।। २८ ।। तुम्हां अवघ्यांच्या कृपेनें । मी हें करीन बोलणे । दासगणू मी तुमचें तान्हें । कठोर मजविषयीं होऊं नका ।। २९ ।। जी कां खरी माय असते । तीच बोलाया शिकविते । तुमचें माझें असे नातें । मायलेंकापरी हो ।। ३० ।। लेखणी काढी अक्षर । परी तो तिच्यांत नाही जोर । ती निमित्ताकारण साचार । लेखनरूपी कार्याला ।। ३१ ।। दासगणू लेखणी येथ । तुम्ही धारण करा ती अवघे संत । ग्रंथ रचवा रसभरित । हीच आहे प्रार्थना ।। ३२ ।। आतां श्रोते सावधान । संतकथेचें करा श्रवण । करोनिया एकाग्र मन । निजकल्याण व्हावया ।। ३३ ।। संत हेच भूमिवर । चालते बोलते परमेश्वर । वैराग्याचे सागर । दाते मोक्षपदाचे ।। ३४ ।। संत हेच सन्नीतीची । मूर्ति होय प्रत्यक्ष साची । संत भव्य कल्याणाची । पेठ आहे विबुध हो ।। ३५ ।। त्या संतचरित्रास । श्रवण करा सावकाश । आजवरी ना कवणास । संतांनीं या दगा दिला ।। ३६ ।। ईश्वरी तत्त्वाचे वाटाडे । संत हेचि रोकडे । अमोघ ज्ञानाचे ते गाडे । भरले असती प्रत्यक्ष ।। ३७ ।। संतचरणीं ज्यांचा हेत । त्यांचा ऋणी रुक्मिणीकांत । आतां मलरहित करा चित्त । गजानन चरित्र ऐकावया ।। ३८ ।। भरतखंडामाझारीं । संत झाले बहुतापरी । ही न पर्वणी आली खरी । अवांतर देशाकारणें ।। ३९ ।। जंबुद्वीप हें धन्य धन्य । आहे पहिल्यापासोन । कोणत्या सुखाची ही वाण । येथें न पडली आजवरी ।। ४० ।। याचें हेच कारण । या भूमीस संतचरण । अनादि कालापासोन । लागत आले आहेत कीं ।। ४१ ।। नारद, ध्रुव, कयाधूकुमर । उद्धव, सुदामा, सुभद्रावर । महाबली अंजनीकुमर । अजातशत्रू धर्मराजा ।। ४२ ।। शंकराचार्य जगद्गुरू । जे पदनतांचे कल्पतरू । जे अध्यात्मविद्येचे मेरू । याच देशीं झाले हो ।। ४३ ।। मध्व–

वल्लभ–रामानुज । यांचा ऋणी अधोक्षज । ज्यानें धर्माची राखिली लाज । निज सामर्थ्य दावोनिया ।। ४४ ।। नरसी मेहता तुलसीदास । कबीर कमाल सुरदास । गौरंग – प्रभूच्या लीलेस । वर्णन करावें कोठवरी ? ।। ४५ ।। राजकन्या मिराबाई । तिच्या भक्तीस पार नाहीं । जिच्यासाठी शेषशायी । प्राशिता झाला विषातें ।। ४६ ।। गोरख–मच्छेंद्र जालंदर । जे कां योगयोगेश्वर । ज्यांचा नवनाथ भक्तिसार । ग्रंथ असे लीलेचा ।। ४७ ।। ज्यांनी नुसतीच हरिभक्ति । करून साधिला श्रीपती । ते नामा नरहरी सन्मति । जनी कान्हो संत सखू ।। ४८ ।। चोखा–सावता–कूर्मदास । दामाजीपंत पुण्यपुरुष । ज्यांच्या कारणें बेदरास । गेला महार होऊन हरी ।। ४९ ।। मुकुंदराज जनार्दन । बोधला निपट निरंजन । ज्यांचीं चरित्रें–गायन । केलीं मागें महिपतींनी ।। ५० ।। म्हणून त्यांची नांवें येथ । मी न साकल्यें आतां देत । नुसते सांगतो वाचा ग्रंथ । भक्तिविजय भक्तमाला ।। ५१ ।। त्यानंतर जे जे झाले । त्या त्या संतां मी गाइले । ग्रंथ असती तीन केले । ते पहा म्हणजे कळेल कीं ।। ५२ ।। त्या संतांच्या तोडीचा । संत श्रीगजानन साचा । या अवतारी पुरुषाचा । प्रभाव खचित लोकोत्तर ।।५३।। मीं जीं मागें गाईलीं । संतचरित्रें असतीं भलीं । तीं सारांशरूपें सांगितली । त्रय ग्रंथांतून विबुध हो ।। ५४ ।। आतां हें सांगोपांग । चरित्र कथितों ऐका चांग । मम सुदैवें आला योग । हें चरित्र रचण्याचा ।। ५५ ।। जो प्रथमताच मी पाहिला । आकोटासन्निध संत भला । तोच मागे राहिला । त्याचें ऐका कारण ।। ५६ ।। माळा आधीं ओविती । मग मेरुमणी जोडिती । तीच आजी झाली स्थिति । ह्या चरित्र रचण्याची ।। ५७ ।। शेगांव नामें वऱ्हाडांत । ग्राम आहे प्रख्यात । खामगांव नामें तालुक्यात । व्यापार चालें जेथ मोठा ।। ५८ ।। ग्राम लहान साचार । परि वैभव त्याचें महाथोर । ज्याचें नांव अजरामर । झालें साधुमुळे जगत्रयीं ।। ५९ ।। त्या शेगांव सरोवरीं भले । गजानन कमल उदया आलें । जें सौरभें वेधितें झालें । या अखिल ब्रह्मांडा ।। ६० ।। हा शेगांव खाणीचा । हिरा गजानन होय साचा । प्रभाव त्या अवलियाचा । अल्पमतीनें वानितों मी ।। ६१ ।। तें आतां अवधारा । गजाननचरणीं प्रेम धरा । येणें तुमचा उद्धार खरा । होईल हें विसरूं नका ।। ६२ ।। गजाननचरित्र मेघ थोर । तुम्ही श्रोते अवघे मोर । चरित्ररूपीं वर्षतां नीर । नाचाल वाटे नि:संशय ।। ६३ ।। शेगांवचे पौरवासी । परम भाग्याचें निश्चयेसी । म्हणून लाधले तयांसी । गजानन हे संतरत्न ।। ६४ ।। जेव्हा करावें लागे पुण्य । तेव्हाच लाभती संतचरण । संत श्रेष्ठ देवाहून । येविषयीं शंका नसे ।। ६५ ।। रामचंद्र पाटलांनीं । केली माझी विनवणी । पंढरी क्षेत्रीं येऊनि । कार्तिकीच्या

वारीला ।। ६६ ।। माझ्या मनीं हेत होता। गावें गजानन – चरित्रा। परी त्याची तत्त्वतां । संगत नाही लागली ।। ६७ ।। त्या माझ्या वासनेची। पूर्तता करण्यासाठी । केली रामचंद्राची । योजना या समर्थे ।। ६८ ।। खऱ्या संताचें धोरण । न कळे कोणालागोन। महापुरुष गजानन । आधुनिक संत चूडामणी ।। ६९ ।। या महापुरुषाचा। ठावठिकाण कोणचा । वा पत्ता त्यांच्या जातीचा। इतिहासदृष्ट्या न लागे कीं ।। ७० ।। जेवीं ब्रह्माचा ठावठिकाण। न कळे कोणा लागून । ते ब्रह्मास पाहून। निश्चय त्याचा करणें असे ।। ७१ ।। जो कां हिरा तेजमान । पूर्णपणें असे जाण। तेज त्याचें पाहोन । ज्ञाते तल्लीन होती कीं ।। ७२ ।। तेथें त्या हिऱ्याची। खाण आहे कोणची। हें विचारीं आणण्याची। गरज मुळी रहात नसे ।। ७३ ।। ऐन तारुण्याभीतरीं । गजानन आले शेगांवनगरी । शके अठराशाभीतरी। माघ वद्य सप्तमीला ।। ७४ ।। कोणी कोणी म्हणती जन। श्रीसमर्थांचे जें कां स्थान । त्या सज्जनगडाहून । या देशीं आले हे ।। ७५ ।। परि याला पुरावा । सबळ ऐसा नाहीं बरवा । परी कांही तरी असावा। अर्थ त्यांच्या म्हणण्यांत ।। ७६ ।। लोक अवघें भ्रष्ट झाले। नाना यातनें गांजले। त्यांच्यासाठीं वाटतें केलें। कौतुक ऐसें समर्थांनीं ।।७७।। जगाचा करण्या उद्धार। गजाननरूपें अवतार । धरून आले महीवर । पुन्हा समर्थसिद्धयोगी ।। ७८ ।। कोणत्याही कलेवरी। योगीपुरुष प्रवेश करी । ऐसा प्रकार भूमीवरी । जगद्गुरूंनीं केला असे ।। ७९ ।। गोरख जन्मला उकिरड्यांत। कानिफा गजकर्णांत। चांगदेव नारायण डोहांत । योनीवांचून प्रगटले ।। ८० ।। तैसेंच येथें कांहीतरी। झालें असावें निर्धारीं। गजाननासी अंगें सारीं । होतीं योगाची अवगत ।। ८१ ।। हें त्यांच्या लीलेवरून। पुढे कळेल तुम्हांलागून। योगाचें अगाध महिमान। त्याची सरी न ये कोणा ।। ८२ ।। शेगांवी माघमासी। वद्य सप्तमी ज्या दिवशी। हा उदय पावला ज्ञानराशी । पदनतातें तारावया ।। ८३ ।। त्या वेळची तुम्हां कथा। सांगतो मी ऐका आतां । एक भाविक गृहस्थ होता । नाम ज्याचें देविदास ।। ८४ ।। हा देविदास सज्जन । पातूरकराचा वंशज जाण। शाखा ज्याची माध्यंदिन। मठाधिपती होता तो ।। ८५ ।। त्याच्या एका मुलाची। ऋतुशांति होती साची । त्यानिमित्त भोजनाची। तयारी होती त्याचे घरा ।। ८६ ।। उष्ट्या पत्रावळी रस्त्यावर। टाकिल्या होत्या साचार। घराचिया समोर । त्या देविदास विप्राच्या ।। ८७ ।। तो गजानन समर्थसिद्धयोगी। बैसले होते तया जागीं। एक बंडी होती अंगी । जुन्या पुराण्या कापडाची ।। ८८ ।। कोणत्याही उपाधीचें । नांव नव्हतें जवळीं साचें । पात्र पाणी प्यावयाचें । होता एक भोपळा ।। ८९ ।। कच्ची चिलीम हातांत। जी होती तयांची स्वकृत । कुंभाराच्या

भट्टीप्रत । जिनें नव्हतें पाहिलें ।। ९० ।। नासाग्र दृष्टि मुद्रा शांत । तपोबल अंगी झळकत । प्राचीच्या बालरवीवत् । वर्णन किती करावें ।। ९१ ।। मूर्ति अवघी दिगंबर । भाव मावळला आपपर । आवडनिवड साचार । राहिली न जवळी जयाच्या ।। ९२ ।। ती समर्थांची स्वारी । बैसोनिया रस्त्यावरी । शोधन पत्रावळींचे करी । केवळ निजलीलेनें ।। ९३ ।। शीत पडल्या दृष्टीप्रत । तें मुखी उचलुनी घालीत । हे करण्याचा हाच हेत । अन्न परब्रह्म कळवावया ।। ९४ ।। कां कीं गर्जोन सांगे श्रुती । अन्न हेंच ब्रह्म निगुती । ''अन्नम् ब्रह्मेति'' ऐसी उक्ती । उपनिषदांठायीं असे ।। ९५ ।। त्याची पटवावया खूण । शितें वेंचती दयाघन । त्याचा सामान्य जनालागून । भावार्थ तो कळला नसे ।। ९६ ।। बंकटलाल आगरवाला । होता रस्त्यानें चालला । त्याने हा प्रकार पाहिला । आपल्या त्या स्नेह्यासह ।। ९७ ।। दामोदरपंत कुलकर्णी । त्याच्या स्नेह्याचे नांव जाणी । दोघें तो प्रकार पाहोनी । आश्चर्यचकित जाहले ।। ९८ ।। आणि एकमेकांप्रत । बोलूं लागले ऐसें सत्य । कीं याची करणी विपरीत । वेड्यापरी दिसतसे ।। ९९ ।। हा अन्नार्थी जरी असतां । तरी पात्र मागून घेता । देविदासही याते देता । कां की तोही सज्जन ।। १०० ।। द्वारीं आलेला याचक । लावीं ना सुज्ञ परत देख । कांही न चाले तर्क । कृतीवरूनी याच्या ह्या ।। १ ।। बंकटलाल म्हणे पंतासीं । ऐसेच उभे रस्त्यासी । आपण राहूं यत्कृतीसी । अजमावयाकारणें ।। २ ।। खरे साधू पिशापरी । जगीं वागती वरवरी । ऐसी व्यासाची वैखरी । बोलली आहे भागवतात ।। ३ ।। कृतीनें हा दिसे वेडा । परी वाटे ज्ञानगाडा । वा विमल ज्ञानाचा हुडा । असावा कीं प्रत्यक्ष ।। ४ ।। ऐसा विचार परस्पर । करूं लागले साचार । रत्न असता समोर । पारखी तोच जाणे त्या ।। ५ ।। पथे हजारो लोक गेले । परी न कोणी पाहिले । या दोघांवांचून भले । याचा विचार करा हो ! ।। ६ ।। हिरे गारा एक्या ठायीं । मिसळल्या असती जगा ठायीं । पारखी तो निवडून घेई । गार टाकून हिऱ्यातें ।। ७ ।। प्रथमता तो पुढे झाला । बंकटलाल आगरवाला । गजाननासी विचारण्याला । विनयानें येणें रीतीं ।। ८ ।। ह्या पत्रावळीच्या शोधना । कां हो करितां कळेना । क्षुधा असेल आपणां । तरी तरतूद करूं अन्नाची ।।९ ।। त्यानें ऐसें विचारिलें । परि न उत्तर मिळालें । नुसतें वरी पाहिलें । उभयतांच्या मुखाकडे ।। ११० ।। तो सतेज कांती मनोहर । दंड गर्दन पिळदार । भव्य छाती दृष्टि स्थिर । भृकुटी ठायीं झाली असे ।। ११ ।। निजानंदी रंगलेला । ऐसा योगी पाहिला । मौनेंच नमस्कार केला । चित्तीं संतोष पावोनियां ।।१२।। देविदासबुवासी । सांगू लागले प्रेमेसीं । तुम्ही पात्र वाढून वेगेंसी । आणा एक बाहेर ।। १३ ।।

देविदासें तैसें केलें । पक्कान्नांनीं भरलेले । पात्र आणून ठेविलें। द्वारासमोर स्वामींपुढे ।। १४ ।। ठेविलेल्या पात्रावरी। भोजना बैसली समर्थस्वारी । चवी न कशाची अंतरी । अणुमात्र उरली असे ।। १५ ।। अनुपम ब्रह्मरसाला। जो पिऊन तृप्त झाला । तो कां मागतो गुळवण्याला। मिटक्या मारीत बैसेल ? ।। १६ ।। जो सार्वभौम नृपवर। झाला असे साचार । अशा नरासी जहागीर। मिळाल्यासी प्रेम नुपजे ।। १७।। अवघीं पक्कान्नें एक केलीं । आवडनिवड नाहीं उरली। जठराग्नीची तृप्ती केली । दोन प्रहरच्या समयाला ।। १८ ।। बंकटलाल तें पाहून। पंताशी करी भाषण । ह्या वेडा म्हणालो आपण । ती नि:संशय झाली चुकी ।। १९ ।। सुभद्रेसाठी द्वारकेला। अर्जुन ऐसाच वेडा झाला । व्यवहाराचा विसर पडला। करूं लागला भलभलतें ।। १२० ।। तैसाच हा ज्ञानजेठीं। मुक्तिरूप सुभद्रेसाठीं । वेडा झाला कसवटी । याची आता घेणें नको ।। २१ ।। धन्य आपुले शेगांव। दृष्टी पाहिला योगीराव । निरिच्छा हा जहागीरगांव । दिला हरीने जयाला ।। २२ ।। सूर्य माध्यान्हीं आला । भाग भूमीचा तप्त झाला । पांखरेही आश्रयाला। जाऊन बैसलीं वृक्षावरी।। २३।। ऐशा भर उन्हात । हा बैसला आनंदात । हा ब्रह्मची होय साक्षात् । भय ना कशाचें उरलें या।। २४ ।। हा जेवला यथेच्छपणीं। तुंब्यामध्ये नाहीं पाणी । तें पंता यालागुनी। आपण देऊं आणून ।। २५।। पुसूं लागले दामोदर। तुंब्यामध्ये नाहीं नीर । मर्जी असल्या हा चाकर। पाणी द्याया तयार असे ।। २६ ।। ऐसे शब्द ऐकिले। समर्थांनी हास्य केले । उभयतांसी पाहून वदले। तें ऐका सांगतो ।। २७ ।। तुम्हां गरज असेल जरी। तरी आणून घाला वारी । एक ब्रह्म जगदांतरीं । ओतप्रोत भरलें असें।। २८।। तुम्ही आम्ही भेद तेथ। नाहीं उरला यत्किंचित। परी जगव्यवहार सत्य । आचरिला पाहिजे।। २९।। अन्न भक्षिले देहानीं । म्हणून त्या पाहिजे पाणी। हा व्यवहार चतुरांनी । अवश्य पाहिजे जाणिला।। १३०।। म्हणून तुमच्या चातुर्यासी। गरज असल्या तुम्हां साची। तरतूद करा पाण्याची। म्हणजे अवघें संपलें।। ३१।। हें भाषण ऐकतां । दोघे हर्षले तत्त्वतां। बंकटलाल म्हणे पंता। आपुलें आहे भाग्य धन्य।। ३२।। पाणी आणण्या दामोदर । घरांत गेले साचार । तो इकडे प्रकार। काय घडला तो ऐका ।। ३३।। कुपाचिया शेजारीं । हाळ होता निर्धारीं। जेथें जनावरें सारीं । पीत होतीं पाण्याला ।। ३४।। तेथें जाऊन पाणी प्याले। तृप्ततेचे ढेकर दिलें। तों इतक्यात घेऊन आले। पंत पाणी गडव्यांत ।। ३५।। हां हां तें गढूळ पाणी । समर्था न

लावा वदनीं । ते जनावरांलागुनी । योग्य आहे प्यावया ।। ३६ ।। मीं हें पहा आणिलें नीर । गोड निर्मळ थंडगार । वासित केलें साचार । वाळा घालून यामध्यें ।। ३७ ।। ऐसें भाषण ऐकतां । महाराज वदले तत्त्वतां । व्यावहारिक अवघ्या कथा । ह्या न सांगा आम्हां तुम्ही ।। ३८ ।। हें अवघे चराचर । ब्रह्मे व्याप्त साचार । तेथें गढूळ, निर्मळ, वासित नीर । हे न भेद राहिले ।। ३९ ।। पाणी तरी तोच आहे । निर्मळ गढूळ तोच पाहे । सुवास कुवास दोन्ही हें । रूप त्याचें नि:संशय ।। १४० ।। पिणाराही वेगळा । त्यापासून ना निराळा । ईश्वराची अगाध लीला । ती कळे या नरजन्मीं ।। ४१ ।। तें दिलें टाकून । व्यवहारीं गोविलें मन । यांचेच करा सदा मनन । कशापासून जग झालें ।। ४२ ।। ऐसी ऐकतां समर्थवाणी । दोघे गेले गहिवरोनि । अनन्यभावें समर्थचरणीं । लोळावया तयार झाले ।। ४३ ।। तो त्यांचा जाणोन हेत । महाराज निघाले पळत पळत । वायूच्या त्या गतिप्रत । अडथळा जगीं कोण करी ? ।। ४४ ।। या पुढील कथा पाही । निवेदन होईल द्वितीयाध्यायीं । अवधान द्यावें लवलाही । त्या श्रवण करावया ।। ४५ ।। हा श्रीगजानन विजय ग्रंथ । आल्हादावो भाविकांप्रत । हेच विनवी जोडोन हात ।। ईश्वरासी दासगणू ।। १४६ ।। श्रीहरिहरार्पणमस्तु । शुभं भवतु ।।

।। इति श्रीगजानन विजय ग्रंथस्य प्रथमोऽध्याय: समाप्त: ।।

# अध्याय दुसरा प्रारंभ

श्रीगणेशायनमः ।। जयजय अज अजिता सर्वेश्वरा । हे चंद्रभागातटविहारा । पूर्णब्रह्मा रुक्मिणीवरा। दीनबंधो पाहि माम् ।। १ ।। तुझ्या वशिल्यावांचून। अवघेच देवा आहे शीण । कुडीमाजीं नसल्या प्राण । कोण विचारी मढ्यातें ।। २ ।। सरोवराची दिव्य शोभा । तोयामुळें पद्मनाभा । रसभरीत आंतला गाभा । टरफलातें महत्त्व आणी ।। ३ ।। तुझी कृपा त्याच परी । शरणांगतातें समर्थ करी । पाप ताप दैन्य वारी । हेंच आहे मागणें ।। ४ ।। मागले अध्यायी झालें कथन । समर्थ गेले निघून । तेणें बंकटलाला लागून । हुरहूर वाटूं लागली ।।५।। गोड न लागे अन्नपाणी । समर्थांचा ध्यास मनीं । न हाले दृष्टिपासोनी । गजाननाचे रूप तें ।। ६ ।। जिकडे पहावे तिकडे भास । होवो लागला त्यांचा खास । याचें नांव श्रोते ध्यास। उग्या नसती पोरचेष्टा ।। ७ ।। चुकलेल्या धेनूची । वत्स शुद्धि करी साची । तैसी बंकटलालाची । स्थिती झाली विबुध हो ।। ८ ।। हें हितगुज सांगावया । जागा नव्हती कोठें तया । वडिलांपासीं बोलावया। छाती त्याची होईना ।। ९ ।। ऐशा रीति चित्ती भलें । विचाराचें काहूर झालें । शेगांव अवघें धुंडाळिलें। परी न पत्ता लागला ।।१० ।। घरीं येतां वडील पुसती । भवानीराम सन्मती । बाळा तुझी आज वृत्ती । कां रे झाली चंचळ ।। ११ ।। चित्तीं उत्साह दिसेना। वदनीं दिसे म्लानपणा। ऐशा असह्य यातना । होती कशाच्या सांग मज ! ।। १२।। तूं पोऱ्या तरणा ज्वान । नाहीं कशाची तुला वाण। ऐसें साच असोन । चिंतातूर दिसतोसी ।।१३।। किंवा शरीरीं कांही व्याधी । होतसे ती सांग आधीं। चोरून पुत्र ठेवी न कधीं। गोष्ट कोणती पित्याला ।। १४ ।। कांही तरी सांगून । केलें पित्याचें समाधान। पुन्हा शोधाकारण । फिरूं लागला शेगांवीं ।।१५।। बंकटलालाचे शेजारीं । एक होते सदाचारीं । घरीं होती जमेदारी । परी अभिमान नसे त्याचा ।। १६ ।। ते देशमुख रामाजीपंत। वयानें वृद्ध अत्यंत । बंकटलालाने इत्थंभूत । हकीकत त्यांना निवेदिली ।।१७।। ते बोलले बंकटलाला। तुझा वृत्तान्त मी ऐकिला । तूं जो पुरुष कथिसी मला। तो योगी असावा कोणीतरी।। १८ ।। योग्यावांचुनी ऐशा क्रिया । मिळती न कोठें पाहावया । पूर्वसुकृता वांचोनिया। होणें न दर्शन अशांचें ।। १९ ।। तूं घेतलें दर्शन । जन्म तुझा धन्य धन्य । भेटता ते तुजलागून ।

ने मलाही दर्शना ।। २० ।। ऐशा स्थितीत दिवस चार । गेले निघून साचार । बंकटलालासी तीळभर । विसर न पडे तयाचा ।। २१ ।। गोविंदबुवा[1] टाकळीकर । होते एक कीर्तनकार । ज्यांच्या कीर्तनीं शारंगधर । प्रसन्नचित्त होतसे ।। २२ ।। लौकिक यांचा वऱ्हाडांत । होता मोठ्या प्रमाणांत । ते आले फिरत फिरत । कीर्तन कराया शेगांवी ।।२३।। शंकराच्या मंदिरीं । झाली कीर्तनाची तयारी । धांवो लागल्या नरनारी । कीर्तन ऐकायाकारणें ।। २४ ।। बंकटलालही तेथें आला । कीर्तन श्रवणासाठी भला । मध्ये शिंपी भेटला । पितांबर नाम ज्याचें ।। २५ ।। हा शिंपी पितांबर । भोळा भाविक होता फार । त्यासी समर्थांचा समाचार । बंकटलालें कथन केला ।। २६ ।। दोघे कीर्तना चालले । तों अवचित समर्थ पाहिले । मागल्या बाजूस बसलेले । फरसावरी तेधवां ।। २७ ।। मग कशाचें कीर्तन । गेलें उभयतां धांवून । जेवीं द्रव्य – घटातें पाहून । कृपण जाय हपापोनी ।। २८ ।। वा चातकाते स्वातिघन । वा मोरासी मेघदर्शन । किंवा तो रोहिणीरमण । चकोर पाहाता आनंदें ।।२९।। तैसें उभयतांसी झालें । दूर उभे राहिले । विनयानें बोलू लागले । कांही आणूं का खावया ? ।। ३० ।। महाराज बोलले त्यावरी । तुला गरज असेल जरी । आण झुणका भाकरी । माळणीच्या सदनातून ।। ३१ ।। बंकटलाले सत्वरीं । चून[2] अर्धी भाकरी । आणोन ठेविली हातावरी । तया योगेश्वराच्या ।।३२।। चून भाकरी खात खात । वदले पितांबरासी समर्थ । जा जावोनी ओढ्याप्रत । तुंबा भरोनी आण पाणी ।।३३।। पितांबर बोले गुरुराया। ओढ्यास पाणी अल्प सदया । पाण्यात तुंबा बुडावया । मुळीं नाहीं अवसर ।।३४।। इतुकें असुन तें पाणी । खराब केलें गुरांनी । तेवीं जाणाऱ्या येणाऱ्यांनीं । नाहीं पिण्याच्या योग्य तें ।।३५।। मर्जी असल्या दुसरीकडून । पाणी आणितो तुंबा भरून । तैं बोलले गजानन । दुसरें पाणी आम्हां नको ।।३६।। नाल्याचेच आण पाणी । आंत तुंबा बुडवोनी । उगीच ओंजळी – ओंजळींनीं । तुंब्यात पाणी भरूं नको ।।३७।। तुंबा घेऊन पितांबर । तात्काळ गेला नाल्यावर । तुंबा भरेल ऐसे नीर । कोठें न त्यानें पाहिलें ।।३८।। तळवे पदाचे भिजतील । इतुकेंच तेथें होते जल । करून हातांची ओंजळ । तुंब्यात पाणी भरणें नसे ।।३९।। ऐसी झाली आड विहीर । चिंतावला पितांबर । हिय्या करून अखेर । तुंबें स्पर्श केला जला ।।४०।। तो ऐसें झाले अघटित । तुंबा ठेवावा जेथ जेथ । तो बुडे तेथ तेथ । खळगा पडून ओढ्याला ।।४१।। नाल्याचें घाण जीवन । तुंब्यांत स्फटिकासमान । आलें तैंसें पाहोन । शिंपी चित्तीं चकित झाला ।।४२।।

---

१. बार्शी टाकळी (अकोला) २. पिठले

तो म्हणे ही ऐसी स्थिती । कीं आज झाली निश्चिती । ती योगेश्वराची साच शक्ति । संशय येथें धरणें नको ।। ४३ ।। तुंबा आणून ठेविला । योगेश्वराचे सान्निध्याला । त्याचा समर्थे स्वीकार केला । झुणकाभाकर सेविल्यावर ।। ४४ ।। बंकटलालासी सुपारी । मागते झाले साक्षात्कारी । अरे माळीणीच्या भाकरीवरी । माझी सेवा करतोस कां ? ।।४५ ।। काढ सुपारी खिशातून । फोडोन देई मजकारण । तें ऐकतां समाधान । बंकटलालास झालें बहु ।।४६।। सुपारीच्या बरोबरी । दोन पैसे हातावरी । ठेवितां झाला व्याघ्रांबरी । दुदंडी तांब्याचे ।। ४७ ।। खडकु दुदंडी व्याघ्रांबरी । ही मुसलमानी नाणी सारी । चालत होती व्यवहारीं । तया वऱ्हाड प्रांतात ।। ४८ ।। पैशाप्रती पाहून । महाराज बोलले हांसोन । काय व्यापारी समजून । मजला तूं हें अर्पिसी ? ।। ४९ ।। हें नाणें तुमचें व्यवहारी । मला न त्याची जरुरी । भावभक्ति नाण्यावरी । संतुष्ट मी रहातसे ।।५०।। तें तुझ्याजवळ होतें । म्हणून भेटलो पुन्हां तूं तें । याचा विचार चित्तातें । करी म्हणजे कळेल ।। ५१ ।। जा आतां कीर्तन । दोघे जाऊन करा श्रवण । मी लिंबापाशीं बैसोन । कथा त्याची ऐकतो ।। ५२ ।। दोघे कीर्तनाप्रती आले । महाराज लिंबापाशीं बैसले । गोविंदबुवाचें सुरू झालें । आरंभीचें निरूपण ।। ५३ ।। निरूपणासी भागवताचा । घेतला होता एक साचा । श्लोक एकादश स्कंधाचा । हंसगीतामधील ।। ५४ ।। बुवांनी पूर्वार्धा विशद केलें । त्याचा उत्तरार्ध समर्थ वदले । तें ऐकोन घोटाळले । गोविंदबुवा मनांत ।। ५५ ।। हा उत्तरार्ध वदणारा । पुरुष अधिकारी दिसतो खरा । जा त्या घेऊन मंदिरा । या हो कीर्तन श्रवणास ।। ५६ ।। बंकटलाल पितांबर । आणिक मंडळी निघाली इतर । समर्थासी साचार । कीर्तनासी आणावया ।।५७।। केली विनंती अवघ्यानीं । श्रोते अती विनयानीं । परी बसल्या जागेपासोनी । मुळीं न महाराज हलले हो ।। ५८ ।। गोविंदबुवा अखेर । येवोन जोडीते झाले कर । कृपा करावी एक वार । चला शिवाच्या मंदिरीं ।।५९।। तुम्ही साक्षात् शंकर । बरें न बसणें बाहेर । धन्यावांचून मंदिर । शून्य साच समर्था ।। ६० ।। पूर्वजन्मीचें पुण्य भलें । माझें आज उदेलें । म्हणून हे दृष्टी पडले । साक्षात् चरण शिवाचे ।। ६१ ।। कीर्तनाची फलप्राप्ती । झाली आज मजप्रती । वेळ न करा गुरुमूर्ती । चला मंदिरीं माझ्यासवें ।। ६२ ।। ऐसें गोविंदबुवा बोलतां । समर्थ वदले तत्त्वतां । ठेवी एकवाक्यता । भाषणीं गोविंदा लवमात्र ।। ६३ ।। तूं इतक्यांत प्रतिपादिलें । अवघें ईश्वरें व्यापिलें । आंत बाहेर कांहीं न उरलें । मग हा ऐसा हट्ट कां ? ।। ६४ ।। जें जें जयानें सांगावें । तें तें त्यानें आचरावें । शब्दच्छलासीं न करावें ।

साधकानें केव्हांही ! ।। ६५ ।। भागवताचा श्लोक सांगसी । आणि त्याच्या विरुद्ध वागसी । कथेकऱ्याची रीत ऐसी । बरवी नव्हे गोविंदा ।। ६६ ।। पोटभऱ्या कथेकरी । तूं न व्हावे भूमीवरी । जा कीर्तन समाप्त करी । मी येथून ऐकतों ।।६७।। बुवा कीर्तनीं परत आले । गर्जोन अवघ्या बोलिले । तुमच्या शेगांवी अमोल आलें । रत्न हे त्या सांभाळा ।। ६८ ।। हें न शेगांव राहिलें । पंढरपूर खचीत झालें । चालते बोलते येथ आले । साक्षात् हे पांडुरंग ।। ६९ ।। यांची तरतूद ठेवावी । सेवा यांची करावी । यांची आज्ञा मानावी । वेदवाक्यापरी हो ।। ७० ।। तरीच तुमचें कल्याण । होईल नि:संशय करून । अनायासें हें निधान । जोडले त्या दवडूं नका ।। ७१ ।। कीर्तन अवघें सांग झालें । लोक आपुल्या घरां गेले । बंकटलाल घरी आले । चित्तीं हर्ष माईना ।।७२।। आपुल्या सन्माननीय पित्यासी । हकीकत कथिली प्रेमेसी । बाबा आपुल्या घरासी । गजानन आणा हो ! ।। ७३ ।। पुत्रानें जें कथन केलें । ते भवानीरामें ऐकिलें । आणि प्रेमें ऐसें वदले । तूंच ये त्या घेऊन ।। ७४ ।। पित्याची मिळाली संमती । बंकटलाल हर्षे अती । म्हणें कधी भेटेल गुरुमूर्ती । मजला सदनीं आणावया ।। ७५ ।। पुढें माणिक चौकांत । चौथे दिवशी सद्गुरुनाथ । भेटले बंकटलालाप्रत ।अस्तमानाचें समयाला ।। ७६ ।। दिनपति अस्ता गेला । इकडे बोध सूर्य उदेला । माणिक चौक प्राचीला । बंकटलालाच्या भाग्यानें ।।७७।। गुराखी घेऊन धेनूंस । येऊं लागले ग्रामास । समर्थांच्या आसपास । गाई जमूं लागल्या ।।७८।। त्या वाटले नंदसुत । आला येथें साक्षात् । वृक्षावरी करितात । पक्षी किलकिलाट आनंदे ।। ७९ ।। दिवाबत्तीची तयारी । दुकानदार करिती खरी । अशा वेळीं आला घरीं । घेऊन बंकट महाराजा ।। ८० ।। पित्यानें मूर्ति पाहतां क्षणीं । अति आनंद झाला मनीं । नमन साष्टांग केलें चरणीं । पाटावरीं बैसविलें ।। ८१ ।। आणि विनविलें जोडोन हात । कांही भोजन करा येथ । तुम्ही साक्षात् पार्वतीकांत । प्रदोष वेळीं आला या ।। ८२ ।। शिव आराधन प्रदोषकालीं । घडेल तो भाग्यशाली । ऐशी आहे ऐकिली । स्कंदपुराणी गोष्ट म्यां ।। ८३ ।। ऐसें म्हणोनि आणिलें । बिल्वपत्र तात्काळ भले । समर्थांच्या ठेविलें । परमभक्तीनें मस्तकीं ।। ८४ ।। करा येथें भोजन । ऐसे गेलों बोलून । परी स्वयंपाकाकारण । अवधी आहे कांहीसा ।।८५।। स्वयंपाक होईपर्यंत । हे न थांबले जरी येथ । तरी प्रदोषकालीं पार्वतीकांत । गेला उपासी घरांतूनी ।। ८६ ।। त्यास करूं कैसी तोड । ऐसें संकट पडलें जड । जनसमुदाय प्रचंड । जमला मौज पाहावया ।। ८७ ।। विचार केला अखेरीं । दुपारच्या पुऱ्या आहेत घरीं । त्याच ठेवोन तबकांतरी । पुढें

ठेवूं समर्थांच्या ।। ८८ ।। ते अवघेच जाणती । कपट नाहीं माझ्या चित्तीं । भावें भेटतो उमापती । ऐसा आहे सिद्धान्त ।। ८९ ।। मी शिळें आवर्जून । यांस घालीत नाहीं अन्न । शिवाय पक्क्या रसोईकारण । शिळें म्हणणें उचित नसे ।। ९० ।। चिंतिल्याप्रमाणें तयारी । तात्काळ त्यानें केली खरी । आणून ठेविलें समोरी । तबक एक समर्थांच्या ।।९१।। पुऱ्या बदाम खारका । केळीं मोसंबी मुळे देखा । भालाप्रती लाविला बुक्का । कंठी घातिला पुष्पहार ।। ९२ ।। गुरुमूर्ति प्रसन्न चित्तें । अवघें झाले सेविते । जें जें पडेल पात्रातें । तें तें खातीं भराभर ।।९३।। उदरीं सुमारें तीन शेर । अन्न साठविलें साचार । तेथेंच राहिलें रात्रभर । श्रीगजानन महाराज ।। ९४ ।। बंकटलालें दुसरें दिवशी । मंगलस्नान समर्थांसी । घातलें असे अतिहर्षी । तो न थाट वर्णवें ।। ९५ ।। घागरी सुमारे शंभर । उष्णोदकाच्या साचार । पाणी घालती नारीनर । मन मानेल ऐशा रीतीं ।।९६।। कुणी शिकेकाई लाविती । कुणी साबण घेऊनी हातीं । समर्थांचे घासीती । पदकमळ आवडीनें ।।९७।। कोणी दवना कोणी हीना । कोणी चमेली तेल जाणा । कोणी बेलियाच्या मर्दना । करूं लागले निजहस्तें ।।९८।। अंगराग नानापरी । त्यांचे वर्णन कोण करी । बंकटलालाचिया घरीं । उणे नव्हतें कशाचें तें ।। ९९ ।। स्नानविधी संपला । पितांबर तो नेसविला । अति सन्मानें बैसविला । योगीराज गादीवरी ।। १०० ।। भाली गंध केशरी । गळ्यांत हार नानापरी । कोणी तुळशीमंजरी । वाहूं लागले शिरावर ।। १ ।। नैवेद्य नानापरीचे । झाले समर्थार्पण साचे । भाग्य त्या बंकटलालाचें । खचित आलें उदयाला ।। २ ।। तें बंकटलालाचें घर । झालें द्वारका साचार । तया दिनीं सोमवार । वार शिवाचा होता हो ।।३।। अवघ्या मंडळींनी आपुले । मनोरथ ते पूर्ण केले । एक मात्र त्यातून उरले । इच्छाराम शेटजी ।।४।। हा चुलत बंधु बंकटाचा । होता भाविक मनाचा । भक्त असे शंकराचा । त्यासी ऐसें वाटले ।। ५ ।। आज आहे सोमवार । मसी उपास साचार । घरां प्रत्यक्ष शंकर । चालते बोलते आलेच कीं ।। ६ ।। त्यांची पूजा अस्तमानीं । यथासांग करोनि । करूं पारणा ऐसी मनीं । इच्छा त्यानें धरली असे ।। ७ ।। तों झाला अस्तमान । मावळलासे नारायण । इच्छारामें केलें स्नान । प्रदोष वेळा लक्षुनी ।। ८ ।। पूजासाहित्य घेऊन । साधु जे कां गजानन । त्यांचें केलें पूजन । परम प्रेमें करोनि ।।९।। आणि विनंती केली वरी । झालें आहे दुपारीं । आपुलें ते भोजन जरी । परी आत्तां कांहीं खावें ।। ११० ।। आपण जेवल्यावांचून । मी नाहीं घेणार अन्न । आहे मजला उपोषण । सोमवारचें

गुरुराया ! ।। ११ ।। अवघ्या भक्तांचा हेत पुरला । माझा मात्र राहिला । तो पाहिजे पुरविला । तुम्ही कृपा करून ।। १२ ।। जन कुतूहल दृष्टींनी । पाहूं लागले तया स्थानी । इच्छाराम तो घेवोनी । नैवेद्य आला परातींत ।। १३ ।। आंबेमोहर तांदळाचा । दोन मुदी भात साचा । नानाविध पक्कान्नांचा । थाट केला तयानें ।। १४ ।। जिलबी राघवदास मोतीचूर । करंज्या अनारसे घीवर । शाखांचे नाना प्रकार । वर्णन करावे कोठवरी ? ।। १५ ।। अगणित चटण्या कोशिंबिरी । वाडगा दह्याचा शेजारीं । तुपाची ती वाटी खरी । ओदनाच्या सव्य भागा ।। १६ ।। चार मनुष्यांचे अन्न । ऐसा नैवेद्य परिपूर्ण । समर्थांपुढें आणून । ठेवला इच्छारामानें ।। १७ ।। पाहोन त्या नैवेद्यासी । महाराज बोलले आपणासी । खातो खातो अहर्निशीं । ऐसें बोलसी गणप्या ।। १८ ।। खा हें आतां अवघें अन्न । अघोऱ्या न करी अवमान । पाहों आलें अवघे जन । तुझ्या अघोर वृत्तीला ।। १९ ।। महाराज भोजना बैसलें । अन्न अवघें पार केलें । पात्रीं न काहीं ठेंविलें । मीठ लिंबू तेही पाहा ।। १२० ।। आग्रहाचा प्रकार । काय होतो अखेर । हें दावण्या साचार । कौतुक केलें गुरुवरें ।।२१।। खणाणून उलटी झाली । खाल्ल्या अन्नाची ती भली । ऐसीच गोष्ट होती केली । श्रीरामदासें एकदां ।। २२ ।। खिरीची झाली वासना । रामदासाचीया मना । तिची खोड मोडण्या जाणा । आकंठ खीर प्याले की ।। २३ ।। उलटी होतां परत । ती भक्षूं लागले सद्गुरुनाथ । श्रीरामदासस्वामी समर्थ । वासनेसी जिंकावया ।।२४।। तैसें लोकाग्रहाला । घालावयासी शीघ्र आळा । हा उलटीचा प्रकार केला । अंगीं बळ असूनिया ।। २५ ।। सत्पुरुषाचें आचरण । पुढील पिढीला साधन । होतें कराया संरक्षण । निसर्गाच्या धर्माचें ।। २६ ।। तेंच समर्थें येथें केलें । लोकांलागीं सुचविलें । आग्रह करणें न चांगलें । तो विपरीत फळ देई ।।२७ ।। असो उलटी झाल्यावरी । जागा केली साफ सारी । नेवोन बैसविले पहिल्या परी । स्नान घालोन महाराजा ।। २८ ।। नरनारी दर्शनें घेती । महाराजांची आनंदवृत्ती । तो भजन करण्याप्रती । दिंड्या आल्या दोन तेथें ।। २९ ।। आवाज ज्यांचे सुस्वर । खडे पहाडी मनोहर । विठ्ठलाचा नामगजर । करूं लागलें आवडीनें ।। १३० ।। इकडे महाराज आसनीं । होते ते वदले वदनीं । भजनाचिया मिषांनीं । ''गणगण गणांत बोतें'' ।। ३१ ।। हेंच सर्वदा त्यांचें भजन । करिती टिचक्या वाजवून । ऐसा झाला आनंद जाण । रात्रभरीं ते ठायां ।।३२ ।। ''गण गण'' हें त्यांचें भजन । हमेशा चाले म्हणून । लोकांनीं दिलें अभिधान । गजानन हें तयाला ।। ३३ ।। जो स्वयंमेव ब्रह्म झाला । नांवरूप कोठून त्याला ? । नामारूपांचा गलबला । प्रकृतीच्या आश्रयास

।। ३४ ।। अस्ति–भाति–प्रिया ठायीं । योगेश्वर निमग्न राही । त्या आनंदा न वर्णवे कांहीं । त्याची उपमा त्यालाच असे ।। ३५ ।। आषाढीसी पंढरपूर । वा सिंहस्थीं गोदातीर । वा कुंभमेळ्यांसीं साचार । गर्दी होते हरिद्वारीं ।। ३६ ।। त्यापरी शेगांवांत । बंकटलालाच्या घरांत । लांबलांबून असंख्यात । जन येती दर्शना ।। ३७ ।। स्वामी समर्थ गजानन । हेच विठ्ठल नारायण । निश्चय विटेस ठेवून । पाय उभे राहिलें ।। ३८ ।। त्यांचें वचन गोदातीर । आनंद हा हरिद्वार । गजबजलें शेगांव नगर । सदन राऊळ बंकटाचें ।। ३९ ।। जो ब्रह्मपदा पोंचला । जात कोठून उरली त्याला ? । सूर्याचिया प्रकाशाला । अवघेंच आहे सारखें ।। १४० ।। नित्य यात्रा नवी येई । समाराधना होती पाही । त्यांतें वाणितां शेषही । थकून जाईल नि:संशय ।।४१।। तेथें माझा पाड कोण । मी कीटकासमान । अवघें वदे गजानन । निमित्त करून माझ्या मुखा ।। ४२ ।। समर्थांची दिनचर्या । सांगतों थोडी या ठायां । अगाध त्यांचें चरित्र गाया । मज पामरा मती नसे ।। ४३ ।। कधीं करावें मंगलस्नान । कधीं हाळात जाऊन । कधीं कधीं प्राशन । करावें गढूळ जलाचें ।। ४४ ।। त्यांच्या दिनचर्येचा । नियम नव्हता एक साचा । प्रकार वायूच्या गतीचा । न ये ठरवितां कोणासी ।। ४५ ।। चिलमीवरी प्रेम भारी । ती लागे वरच्यावरी । नव्हती आसक्ति तिच्यावरी । तें केवळ कौतुक ।। ४६ ।। असो आतां पुढीलाध्याया । भाव ठेवा ऐकावया । आली पर्वणी साधावया । वेळ करूं नका हो ! ।। ४७ ।। हें श्रीगजाननचरित्र । आदर्श होवो भाविकांप्रत । हेंच विनवी जोडोन हात । दासगणू ईशातें ।। १४८ ।। श्रीहरिहरार्पणमस्तु ।। शुभं भवतु ।। ।। इति द्वितीयोऽध्याय: समाप्त: ।।

।। इति श्रीगजाननविजय ग्रंथस्य द्वितीयोऽध्याय: समाप्त: ।।

# अध्याय तिसरा प्रारंभ

श्रीगणेशायनमः ।। जय जय सच्चिदानंदा श्रीहरी । कृपा करावी लौकरी । तुम्ही पदनताच्या वरी। कधीं न कठोर झालात ।। १ ।। तूं करुणेचा सागर। तूं दीनजनांचे माहेर । तूं भक्तासी साचार। कल्पतरू वा चिंतामणी ।। २ ।। ऐसा तुझा अगाध महिमा । संत गाती राघवा रामा । दासगणूसी पुरुषोत्तमा । पावा वेळ करूं नका ।। ३ ।। असो बंकटलाला घरीं । राहाते झाले साक्षात्कारी । दीनदुबळ्यांचे कैवारी । श्रीगजानन महाराज ।। ४ ।। लांबलांबोनि भक्त येती । समर्थांतें वंदिती। मधु तेथें माश्या जमती । न लगे करणें आमंत्रण ।। ५ ।। एके दिनी काय झालें। तें आतां सांगतों वहिलें। महाराज होते बसलेले । निजासनीं आनंदांत ।। ६ ।। ती प्रभातीची होती वेळा। प्राचीप्रांत ताम्र झाला । पक्षी किलकिलाटाला । करूं लागलें वृक्षावर ।। ७ ।। कुक्कुटाचे होती स्वन । मंद शीत वाहे पवन । वृद्ध करिती नामस्मरण । शय्येवरी बैसोनिया ।। ८ ।। उदयाचलीं नारायण । येऊं पाहे हर्षे करून। तेणें तम पलायन । करूं लागला कंदरीसी ।। ९ ।। परम भाविक सुवासिनी । रत सडासंमार्जनीं । वत्स धेनूस पाहोनी । तोडूं लागलीं चऱ्हाटें ।। १० ।। ऐशा त्या रम्य वेळेस । एक साधु शेगांवास । येता झाला दर्शनास। श्रीगजानन साधुंच्या ।। ११ ।। तो भिकार गोसावी । मानमान्यता त्याची राहावी । कोठोनिया सांगा बरवी। श्रीमंतांच्या मंडळींत ? ।। १२ ।। भगवी चिंधी डोक्यास । झोळी वाम बगलेस । होती एक नेसण्यास । फाटकीसी लंगोटी ।। १३ ।। मृगाजिनाचा गुंडाळा । पाठीवरी होता भला । ऐसा गोसावी बैसला । कोपऱ्यांत एकीकडे ।। १४ ।। दर्शनासी भीड फार। होवो लागली साचार । अशा स्थितीत मिळणार । सवड कशी त्या गोसाव्यास ? ।। १५ ।। तो ठायींच बैसोन । करूं लागला चिंतन । म्हणे समर्थांचे चरण । दृष्टि पडणें कठीण मला ।। १६ ।। समर्थांचा लौकिक भला । मी काशीत ऐकला । आवडीनें नवस केला। भांग स्वामींस अर्पिण्याचा ।। १७ ।। तो मम हेतु मनांत । जिरून जाया पाहे येथ। या श्रीमान मंडळींत। माझ्या नवसास कोण पुसे ? ।। १८ ।। गांजाचे नांव काढितां । लोक मजला देतील लाथा । मी तो आलों फेडण्याकरितां । नवस गांजाचा शेगांवी ।। १९ ।। माझ्या नवसाची ती मात । सांगू तरी कवणाप्रत? । येथें एकही ना दिसत। प्रेमी या शांभवीचा ।। २० ।। जी वस्तु ज्या

आवडे खरी । तिचाच तो नवस करी । आणि मानी सर्वतोपरी । हीच वस्तु उत्तम ।। २१ ।। ऐसे नाना विचार । गोसावी करी साचार । झाला होता परम आतुर । दर्शन घ्याया समर्थांचे ।। २२ ।। तें त्याचे मनोगत । जाणते झालें समर्थ । बोलतें झालें इतरांप्रत । आणा काशीचा गोसावी ।। २३ ।। तो पाहा त्या कोपऱ्याला । आहे बिचारा दडून बसला । हे ऐकतां आनंद झाला । गोसाव्याला परमावधी ।। २४ ।। आणि बोलला मनांत । त्रिकालज्ञ हे खरेच संत । मी जें बोललों मनांत । तें सर्व यांनीं जाणलें ।। २५ ।। ज्ञानेश्वरींत षष्ठाध्यायीं । जी गोष्ट कथिली पाही । कीं स्वर्गलोकीच्या कथा त्याही । समजतात योगीवरा ।। २६ ।। त्याचें आलें प्रत्यंतर । मला येथें साचार । धन्य धन्य हा साधुवर । त्रिकालज्ञ महात्मा ।। २७ ।। न बोलतां माझा नवस । जाणतील हें पुण्यपुरूष । त्याचें प्रत्यंतर यावयास । अवधी उरला थोडका ।। २८ ।। मंडळींनी गोसाव्याला । पुढें आणोन उभा केला । तो महाराज वदले तयाला । काढ झोळीची पोटळी ।। २९ ।। जी तीन महिनेपर्यंत । रक्षण केलीस झोळींत । त्या पोटळींचे आज येथ । होवो दे गा पारणें ।। ३० ।। गोसावी पदीं लागला । गहिवर त्यासी दाटला । गडबडा लोळूं लागला । बालकापरी स्वामींपुढे ।। ३१ ।। महाराज म्हणती गोसाव्यास । पुरे आतां उठोन बैस । पोटळीच्या बुटीस । काढ बाहेर झोळीच्या ।। ३२ ।। नवस केलास ते वेळीं । नाहीं लाज वाटली । आणि आतां कां ही लाविली । चाळवाचाळवी निरर्थक ।। ३३ ।। गोसावी होता महाधूर्त । तो बोलला भीत भीत । जोडोनिया दोन्हीं हात । ऐसें नम्र वाणीनें ।। ३४ ।। मी बुटी काढितों । नवस आपुला फेडितों । परि मागणें मागतो । एक तें द्या दीनाला ।। ३५ ।। आठवण माझ्या बुटीची । नित्य रहावी आपणा साची । हीच इच्छा मानसींची । आहे ती पूर्ण करा ।। ३६ ।। तुम्हां बुटीचें प्रयोजन । नाहीं हें मी जाणतो पूर्ण । परी बालकाची आठवण । राहाया बुटी स्वीकारा ।। ३७ ।। भक्त जी जी इच्छा करीत । ती ती ज्ञाता पुरवीत । अंजनीचा वृत्तान्त । आणा मनीं आपुल्या ।। ३८ ।। अंजनी होती वानरी । तिनें प्रार्थिला त्रिपुरारी । कीं तुम्हीं यावें माझ्या उदरीं । वानर होऊन शंकरा ।। ३९ ।। तें हरानें मानिलें । महारुद्र पोटीं आले । अंजनीचे पुरविले । मनोरथ चंद्रमौळींनीं ।। ४० ।। तेथें शंकराकारण । आड ना आलें वानरपण । तेवी माझ्या बुटीची आठवण । राहाया तीतें स्वीकारा ।। ४१ ।। त्यांतून तुम्ही कर्पूरगौर । साक्षात आहा शंकर । म्हणून बुटीचा अव्हेर । करू नको दयाळा ! ।। ४२ ।। ज्ञानवल्ली शंकरानें । म्हटलें आहे इजकारणें । ही इतरा आणील उणें । परि भूषण तुम्हांला

।। ४३ ।। महाराज किंचित् घोटाळले । परि अखेर होय म्हणाले । माय पुरवी बालक–लळे । वेडेवाकुडे असले जरी ।। ४४ ।। गोसाव्यानें बुटी काढली । हातावरी घेवोन धुतली । चिलमींत घालून पाजिली । पुण्यपुरूषा गजानना ।। ४५ ।। ऐसा बुटीचा वृत्तान्त । कथिलासे कारणासहित । तो आणून ध्यानात । विचार करणें प्रत्येकीं ।। ४६ ।। कांही दिवस राहोन । गेला गोसावी निघोन । आपणां धन्य मानोन । रामेश्वराकारणें ।। ४७ ।। ऐसी गांजाची पडली प्रथा । ते ठायीं तत्त्वतां । परी व्यसनाधीनता । न च आली समर्थातें ।। ४८ ।। पद्मपत्राचियेपरी । ते अलिप्त होते निर्धारी । न ये कोणास त्याची सरी । खरेंच अती थोर ते ।। ४९ ।। वेदऋचा अस्खलित । उदात्त–अनुदात्त स्वरांसहित । कधीं म्हणाव्या मुखीं सत्य । कधीं त्याचें नांव नसे ।। ५० ।। वेदाक्षरें पडतां श्रवणीं । साशंक व्हावें वैदिकांनी । याच एका अनुमानीं । गजानन होते ब्राह्मण ।। ५१ ।। कधीं गवयासमान । अन्य अन्य रागांतून । एकाच पदातें गाऊन । दाखवावें निजलीलें ।। ५२ ।। चंदन चावल बेलकी पतीया । प्रेम भारी या पदा ठाया । ते आनंदांत येवोनिया । वरच्यावरी म्हणावें ।। ५३ ।। कधीं गणगणाचें भजन । कधीं धरावें नुसतें मौन । कधीं राहावें पडून । शय्येवरी निचेष्टित ।। ५४ ।। कधीं वागावें पिशापरी । कधीं भटकावे कांतारीं । कधीं शिरावे जाऊन घरीं । एखाद्याच्या अवचीत ।। ५५ ।। असो त्या शेगांवांत । जानराव देशमुख विख्यात । होता त्याचा प्राणान्त । व्हावयाचा समय आला ।। ५६ ।। व्याधी शरीरी बळावली । शक्ति पार निघून गेली । प्रयत्नांची कमाल केली । वैद्यांनी ती आपुल्या ।। ५७ ।। नाडी पाहोन अखेर । आप्ता कळविला समाचार । प्रसंग आहे कठीण फार । नसे आशा वांचण्याची ।। ५८ ।। आम्ही प्रयत्न केले अती । परी यश ना आलें तिळरती । यांना आतां घोंगड्यावरती । काढोन ठेवा हेंच बरें ।। ५९ ।। तें ऐकता अवघे आप्त । दु:ख करिती अत्यंत । जानरावा आम्हांप्रत । सोडून तूं जाऊं नको ।। ६० ।। तुझ्याप्रीत्यर्थ नवस केले । नाना दैवतालागीं भले । परी न कोणी पावले । हाय हाय रे दुर्दैवा ।। ६१ ।। वैद्यानें टेकिले हात । प्रयत्न झाले कुंठित । आतां अखेरच्या यत्नाप्रत । करोन पाहूं एक वेळां ।। ६२ ।। बंकटलालाचिये घरीं । आहेत एक साक्षात्कारी । त्यांच्या योगें शेगांव नगरी । झाली प्रती पंढरपूर ।। ६३ ।। साधूने आणिल्या मनांत । काय एक नाहीं होत । सच्चिदानंदबाबाप्रत । ज्ञानेश्वरांनी उठविलें ।। ६४ ।। त्याचें पाहूं प्रत्यंतर ।। जा जा कोणी जोडा कर । नका करूं रे उगा उशीर । वेळ अंतसमयाची ।। ६५ ।। तें ऐकोन एक आप्त । आला

बंकटसदनाप्रत । जानरावाची हकीकत । बंकटलाला कथन केली ।। ६६ ।। जानराव देशमुखाचा । समय अंतकाळाचा । आला आहे जवळी साचा । म्हणून आलों तुम्हांकडे ।। ६७ ।। महाराजांचें चरणतीर्थ । द्या कृपा करोनी मजप्रत । तें तीर्थ नोहे अमृत । होईल वाटे जानरावा ।। ६८ ।। बंकटलाल म्हणे त्यावरी । ही गोष्ट न माझ्या करीं । तुम्ही करावी अत्यादरी । विनवणी आमुच्या वडिलाला ।। ६९ ।। जैसें त्याने सुचविले । तैसें आप्ते तात्काळ केले । भवानीरामा विनविलें । द्याया तीर्थ समर्थांचें ।। ७० ।। भवानीराम सज्जन । होता मनाचा दयाळु पूर्ण । दुसऱ्याचें दु:ख ऐकून । सज्जन तेच विव्हळ होती ।। ७१ ।। प्याल्यामध्यें भरून पाणी । समर्थांच्या लाविलें चरणीं । आणि केली विनवणी । तीर्थ देतो जानरावा ।। ७२ ।। समर्थें तुकाविली मान । तीर्थ पाजिलें नेऊन । जानरावाकारण । घरघर घशाची बंद झाली ।। ७३ ।। हात हालवूं लागला । किंचित् डोळा उघडिला । उतार पडूं लागला । तीर्थप्रभावें देशमुखासी ।। ७४ ।। तो पाहता प्रकार । आनंदले नारीनर । सत्पुरुषाचा अधिकार । आला कळून सर्वांसी ।। ७५ ।। मग औषधी बंद केली । तीर्थी भिस्त ठेविली । ज्या–योगें लाभती झाली । आरोग्यता जानरावा ।। ७६ ।। आठ दिवसांमाझारी । जानराव झाला पहिल्यापरी । भवानीरामाचिये घरीं । आला दर्शना समर्थांच्या ।। ७७ ।। पहा संतांचे चरणतीर्थ । साधनांत झाले अमृत । संत न ते साक्षात् । देव कलीयुगाचे ।। ७८ ।। येथें एक ऐसी शंका । उत्थान पावे सहज देखा । श्रीगजाननसारिखा । संत होता शेगांवी ।। ७९ ।। मग तो तेथें असतांना । गेले न पाहिजे कोणी जाणा । यमाजी पंताचीया सदना । परि हाच आहे कुतर्क ।। ८० ।। संत मृत्यु ना टाळिती । निसर्गाप्रमाणें वागती । परि संकटातें वारिती । आगंतुक असल्यास ते ।। ८१ ।। सच्चिदानंदबाबासी । ज्ञानेशें उठविलें नेवाशासी । परि ते अखेर आळंदीसी । देह ठेविते झाले हो ।। ८२ ।। याचें रहस्य इतुकेचि आहे । हें गंडांतर टाळिती पाहे । तें टाळणें कांहीच नोहे । अशक्य संत पुरुषाला ।। ८३ ।। मृत्यूचें तीन प्रकार । आहेत जगीं साचार । त्यांची नांवे क्रमवार । देतो तुम्हा कारणे ।। ८४ ।। आध्यात्मिक, आधिभौतिक । आणि तिसरा तो आधिदैविक । त्या तिघांमाजी बलिष्ठ देख । आध्यात्मिक मृत्यू असे ।। ८५ ।। आधिभौतिकाची तयारी । कुपथ्यानें होते खरी । नाना प्रकारच्या शरीरीं । व्याधि निर्माण होतात ।। ८६ ।। त्यांचा जोर झाल्यावर । मृत्यू येतो अखेर । त्या मृत्यूचा परिहार । करितां येतो औषधीनें ।। ८७ ।। मात्र औषधी देणारा । शास्त्रज्ञ असला पाहिजे पुरा । औषधीचा पसारा । आहे अवगत जयासी

।। ८८ ।। ऐसा वैद्य भेटल्यास । आधिभौतिकाचा होय नाश । तैसे आधिदैविकास । नवससायास घालविती ।। ८९ ।। हें गंडांतर रूपाचें । मृत्यू दोन प्रकारचे । भौतिक आणि दैविक साचे । हे आहेत ख्यात जगीं ।। ९० ।। मृत्यू जो कां आध्यात्मिक । तो कवणाच्यानें न टळे देख । पाहा अर्जुनाचा बालक । कृष्णासमक्ष पडला रणीं ।। ९१ ।। तैसा जानरावाचा । मृत्यू गंडांतर स्वरूपाचा । होता तो टाळिला साचा । समर्थतीर्थ देवोनिया ।। ९२ ।। म्हणजे गंडांतरा कारण । निवारिती साधुचरण । तेंच आलें घडोन । शेगांवामाझारीं ।। ९३ ।। कांहीं मृत्यु नवसांनीं । टाळिता येती या जनीं । परी तो नवस श्रद्धेनीं । केला पाहिजे विबुध हो ! ।। ९४ ।। श्रद्धा पूर्ण असल्यावरी । तीच मृत्यु टाळी खरी । श्रद्धाच अवघ्या माझारीं । सर्व बाजूंनी श्रेष्ठ असे ।। ९५ ।। चरणतीर्थ साधूंचें । तेंही टाळी मृत्यु साचे । वरील दोन प्रकारचे । परी तो साधु पाहिजे ।। ९६ ।। साधु असल्या वेषधारी । ऐसी न होय गोष्ट खरी । माती न होय कस्तुरी । हें ध्यानी असूं द्या ।। ९७ ।। षड्विकार धुतल्याविना । अंगी साधुत्व येईना । आणि साधुविण होईना । अघटित कृत्य केव्हांही ।। ९८ ।। म्हणून बहुरूप्याकारण । जपणे आहे अवश्य जाण । उगीच पाहून पिवळेपण । सोनें पितळेस मानूं नका ।। ९९ ।। गजानन नव्हते वेषधारी । ते पूर्ण साक्षात्कारी । म्हणून तीर्थानें झाली बरी । व्याधि जानरावाची ।। १०० ।। देशमुख बरा झाल्यावर । भंडारा घातिला थोर । साधुप्रीत्यर्थ साचार । बंकटलालाचिये घरीं ।। १ ।। तीर्थें देशमुख बरा झाला । परी स्वामींशी पेच पडला । त्यांनी मनासी विचार केला । तो ऐका येणें रितीं ।। २ ।। कडकपणा धरल्याविना । ही उपाधि टळेना । स्वार्थसाधू प्रापंचिकांना । साधुत्वाची चाड नसे ।। ३ ।। त्या दिवसापासून । आणूं लागलें अवसान । स्वामी महाराज दयाघन । वरपांगी कडक झाले ।। ४ ।। हा त्यांचा कडकपणा । असह्य झालां इतरांना । परी त्यांच्या भक्तांना । कांही न त्याचे वाटलें ।। ५ ।। जेवीं नरसिंह अवतार । इतरांसी वाटला क्रूर । परी कयाधूचा कुमार । मुळीं न भ्याला त्या रूपा ।। ६ ।। वाघीण इतरा भयंकर । परी तिचे जें का असेल पोर । तें तिच्याच अंगावर । निर्भयपणें क्रीडा करी ।। ७ ।। असो आता गोष्ट दुसरी । सांगतो मी तुम्हां खरी । कस्तुरीच्या शेजारी । बसल्या माती मोल पावे ।। ८ ।। चंदनाचा शेजार । असला थोडा बहुत हिवर । वासित होतो साचार । हा न्याय निसर्गाचा ।। ९ ।। वासित हिवर झालेला । चंदन मानील आपणाला । तरी त्याच्या फजितीला । पारावर न राही पुढे ।। ११० ।। जेथें ऊंस निपजतो । तेथेंच निवडुंग उगवतो । जेथें मोगरा वाढतो ।

तेथेंच येतो पिंगूळ ।। ११ ।। जेथें साधु सज्जन । तेथेंच मैंद निर्माण । हिरे गारा एकवटून । खाणीमाजी राहाती ।। १२ ।। स्थान एक म्हणून । किंमत नाहीं समान । तेज हिऱ्याचे हिऱ्यालागून । भूषवी न गारेला ।। १३ ।। गार ती गारच राही । पायाखाली तुडविली जाई । ऐसी स्थितीं कधीं न येई । अमोलिक हिऱ्याला ।। १४ ।। श्रीगजाननाचें सन्निध । ऐसाच होता एक मैंद । संतसेवा हाच मद । अंगीं ज्याच्या भरला असे ।। १५ ।। तो सेवा करी वरीवरी । भाव निराळा अंतरीं । मिठाई पेढे सावरी । समर्थांच्या नांवांवर ।। १६ ।। भक्तगणांस ऐसे म्हणे । मी समर्थ कृपेचें पोसणें । प्रत्येक काम माझ्याविणें । होत नाहीं ये ठायां ।। १७ ।। मी कल्याण समर्थांचा । अत्यंत आहे आवडीचा । कधीं न खाली जावयाचा । शब्द माझा त्यांच्यापुढे ।। १८ ।। चिलीम त्यांची मीच भरी । खाण्यापिण्याची तयारी । निजांगे मीच करी । अत्यंत मी आवडीचा ।। १९ ।। ऐसें लोकांस सांगतसे । आपला सवरात करीतसे । त्या अधमाचें नांव असे । माळी विठोबा घाटोळ ।। १२० ।। महाराज स्वयंमेव शंकर । हा बनला नंदिकेश्वर । हमेशा करी गुरगुर । आल्या गेल्या भक्तांवरी ।। २१ ।। ते अंतर्ज्ञानांनी । जाणिले सर्व समर्थांनी । कौतुक केलें एकें दिनीं । तें ऐका विबुध हो ।। २२ ।। परस्थ काहीं मंडळी । शेगांवी दर्शना आली । तों मूर्ति होती निजलेली । समर्थांची शय्येवर ।। २३ ।। हिय्या कुणाचा होईना । जागे करण्या समर्थांना । मंडळींस होती जाणा । त्वरा पुढे जाण्याची ।। २४ ।। ते कुजबुज करूं लागले । विठोबाला विनवते झाले । विठोबा आम्हां पाहिजे गेलें । येथून आतांच परगांवा ।। २५ ।। काम निकडीचें आहे फार । कैसा करावा विचार । महाराज तों शय्येवर । असती निद्रिस्त जाहले ।। २६ ।। त्यांचे दर्शन घेतल्याविना । आमचा पाय निघेना । हें अवघड काम होईना । तुझ्यावांचून ये ठायीं ।। २७ ।। तूं समर्थांच्या शिष्यांत । मुख्य धोरणी महाधूर्त । तुला आम्ही जोडितों हात । एवढें काम करावें ।। २८ ।। ऐसा त्या स्तुतीनीं । विठोबा फुगून गेला मनीं । त्यानें जाऊन तत्क्षणीं । महाराजांसी उठविलें ।। २९ ।। मंडळींचे काम झालें । परी संकट ओढवलें । घाटोळ विठोबावरी भले । कर्म जैसें तैसें फल ।। १३० ।। समर्थांच्या हातीं काठी । एक होती भली मोठी । तीच त्यांनी घातली पाठीं । त्या विठोबा माळ्याच्या ।। ३१ ।। म्हणती बेटा माजून गेला । आपुली स्थिती विसरला । या लुच्च्याने आरंभीला । उघड उघड व्यापार कीं ।। ३२ ।। मला लावितों उपाधी । घंटे आणून बांधितो मठीं । घुमारे घाली कधीं कधीं । ऐसा अती नीच हा ।। ३३ ।। त्या घुमाऱ्याचें बक्षीस । घे मी देतो तुला

खास । तुजवरी केल्या कृपेस । होईन प्रभुचा अपराधी ।। ३४ ।। सोमला साखर मानूं नये । विषा जवळ करूं नये । तस्करासी लेखूं नये । निज कंठीचा ताईत ।। ३५ ।। ऐसा रीतीं ठोकला । छड्याखालीं घाटोळाला । विठोबा तो पळाला । पुनः न आला मागुती ।। ३६ ।। खरे जे कां असती संत । ते ते ऐसेंच करितात । ढोंगी मात्र जातात । अशाचिया करांमध्ये ।। ३७ ।। म्हणजे अधिकारावांचून । ढोंगी बैसती होऊन । संत, नादी लावण्या जन । ऐसे प्रकार किती तरी ।। ३८ ।। मतलबी त्यांना साथ देती । उदोउदो त्यांचा करिती । भलभलते सांगताती । साक्षात्कार ढोंग्यांचे ।। ३९ ।। तेणे दोघांचें काम होई । अपार पैसा मिळविला जाई । परी ही प्रथा बरी नाही । समाज जाईल रसातळा ।। १४० ।। खरे जे कां असती संत । ईश्वराचे निःसीम भक्त । त्यांना न मुळी आवडत । सान्निध्य त्या षंढांचें ।। ४१ ।। पतिव्रतेसी शेजार । कसबिणीचा कां पटणार ? । सोन्याप्रती अलंकार । काय शोभती कथलाचे ? ।। ४२ ।। संत शठातें राखिती । परी न त्याला महत्त्व देती । ती जगांतील एक व्यक्ति । कृतकर्म भोगण्या आली असे ।। ४३ ।। ऐसें मानसीं समजून । त्याविषयीं धरिती मौन । जेवीं निवडुंगालागून । स्थान भूमी देते हो ।। ४४ ।। मोगरा, निवडुंग आणि शेर । हीं जमिनींची लेकरं । परि किंमतीचा प्रकार । निरनिराळा तो तिघांचा ।। ४५ ।। मोगऱ्याचें संरक्षण । करिती निवडुंगाचें दहन । चिलटांसाठी बांधून । शेर ठेविती दारावरी ।। ४६ ।। तेवीं संत भूमिवरी । रक्षण अवघ्यांचे करिती जरी । किंमतीमाजीं ठेविती परी । गुणांप्रमाणे भेद पाहा ।। ४७ ।। नशीब विठोबा घाटोळाचें । अति खडतर होतें साचें । पाय लाभून साधूचें । दैवें दूर झालें कीं ।। ४८ ।। जरी तो ना ढोंग करितां । तरी योग्यतेप्रती चढता । संतांची ती योग्यता । त्यानें मुळीं ना जाणिली ।। ४९ ।। कल्पवृक्षाच्या तळवटीं । बसून इच्छिली गारगोटी । वा मागितली करवंटी । कामधेनूपासून ।। १५० ।। ऐसें न कोणी करावें । संतापासीं राहून बरवें । तेथें विचारा ठेवावें । अहर्निशीं जागृत ।। ५१ ।। हा दासगणूविरचित । श्रीगजानन विजय ग्रंथ । तारक होवो भवाब्धींत ।अवघ्या भाविकांकारणें ।। १५२ ।। श्रीहरिहरार्पणमस्तु ।। शुभं भवतु ।।

।। इति श्रीगजानन विजय ग्रंथस्य तृतीयोऽध्यायः समाप्तः ।।

# अध्याय चौथा प्रारंभ

श्रीगणेशायनमः ।। हे सर्वसाक्षी सर्वेश्वरा । नीलकंठा गंगाधरा । महांकाल त्र्यंबकेश्वरा । श्रीओंकारा पाव मशी ।। १ ।। तूं आणि रुक्मिणीश । एक तत्त्व आहां खास । तोय वारी म्हटल्यास । काय जलीं भेद होतो ।। २ ।। तैसी तुमची आहे स्थिती । तंतोतंत जगत्पति । जैसी ज्याची मानेल मति । तैसा तो तुज बाहत ।। ३ ।। अनन्यभावें बाहतां । तूं पावसी आपुल्या भक्तां । माता न धरी निष्ठुरता । आपल्या वत्साविषयीं कधीं ।। ४ ।। मी तुझें अजाण लेंकरूं । नको माया पातळ करूं । तूं साक्षात् कल्पतरू । इच्छा पूर्ण करी हरा ।। ५ ।। बंकटलालाचें घरांत । असता स्वामी समर्थ । प्रकार एक अघटीत । आला ऐसा घडोनी ।। ६ ।। वैशाख शुद्ध पक्षासी । अक्षयतृतीयेचिया दिवशीं । पितरार्थ उदककुंभासी । देती श्राद्ध करोनिया ।। ७ ।। अक्षयतृतीयेचा दिवस । वऱ्हाडातील लोकांस । विशेष वाटे प्रत्येकांस । मोठा सण मानिती हा ।। ८ ।। त्या दिवशीं काय झाले । तें पाहिजे श्रवण केले । महाराज पोरांत बैसले । कौतुकें लीला करावया ।। ९ ।। बालकां म्हणती गजानन । चिलीम द्यावी भरून । तंबाखूची मजकारण । विस्तव वरी ठेवोनिया ।। १० ।। सकाळपासून ऐसाच बसलों । चिलीम मुळीं नाहीं प्यालो । त्यामुळें हैराण झालो । भरा चिलीम मुलांनों !।। ११ ।। ऐसी आज्ञा ऐकतां भली । पोरें अवघी आनंदली । चिलीम भरूं लागली । तंबाखू आंत घालुनिया ।। १२ ।। विस्तवाचा तपास केला । तो न सदनीं मिळाला । कां कीं चूल पेटण्याला । अवकाश होता विबुध हो ।। १३ ।। पोरें चित्तीं विचार करती । आपापसांत निश्चिती । कशी करावी यासी युक्ति । विस्तव पाहिजे चिलिमीला ।। १४ ।। मुले पाहून चिंतातुर । बंकट करी मधुरोत्तर । अरे जानकीराम सोनार । आहे वेटाळी आपुल्या ।। १५ ।। त्याच्याकडे तुम्ही जावें । विस्तवासी मागून घ्यावें । दुकान ते चालण्या बरवें । विस्तव लागतो आधीं त्या ।। १६ ।। आधीं पेटते बागेसरी । त्याच्यापुढें दुकानदारी । ही सोनाराची रीत खरी । आहे ठावें की तुम्हांला ।। १७ ।। पोरांनी तें ऐकलें । जानकीरामाकडे आले विस्तव मागूं लागले । समर्थांच्या चिलमीस ।। १८ ।। जानकीराम रागावला । लेंकरांसी बोलतां झाला । अक्षयतृतीयेच्या सणाला । दे न कोणा विस्तव मी ।। १९ ।। पोरें म्हणाली त्यावर । जोडोनी आपले दोन्ही कर । नको करूं हा

अविचार । विस्तव पाहिजे समर्थाला ।। २० ।। महाराज श्रीगजानन । देवांचेही देव जाण । त्यांच्या चिलमीकारण । विस्तव हा जातसे ।। २१ ।। साधुप्रती कांहीं देतां । तेथें अशुभाची नसे वार्ता । उगीच व्यावहारिक कथा । सांगत आम्हां बसूं नको ।। २२ ।। आम्ही आहों मुलें लहान । तूं मोठा आमच्याहून । ऐसें साच असून । हें न कैसें कळे तुला ? ।। २३ ।। विस्तव तूं देशील जरी । भाग्य येईल तुझ्या घरीं । चिलीम पिऊन तृप्त जरी । झाले गजानन महाराज ।। २४ ।। तें सोनारें न ऐकिलें । अद्वातद्वा भाषण केलें । ज्याचें जवळ मरण आलें । त्याचे पाय खोलाकडे ।। २५ ।। सोनार म्हणे बालकांसी । गजानन कशाचा पुण्यराशी ? । त्या चिलमीबहाद्दरासी । साधू म्हणून सांगू नका ।। २६ ।। गांजा तंबाखू पीत बसतो । नग्न गांवांत हिंडतो । वेड्यापरी चाळे करितो । पितो पाणी गटाराचें ।। २७ ।। जात गोत नाहीं त्याला । ऐशा वेड्यापिशाला । मी साधू मानण्याला । नाहीं मुळीं तयार ।। २८ ।। बंकटलाल खुळावला । नादीं त्याच्या लागला । नाहीं देत विस्तवाला । मी तयाचे चिलमीसी ।। २९ ।। तो आहे ना साक्षात्कारी । मग विस्तव कशाला पाहिजे तरी ? । आपुल्या कर्तृत्वें कां न करी । विस्तवातें निर्माण ।। ३० ।। साधु नाथ जालंदर । पीत होते चिलीम फार । परि विस्तवासाठीं घर घर । ना हिंडले कदा ते ।। ३१ ।। जा जा उभे न राहा येथ । विस्तव ना मिळे तुम्हांप्रत । नाहीं मला किंमत । त्या तुमच्या पिशाची ।। ३२ ।। पोरें विन्मुख परत आली । महाराजांसी निवेदिली । हकीकत जी कां झाली । सोनाराचें दुकानात ।। ३३ ।। ती ऐकतां हास्यवदन । करिते झाले दयाघन । नाहीं आपणां प्रयोजन । मुळींच त्याच्या विस्तवाचें ।। ३४ ।। ऐसे म्हणोनि घेते झाले । चिलीम आपुल्या हातीं भले । बंकटलालासी बोलले । काडी एक वरती धरीं ।। ३५ ।। बंकट म्हणे गुरुराया । थोडे थांबा परम सदया । विस्तव देतो करूनिया । काडी घासून आतां मी ।। ३६ ।। काडी घासल्यावाचूनि । कदां न प्रगटे अग्नि । म्हणून केली विनवणी । ती मनास आणा समर्था ।। ३७ ।। महाराज बोलले त्यावर । उगी न करी चरचर । नुसती काडी धरणें वर । तिला मुळींच घासूं नको ।। ३८ ।। बंकटलालें तैसें केलें । नुसत्या एका काडीस धरिले । चिलमीचिया वरती भले । समर्थ आज्ञा म्हणून ।। ३९ ।। तों काय झाला प्रकार । ऐका तुम्ही श्रोते चतुर । प्रगट झाला वैश्वानर । काडी नुसती धरतां वरी ।। ४० ।। काडीप्रती विस्तवाचा । अंशही नव्हता साचा । हा प्रभाव शक्तीचा । महाराजांच्या लोकोत्तर ।। ४१ ।। काडी तैसीच राहिली । चिलीम तीही पेटली । कशाचीही नाहीं उरली । जरूर खऱ्या साधुला ।। ४२ ।। याचें नांव साधुत्व । उगीच नव्हतें थोतांड मत । आतां

सोनाराचे घरांत। काय झाले तें ऐका ।। ४३।। या अक्षयतृतीयेला । मान विशेष चिंचवण्याला । जेवीं वर्षप्रतिपदेला। महत्त्व निंब फुलांचे ।। ४४ ।। असो भोजना बैसली पंगत । चिंचवणें वाढलें द्रोणांत । तो प्रकार ऐसा अघटीत । घडून आला तो ऐका ।। ४५ ।। त्या चिंचवण्या माझारी । अळ्या दिसल्या नानापरी। बुजबुजाट झाला भारी । किळस वाटली सर्वांना ।। ४६ ।। लोक उठले पात्रावरून । अवघ्या अन्नातें टाकून । सोनार बसला अधोवदन । कारण कांही उमजेना ।। ४७ ।। चिंचवण्याच्या संगे भलें । अवघे अन्न वायां गेलें । मग त्या कोडें उमगलें । ऐसें व्हाया मीच कारण ।। ४८ ।। मी न साधूसी विस्तव दिला। त्याचा प्रत्यय तात्काळ आला । गजाननाची अगाध लीला । मी न खचित जाणिली ।। ४९ ।। गजानन जान्हवी नीर । मी त्या मानिले थिल्लर । गजानन राजराजेश्वर । मी त्या भिकारी मानिले ।। ५० ।। त्रिकालज्ञ गजानन । मीं त्या मानिलें वेडा पूर्ण । कल्पतरुकारण। मी बाभुळ मानिली ।। ५१ ।। गजानन हा चिंतामणी । मी लेखिली गार जाणी । गजानन हा कैवल्यदानी। मी ढोंगी मानिला हो ।। ५२ ।। हाय हाय रे दुर्दैवा । त्वां कैसा साधिला दावा । माझ्या हातून संतसेवा। होवो ना तूं दिलीस ।। ५३ ।। मसी असो हा धिक्कार । मी भारभूत साचार । जन्म पावलों भूमीवर। द्वय पायांचा पशू मी ।। ५४ ।। आज माझ्या भाग्यकाळीं । बुद्धि कशी चळती झाली । सुयोगाची दवडिली । वेळ आलेली म्यां करें ।। ५५ ।। कांहीं असो आतां जाऊं । समर्थांचें पाय पाहूं। पदीं त्यांच्या अनन्य होऊं । क्षमा मंतूची मागावया ।। ५६ ।। ऐसा विचार करूनी । सवें घेऊनि चिंचवणी । बंकटलालाच्या सदनीं । आला हकीकत सांगावया ।। ५७ ।। अहो शेटजी बंकटलाला। आज माझा घात झाला । पाहा या चिंचवण्याला । आंत किडे पडले बहु ।। ५८ ।। माणसें उठलीं उपोषित। तेणें झाला श्राद्धघात । हें ऐसें व्हावया कृत्य । माझा मीच कारण असे ।। ५९ ।। आज सकाळीं चिलिमीला। मी नाहीं विस्तव दिला । पोरें मागत असतां भला । समर्थांच्या चिलिमीस्तव ।। ६० ।। त्याचेंच हें आहे फळ । चिंचवणी नासलें सकळ । ते ऐकून बंकटलाल । बोलूं लागला येणें रिती ।। ६१ ।। तुम्ही न चिंचोके पाहिले । ते असतील किडलेले। म्हणून हे नासते झाले । तुमचें चिंचवणी वाटे मला ।। ६२ ।। सोनार म्हणे ऐसी शंका । शेटजी तुम्ही घेऊं नका । नवी चिंच होती देखा। मग चिंचोके किडके कसे ? ।। ६३ ।। जी मी चिंच फोडिली । तिचीं टरफलें अजून पडलीं । चिंचोक्यांची रास झाली। मर्जी असल्या पाहा चला ।। ६४ ।। आतां इतुकीच विनंती। आहे शेठजी तुम्हांप्रती । मला नेऊन पायावरती । घाला

शीघ्र समर्थांच्या ।। ६५ ।। क्षमा मंतूची मागेन । अनन्यभावें करून । साधु दयेचे परिपूर्ण । सागर मुळचेच आहेत कीं ।। ६६ ।। समर्थांपुढे भीत भीत । जानकीराम गेला त्वरित । घातलें त्यानें दंडवत । अष्टांगेसी समर्थां ।। ६७ ।। आणि म्हणाला दयाघना । तुला येवो माझी करुणा । मी अपराध केले नाना । त्यांची क्षमा करावी ।। ६८ ।। तूं साक्षात् उमानाथ । नांदसी या शेगांवांत । ज्याची होती मजला भ्रांत । ती त्वां आज निवटीली ।। ६९ ।। माझें अपराधरूपीं अवघें तृण । जाळीं कृपाकृशाने करून । समर्था आजपासोन । मी ना टवाळी तुझीं करी ।। ७० ।। जी शिक्षा आज केली । तेवढीच मजसी पुरे झाली । तूं अनाथांचा आहेस वाली । आतां अंत पाहू नको ।। ७१ ।। महाराज बोलले त्यावर । खोटें न सांगे तिळभर । तुझें चिंचवणी आहे मधुर । किडे न पडले त्यामध्यें ।। ७२ ।। तें ऐकतां अवघ्यांनीं । पाहिलें तें चिंचवणी । पहिला प्रकार मावळोनी । गेला होता तेधवां ।। ७३ ।। अवघ्यांप्रती आश्चर्य झालें । समर्थाचें महत्त्व कळलें । हां हां म्हणतां पसरलें । वृत्त हें त्या गांवामध्ये ।। ७४ ।। ज्यांच्या त्यांच्या तोंडी मात । हीच निघूं लागली सत्य । कस्तुरीचा नाहीं येत । वास झांकाया कवणातें ।। ७५ ।। चंदुमुकीन नांवाचा । गृहस्थ एक शेगांवाचा । निःसीम भक्त समर्थांचा । त्याची कथा ऐका ही ।। ७६ ।। श्रोते ज्येष्ठ मासांत । सभोवार बसले भक्त । अति आदरें जोडोन हात । दृष्टि ठेवून पायांवरी ।। ७७ ।। कोणी आंबे कापिती । कोणी फोडी हातात देती । कोणी पंख्याने घालिती । वारा समर्थांकारणें ।। ७८ ।। कोणी वाटिती खडीसाखर । कोणी गळ्यात घालिती हार । कोणी चंदन थंडगार । लाविती अंगी साधूंच्या ।। ७९ ।। तयीं महाराज म्हणाले चंदूला । हें आंबे नकोत मला । दोन कान्होले उतरंडीला । आहेत तुझ्या ते आण जा ।। ८० ।। चंदू बोले कर जोडोन । आता कान्होले कोठून ? । इच्छा असल्या तळून । ताजे आणितो गुरुराया ।। ८१ ।। तई महाराज वदलें वाचें । नाहीं कारण ताज्याचें । पाहिजेत तुझ्या उतरंडीचे । कान्हवले मज खावया ।। ८२ ।। जा वेळ करूं नको । उगीच सबबी सांगू नको । गुरूपाशीं बोलूं नको । खोटें वेड्या यत्किंचित् ।। ८३ ।। त्या मुकीनचंदूप्रतीं । लोक अवघे बोलती । जा ये पाहून शीघ्रगती । खोटी न होय संतवाणी ।। ८४ ।। चंदू घराप्रती गेला । कांतेस पुसूं लागला । दोन कान्हवले उतरंडीला । आहेत काय रंभोरू ? ।। ८५ ।। तैं बोले अंगना । होऊन गेला एक महिना । आता कान्हवले आपल्या सदना । मिळतील कशाचे ? ।। ८६ ।। अक्षयतृतीया दिवशी भलें । कान्हवले मी पतिराया केलें । ते न आतां राहिलें । संपून गेले त्याच दिनीं ।। ८७ ।। मर्जी असल्या नवे करिते । समर्थांस्तव तळून देते । ही

पाहा मी ठेवितें । कढई नाथा चुलीवर ।। ८८ ।। तुम्ही थांबा क्षणभर । सामान अवघें तयार । नको पाहण्या बाजार । कान्हवल्याच्या साहित्यासी ।। ८९ ।। चंदू बोले त्यावरी । ताजे नकोत सुंदरी । जे तूं उतरंडीमाझारी । दोन ठेविले तेच दे ।। ९० ।। समर्थांनी ऐसेंच कथिले । तेंच मी तुज निवेदिले । आठवण करून चांगले । पाहा कांहीं येधवां ।। ९१ ।। ऐसें ऐकतां पतिवचन । कांता गेली घोटाळून । करूं लागली शोधन । कान्हवल्याचे चित्तांतरी ।। ९२ ।। कान्हवल्याचा शोध करितां । आठवण झाली तत्त्वतां । उघड म्हणे थांबा नाथा । सत्य गिरा समर्थांची ।। ९३ ।। दोन कान्हवले होते उरले । ते मी उतरंडीस ठेविले । त्यांचे स्मरण नाहीं उरलें । सगळ्या महिन्यांत मजलागीं ।। ९४ ।। त्यास महिना होऊन गेला । असेल बुरसा वरी आला । ते खाण्याच्या उपयोगाला । राहिले नसतील अणुमात्र ।। ९५ ।। ऐसें बोलून तात्काळ उठली । उतरंड सर्व धांडोळली । कान्हवलें ते ठेवलेली । कळशी होती खापराची ।। ९६ ।। आंत जों पाहिलें न्याहाळून । तो दृष्टी पडले तिच्या दोन । कान्हवले जे सुकोन । गेले होते थोडके ।। ९७ ।। बुरसा मुळींच नाहीं आला । श्रोते या कान्हवल्याला । बट्टा संतवाणीला । नाहीं लागला कधीं जगीं ।। ९८ ।। कान्हवल्यातें पाहोन । उभयतांचें हर्षले मन । धन्य साधु गजानन । महा समर्थ सिद्धयोगी ।।९९।। चंदू कान्हवले घेऊन आला । समर्थांसी अर्पिता झाला । लोक करती आश्चर्याला । त्याच्या कृतीतें पाहून ।। १०० ।। लोक म्हणती गजानन । खचित असती त्रिकालज्ञ । भूत भविष्य वर्तमान । यांसी अवघे कळतसे ।। १ ।। चंदूच्या त्या कान्हवल्यासी । सेविते झाले पुण्यराशी । राम शबरीच्या बोरांशी । जेवीं झाला भक्षिता ।। २ ।। शेगांवच्या दक्षिणेसी । चिंचोली गांव परियेसी । तेथील एक रहिवासी । माधव नामें विप्र होता ।। ३ ।। वय ज्याचे साठावर । अवयव झाले क्षीण फार । तरुणपणीं संसार । हेंच होतें ब्रह्म ज्याचें ।। ४ ।। प्रारब्धाच्या पुढारी । कोण जातो भूमीवरी ? । ब्रह्मदेवें जीं कां खरीं । लिहिलीं अक्षरें तेंच होय ।। ५ ।। माधवासी न कोणी उरले । कांतापुत्र मरून गेले । म्हणून विरक्त जाहले । मन तयाचें संसारी ।। ६ ।। जी का होती चीजवस्त । ती अवघी केली फस्त । म्हणे आतां माझी गत । होईल कैशी देवदेवा ? ।। ७ ।। म्यां हमाधुमीचा संसार केला । तों आतां अवघा निमाला । आठविले कधी नाहीं तुला । एक क्षणही दीनबंधो ! ।। ८ ।। आतां माझा वाली कोण ? । दीनदयाळा तुजवांचून । माझें हें अरण्यरुदन । तुजविण देवा कोण ऐके ? ।। ९ ।। ऐसा अनुताप धरून पोटीं । शेगांवी आला शेवटीं । गजाननाच्या द्वारवंटी । हट्ट धरून बैसला ।। ११० ।। आरंभिलें उपोषण । अन्नपाण्यातें

त्यागून । वदनीं वदे नारायण। खंड न पडे तयाला ।। ११ ।। ऐशापरी एक गेला। दिवस परी नाहीं उठला । तई महाराज वदले तयाला। हें करणें उचित नसे ।। १२।। हेंच हरीचें नामस्मरण। कां न केलें मागे जाण । प्राण देहातें सोडून । जातां वैद्य बोलाविसी ।। १३ ।। तरुणपणीं ब्रह्मचारी । म्हातारपणीं करिसी नारी। अरे वेळ गेल्यावरी। नाहीं उपयोग साधनाचा ।। १४ ।। जें करणें तें वेळेवर । करावें कीं साचार। घर एकदां पेटल्यावर। कूप खणणें निरर्थक ।। १५।। ज्या कन्यापुत्रासाठीं । तूं केलीस आटाआटी । ते अवघें गेले शेवटी। टाकोनिया तुजलागीं ।। १६ ।। अशाश्वताचें पोषण । केलें शाश्वता विसरून । त्या कर्माची तुजलागून। फळें भोगणें भाग असे ।। १७ ।। ती फळें भोगल्याविना । सुटका तुझी होईना। दे हा टाकून हट्टीपणा । विवेक कांहीं करीं मनीं ।। १८।। तें न माधवे ऐकिलें । हट्टासिं ना सोडिलें । यत्न लोकांचे वायां गेलें । त्यासी भोजन घालण्याचें ।। १९ ।। शेगांवचा कुलकर्णी। करूं लागला विनवणी। भोजनास चला सदनीं । अन्नाविण राहूं नका ।। १२० ।। तेंही म्हणणें माधवाला । नाहीं पटलें तसाच बसला । समर्थांच्या सान्निध्याला । नाम घेत हरीचें ।। २१ ।। रात्र झाली दोन प्रहर । तमें आक्रमिलें अंबर। निशीचा तो शब्द किर्र । होऊं लागला वरच्यावरी ।। २२।। आसपास कोणी नाही । ऐसें पाहून केलें काही । कौतुक ते लवलाही । स्वामी गजाननांनीं ।। २३ ।। रूप धरिले भयंकर। दुसरा यमाजी भास्कर । आ पसरून माधवावर । धांवून आलें भक्षावया ।। २४ ।। तेणें माधव पळाला । घेऊन आपला जीव भला । धडकीं भरली चित्ताला । छाती उडे धडधड ।। २५।। बुडबुडा आला तोंडासी । शब्द फुटेना वाचेसी। ऐशा पाहोन स्थितीसी । समर्थें धरिलें सौम्य रूप।। २६ ।। आणि बोलले गर्जोन। हेंच कां तुझें धीटपण। तूं काळाचें भक्ष्य जाण । असाच खाईल काळ तुला ।। २७ ।। त्याची चुणूक दाखविली । पुढची स्थिती जाणविली। तेथें पळाया नाहीं उरली । यमलोकांत जागा तुला ।। २८ ।। माधव ऐसें ऐकतां । झाला विनयें बोलतां। यमलोकाची नको वार्ता। तेवढी माझी टाळा हो ।। २९ ।। नको नको हें जीवित। द्या धाडून वैकुंठात। हीच विनंति आपणांप्रत । महाराज माझी शेवटची ।। १३० ।। यमलोकीं जें दिसणार होतें। तें तुम्हीं दाविलें येथें। आतां या लेंकरातें। यमलोकीं धाडूं नका ।। ३१ ।। माझ्या पातकांच्या राशी। आहेत जरी बहुवशी । परी त्या जाळणें तुम्हांसी। नाही मुळीं अशक्य ।।३२।। कांही सुकृत पदरीं होतें । म्हणून पाहिलें तुम्हांतें । संतभेटी ज्याला होतें । यमलोक ना तयासी ।। ३३ ।। ऐसें ऐकतां भाषण। समर्थें केलें हास्यवदन । महापतीता पावन । साधूच एक

करिती की ।। ३४ ।। श्रीमन्नारायण नारायण । ऐसेंच माधवा करी भजन । जवळ आलें तुझें मरण । आतां गाफील राहूं नको ।। ३५।। किंवा अजून वांचण्याची । आस आहे तुला साची । ती असल्यास आयुष्याची । वाढ तुझ्या करितों मी ।। ३६ ।। माधव म्हणें गुरुराया । नको मला आयुष्य सदया । ओखटी ही प्रपंचमाया । त्यांत पुन्हां गोवूं नको ।। ३७ ।। तथास्तु ऐसें महाराज वदले । तूं जें मागसी तें मीं दिलें । आतां तुला नाहीं उरलें । जन्मास येणें भूमीवर ।। ३८ ।। ऐशा रीतीं दोघांचा । संवाद गुप्त स्वरूपाचा । झाला त्या वर्णण्या वाचा । नाहीं माझी समर्थ ।। ३९ ।। इहलोकीचें देहभान । माधवाचें निमालें जाण । कित्येक बोलूं लागलें जन । उपवासे फिरलें मस्तक ।। १४० ।। म्हणून वेडेचार करी । जनकल्पना नानापरी । उठत्या झाल्या त्या अवसरीं । त्या किती म्हणून वर्णाव्या ? ।। ४१ ।। असो माधवाचें देहावसान । समर्थांसन्निध झालें जाण । चुकलें त्याचें जन्ममरण । गजाननाच्या कृपेनें ।। ४२ ।। असो एक्या समयीं भली । समर्थांसी इच्छा झाली । ती त्यांनीं निवेदिली । आपल्या शिष्यवर्गातें ।। ४३ ।। वैदिक ब्राह्मण बोलवा । मंत्रजागर येथें करवा । वेदश्रवणें देवदेवा । आनंद होतो अतिशय ।। ४४ ।। पन्हें पेढे बर्फी खवा । भिजल्या डाळीस मीठ लावा । एकेक रुपया तो द्यावा । घनपाठीं ब्राह्मणातें ।। ४५ ।। ऐसें भाषण ऐकिलें । शिष्य विनवूं लागले । ऐसे वैदिक नाहीं उरले । या आपल्या शेगांवी ।। ४६ ।। सांगाल तो करूं खर्च । परी अडचण आहे हीच । ब्राह्मण मिळविण्याची साच । आमचा उपाय यातें नसे ।। ४७ ।। महाराज म्हणाले त्यावरी । करा उद्यां तयारी । ब्राह्मण धाडील श्रीहरी । तुमच्या वसंतपूजेला ।। ४८ ।। मग काय विचारतां । अवघे हर्षलें तत्त्वतां । झाली तयारी हां हां म्हणतां । रुपये शंभर झाले जमा ।। ४९ ।। सामान सर्व आणिले । चंदनाचे उटणें केलें । आंत केशर कालविलें । तैसाच आणखी कापूर ।। १५० ।। दोन प्रहरचे समयाला । ब्राह्मण आले शेगांवाला । जें पद क्रम जटेला । जाणत होते विबुध हो ! ।। ५१ ।। थाटांत वसंतपूजा झाली । ब्राह्मण मंडळी आनंदली । दक्षिणा घेऊन गेली । अन्य ग्रामाकारणें ।। ५२ ।। संतांच्या जें मनीं येत । तें तें पुरवी रमानाथ । कमी न पडे यत्किंचित । ऐसा प्रभाव संतांचा ।। ५३ ।। बंकटलाल प्रतिवर्षी । व्रत हें चालवी अतिहर्षी । अजून परी शेगांवासी । वंशज त्यांचे करिती हें ।। ५४ ।। हा दासगणूविरचित । श्रीगजानन विजय नामें ग्रंथ । साधकासी दावो पथ । विमलशा हरिभक्तीचा ।। १५५ ।। श्रीहरिहरार्पणमस्तु ।। शुभं भवतु ।।

।। इति श्रीगजानन विजय ग्रंथस्य चतुर्थोऽध्यायः समाप्त ।।

# अध्याय पाचवा प्रारंभ

श्रीगणेशायनमः ।। हे अज अजित अद्वया । सच्चिदानंदा करुणालया । दासगणू लागला पाया । आता अभय असूं दे ।। १ ।। मी हीन दीन पातकी नर । नाही कोणता अधिकार । सर्व बाजूंनी लाचार । आहे मी देवदेवा ।। २ ।। परी अत्यंत हीनावरी । थोर सर्वदा कृपा करी । पाहा अंगीं लाविली खरी । विभूति श्रीशंकराने ।। ३ ।। तो हीनांचा हीनपणा । थोरा न आणी कमीपणा । हे जाणोन नारायणा । गणू हा ठेवा संग्रही ।। ४ ।। सर्व लाड लेकरांचे । माता ती पुरवी साचे । आहे दासगणूचें । ओझें सर्व तुझ्या शिरी ।। ५ ।। जैसें करशील तैसें करी । परी दया असू दे अंतरी । देवा तुझ्या बळावरी । दासगणूच्या साऱ्या उड्या ।। ६ ।। गजानन असता शेगांवी । यात्रा येई नित्य नवी । ती कोठवर वर्णावी ? । पार न लागे तियेचा ।। ७ ।। महिमा तो वाढला फार । म्हणून गजानन साधूवर । ती उपाधि करण्या दूर । भटकू लागले काननीं ।। ८ ।। महिना महिना तिकडेच राहावें । वाटेल तेथेच बैसावे । कोणाशी न उमगूं द्यावें । चरित्र आपुले येतुलेही ।। ९ ।। श्रोते एका समयासी । महाराज पिंपळगांवासी । गेले तेथे गोष्ट कैसी । झाली ते अवधारा ।। १० ।। त्या पिंपळगांवाच्या शिवारांत । होते एक अरण्यांत । शंकराचे मंदिर सत्य । जुने पुराणे हेमाडपंती ।। ११ ।। ऐशा त्या मंदिरी । येते झाले साक्षात्कारी । बैसले शिवाच्या गाभारी । लावोनिया पद्मासन ।। १२ ।। गुराखी त्या गांवचे । आपापले कळप गुरांचे । घेऊनिया निघाले साचे । अस्तमानी गांवाकडे ।। १३ ।। मंदिरापुढे तत्वतां । एक लहान ओढा होता । तेथे पाणी पाजण्याकरितां । गुरे गुराखी पातले ।। १४ ।। कोणी सहज मंदिरांत । गेले वंदण्या शिवाप्रत । तो तेथे पाहोन समर्थ । आश्चर्यचकित जाहले ।। १५ ।। मुलें म्हणती या मंदिरी । कोणी न पाहिला आजवरी । पुरुष बसलेला निर्धारी । अस्तमानाचे समयाला ।। १६ ।। कांही गुराखी बाहेर आले । इतरां बोलावू लागले । कांहीं तेथेच बैसले । सत्पुरुषाचे समोर ।। १७ ।। परी साधु बोलेना । डोळे मुळीच उघडीना । याचे कारण कळेना । त्या गुराखी अर्भकांसी ।। १८ ।। कोणी म्हणती थकलेला । हा साधु दिसतो भला । शक्ती मुळी नुरली त्याला । बोलावयाकारणे ।। १९ ।। कोणी म्हणती उपवासी । असावा निश्चयेसी । थोडी भाकर तयासी । देऊं आपण

खावया ।। २० ।। ऐसे म्हणून भाकर । धरली मुखासमोर । भाविक मुळची गुराखी पोरं । हलवूं लागली समर्थाला ।। २१ ।। परी साधु हालेना । मुखीं शब्द बोलेना । म्हणून साऱ्या गुराख्यांना । नवल वाटले विशेष ।। २२ ।। गुराखी आपसात बोलती । याची मुळीं न कळे स्थिती । जरी मेला म्हणावा निश्चिती । तरी आहे बसलेला ।। २३ ।। अंग ना झाले थंडगार । ऊन आहे साचार । यावरून हा जिवंत नर । आहे आहे शंका नको ।। २४ ।। कोणी म्हणे असेल भूत । मायावी रूप दावीत । कोणी म्हणे हे तर सत्य । शिवापुढे ना भूत येई ।। २५ ।। कोणी म्हणती स्वर्गीचा । देव हा असावा साचा । लाभ त्याच्या दर्शनाचा । झाला आपणा हेंच भाग्य ।। २६ ।। याचें आता पूजन । करू अवघे आपण । जा स्नानालागून । पाणी आणा ओढ्याचे ।। २७ ।। पोरें गेली ओढ्यावरी । गेळ्यामध्ये[1] आणिले वारी[2] । परमभावे पायावरी । घालिते झालें समर्थांच्या ।। २८ ।। कोणीं वन्यपुष्पें आणिलीं । माळ त्यांची तयार केली । कंठामध्यें घातिली । गुराख्यांनी साधूच्या ।।२९ ।। कोणी कांदाभाकर । नैवेद्यार्थ साचार । दिली ठेवून समोर । एका वडाच्या पानावरी ।। ३० ।। गुराख्यांनी केले नमन । आदरें भाव धरून । कांही वेळ केलें भजन । पुढे बसून समर्थांच्या ।। ३१ ।। ऐसा आनंद चालला । तो गुराखी एक बोलला । अरे वेळ बहु झाला । चला आता गांवाकडे ।। ३२ ।। दिवस गेला मावळून । कां न आली रानातून । मुले गुरांना घेऊन । ऐसे लोक म्हणतील कीं ।। ३३ ।। कदाचित आपणांसी । पाहण्यां येतील काननासी । तान्हीं वासरें घरांसी । लागली असतील हुंबरावया ।। ३४ ।। या साधूची हकीकत । आपण सांगू गांवांत । शहाण्या वडील माणसांप्रत । म्हणजे येईल कळून की ।। ३५ ।। ते अवघ्यांसी मानवले । गुराखी सर्व निघून गेले । गांवामाजीं कळविले । मंदिराचे अवघे वृत्त ।। ३६ ।। पुढे श्रोते प्रात:काळी । आली गांवची मंडळी । समर्थासी पाहण्या भली । गुराख्यांच्या बरोबर ।। ३७ ।। जैसा काल होता बैसला । तैसाच आता पाहिला । भाकरीसी ना स्पर्श केला । ती जशीच्या तशीच आहे कीं ।। ३८ ।। म्हणूं लागले गांवकरी । हा योगी पुरुष कोणीतरी । आहे बैसला मंदिरी । सांप्रत या शंकराच्या ।।३९ ।। कोणी ऐसे बोलले । शिव पिंडीच्या बाहेर आले । आपणा दर्शन द्याया भले । चला नेऊं या गांवांत ।। ४० ।। हा समाधी उतरील । तेव्हां कांहीं बोलेल । ही उतरण्या आहे वेळ । त्याला त्रास देऊ नका ।। ४१ ।। बंगाल देशी जालंदर । बारा वर्षे झाले स्थिर । समाधीच्या जोरावर । गर्तेमाजी ख्यात हे ।। ४२ ।। ऐसी भवती न भवती झाली ।

1. IrnaMmnUr^aÊmMn~wXmËm_Ü o2. mUr

एक पालखी आणविली । त्यांत उचलून ठेविली । समर्थांची मूर्ति पाहा ।। ४३ ।। ग्रामांतील नारीनर । अवघे होते बरोबर । पुढें वाजंत्र्यांचा गजर । होत होता विबुध हो ! ।। ४४ ।। मधून मधून तुळशी फुले । पौर टाकीत होते भले । समर्थांचे अंग झाले । गुलालाने लाली लाल ।। ४५ ।। घंटाघड्याळे वाजती । लोक अवघे भजन करिती । जयजय योगीराज मूर्ति । ऐसे उंच स्वरानें ।। ४६ ।। मिरवणूक आली गांवांत । मारुतीच्या मंदिरात । बसविले आणून सद्गुरुनाथ । एका भव्य पाटावरी ।। ४७ ।। तोही दिवस तैसाच गेला । मग लोकांनी विचार केला । आपण करूं स्तवनाला । उपाशी बसून यांच्यापुढें ।। ४८ ।। ऐसा जो ते विचार करिती । तो आले देहावरती । श्रीगजानन सद्गुरुमूर्ति । मुगुटमणी योग्यांचे ।। ४९ ।। मग काय विचारतां । आनंद झाला समस्तां । प्रत्येक स्त्रीपुरुष ठेवी माथा । स्वामींचिया चरणांवरी ।। ५० ।। नैवेद्याची धूम झाली । ज्यानें त्यानें आणिलीं । पात्रें ती वाढून भली । मारुतीच्या मंदिरांत ।। ५१ ।। त्या अवघ्यांचा स्वीकार । समर्थें केला थोडाफार । हाळोपाळीत साचार । ही वार्ता श्रुत झाली ।। ५२ ।। पुढें दुसऱ्या मंगळवारी । पिंपळगांवचे गांवकरी । आलें बाजारा निर्धारी । शेगांवाकारणें ।। ५३ ।। ते शेगांवच्या लोकांसी । सहज बोलले प्रेमेसी । आमच्याही गांवांसी । आला एक अवलिया ।। ५४ ।। अवलिया थोर अधिकारी । प्रत्यक्ष आहे श्रीहरी । धन्य पिंपळगांव नगरी । पाय लागलें साधूचे ।। ५५ ।। आम्ही तया योगीवरा । कोठे न जाऊं देऊं खरा । निधी चालत आला घरा । त्यातें कोण दवडी हो! ।। ५६ ।। शेगांवचे बाजारांत । जिकडे तिकडे हीच मात । बंकटलाला झाले श्रुत । वर्तमान ते अवलियाचे ।। ५७ ।। बंकटलाल पत्नीसहित । गेला पिंपळगांवांत । समर्थांसी जोडोन हात । विनवूं लागला नानापरीं ।। ५८ ।। आत्तां येतो म्हणून । निघून गेलात आपण । त्यास झाले पंधरा दिन । याचा विचार करा हो ।। ५९ ।। गुरुराया तुम्हाविण । भणभणीत दिसे सदन । शेगांवचे अवघे जन । चिंतातुर झाले हो ।। ६० ।। गाडी आणिली आपणासाठीं । चला शेगांवी ज्ञानजेठी । मायलेका होणे तुटी । हे काही बरे नसे ।। ६१ ।। कित्येक दयाळा आपुले भक्त । राहिले असती उपोषित । त्या शेगांव शहरांत । नित्य दर्शन घेणारे ।। ६२ ।। तुम्ही न आल्या शेगांवी । मी ही तनु त्यागीन बरवी । आमुची सांगा पुरवावी । आळ कोणी गुरुवर्या ? ।। ६३ ।। बंकटलाल ऐसें वदले । महाराज गाडीवरी बसले । शेगांवासी निघाले । पिंपळगांवा सोडून ।। ६४ ।। जैसा मागें गोकुळाला । न्याया कृष्णा अक्रूर आला । तैसा बंकटलाल भासला । अक्रूर पिंपळगांवातें ।। ६५ ।। पिंपळगांवच्या लोकांप्रती ।

बंकटलाल समजाविती । नका होऊ दु:खित चित्तीं । जाती न कोठे लांब साधु ।। ६६ ।। वाटेल तेव्हां दर्शना यावें। हेतु आपुलें पुरवावें । जेथल्या तेथें असू द्यावें । या अमोल मूर्तीला ।। ६७ ।। बहुतेक पिंपळगांवाचा । बंकटलाल साहुकार साचा। मनोभंग साहूचा । करण्या कुळांची छाती नसे।। ६८ ।। चुरमुऱ्याचे लाडू खात। पिंपळगांव बसले स्वस्थ। महाराज बसून गाडीत । जाऊं लागले शेगांवा ।। ६९ ।। पथीं जाता गुरुमूर्ति । बोलली बंकटलालाप्रती । ही कां साहूची होय रीति। माल दुसऱ्याचा बळे न्यावा ! ।। ७० ।। मशीं यावया तुझ्या घरीं। भय वाटतें अंतरीं । तुझ्या घरची नाही बरी । रीत हे मी पाहतो ।। ७१ ।। लक्ष्मी जी लोकमाता। महाविष्णूची होय कांता। जिची अगाध असे सत्ता । तिलाही त्वां कोंडिलें ।। ७२ ।। तेथें माझा पाड कोण? । म्हणून गेलों पळोन। जगदंबेचे पाहून । हाल, माझे चित्त भ्यालें ।। ७३ ।। ऐसे ऐकतां हंसूं आलें। बंकटलालाप्रती भले । विनयानें भाषण केलें । ते ऐका सावचित्तें ।। ७४ ।। बंकट बोले गुरुनाथा। माझ्या कुलपा न भ्याली माता । आपुला वास तेथे होता । म्हणून झाली स्थिर ती ।। ७५ ।। जेथें बाळ तेथें आई। तेथें दुज्याचा पाड काई? । आपुल्या पायापुढें नाहीं । मला धनाची किंमत ।। ७६ ।। तेच माझे धन थोर । म्हणून आलो इथवर । माझे न उरले आतां घर । ते सर्वस्वी आपुलें ।। ७७ ।। घरमालकाकारण। शिपाई आडवी कोठून ? । जैसे तुमचे इच्छिल मन । तैसेच तुम्ही वागावें ।। ७८ ।। इतकीच माझी विनंती । शेगांवीं असो वस्ती । धेनू काननाते जाती । परी येती घरी पुन्हां ।। ७९ ।। तैसेच तुम्ही करावें। अवघ्या जगा उद्धरावें । परी आम्हां न विसरावें । शेगांवी यावें वरचेवर ।। ८० ।। ऐसी समजूत घालून । शेगांवीं आणलें गजानन। तेथें कांहीं दिवस राहून । निघून गेले पुनरपि ।। ८१ ।। ती ऐकावी तुम्हीं कथा। सांगतो मी इथे आतां । अडगांव नामे ग्राम होता। एक तया वऱ्हाड प्रांतीं।। ८२ ।। त्या ग्रामाकारण। जाया निघाले दयाघन। प्रात:काळीं चुकवून । नजर शेगांवकरांची ।। ८३ ।। महाराजांची चालगती । वायुचिया समान होती। अंजनी–तनय मारुती । आला काय वाटे पुन्हां ।। ८४ ।। मास होतां वैशाख। सोळा कलांनी तपे अर्क । क्वचित कोठें न राहिलें उदक । ऐसा प्रखर उन्हाळा ।। ८५ ।। माध्यान्हीच्या समयाला। अकोली गांवापासी आला। हा योगयोगेश्वर साधु भला । गजाननमहाराज ।। ८६ ।। तो काय घडले वर्तमान । समर्थांसी लागली तहान। करिती चौफेर अवलोकन । तों उदक कोठें दिसेना ।। ८७ ।। अंगावाटे चालल्या धारा । घामाच्या त्या एकसरां । अधरोष्ठ तो सुकला खरा । उदकाविण समर्थांचा ।। ८८ ।। ऐशा दुपारच्या अवसरीं । भास्कर नामें

शेतकरी । घालीत होता पाळी खरी । आपुल्या त्या शेताला ।। ८९ ।। शेतकऱ्याची पाहतां स्थिति । हे अवघ्यांत मुख्य असती । कृषीवल हा निश्चिती। अन्नदाता जगाचा ।।९०।। अंगी ऐसें मोठेपण । परी सोशी यातना दारुण । बिचाऱ्यांना ऊन तहान। सोसणें भाग असें कीं।। ९१।। त्या अकोलीच्या शिवारांत । जलाचें दुर्भिक्ष अत्यंत । एक वेळा मिळेल घृत । परी अभाव पाण्याचा ।। ९२ ।। आपणांते प्यावयासी । भास्करानें शेतासी । आणिलें खापराच्या घागरीसी । उदक होते गांवांतून ।। ९३ ।। पाठीशी ती भाकर । डोई जलाची घागर । ऐसा होता प्रकार। शेतामाजीं येण्याचा ।। ९४ ।। ती घागर झुडुपाखालीं। होती भास्करे ठेविली । त्या ठिकाणी स्वारी आली। भास्करा जल मागावया ।। ९५ ।। समर्थ म्हणती भास्कराला। तहान बहुत लागली मला । पाणी दे बा प्यावयाला । नाही ऐसें म्हणूं नको ।। ९६ ।। पुण्य पाणी पाजण्याचें। आहे बापा थोर साचें । पाण्यावाचून प्राणाचें । रक्षण होणे अशक्य ।। ९७ ।। धनिक पाणपोया घालिती । हमरस्त्याच्या पथावरती । याचें कारण शोध चित्तीं । म्हणजे येईल कळोन ।। ९८ ।। भास्कर बोले त्यावर । तूं नंगा धूत दिगंबर । तुला दांडग्या पाजिता नीर। पुण्यलाभ कशाचा ? ।। ९९ ।। अनाथ –पंगू–दुबळ्यांसाठीं। त्या पुण्याच्या शोभती गोष्टी । वा जो समाजहितासाठीं । झटे त्यासी साह्य करा ।। १०० ।। ऐसे शास्त्राचे आहे वचन । तुझ्यासारख्या मैंदाकारण । आम्ही पाजिता जीवन। तें उलटे पाप होय ।। १ ।। भूतदयेच्या तत्त्वें भला । सर्प कोणी कां पोसला ? । वा जागा चोरट्याला। देती सदनीं काय कोणी ।। २ ।। तूं भीक मागून घरोघर। केलेस पुष्ट शरीर । भारभूत साचार। झालास आपुल्या कृतीने ।। ३ ।। मीं माझ्यासाठीं घागर । आणिली सकाळीं डोक्यावर। त्या आयत्या पिठावर। रेघोट्या तूं ओढूं नको ।। ४।। तुला ना देणार पाणी । नको करूं रे विनवणी। जा जा करी येथोनी । काळे आपले चांडाळा ।। ५ ।। तुझ्यासारिखे निरुद्योगी। जन्मले आमच्यात जागजागीं। म्हणून झालो अभागी । आम्ही चहूं खंडांत ।। ६ ।। हे भास्कराचे भाषण । समर्थांनी ऐकून । थोडे करूनी हास्यवदन । निघोन गेले तेथोनिया ।। ७ ।। थोड्या दूर अंतरावर । एक होती साच विहीर । तिकडे धांव अखेर । घेतली स्वामीरायांनीं ।। ८ ।। स्वामी तिकडे जाऊं लागतां । भास्कर झाला बोलतां। उच्च स्वरे; वेड्या वृथा । तिकडे कशाला जातोस ? ।। ९ ।। ती कोरडी ठणठणीत। आहे विहीर जाण सत्य। पाणी या एक कोसांत । नाही कोठे जाण पिशा ।।११०।। समर्थ बोलले त्यावरी। ही सत्य तुझी वैखरी । विहिरींत पाणी नाहीं जरी । परी करितों प्रयत्न ।। ११ ।।

तुझ्यासारिखे बुद्धिमान । जलाने होती हैराण । ते मी नयनीं पाहून । स्वस्थ ऐसा बैसलों जरी ।। १२ ।। तरी समाजहितासाठीं । काय मी केली सांग गोष्टी । साह्य होतो जगजेठी । हेतु शुद्ध असल्यावर ।। १३ ।। समर्थ आले विहिरीपाशीं । तो थेंब नाही तियेशीं । हताश होऊन वृक्षापाशी । बैसले एका दगडावर ।। १४ ।। डोळे मिटून केले ध्यान । चित्तीं साठविला नारायण । जो सच्चिदानंद दयाघन । दीनोद्धार जगद्गुरू ।। १५ ।। समर्थ म्हणती देवदेवा । हे वामना वासुदेवा । प्रद्युम्ना राघवा । हे विठ्ठला नरहरी ! ।। १६ ।। देवा ही अकोली । पाण्यांवाचून त्रस्त झाली । वोलही न राहिली । कोठेच देवा विहिरीतून ।। १७ ।। मानवी यत्न अवघे हरिले । म्हणून तुजला प्रार्थिले । पाव आतां जगन्माऊले । पाणी दे या विहिरीला ।।१८ ।। तुझी करणी अघटित । जें न घडे तें घडविसी सत्य । मांजरे जळत्या आव्यांत । पांडुरंगा ! तूं रक्षिलीं ।। १९ ।। प्रल्हाद भक्त करण्या खरा । स्तंभी प्रगटलास जगदोद्धारा । बारा गांव वैश्वानरा । भक्षिलें त्वां गोकुळांत ।। १२० ।। कर नखाग्रीं धरिला गिरी । तूंच की रें मुरारी । तुझ्या कृपेची न ये सरी । जगत्रयी कवणास ।। २१ ।। दामाजीपंत ठाणेदार । त्याच्यासाठी झालास महार । चोख्यासाठीं ओढिलीं ढोरं । पांखरें रक्षिलीं माळ्याचीं ।। २२ ।। उपमन्यूसाठीं भला । क्षीरसमुद्र तुवां दिला । तहान नामदेवाला । मारवाडांत लागली जैं ।। २३ ।। तैं तुम्ही कौतुक केलें । निर्जलता प्रांतीं भलें । नाम्यासाठीं भरविलें । जल हें आण ध्यानांत ।। २४ ।। ऐसे विनवितां ईश्वरा । विहिरीलागीं फुटला झरा । उफाळ्याचा साजिरा । विहीर भरली क्षणामध्यें ।। २५ ।। साह्य झाल्या जगन्नाथ । काय एक ना तें होत । ईश्वरी सत्ता अगाध सत्य । जें ना घडे तेंच घडवी ।। २६ ।। तेथ पाणी समर्थ प्याले । तें भास्करानें पाहिलें । चित्त त्याचें घोटाळलें । कांही न च चाले तर्क त्याचा ।। २७ ।। वर्षे झाली द्वादश । जल नाहीं या विहिरीस । तिलाच एका घटकेस । यानें जलमय केली कीं ।। २८ ।। यावरून हा कोणीतरी । खचित आहे साक्षात्कारी । बळेच फिरतो पिशापरी । हे आतां समजलें ।।२९ ।। शेतीचें काम सोडून । भास्कर आला धांवून । धरिता झाला दृढ चरण । मुखें स्तोत्र आरंभिलें ।।१३० ।। हे नरदेहधारी परमेश्वरा । हे दयेच्या सागरा । लेंकरासी कृपा करा । अर्भक मी तुमचें असें ।। ३१ ।। तुम्हांते ना जाणून । मी बोललों टाकून । आता पस्तावा झाला पूर्ण । क्षमा त्याची करा हो ।। ३२ ।। टाकून बोलतां गौळणी । रागावला ना चक्रपाणी । दयाळा बाह्य वेषांनी । तुझ्या मजला ठकविलें ।। ३३ ।। त्याचे तूंच निरसन । केले चमत्कार दाखवून । भगवंताचे देवपण । कृतीनेंच कळले कीं ।। ३४ ।। तैसा तुझा अधिकार ।

केवढा तरी आहे थोर । ते कळले साचार । या जलाच्या कृतीनें ।। ३५ ।। कांही असो सद्गुरुनाथा । मी न सोडी तुम्हां आतां । लेकरानें भेटतां । मायें कोठें न राहावें कीं ।। ३६ ।। खोटी ही प्रपंचमाया । आलें आज कळोनीया । आता परते न लोटा या । दीना अर्भकाकारणें ।। ३७ ।। भास्करासी समर्थ म्हणती । ऐसा न होई दु:खित चित्ती । आतां घागर डोक्यावरती । गांवांतून आणूं नको ।। ३८ ।। तुझ्यासाठीं हे जीवन । विहिरींत केले निर्माण । आता कशाची नुरली वाण । मग कां प्रपंच टाकिशी ? ।। ३९ ।। पाणी आले तुझ्याकरितां । बगीचा तो लाव आतां । भास्कर म्हणे गुरुनाथा । हें आमीष दावूं नका ।। १४० ।। माझा निश्चय हीच विहीर । कोरडी ठणठणीत साचार । होती दयाळा आजवर । थेंब नव्हता पाण्याचा ।। ४१ ।। ती विहीर फोडण्याला । तुम्हीच हा प्रयत्न केला । साक्षात्काराचा लाविला । सुरूंग खडक फोडावया ।। ४२ ।। तेणें हा फुटला खडक । भावाचे लागले उदक । आतां मळा नि:शंक । भक्तिपंथाचा लावीन मी ।। ४३ ।। वृत्तीच्या मेदिनीठायी । फळझाडें ती लावीन पाही । सन्नीतीची माझे आई । तुझ्या कृपेकरूनी ।। ४४ ।। सत्कर्माची फुलझाडें । लावीन मी जिकडे तिकडे । हे क्षणैक बैलवाडे । यांचा संबंध आतां नको ।। ४५ ।। पहा श्रोते संतसंगती । क्षणैक घडतां भास्कराप्रति । केवढी झाली उपरती । याचा विचार करा हो ।। ४६ ।। खऱ्या संतांचें दर्शन । आगळें सर्व साधनाहून । तुकारामें केले वर्णन । संत चरणरजाचे अभंगीं ।। ४७ ।। तो अभंग पहावा । चित्ती विचार करावा । आणि त्याचा अनुभव घ्यावा । निजहिताकारणें ।। ४८ ।। पाणी लागले विहिरीस । ही वार्ता आसपास । पसरतां जन दर्शनास । धावूं लागलें स्वामींच्या ।। ४९ ।। मधूचा लागतां सुगावा । जैशा मक्षिका घेती धांवा । वा साखरेचा पाहून रवा । मुंग्या येती धांवून ।। १५० ।। तैसे श्रोते तेथ झाले । लोक अपार मिळाले । विहिरीचे पाणी पाहिले । पिऊन त्यांनी तेधवां ।। ५१ ।। उदक निर्मळ शीत मधुर । गोड अमृताहून फार । करू लागले जयजयकार । गजाननाचा लोक सारे ।। ५२ ।। असो पुढे भास्करासहित । अडगांवासी न जातां परत । महाराज आले शेगांवांत । श्रीगजानन सिद्धयोगी ।। ५३ ।। स्वस्ति श्रीदासगणूविरचित । हा श्रीगजानन विजय नामें ग्रंथ । होवो जगासीं आदर्शभूत ।संतमहिमा जाणावया ।। १५४ ।। शुभं भवतु ।। श्रीहरिहरार्पणमस्तु ।।

।। इति श्रीगजानन विजय ग्रंथस्य पंचमोऽध्याय: समाप्त: ।।

# अध्याय सहावा प्रारंभ

श्रीगणेशायनमः ।। हे परममंगला श्रीहरी । तुझी कृपा झालीयावरी । अशुभ अवघें जातें दुरी । हा अनुभव संतांचा ।। १ ।। त्या संतवाक्यीं भरंवसा । मी ठेवून श्रीनिवासा । मंगलाची धरून आशा । तुझ्या दारीं पातलों ।। २ ।। आतां विन्मुख लावल्यास । त्याचा तुला लागेल दोष । आणि बट्टा वाक्यास । लागेल कीं संतांच्या ।। ३ ।। म्हणोन हे माधवा ! । अभिमान माझा धरावा । रोष कधीं ना करावा । या अजाण लेंकरावर ।। ४ ।। बालकाचें हीनपण । मातेलागीं दूषण । हे मनांत आणून । करणें असेल ते करी ।। ५ ।। असो बंकटलाला घरीं । राहिली समर्थांची स्वारी । तयी अपूर्व एक घडली खरी । गोष्ट श्रोते ती ऐका ।। ६ ।। गांवाचिया दक्षिणेस । बंकटलालाच्या मळ्यास । महाराज गेले एक दिवस । कणसें मक्याची खावया ।। ७ ।। बहुत मंडळी बरोबरी । कणसें खाया आली खरी । विहिरीपासी तयारी । केली कणसें भाजण्याची ।। ८ ।। विहीर होती धनत्तर । पाणी जिला अपरंपार । गर्द छायेचे वृक्ष थोर । जवळ होते चिंचेचे ।। ९ ।। आगट्या पेटल्या एकसरां । अजमासें हो दहाबारा । तेणे डोंब झाला खरा । गगनोदरीं धूमाचा ।। १० ।। त्यायोगे ऐसे झाले । आग्या मोहोळ लागलेले । चिंचवृक्षावरी भलें । त्याच्या माशा उठल्या कीं ।। ११ ।। त्या माशा उठतां क्षणीं । मंडळीं गेली पळोनी । कणसें ठिकाणच्या ठिकाणीं । मक्याचीं तीं राहिलीं हो ।। १२ ।। त्या आग्या मोहोळांच्या मक्षिका । पसरल्या अवघ्या मळ्यांत देखा । घोंगड्याचा करून बुरखा । कोणी गेले पळून ।। १३ ।। प्राणापरी आवडती । वस्तु नसे हो कोणती । अशा वेळीं समर्थमूर्ति । आसनीं होती निर्धास्त ।। १४ ।। ते नाही पळून गेले । आसनीं आपल्या स्वस्थ बसले । विचार करूं लागले । निजचित्ती माश्यांचा ।। १५ ।। माशी तरी मीच झालों । मोहोळ तेंही मीच बनलों । कणसें खाया मीच आलों । कणसें तेंही रूपे माझी ।। १६ ।। ऐशा विचारें आनंदांत । महाराज राहिले डोलत । अंगावरी असंख्यात । माशा येऊन बैसल्या ।। १७ ।। वाटे पासोडी माश्यांची । समर्थ पांघरले साची । योग्यता ब्रह्मनिष्ठाची । काय वर्णन करावी ? ।। १८ ।। माशा चावती वरच्यावरी । परी न तो पर्वा करी । त्यांचे कांटे शरीरी । बोचले असती असंख्यात ।। १९ ।। यासी झाला एक प्रहर । भक्त झाले चिंतातुर । बंकटलालाचे

अंतर । दु:खे व्याकुळ झालें हो ।। २० ।। कोठून बुद्धी झाली मला । येथें आणिले समर्थाला । कणसें मक्याची खावयाला । मंडळींच्या समवेत ।। २१ ।। अशा समर्थालागून । दु:ख द्याया मीच कारण । झालों हे कां शिष्यपण । माझें हाय रे दुर्दैवा ? ।। २२ ।। बंकटलालानें तयारी । पुढें येण्याची केली खरी । हें जाणोन अंतरी । कौतुक केलें समर्थानें ।। २३ ।। जीवांनो ! जा निघोन । बसा मोहोळी जाऊन । माझ्या बंकटाकारण । तुम्ही कोणी न चावावें ।। २४ ।। जमलेल्या मंडळींत । बंकट हाच नि:सीम भक्त । जो माझ्या प्रीत्यर्थ । येत आहे धांवोनिया ।। २५ ।। ऐसे म्हणतां माश्या गेल्या । मोहोळावरी जाऊन बैसल्या । बंकटलालानें पाहिल्या । त्या आपल्या निजदृष्टीं ।। २६ ।। महाराज त्या पाहोनी । बोलते झाले हांसोनी । वा खूप केलीस मेजवानी । आम्हांसी तूं माश्यांची ।। २७ ।। अरे ते जीव विषारी । बैसले माझ्या अंगावरी । माझ्यापासून झाले दूरी । लड्डूभक्त येधवां ।। २८ ।। याचा करी विचार । संकट आल्या कोणावर । कोणी न साह्य करणार । एका ईश्वरांवाचुनी ।। २९ ।। जिलेबी पेढे बर्फी खाती । माश्या आल्या पळून जाती । ऐशी जयांची आहे कृति । ते स्वार्थी भक्त नि:संशय ।। ३० ।। बंकटलाल मधुरोत्तर । करितां झाला त्यावर । महाराज आणवूं कां सोनार । काटे माश्यांचें काढावया ? ।। ३१ ।। महापापी मी गुरुराया । तुम्हांलागीं त्रास द्याया । आणवितां झालो या ठायां । माश्या किती डसल्या तरी ! ।। ३२ ।। गांधी अगणित अंगावर । उठल्या तुमच्या साचार । याचा व्हावया परिहार । उपाय सांगा कोणता ? ।। ३३ ।। बंकटलालाचे ऐकिले । वचन, महाराज बोलते झाले । अरे यांत ना कांहीं अधिक घडलें । डसणें स्वभाव माश्यांचा ।। ३४ ।। मला त्याची मुळीच बाधा । होणार नाहीं जाण कदा । त्या माशीरूप सच्चिदानंदा । म्यां जाणले म्हणोन ।। ३५ ।। माशी तरी तोच झाला । तोच आहे माझा पुतळा । पाण्यानेंच पाण्याला । काय दुखवितां येईल ? ।। ३६ ।। हें ऐकतां ब्रह्मज्ञान । बंकटलाल धरी मौन । कांटे काढण्यालागून । बाहिले त्यानें सोनारा ।।३७ ।। सोनार चिमटे घेऊन आले । देहास शोधूं लागले । कोठे आहेत कांटे रुतले । मक्षिकेचे पाहावया ।।३८ ।। महाराज वदले तयांना । काय ह्या वंध्यामैथुना । करितसा तुमच्या नयनां । कांटे ते ना दिसतील ।।३९ ।। ते काढण्या चिमट्याची । गती नाहीं मुळीच साची । साक्ष ती ह्या गोष्टीची । मीच दावितों तुम्हांला ।। ४० ।। ऐसे म्हणून कौतुक केलें । वायूलागी रोधून धरिलें । तों कांटे अवघे वरी आलें । रुतलेल्या स्थलांतून ।। ४१ ।। तो पाहतां प्रकार । लोक आनंदले फार । कळून आला अधिकार । श्रीगजाननस्वामींचा ।। ४२ ।। पुढें कणसें

भाजली। अवघ्यांनी ती ग्रहण केलीं। अस्तमानीं निघून आली । मंडळी निजगृहातें ।। ४३ ।। असो पुढें एक वेळां। महाराज गेले अकोटाला । आपुल्या बंधूस भेटण्याला । श्रीनरसिंगजीकारणें ।। ४४ ।। हा कोतश्या अल्लीचा। शिष्य मराठा जातीचा। कंठमणी विठ्ठलाचा । भक्तिबलानें झाला असे ।। ४५ ।। त्या नरसिंगजीचें चरित्र । मी भक्तलीलामृतांत । वर्णिले आहे इत्थंभूत । आतां ते सांगणे नको।। ४६ ।। हें अकोट नामें नगर । शेगांवाहून साचार । आहे अठरा कोसांवर । ईशान्येला परियेसी ।। ४७ ।। मनोवेगाचा सजवून वारू । निघते झाले सद्गुरू । जे पदनताचे कल्पतरू । श्रीगजानन महाराज ।। ४८ ।। अकोटाच्या सान्निध्यासी । एका निबिडतरशा अरण्यासी । नरसिंग राहे अहर्निशी । एकान्तवास सेवावया ।। ४९ ।। हें निर्जन अवघे अरण्य । महा भयंकर दारुण। निंब अश्वत्थ रातांजन । वृक्ष जेथे उदेलें ।। ५० ।। लता त्या नाना जाती । वृक्षा वेढून बैसल्या असती । तृण वाढलें भूमीवरती। सर्प वारुळीं असंख्यात ।। ५१ ।। ऐशा त्या अरण्यांत । नरसिंगजी जाऊन बसत। म्हणून आले अवचित । समर्थ त्यासी भेटावया ।। ५२ ।। सारखा भेटे सारख्यासी । पाणीच मिळे पाण्याशीं । विजातीय द्रव्यासी । समरसता होणे नसें ।। ५३ ।। गजाननासी पाहिले । तेणें चित्त आनंदलें। स्वामी नरसिंगजीचें भलें । तो प्रेमा न वर्णवे कीं ।। ५४ ।। एक हरी एक हर। चालते बोलते परमेश्वर । एक राम एक कुमर । वसुदेवदेवकीचा ।। ५५ ।। एक मुनि वसिष्ठ । एक पाराशर ऋषि श्रेष्ठ । एक जान्हवीचा कांठ । एक तट गोदेचा ।। ५६ ।। एक हिरा कोहिनूर । एक कौस्तुभ साचार। एक वैनतेय, एक कुमर । सती वानरी अंजनीचा ।।५७।। दोघे भेटले एकमेकां। दोघा आनंद सारखा । बैसते झाले आसनीं एका । हितगुज तें करावया ।। ५८ ।। अनुभव ते आपापले। एकमेकां कथिते झाले । नरसिंगा तूं उत्तम केलें । प्रपंचात राहिलास ।। ५९ ।। मी त्याग केला तयाचा । स्वीकार करून योगाचा। या सच्चिदानंद तत्त्वाचा । करितां झालों विचार।। ६० ।। या योगाच्या क्रियेंत । गोष्ट होती अघटित । ज्यांचा मुळी न लागे अंत । या सामान्य लोकांला ।। ६१ ।। त्या गोष्टी लपवावया। पिसा बनलों जगा ठायां । उपाधि ते नासावयां । वेड बळेंच पांघरलों ।। ६२ ।। तत्त्व जाणण्याकारण । मार्ग कथिले आहेत तीन । कर्म, भक्ती, योग म्हणून । शास्त्रकारांनी शास्त्रांत ।। ६३ ।। फल या तिन्हीं मार्गांचें । एकचि आहे अखेरीचे । परी बाह्य स्वरूप त्यांचें । भिन्न भिन्न असें कीं ।। ६४ ।। योगी योगक्रियेचा । जरी अभिमान वाही साचा । तरी तयासी तत्त्वाचा । खरा बोध ना होईल ।। ६५ ।। योगक्रिया वरून । अलिप्त राहावे तयापासून ।

कमलपत्रासमान । तरीच तत्त्व कळून ये ।। ६६ ।। याचपरी प्रपंचाची । स्थिती नरसिंगा आहे साची । आसक्ति कन्यापुत्रांची । मुळींच राहता कामा नये ।। ६७ ।। गार पाण्यांत रहाते । परी न पाणी शिरूं देते । तैसेंच वागती साचें । या प्रपंचामाझारीं ।। ६८ ।। यापरी त्वां रहावें। अपेक्षारहित असावें । चित्तांतून ना ढळू द्यावे । सच्चिदानंद ईशाला ।। ६९ ।। म्हणजें कांहींच अशक्य नाहीं । तूं, मी आणि शेषशायी। एकरूप आहों पाही । जन जनार्दन भिन्न नसे ।। ७० ।। नरसिंग म्हणती बंधुराया ! । आलास मसी भेटावया। ही तुझी केवढी दया । उपमा याला देण्या नसे ।। ७१ ।। प्रपंच मुळी अशाश्वत । त्याची काय किंमत । दुपारच्या सावलीप्रत। कोण सांग खरें मानी? ।। ७२।। तूं कथिले जयापरी । तैसा वागेन भूवरीं । मी, जाण वरच्यावरी। अशीच भेटी द्यावी तुवां।। ७३ ।। देहप्रारब्ध जयाचें । असेल ज्या जातीचें । तेंच आहे व्हावयाचें। लोकाचारी नि:संशय ।। ७४ ।। तुम्हां आम्हां कारणें । जे कां धाडिले ईशानें । तेच आहे आपणांकरणें । निरालसपणें भूमिवरी ।। ७५।। आतां विनंती इतुकीच खरी । व्यावहारिक भेट वरच्यावरी। देत जावी साजिरी । मी धाकटा बंधु तुझा ।। ७६ ।। नंदीग्रामा राहिला भरत। रघुपतीची वाट पाहात । तैसाच मी या आकोटात । राहून पाहतों वाट तुझी ।। ७७ ।। तुला येथे यावया। अशक्य कांहीं नाहीं सदया। अवघ्या आहेत योगक्रिया। अवगत तुला पहिल्यापून।। ७८ ।। पद न लाविता पाण्याप्रत । योगी भरधांव वरूनी पळत । क्षणामाजी फिरून येत । शोधून अवघ्या त्रिभुवना ।। ७९।। ऐसें हितगुज उभयतांचें । रात्रभरी झालें साचें । भरतें आलें प्रेमाचें। दोघांचिया संगमीं ।। ८० ।। खरे खरे जे कां संत । तेथें हेंच घडून येत । दांभिकांची होतात । भांडणें पाहून एकमेकां ।। ८१ ।। दांभिक म्हणूं नये गुरू । ते अवघे पोटभरू । पुरामाजीं फुटकें तारूं । तारण्यासी समर्थ नसे! ।। ८२ ।। दांभिकांचा बोलबाला । जरी होतो जगीं भला। तरी त्यागणें आहे त्याला । निवडूनिया श्रोते हो! ।। ८३ ।। संतत्व नाहीं मठांत । संतत्व नाहीं विद्वत्तेंत। संतत्व नाही कवित्वांत । तेथें स्वानुभव पाहिजे ।। ८४।। दांभिक मुलाम्याचे सोनें । त्याला सांगा काय घेणे । गृहिणी म्हणून ठेवणें । काय कसबीण सदनात ? ।। ८५ ।। ही संतजोडी साक्षात्कारी । दांभिकतेची साच वैरी । नांदे ज्यांच्या सदैव घरीं । सन्नीती सदाचार ।। ८६ ।। नरसिंगजीस भेटण्या जाण। काननीं आले गजानन । ऐसें कळले वर्तमान । गुराखीद्वारे आकोटाला ।। ८७ ।। तें कळतां आनंदले । लोक धावूं लागले । नारळ घेऊन निघाले । पहाया द्वय संतांसी ।। ८८।। एकमेकां ऐसें म्हणती । चला चला रे सत्वर गती । गोदा आणि भागीरथी । संगम पावली

काननांत ।। ८९ ।। त्या भेटरूप प्रयागासी । जाऊं आपण स्नानासी । या महोदयपर्वणीसी । साधून घेऊं चला हो ।। ९० ।। तो इकडे काय झालें । गजानन आधींच निघून गेले । नरसिंगासी पुसून भले । भेट ना झाली पौरासी ।। ९१ ।। पुढें एकदां गजानन । करीत असता भ्रमण । दर्यापुराच्या सन्निध जाण । येतें जाहले शिष्यांसह ।। ९२ ।। दर्यापुराच्या शेजारी । शिवर गांव निर्धारी । असे चंद्रभागेच्या तीरीं । व्रजभूषणा वास जेथें ।। ९३ ।। श्रोते ही चंद्रभागा । पंढरीची नाहीं बघा । ही लहानशी एक गंगा । पयोष्णीला मिळणारी ।। ९४ ।। या शिवर गांवांत । व्रजभूषण नामें पंडित । चार भाषा अवगत । होत्या श्रोते जयाला ।। ९५ ।। कीर्ति ज्याच्या विद्वत्तेची । वऱ्हाडी पसरली साची । याला भक्ति भास्कराची । आत्यंतिक असे हो ।। ९६ ।। प्रत्यहीं चंद्रभागेवर । स्नान करी साचार । उदयास येतां दिनकर । अर्घ्य त्यासी देतसे ।। ९७ ।। पंच पंच उषःकाला । व्रजभूषण उठे भला । सारून प्रातर्विधीला । अरुणोदयीं स्नान करी ।।९८।। तेंही शीतोदकांनी । ऐसा कर्मठ परी ज्ञानी । मानमान्यतां विद्वज्जनीं । ज्याची होती विशेष ।। ९९ ।। त्या शिवरगांवाला । योगीराज फिरत आला । वाटे तपाचें द्यावयाला । फल त्या व्रजभूषणासी ।। १०० ।। चंद्रभागेच्या वाळवंटी । हा बैसला ज्ञानजेठी । समोर नदीचिया कांठी । आले व्रजभूषण स्नानाला ।। १ ।। ती प्रभातीची वेळा पाही । प्रकाशिल्या दिशा दाही । कुक्कुटाचा आवाज येई । वरचेवरी ऐकावया ।। २ ।। चातक भारद्वाज पांखरें । जाऊं लागली अत्यादरें । भास्करासी सामोरे । पूर्व दिशा लक्षून ।। ३ ।। भास्कराचा उदय होतां । तम निमाला हां हां म्हणतां । जैसा सभेस पंडित येतां । मूर्ख जाती उठोनी ।। ४ ।। ऐशा त्या सुप्रभातीं । वाळवंटी गुरुमूर्ति । बैसली होती निश्चिती । ब्रह्मानंदी डोलत ।। ५ ।। सवें शिष्य अपार । बसले होते मंडलाकार । ते शिष्य नव्हते किरणें थोर । त्या गजाननभास्कराची ।। ६ ।। तईं व्रजभूषण तत्त्वतां । झाला सूर्यासीं अर्घ्य देतां । तो हा पुढें ज्ञानसविता । त्यानें पाहिला प्रत्यक्ष ।। ७ ।। सूर्याप्रमाणें सतेज कांति । आजानुबाहू निश्चिती । दृष्टि नासाग्राच्या वरती । स्थिर जयाची झाली असे ।। ८ ।। ऐसा पुरुष पाहतां क्षणी । व्रजभूषण हर्षला मनीं । संध्यासामान घेऊनी । आला धावून जवळ त्यांच्या ।। ९ ।। अर्घ्य दिले पायांवरी । गजाननाच्या सत्वरीं । प्रदक्षिणाही अखेरी । त्यानें घातली तयाला ।। ११० ।। मित्राय नमः सूर्याय नमः । भानवे नमः खगाय नमः । ऐशी नांवे घेऊन पाहा । घातले द्वादश नमस्कार ।। ११ ।। शेवटीं आरती

ओवाळिली । गजाननासी आदरें भली । न्यूनता ती नाहीं पडली । कशाचीही त्या ठायां ।। १२ ।। प्रार्थनापूर्वक नमस्कार । साष्टांग केला अखेर । मुखानें तें स्तवन थोर । महाराजांचे चाललें ।। १३ ।। माझ्या तपाचरणाचें । फळ आजि मिळालें साचें । दर्शन दिव्य पायांचें । आज झालों धन्य मी ।। १४ ।। नभोदरींच्या भास्कराला । देत होतों अर्घ्य भला । तों आज प्रत्यक्ष पाहिला । ज्ञाननिधी योगेश्वर ।। १५ ।।

**श्लोक - हे पूर्णब्रह्म जगचालक ज्ञानराशी । ऐसें युगायुगीं किती अवतार घेसी । झाल्यास दर्शन तुझें ! भय रोग चिंता । नासे गजाननगुरी! मज पाव आतां ।। १ ।।**

ऐसी प्रार्थना करून । संपविलें त्यानें स्तवन । योगेश्वरें या आलिंगन । दृढ दिधले त्या दोन्ही करें ।। १६ ।। माय जैसी लेंकराला । प्रेमे धरी पोटाला । तेवीं व्रजभूषणाला । धरिते झाले महाराज ।। १७ ।। मस्तकावरीं ठेविला कर । आशीर्वाद दिधला थोर । सर्वदा तुझा जयजयकार । होईल बाळा व्रजभूषणा ।। १८ ।। कर्म मार्ग सोडूं नको । विधी निरर्थक मानूं नको । मात्र त्यांत होऊं नको । लिप्त बाळा केव्हांही ।। १९ ।। आचरून कर्म फल । टाकितां भेटतो घननीळ । त्याच्या अंगीं न लागे मळ । या कर्माचा केव्हांही ।। १२० ।। तूं आतां आपुल्या सदनीं । माझें बोल ठेवी मनीं । प्रत्यहीं माझें तुला ध्यानीं । होत जाईल दर्शन ।। २१ ।। ऐसें म्हणून प्रसाद दिला । श्रीफलाचा श्रोते भला । त्या व्रजभूषण पंडिताला । महाराज आले शेगांवीं ।। २२ ।। ह्या शेगांवाचें होते नांव । पूर्वकालीं शिवगांव । अपभ्रंश लाधला ठाव । शेगांव या शब्दाला ।। २३ ।। तेंच हल्लीं प्रचलित । आहे बुधहो वऱ्हाडांत । सतरा पाटील होते सत्य । ह्या एकाच ग्रामाला ।। २४ ।। महाराज शेगांवासी आले । परी न स्थिर राहिले । हमेशा ते भटकत फिरले । मनास येईल त्या स्थळा ।। २५ ।। आकोट अकोलें मलकापूर । नांवें सांगावीं कुठवर ? । चांदण्यांची न होणार । मोजदाद कोणाही ।। २६ ।। ज्येष्ठ आषाढ महिना गेला । पुढें श्रावण मास आला । उत्सव होता सुरूं झाला । मारुतीच्या राउळांत ।। २७ ।। हें मारुतीचें मंदिर । शेगांवीं भव्य साचार । पाटील मंडळी थोर थोर । होती या भक्त देवाची ।। २८ ।। पेंडीलागीं जैसा आळा । तेवीं पाटील गांवाला । जें जें कांहीं आवडे त्याला । तिकडे लोकांचा कल होई ।। २९ ।। चाले उत्सव महिनाभर । अभिषेक पोथी कीर्तन गजर । अन्नदानाशीं येई पूर । अवघे लोक तृप्त होती ।। १३० ।। या उत्सवाचा पुढारी । खंडू पाटील निर्धारी । जो गांवचा कारभारी । होता उदार

मनाचा ।। ३१ ।। श्रोते हे पाटीलपण । आहे वाघाचें पांघरूण । तें जो घेई त्याला जन । भिऊ लागती सहजची ।। ३२ ।। गांव करी तें राव न करी । ऐशी मराठी भितरीं । म्हण एक आहे साजरी । ती यथातथ्य असे ।। ३३ ।। त्या मारुती मंदिरासी । आले गजानन पुण्यराशी । श्रावणाच्या आरंभासी । उत्सव श्रीचा पाहावया ।। ३४ ।। बोलले बंकटलालासी । मी आतां या मंदिरासी । राहीन जाण अहर्निशीं । त्याचा शोक करूं नको ।। ३५ ।। गोसावी संन्यासी फकीर । यांना कायमचें राहण्या घर । योग्य नाहीं साचार । तुम्हां प्रापंचिकाचें ।। ३६ ।। मी परमहंस संन्यासी । आतां राहतों मंदिरासी । तूं बोलाविशी ज्या दिवशीं । तेवढ्यापुरता येईन तेथ ।। ३७ ।। हें अंतरींचें गुह्य तुला । कथन केलें बंकटलाला । स्वामी शंकराचार्याला । भ्रमण करणें भाग आलें ।। ३८ ।। गोसावी मच्छिंद्र जालंदर । हेंही राहिले निरंतर । प्रापंचिकाचें वगळून घर । काननामाजीं वृक्षातळी ।। ३९ ।। छत्रपती राजा शिवाजी । जो रणबहादूर वीरगाजी । ज्याने हिंदूंची रक्षिली बाजी । दंडून दुष्ट यवनांना ।। १४० ।। त्या शिवाजीचें प्रेम फार । होतें रामदासावर । परी सज्जनगडावर । स्वामी होते वस्तीला ।। ४१ ।। याचा विचार करावा । हट्ट मुळीं ना धरावा । माझ्या म्हणण्यास मान द्यावा । यांत कल्याण तुझें असें ।। ४२ ।। निरुपाय होऊन अखेर । देता झाला रुकार । तो बंकटलाल सावकार । गजाननाचें म्हणण्याला ।। ४३ ।। मंदिरीं स्वामी समर्थ येतां । हर्ष झाला समस्तां । भास्कर पाटील शुश्रूषेकरितां । जवळ राही निरंतर ।। ४४ ।। हा दासगणूविरचित । श्रीगजानन विजय नामें ग्रंथ । मुमुक्षूला दावो पथ । संतचरण सेवेचा ।। १४५ ।। शुभं भवतु ।। श्रीहरिहरार्पणमस्तु ।।

।। इति श्रीगजानन विजय ग्रंथस्य षष्ठोऽध्याय समाप्तः ।।

# अध्याय सातवा प्रारंभ

श्रीगणेशायनमः ।। जयजयाजी राघवा रामा । जय जयाजी मेघःश्यामा । संतजनांच्या विश्रामा । सीतापते दाशरथे ।। १ ।। तुझ्या कृपेने वानर । बलिष्ठ झाले भूमिवर । ज्यांनी रावणाचा चक्काचूर । केला देवा लंकेवरी ।। २ ।। तुझी कृपा झाल्या पाही । तो सर्वदा होतो विजयी । जें जें इच्छील तें तें नेई । काम आपलें तडीला ।। ३ ।। भूपतीचा वशीला । ज्यातें देवा लाधला । तो वंद्य होतो दिवाणाला । नीच कितीही असला जरी ।। ४ ।। ऐशा अमोघ कृपेला । होईन कां मी योग्य भला । याचा विचार जो मी केला । तों ऐसे आलें कळोन ।। ५ ।। नाहीं ज्ञान, नाहीं भक्ती । खरीखुरी हे श्रीपती । ऐसी आहे माझी स्थिति । शोचनीय पांडुरंगा ।। ६ ।। मन सदा आशाळभूत । ते ना कदा स्थिर होत । नाना विकल्प मनांत । येऊ लागती वरच्यावरी ।। ७ ।। मग ऐशा पातक्याला । केवि लाधावा वशीला । तुझा सांग जगत्पाला । हें व्यावहारिक म्हणणें असें ।। ८ ।। तुला आवडी पातक्याची । मनापासून आहे साची । ऐसी साक्ष पुराणाची । आहे की दीनबंधो ।। ९ ।। पुण्यवानाचें तारण । केल्या न कांही नवल जाण । जो पातक्यालागून । उद्धरीतसे तोच मोठा ।। १० ।। या जगतीं तुझ्याहून । मोठा नाही कोणी आन । देवा मम पातकालागून । किमपि आता पाहूं नको ।। ११ ।। रक्षी आपला मोठेपणा । मज सांभाळी नारायणा । दासगणू शरण चरणा । आता उपेक्षा करूं नका ।। १२ ।। हा मारुतीचा उत्सव । करीत होता अवघा गांव । याचा पुढारी खंडेराव । पाटील गणेशकुळीचा ।। १३ ।। हे पाटील घराणें जाण । आहे अति पुरातन । घरचे धन कनकसंपन्न । पसारा थोर शेतीचा ।। १४ ।। पूर्वीपासून यांच्या घरीं । संतसेवा होती खरी । आली भाग्ये जमेदारी । मग काय विचारतां ? ।। १५ ।। महादाजी पाटलास । दोन मुलगे औरस । थोरल्या त्या पुत्रास । नांव असे कडताजी ।। १६ ।। कुकाजी तो धाकटा । पंढरीचा भक्त निका । गोमाजीचा उपदेश देखा । होता या घराण्यातें ।। १७ ।। पाटील कडताजी कारण । मुलगे होते सहा जण । कुकाजी नुसता भाग्यवान । पुत्र नव्हतां त्याचे कुशी ।। १८ ।। कडताजी पावतां मरण । साही मुलांचे संगोपन । कुकाजीनें केले जाण । जन्मदात्या बापापरी ।। १९ ।। कुकाजीच्या अमदानींत । भरभराट झाली बहुत । अष्टसिद्धी सदनांत । वाटे नांदू लागल्या ।। २० ।। पाटील कुकाजीनंतर । खंडू करी कारभार ।

याच्या पुढें साचार । कांहीं न चालें कोणाचे ।। २१ ।। या खंडू पाटलाप्रती । पांच बंधू निश्चिती । गणपती नारायण मारुती । हरी आणि कृष्णाजी ।। २२ ।। आधीच पाटील जमेदार । सत्ता हाती साचार । पैशाचा तो निघे धूर । जयाचिया सदनामध्यें ।। २३ ।। बंधुसारे तालीम करिती । दांडपट्टे खेळती । कुस्तीचा तो षोक अती । होता हरी पाटलास ।। २४ ।। उत्सव नांवास मारुतीचा । तरी जयजयकार पाटलाचा । म्हणतील तो शब्द त्यांचा । झेलणें भाग रयतेला ।। २५ ।। नेहमी कटकटी मारामाऱ्या । शेगांवांत होती खऱ्या । पाटील एक्या मापी साऱ्या । लोकांप्रती मोजितसे ।। २६ ।। हा सज्जन साधुसंत । हे न त्यांच्या मनीं येत । वाटेल त्या बोलती सत्य । अद्वातद्वा यथामती ।। २७ ।। असो पाटीलबंधूंनी । राऊळांत येऊनी । महाराजातें हेटाळणीं । करण्याचें तें सुरू केलें ।। २८ ।। कोणी म्हणावें पिश्या गण्या । खातोस कां ताककण्या ? । ऐशा गोष्टी अति उण्या । त्यांनी कराव्या समर्थांसी ।। २९ ।। कोणी म्हणावें खेळ कुस्ती । आम्हांसवे निश्चिती । तुला लोक बोलती । योगयोगेश्वर म्हणोन ।। ३० ।। त्याचे दाव प्रत्यंतर । ना तरी आम्ही देऊं मार । याचा करी विचार । बऱ्या बोलाने येधवां ।। ३१ ।। त्यांचें बोल ऐकावे । समर्थांनीं न उत्तर द्यावें । अवघे हंसण्यावरी न्यावें । कोप न धरावा यत्किंचित् ।। ३२ ।। ऐसा उर्मट प्रकार । मंदिरीं चाले निरंतर । म्हणून पाटील भास्कर । समर्थासी ऐसें वदला ।। ३३ ।। नका महाराज येथे राहूं । चला आकोली ग्रामा जाऊं । हीं पाटील पोरें माजलीं बहु । यांचा नको संबंध ।। ३४ ।। हे शक्तिनें माजले । लक्ष्मीनें धुंद झालें । सत्तेपुढें कांहीं न चाले । येथे यांची पाटीलकी ।। ३५ ।। गजानन बोलले त्यावरी । भास्करा थोडा दम धरी । ही पाटील मंडळी सारी । आहेत माझे परमभक्त ।। ३६ ।। मात्र विनयाप्रती थारा । यांच्यापाशीं नाही जरा । शोधुनि पाहा अंतरा । त्यांच्या म्हणजे कळेल तुज ।। ३७ ।। ही पोरें पाटलाचीं । माझीं लेकरें आहेत साचीं । कृपा आहे संतांची । यांच्या कुळावर भास्करा ।। ३८ ।। जमेदारा उर्मटपण । हेच आहे भूषण । काय वाघाचें तें वजन । असावे सांग गाईपरी ? ।। ३९ ।। तलवारीला मऊपणा । मुळीं उपयोगी नाहीं जाणा । अग्नीनें तो थंडपणा । सांग धरावा कवण्या रीती ।। ४० ।। गेल्यावरी कांहीं काळ । हा उर्मटपणा जाईल । पावसाळ्याचे गढूळ जल । हिवाळ्यांत निवळ होई ।। ४१ ।। एके दिवशीं पाटील हरी । आला मारुतीच्या मंदिरी । महाराजांला धरून करीं । म्हणे कुस्ती करी माझ्यासवें ।। ४२ ।। तुला कुस्तीत करीन चीत । चाल जाऊं तालमीत । उगे न बैसे ऐसें

म्हणत । गण गण गणांत बोते ।। ४३ ।। तुझे प्रस्थ माजले बहु । ते खरें खोटें आज पाहूं । मला पाडसी तरी देऊं । तुला मोठे बक्षीस ।। ४४ ।। ते समर्था मानवलें । दोघे तालमीमध्ये गेलें । समर्थांनी कौतुक केलें । ते आतां परियेसा ।। ४५ ।। खाली बसले गजानन । उठीव आतां मजलागून । असलास जरी पैलवान । तरी साच करशील हें ।। ४६ ।। हरी पाटील उठवावया । लागला यत्न करावया । परी ते अवघे गेले वायां । हालेनात समर्थ मुळीं ।। ४७ ।। घामाघूम तनु झाली । शक्तीची ती कमाल केली । पेंच झालें निर्बळी । समर्थांसी झुंजतां ।। ४८ ।। हरी म्हणे मनांत । हा केवढा तरी सशक्त ? । अचल ऐसा पर्वत । याच्यापुढे येईल उणा ।। ४९ ।। हा किडकिडीत दिसतो जरी । शक्ती याची गजापरी । खोड्या आमच्या नानापरी । आजवरी यानें सहन केल्या ।। ५० ।। त्याचें हेंच कारण । हा गजापरी बलवान । आम्ही जंबुकासमान । म्हणून नाहीं रागावला ।। ५१ ।। जंबुकाच्या चेष्टेला । गजपती न मानी भला । श्वानाचिया भुंकण्याला । व्याघ्र ना दे किंमत ।। ५२ ।। कांहीं असो याच्या पायीं । आतां ठेवणें आली डोई । आजपर्यंत मी नाहीं । कवणासीही नमन केलें ।। ५३ ।। समर्थ म्हणाले हरीला । आतां बक्षिस द्या आम्हांला । ना तरी चीत मजला । तुवां करावें कुस्तींत ।। ५४ ।। कुस्ती हा मर्दानी । षोक श्रेष्ठ सर्वांहुनी । कृष्ण बलरामें बालपणीं । ऐशाच कुस्त्या केल्या रे ! ।। ५५ ।। मुष्टिक आणि चाणूर । मल्लविद्येने परमेश्वर । वधिता झाला साचार । जे देहरक्षक कंसाचे ।। ५६ ।। पहिली संपत्ति शरीर । दुसरें तें घरदार । तिसरीचा तो प्रकार । आहे धनमानाचा ।। ५७ ।। तुझ्याप्रमाणे पूतनारी । पाटील होता यमुनातिरीं । गोकुळींचीं पोरें सारीं । त्यानें केली सशक्त ।। ५८ ।। तैसे तुवां करावें । शरीरबला वाढवावें । ना तरी हे सोडावें । पाटील नांव आपुलें ।। ५९ ।। हेंच बक्षीस द्यावे मज । ना तरी कुस्ती करी आज । येणें रिती उतरला माज । समर्थांनी हरीचा ।। ६० ।। हरी म्हणे समर्थांस । आपुली कृपा असल्यास । शेगांवच्या लेकरांस । सशक्त करितां येईल कीं ।। ६१ ।। ऐसे धूर्तपणाचे बोलणें । केले पाटील हरीनें । जे मुळांत असती शहाणे । त्यांना शाळा नको कीं ।। ६२ ।। असो त्या दिवसांपासून । हरीनें दिले सोडून । अद्वातद्वा भाषण । करणें पुण्यपुरुषाशीं ।। ६३ ।। ही पाहोनि त्याची कृति । इतर बंधु बोलती । हरी तूं त्या जोगड्याप्रति । कां भितोस कळेना ।। ६४ ।। आपण पाटलाचे कुमार । या गांवींचें जमेदार । तें तूंच कां रे ठेविशी शिर । पदीं त्या नागव्याच्या ।। ६५ ।। त्या पिशाचें थोतांड । गांवी माजलें उदंड । त्याचा पाहिजे काढिला दांड ।

लोकां सावध करावया ।। ६६ ।। ऐसे न जरी आपण केलें । तरी लोक अवघे होतील खुळे । पाटलाचे कर्तव्य भले । गांवा हुशार करण्याचें ।। ६७ ।। मैंद साधूचे वेष घेती । वेड्यावाकड्या कृत्या करिती । बायाबापड्या भोंदिती । याचा करी विचार ।। ६८ ।। सोन्या कस लाविल्याविना । न कळे रे सोनेपणा । तुकारामाचा शांतपणा । कळून आला ऊंसानें ।। ६९ ।। ज्ञानेश तेव्हां साधु कळला । जेव्हां रेडा वेद बोलला । परीक्षेविण कवणाला । अस्थानीं मान देऊं नये ।। ७० ।। चाल परीक्षा तयाची । आज आपण करूं साची । मोळी घेऊन ऊंसाची । मंदिरात पातलें ।। ७१ ।। हरी न कांहीं बोलला । इतरांनीं प्रश्न केला । अरे पिशा या ऊंसाला । खातोस कां तूं सांग हें ? ।। ७२ ।। जरी ऊंस खाण्याची । इच्छा असेल तुला साची । तरी एक अट आमुची । आहे ती तूं मान्य करी ।। ७३ ।। आम्ही ऊंसाचे करूं प्रहार । तुझ्या येधवां अंगावर । त्याचे वळ ना उठले जर । तरीच योगी मानूं तुला ।। ७४ ।। ऐसें भाषण ऐकिलें । महाराज कांहीं न बोलले । लेंकराचे बालिश चाळे । मनीं न आणीं सूज्ञ कदा ।। ७५ ।। मारुती म्हणाला त्यावर । अरे हा भ्याला साचार । ऊंसाचा तो खाण्या मार । हा कांहीं तयार नसे ।। ७६ ।। मग म्हणाला गणपती । अरे मौन हीच संमती । त्यानें दिधली आपणाप्रति । आतां काय पाहतां ! ।। ७७ ।। ते दोघां तिघां मानवलें । ऊंस करी घेतले । समर्थांसी मारण्या भले । आले चढून अंगावर ।। ७८ ।। ते पाहतां नारीनर । मंदिरी जे होते इतर । ते पळूं लागले भराभर । भास्कर तेवढा जवळ असे ।। ७९ ।। भास्कर म्हणें पोरांसी । नका मारूं समर्थांसीं । या ऊंसानें आज दिवशीं । हें कांहीं बरें नव्हे ।। ८० ।। तुमचा पाटील कुळांत । जन्म झाला आहे सत्य । तुमचें असावें दयाभूत । अंत:करण दीनांविषयी ।। ८१ ।। हें महासाधु तुम्हांसी । जरी न वाटतील मानसी । तरी हीन दीन लेखून यासी । द्यावे सोडून हेच बरें ।। ८२ ।। अरे शूर जे कां शिकारी । ते चाल करिती वाघावरी । उगीच बंदूक घेऊन करी । न मारिती नाकतोडा ।। ८३ ।। मारुतीनें जाळिली । रावणाची लंका भली । उगीच नाहीं चाल केली । झोपड्या पाहून दुबळ्यांच्या ।। ८४ ।। यावरी म्हणती पोरें । तुमचें भाषण ऐकिले सारें । गांवीचें लोक अत्यादरें । योगयोगेश्वर म्हणती या ।। ८५ ।। म्हणून त्याचा पहाया योग । येथें आलो आम्ही चांग । यात न घ्यावा तुम्ही भाग । पाहा मौज दुरूनी ।। ८६ ।। ऊंस घेऊन हातात । मारूं लागले समर्थाप्रत । जैशा का झोडितात । ओंब्या शेती कृषीवल ।। ८७ ।। परि न महाराज डगमगले । मुलां पाहून हंसत बसले । कोठेंही ना उमटले । वळ त्यांच्या

अंगावर ।। ८८ ।। तें पाहतां पोरें भ्यालीं। चरणीं त्यांच्या लागलीं । म्हणती खराच आहे बली । हा योगयोगेश्वर ।। ८९ ।। महाराज म्हणती पोरांला । मुलांनों तुमच्या कराला । असेल अति त्रास झाला । मारण्यानें मजलागी ।। ९०।। त्या श्रमाचा करण्या नाश । काढून देतो इक्षुरस । तुम्हांलागीं प्यावयास । या बसा माझ्यापुढें ।। ९१।। ऐसे म्हणून घेतला । एक ऊंस करीं भला । हातानेंच पिळून त्याला । रस काढिला पात्रामध्यें ।। ९२।। त्या ऊंसाची अवघी मोळी । समर्थांनी पाहा पिळिली। आणि प्यायाकारणें दिली । रस नव्हाळी पोरांस ।। ९३।। श्रीगजानन पुण्यपुरुष । चरकांवाचून काढिला रस । ते पाहतां बालकांस । अति आनंद जाहला ।। ९४ ।। लोक म्हणती ही योगशक्ति । दंतकथा मुळी नसती । योगें जी का प्राप्त होती । त्या शक्तिला च्युति नसे।। ९५।। पौष्टिक पदार्थे शक्ति येते । परी न ऐसी कायम टिकते । सशक्त आपुल्या राष्ट्रातें । करणें असल्या योग शिका ।। ९६ ।। हेच तत्त्व सुचवावयासी । पाटील अर्भकांशी । करें काढून रसाशीं । दाविते झाले श्रोते हो ।। ९७ ।। समर्थांसी वंदून। गेली पोरें निघून । खंडू पाटलाकारण । वर्तमान श्रुत केलें।। ९८।। दादा आपुल्या गांवांत । गजानन ईश्वर साक्षात्। त्याचा आज आम्हाप्रत । आला आहे प्रत्यय ।। ९९ ।। ऐसे म्हणून कथिली सारी । हकीकत त्याला खरी । ती ऐकता अंतरीं । खंडू पाटील चकित झाला ।। १०० ।। मग तोही दर्शनाला । समर्थांच्या येऊ लागला। परी मार्दव वाणीला । मुळी नव्हतें यत्किंचित् ।। १ ।। गण्या, गजा ऐसें म्हणें । पाटील समर्थाकारणें । अरे तुरे हे बोलणें । होते दोन ठिकाणीं ।। २ ।। प्रेम आत्यंतिक जें कायीं । तेथें ऐसे घडून येई । आई लेकरांमाजीं होई। भाषण अरेतुरेचे ।। ३ ।। हा एक प्रकार झाला । आता दुसरा राहिला । तोही सांगतो ऐका भला । सावधान चित्तानें ।। ४ ।। नोकर चाकर हीन दीन । यांच्या सवे जें भाषण । करिती संभावित जन । तेही एकेरी स्वरूपाचें ।। ५ ।। अरेतुरे म्हणण्याची । संवय पाटला पडे साची । कां की रयत गांवची । लेकरें त्याची नि:संशय ।। ६ ।। श्रोते याच संवयीनें। खंडू पाटील गण्या म्हणे । श्रीसमर्थाकारणें । कांहीं न दुसरें कारण ।। ७ ।। गण्या गण्या म्हणे वाणी । परी प्रेम उपजे अंत:करणी । पाहा नारळालागुनी । वर करवंटी खोबरे आंत ।। ८ ।। याच न्याये तयाचा। परिपाठ होता बोलण्याचा । वृद्धापकाळ कुकाजीचा। झाला म्हणून कारभार करी ।। ९ ।। कुकाजी तो एके दिवशी । बोलता झाला खंडूशीं । तूं जातोस प्रतिदिवशीं। महाराजांच्या दर्शना ।। ११० ।। सांगतोस मला साक्षात्कारी । गजानन एक

भूमीवरी । मग कां रे तुझी वैखरी। मुग्ध होते त्यांच्यापुढें ।। ११।। तुला नाही पोरबाळ । माझा झाला वृद्धापकाळ । नातवंडाचे बोल खेळ। पाहू दे मज डोळ्यानें ।। १२ ।। आज विनंती करी त्यांना । स्वामी समर्थ गजानना। म्हणावें त्या करून करुणा । पोर एखादे द्या मज।। १३।। तों खरा साधू असल्या सत्य । पुरतील तुझे मनोरथ । आणि माझाही अवघा हेत । तडीस जाईल त्यायोगें ।। १४।। साधुपुरुषा अशक्य कांहीं। जगत्रयीं या उरले नाहीं । संतलाभाचा करून घेई । कांहीं आपणा उपयोग ।। १५।। ते खंडूतें मानवलें । एके दिवशी बोलणे केलें । मारुतीच्या मंदिरी भले । ते ऐका येणें रिती ।। १६।। अरे गण्या माझा चुलता । वृद्ध झाला आहे आतां। इच्छा उपजली त्याच्या चित्ता । नातवंड ते पाहण्याची ।। १७ ।। तुला लोक साधु म्हणती । दर्शन केल्या तुजप्रती । इच्छा मनींच्या पूर्ण होती । ऐसें लोक सांगतात ।। १८ ।। त्याचें दावीं प्रत्यंतर । उगा नको करूं उशीर। तुझ्या पायीं ज्याचें शिर । तो कां राहावा निपुत्रिक ?।। १९ ।। ऐसें भाषण ऐकिलें। महाराज त्यासी बोललें । आज हें उत्तम घडून आले । त्वां याचना केली आम्हां ।। १२० ।। सत्ता, धन तुझ्या हाती । तूं प्रयत्नवादी असशी निगुती। मग विनंति आम्हांप्रती । कां करितोस कळेना? ।। २१ ।। धन आणि बलापुढें । अवघेंच म्हणशी बापुडें। मग कां रे हे न घडे । साह्यें धनबलाच्या ।। २२ ।। तुझी भव्य आहे शेती । गिरण्या दुकानें पेढ्या अती । तुझे कोणी न मोडती । जन शब्द या वऱ्हाडांत ।। २३।। मग त्या ब्रह्मदेवाला । कां न आज्ञा करिशी भला ? । आपणां पुत्र द्यावयाला । हेच कोडें पडलें मज ।। २४ ।। खंडू करी भाषण। ही गोष्ट ना यत्नाधीन । पिकें पाण्यापासून । येती जरी जगामध्यें ।। २५ ।। तरी पाडणें पाणी । मानवाच्या न करी जाणी । दुष्काळांत जमिनी । पडती उताण्या ख्यात हे ।। २६ ।। मात्र पाणी पडल्यावर। कर्तृत्व आपुलें चालवी नर। तैसाच हाही प्रकार । तेथे न गती मानवाची ।। २७ ।। खंडू पाटील ऐसे बोलतां । हंसू आले समर्था । तूं केलीस याचना आतां । मजकारणें पोराची।। २८।। याचना म्हणजे मागणें भीक । हे तूं आज केलें देख। तुला होईल बालक । भिक्या नांव ठेव त्याचें।। २९।। पुत्र देणें माझ्या करीं । सर्वतोपरी नाहीं जरी । परी मी विनंती करीन खरी । तुझ्यासाठी परमेश्वरा ।। १३०।। तो ऐकेल माझी भीड । त्याला न हे कांहीं जड । तूं घरचा आहेस धड । रस आंब्याचा द्विजां घाली।। ३१ ।। हे मम मानी प्रमाण वचन । पुत्र होईल तुजकारण। आम्ररसाचें भोजन । दरसाल घाली ब्राह्मणा ।। ३२ ।। हे खंडूनें ऐकले । घरी

येऊन सांगितलें । कुकाजीसी निवेदिलें । मंदिराचें वर्तमान ।। ३३ ।। हे ऐकतां कुकाजीस । आनंद झाला बहुवस । तो कांहीं लोटतां दिवस । समर्थ वचन झालें खरें ।। ३४ ।। कांता खंडू पाटलाची । गंगाबाई नांवाची । गर्भिणी झाली साची । नवमास पूर्ण झाले ।। ३५ ।। तिजलागीं पुत्र झाला । खंडू पाटील आनंदला । कुकाजीच्या हर्षाला । पारावार कांहीं नसें ।। ३६ ।। त्यानें धर्म केला बहु । गरिबां दिलें गूळ गहूं । पेढे-बर्फीचा दिला खाऊ । गांवातील अर्भकांना ।। ३७ ।। थाटांत झाले बारसें । भिकू नांव ठेविलेंसें । पुढे बाळ वाढला असे । शुक्लपक्षीच्या इंदुपरी ।। ३८ ।। आम्ररसाचे भोजन । दिले ब्राह्मणांकारण । तो संप्रदाय अजून । शेगांवांत चालत असे ।। ३९ ।। पुण्यपुरुषाची वैखरी । कोठून होईल असत्य तरी । पाटलाच्या ओसरीवरी । बाळ रांगूं लागला ।। १४० ।। हा बोलबाला पाटलाचा । देशमुखां पटला न साचा । शेगांव हा दुफळीचा । गांव पहिल्यापासून ।। ४१ ।। एक फळी देशमुखांची । एक फळी पाटलांची । अंत:करणें एकमेकांची । मुळीं होती अशुद्ध ।। ४२ ।। प्रत्येक आपुल्या डावांत । एकमेकांचा करण्या घात । सदा इच्छिती मनांत । लेश नसे प्रेमाचा ।। ४३ ।। शास्त्री दोन मंत्री दोन । शस्त्री दोन तंत्री दोन । एकमेकांपुढें श्वान । येता गुरगुर रोकडी ।। ४४ ।। तैसें झाले शेगांवांत । पाटील आणि देशमुखात । छत्तिसाचा आकडा सत्य । झाला न होईल त्रेसष्टाचा ।। ४५ ।। पुढे गोष्ट झाली ऐशी । कुकाजी झाले स्वर्गवासी । पाहूनिया नातवंडासी । भीमातटी पंढरींत ।। ४६ ।। तेणे खंडूचें उद्विग्न मन । गेलें सहज होऊन । तो म्हणे छत्र पूर्ण । माझे आज ढासळले ।। ४७ ।। ज्या चुलत्याच्या जिवावरी । मी निर्भय होतो भूमीवरी । तो आधार माझा श्रीहरी । कां रे नेलास काढून ? ।। ४८ ।। ऐशी संधि पाहून । बालंट आणाया कारण । पाटलावरी सवड पूर्ण । मिळाली देशमुखमंडळीला ।। ४९ ।। तो वृत्तांत अष्टमांत । सांगेन श्रोते तुम्हांप्रत । ही जमेदारी खाण सत्य । आहे प्रत्यक्ष द्वेषाची ।। १५० ।। हा दासगणूविरचित । श्रीगजानन विजय नामें ग्रंथ । परिसा श्रोते सावचित्त । कुतर्कातें सोडोनिया ।। १५१ ।। शुभं भवतु ।। श्रीहरिहरार्पणमस्तु ।।

।। इति श्रीगजानन विजय ग्रंथस्य सप्तमोऽध्याय समाप्त: ।।

# अध्याय आठवा प्रारंभ

श्रीगणेशाय नमः ।। हे वसुदेवदेवकीनंदना । हे गोपगोपीमनरंजना । हे दुष्टदानवमर्दना । श्रीहरी पाव मातें ।। १ ।। तुझ्या प्राप्तीचें साधन । कर्मादिकांचें अनुष्ठान । परा भक्तिचें सेवन । करण्या आहे अपात्र मी ।। २ ।। तुझी ज्ञानदात्री शास्त्रें सारी । गीर्वाण भाषेंभीतरीं । त्यांचें सांग करूं हरी । सेवन तें कवण्या रीतीं ।। ३ ।। गीर्वाणाचा नसे गंध । त्यांतून माझी मती मंद । कमलांतील मकरंद । बेडुकाला मिळतो कसा ? ।। ४ ।। अन्नदानें तुझी प्राप्ती । जरी करून घेऊं श्रीपती । तरी धनाचा अभाव निश्चिती । दारिद्र्य पदरी बांधले त्वां ।। ५ ।। जरी करूं मी तीर्थयात्रा । तरी सामर्थ्य नाही गात्रा । तशांतही अंधत्व आतां । आलें आहे दृष्टीतें ।। ६ ।। ऐसा सर्व बाजूंनी । मी हीनदीन चक्रपाणी । दारिद्र्याचे मनीच्या मनी । जाती जिरोन मनोरथ ।। ७ ।। हे व्यावहारिक दृष्ट्या खरें जरी । परी तुझी कृपा झाल्यावरी । स्वानंदाच्या सागरी । पोहत राहे अहोरात्र ।। ८ ।। तुझ्या कृपेचें महिमान । आगळे आहे सर्वांहून । घनाच्या पाण्यालागून । दाम देण्याची गरज नसें ।। ९ ।। मेघांनी आणिल्या मनांत । तळी विहिरी भरतात । निव्वळ खडकास फुटतात । पाट पाण्याचे पांडुरंगा ! ।। १० ।। ऐशा त्या तंव कृपेचा । दासगणू हा भुकेला साचा । घास एखादा तरी त्याचा । घाल माझ्या मुखांत ।। ११ ।। तेणे मी तृप्त होईन । अवघ्या सुखातें पावेन । अमृताचा लाभतां कण । रोग सारे दूर होती ।। १२ ।। असो मागील अध्यायीं । देशमुख पाटलाठायीं । मुक्कामातें दुफळीबाई । येऊन बैसली हें ऐकिलें ।। १३ ।। जेथ जेथ ही नांदे दुफळी । तेथ तेथ ही करी होळी । अवघ्या सुखांची रांगोळी । इच्या पायीं होतसे ।। १४ ।। क्षयरोग तो शरीराला । वा दुफळी रोग समाजाला । नेतसे यमसदनाला । प्रयत्न पडती लुळे तेथ ।। १५ ।। असो तळ्याचिया काठांवर । देशमुखाचा एक महार । करूं लागला चरचर । या खंडू पाटलापुढें ।। १६ ।। पाटील गांवींचा अधिकारी । पाटील गांवीची पांढरी । कांहीं कामावरून खरी । कुरबुर झाली उभयतांत ।। १७ ।। तो असे मऱ्या महार । देशमुखाचा ज्याला जोर । तो बोलला उणें उत्तर । खंडू पाटलाकारणें ।। १८ ।। पाटील वदला त्यावरी । तुझी रीत ही नाही बरी । गरीबानें पायरी । आपली कधीं सोडूं नये ।। १९ ।। उणीं उत्तरें बोलण्याचा । अधिकार आहे देशमुखाचा । तुझ्यासारख्या नकट्याचा । नाहीं हें जाण मनीं

।। २० ।। तरी महार ऐकेना । करूं लागला चेष्टा नाना । त्याच्या ऐकोनी भाषणा । पाटील खवळला मानसीं ।। २१ ।। बाचाबाचीचे कारण । होते अति क्षुल्लक जाण । कागद ठाण्यालागून । पाठवणें होते पाटलाला ।। २२ ।। तो टप्पा न्यावयासी । सांगितले होते महारासी । कीं तूं असाच जा अकोल्यासी । तहशिलींत टप्पा द्याया हा ।। २३ ।। तें ऐकोनि वदला महार । मी न हा टप्पा नेणार । देशमुखाच्या आश्रितावर । तुमचा डोळा हमेशा ।। २४ ।। कांहीं असो आज दिनीं । मी टप्पा न जाय घेवोनी । तुझ्या हुकूमालागूनी । बोंबा शिमग्याच्या समजतों मी ।। २५ ।। ऐसे वदनीं बोलला । हावभावही तैसा केला । मूठ वळूनि हात नेला । त्यानें आपुल्या मुखापुढें ।। २६ ।। ती त्याची पाहूनी कृती । खंडू पाटील कोपला चित्तीं । भरीव वेळूची कांठी होती । पाटलाच्या हातांत ।। २७ ।। त्याच काठीचा केला प्रहार । महाराचिया हातावर । पाटील मूळचा जोरदार । त्यानें रागें केला प्रहार हा ।। २८ ।। त्या प्रहारें करूनी । हात गेला मोडूनी । महार बेशुद्ध होवोनी । पडतां झाला भूमीवर ।। २९ ।। पाटील दुसऱ्या महाराला । गेले टप्पा द्यावयाला । तों इकडे वृत्तांत्त कैसा झाला । तो आता सांगतों ।। ३० ।। तो महार त्याच्या आप्तांनी । नेला उचलून देशमुखसदनीं । मोडला हात हे पाहूनि । देशमुख ते संतोषले ।। ३१ ।। वा ! वा ! छान गोष्ट झाली । आपणा कुरापत काढण्या भली । ही अनायासें संधी आली । ती उपयोगी न दवडणें ।। ३२ ।। त्यांनी त्या महारासी । तात्काळ नेले कचेरीसी । समजाविलें अधिकाऱ्यासी । खोटेंनाटें विबुध हो ।। ३३ ।। कोठेंही दोन पक्षांत । वाकडे आल्या यत्किंचित् । काट्यांचेच होतात । नायटे ते अवलोका ।। ३४ ।। फिर्याद त्या महाराची । पुस्तकात नोंदली साची । आज्ञा झाली अधिकाऱ्याची । पाटील पकडून आणावया ।। ३५ ।। शेगांवी झाली पुकार । उद्यां आहे पडणार । पाटलाच्या पदीं थोर । बेडी, करीं हातकड्या ।। ३६ ।। तें खंडू पाटला समजलें । धाबें त्याचें दणाणलें । तोंडचे पाणी पळालें । झाला अति चिंतातुर ।। ३७ ।। ज्या शेगांवी मी वाघापरी । वागत होतो आजवरी । तेथेंच कां हा श्रीहरी । प्रसंग आणिला बेडीचा ।। ३८ ।। अब्रुदारास अपमान । वाटे मरणाहून मरण । बंधू गेले घाबरून । कांही विचार सुचेना ।। ३९ ।। खंडू हताश होऊन बसला । तो एक विचार सुचला त्याला । श्रीगजानन महाराजांला । सांकडे हें घालावें ।। ४० ।। त्या साधूचें वाचून । या संकटाचे निरसन । करणारा न कोणी आन । राहिला या वऱ्हाडीं ।। ४१ ।। लौकिकीं यत्न करण्याला । बंधू गेले अकोल्याला । खंडू पाटील नीट आला । समर्थाकडे रात्रीस ।। ४२ ।। येताच केला नमस्कार । शिर ठेविलें पायावर । महाराज आला कठीण फार । प्रसंग तो माझ्यावरी ।। ४३ ।। सरकारी

ग. वि. ८

कामानिमित्त । मी एका महाराप्रत । तळ्यापाशीं ताडिलें सत्य । करांतील काठींनें ।। ४४ ।। त्याचा ऐसा परिणाम झाला । कांट्याचा नायटा केला । देशमुख मंडळींनी भला । माझें अहित करण्यास ।। ४५ ।। त्यानिमित्त कैद मला । होण्याचा उद्या प्रसंग आला । समर्था माझ्या इज्जतीला । तुजवीण कोण रक्षील ? ।। ४६ ।। उद्यां येतील राजदूत । मला येथूनि नेण्याप्रत । बेडी ठोकोनि पायांत । ऐसें आज ऐकिलें ।। ४७ ।। त्यापेक्षा गुरूवरा । गळा माझा येथेचि चिरा । ही घ्या तलवार देतो करा । वेळ करूं नका हो ।। ४८ ।। अब्रूदाराकारण । बेइज्जत हेच मरण । अपराध माझा त्यांतून । अति अल्प दयाळा ।। ४९ ।। त्या अपराधरूपी खड्याचा । हा डोंगर झाला साचा । अभिमान माझ्या अब्रूचा । धरा समर्थां ये काळीं ।। ५० ।। जयद्रथाच्या वेळेला । अग्निकाष्ठ भक्षण्याला । होता अर्जुन तयार झाला । केवळ आपुल्या अब्रूस्तव ।। ५१ ।। तेथे भगवंतानें भली । अब्रू त्याची रक्षण केली । प्रभूनें वस्त्रे नेसविलीं । द्रौपदीला सभेत ।। ५२ ।। तेवीं मम अब्रू ही पांचाळी । देशमुख कौरवांनी आणिली । नग्न करण्यासाठी भली । तिचे करा हो रक्षण ।। ५३ ।। ऐसे वदून समर्थाला । पाटील रडूं लागला । आसवांचा तो चालला । पूर नेत्रावाटें हो ! ।। ५४ ।। घरचीं माणसें चिंतातुर । आधीच झाली होती फार । नाही त्यांच्या शोका पार । तो सांगावा कोठवरी ? ।। ५५ ।। इकडे समर्थांनीं भले । दोन्ही हातीं कवटाळीलें । खंडू पाटला हृदयीं धरिले । त्याचें सांत्वन करावया ।। ५६ ।। अरे कामकर्त्या पुरुषाप्रत । ऐशी संकटे येतात । वरच्यावरी जाण सत्य । त्याची चिंता वाहूं नको ।। ५७ ।। स्वार्थदृष्टी बळावतां । ऐसेंच होते तत्वतां । खऱ्या नितीची ही वार्ता । अणुमात्र त्या कळत नसे ।। ५८ ।। तुम्ही पाटील देशमुख दोघेजण । एका जातीचे असून । एकमेकांचे नुकसान । स्वार्थें करू पाहतां ।। ५९ ।। मागें कौरवपांडवांत । स्वार्थेच आला विपट सत्य । परि पांडवांचा पक्ष तेथ । न्यायें खरा होता कीं ।। ६० ।। म्हणून पांडवांकारणें । साह्य केलें भगवंतानें । सत्यासाठीं मारणें । भाग पडले कौरवांना ।। ६१ ।। जा भिऊं नकोस तिळभर । बेडी न तुशीं पडणार । किती जरी केला जोर । देशमुखानें आपला ।। ६२ ।। तेच पुढें खरें झालें । पाटील निर्दोषी म्हणोन सुटले । जे कां संत मुखावाटें आले । तें न खोटे होई कधीं ।। ६३ ।। पाटील मंडळी उत्तरोत्तर । भजूं लागली साचार । कोणा नाही आवडणार । अमृत तें सेवावया ।। ६४ ।। पुढें खंडू पाटलानें । करून विनंति प्रेमानें । नेलें रहावयाकारणें । समर्थाला निजगृहीं ।। ६५ ।। असतां पाटील सदनांत । गजाननस्वामी समर्थ । ब्राह्मण आले अवचित । दहापांच तैलंगी ।। ६६ ।। तैलंगीं विद्वान असती । कर्मठ वेदावरी प्रीती । परी धनाचा लोभ चित्तीं । राहीं

ज्यांच्या विशेष ।। ६७ ।। ते कांहीं मिळेल म्हणून । समर्थांकडे आले जाण । तयी होते पांघरूण । घेऊन समर्थ निजलेलें ।। ६८ ।। त्यांना जागे करण्याप्रत । ब्राह्मण म्हणूं लागले मंत्र । जटेचे ते स्वरांसहित । अति उच्च स्वरानें ।। ६९ ।। मंत्र म्हणण्यात चूक झाली । ती न त्यांनी दुरूस्त केली । म्हणून आसनीं उठून बसली । गजाननाची स्वारी पहा ।। ७० ।। आणि ऐसें वदलें ब्राह्मणाला । तुम्हीं कशासाठीं वैदिक झाला । हीनत्व वेदविद्येला । आणूं नका रे निरर्थक ।। ७१ ।। ही न विद्या पोटाची । मोक्षदात्री आहे साची । बा डोईस बांधल्या शालीची । किंमत कांहीं राखा हो ।। ७२ ।। मी म्हणतों ऐसें म्हणा । खरे स्वर मनीं आणा । उगीच भोळ्या भाविकांना । सोंग आणून नाडूं नका ।। ७३ ।। जी ऋचा ब्राह्मणांनी । म्हणण्यां सुरूं केली जाणी । तोच अध्याय समर्थांनीं । धड धड म्हणून दाखविला ।। ७४ ।। चूक न कोठें म्हणण्यांत । शब्दोच्चार स्पष्ट सत्य । वाटे वसिष्ठ मूर्तिमंत । वेद म्हणण्या बसला असे ।। ७५ ।। तैलंगी ते ऐकून चकित झाले । अधोवदन बैसले । मुख वरी करण्या आपुलें । भय मनीं वाटलें त्यां ।। ७६ ।। सूर्य उदय झाल्यावर । त्याच्यापुढें कां होणार । दीपांचा तो जयजयकार । त्यांची किंमत अंधारी ।। ७७ ।। विप्र म्हणती आपुल्या मनीं । हा पिसा कशाचा महाज्ञानी । चारी वेद याच्या वदनीं । नांदतात प्रत्यक्ष ।। ७८ ।। हा विधाताच होय दुसरा । शंका येथे नुरली जरा । हा असावा ब्राह्मण खरा । जातीनें कीं नि:संशय ।। ७९ ।। परमहंस दीक्षा याची । वार्ता न उरली बंधनाची । कोणत्याही प्रकारची । हा जीवन्मुक्त सिद्धयोगी ।। ८० ।। कांहीं पुण्य होतें पदरीं । म्हणून मूर्ति पाहिली खरी । हा वामदेव याला दुसरी । उपमा न ती द्यावया ।।८१ ।। असो खंडू पाटलाकडून । त्या ब्राह्मणालागून । देते झाले दयाघन । रूपया रूपया दक्षिणा ।। ८२ ।। ब्राह्मण संतुष्ट झाले । अन्य गांवा निघून गेले । महाराजही कंटाळलें । उपाधिला गांवच्या ।। ८३ ।। श्रोते खऱ्या संताप्रत । उपाधि ना असे पटत । दांभिकांला मात्र । भूषण होते तियेचे ।। ८४ ।। गांवाचिये उत्तरेला । एक मळा सान्निध्याला । या मळ्यांत भाजीपाला । होत होता बहुवस ।। ८५ ।। एक शिवाचे मंदिर । तेथें होते साचार । लिंबतरूंची थंडगार । छाया होती ते ठायीं ।। ८६ ।। हा कृष्णाजी पाटलाचा । मळा होता मालकीचा । हा कृष्णाजी खंडुजीचा । सगळ्यांत शेवटला भाऊ असे ।। ८७ ।। त्या मळ्यांत महाराज आले । शिवालयासन्निध बसले । एका ओट्यावरी भले । निंबतरूच्या छायेंत ।। ८८ ।। समर्थ म्हणाले कृष्णाजीसी । मी आलों तुझ्या मळ्यासी । कांही दिवस रहावयासी । या श्रीशंकरासन्निध ।। ८९ ।। हा भोलानाथ कर्पूरगौर । नीलकंठ पार्वतीवर । हा राजराजेश्वर । आहे अवघ्या देवांचा ।। ९० ।। तो

तुझ्या मळ्यांत रमला । म्हणून मीही विचार केला । येथें येण्याचा तो भला । दे साऊली करून ।। ९१ ।। ते वाक्य ऐकिलें । सहा पत्रें आणविलें । ओट्यावरी छप्पर केलें । कृष्णाजीनें तात्काळ ।। ९२ ।। समर्थांनी वास केला । म्हणून मळा क्षेत्र झाला । राजा जाय जया स्थला । तीच होते राजधानी ।। ९३ ।। महाराजांचे बरोबर । होता पाटील भास्कर । सेवा करण्या निरंतर । दुसरा तुकाराम कोकाट्या ।। ९४ ।। खाण्यापिण्याची तरतूद सारी । निजांगे कृष्णाजी पाटील करी । समर्थ तें जेवल्यावरी । तो प्रसाद घेत असे ।। ९५ ।। असो गजानन असतां मळ्यांत । गोष्ट घडली अद्‌भूत । येते झाले फिरत फिरत । दहावीस गोसावी ते ठायां ।। ९६ ।। समर्थांचा बोलबाला । त्यांनी आधींच होता ऐकिला । म्हणून त्यांनी तळ दिला । येऊनि या मळ्यामध्ये ।। ९७ ।। गोसावी म्हणती पाटलासी । आम्हीं आहो तीर्थवासी । जातो रामेश्वरासी । भागीरथीला घेऊन ।। ९८ ।। गंगोत्री, जम्नोत्री, केदार । हिंगलाज, गिरनार, डाकोर । ऐशी क्षेत्रें अपार । पाहिलीं पायीं फिरूनी ।। ९९ ।। ब्रह्मगिरी गोसाव्याचे । आम्ही शिष्य आहो साचे । महाराजही आमुचे । आहेत सांप्रत बरोबर ।। १०० ।। हे महासाधु ब्रह्मगिरी । ज्यांचा बंदा गुलाम हरी । ती मूर्ति आली घरी । तुझ्या पूर्वभाग्यानें ।। १ ।। शिरापुरींचें अयाचित । आम्हां द्यावें तुम्हीं त्वरीत । लागे जो ओढण्याप्रत । गांजा तोही पुरवावा ।। २ ।। तीन दिवस येथें राहूं । चौथे दिवशी येथून जाऊं । पाटील नका कष्टी होऊं । साधून घ्या ही पर्वणी ।। ३ ।। तुम्ही पोशिला मळ्यांत । वेडापिसा नंगाधूत । मग आम्हां देण्या अयाचित । मागेपुढे कां पाहतां ? ।। ४ ।। गाढवासी पोशिती । गाईस लाथा मारिती । ते कां म्हणावें सन्मती । पहा विचार करून ।। ५ ।। आम्ही गोसावी वैराग्यभरित । जाणतो अवघा वेदांत । मर्जी असल्या मळ्यांत । या पोथी ऐकावया ।। ६ ।। कृष्णाजी म्हणे त्यावरी । उद्यां घालीन शिरापुरी । आज आहेत भाकरी । त्याच जाव्या घेऊन ।। ७ ।। जितुका गांजा ओढाल । तितुका तेथेच मिळेल । तेथें चालतां बोलतां कंठनीळ । बसला आहे पत्र्यामध्यें ।। ८ ।। दोन प्रहराची वेळा खरी । घेतल्या चूण भाकरी । मळ्यांत येऊनि विहिरीवरी । बसलें गोसावी भोजना ।। ९ ।। समर्थांच्या समोरी । एका छपराभीतरी । गोसाव्यांनी लाविली खरी । आपआपली कडासनें ।। ११० ।। त्यांचा जो होता महंत । ब्रह्मगिरी नामें सत्य । तो भगवद्‌गीतेप्रत । वाचूं लागला अस्तमानी ।। ११ ।। गोसावी श्रवणा बैसले । गांवांतूनही कांही आलें । पोथी ऐकावया भले । त्या ब्रह्मगिरी गोसाव्याची ।। १२ ।। ''नैनं छिन्दन्ति'' हा श्लोक । निरूपणाचा होता देख । ब्रह्मगिरी पक्का दांभिक । स्वानुभवाचा लेश नसे ।। १३ ।। निरूपण त्याचें ऐकलें ।

गांवकऱ्यास नाहीं पटले। ते आपसांत बोलूं लागले । हा नुसता शब्दच्छल ।। १४ ।। सारे पोथी ऐकल्यावरी । येऊन बैसले पत्र्याभीतरीं । गजाननाच्या समोरी । संतदर्शन घ्यावया ।। १५ ।। लोक म्हणती छपराला। निरूपणाचा भाग झाला । येथें पत्र्यास बैसला । स्वानुभवाचा पुरूष हा ।। १६ ।। तेथें ऐकला इतिहास । येथें पाहिला प्रत्यक्ष पुरूष । या भाषणें गोसाव्यास। राग आला कांहीसा ।। १७ ।। अवघे गोसावी गांजा प्याया । बसले होते घेऊनिया । त्या पत्र्याचियां ठायां । चालली चिलीम गांजाची ।। १८ ।। पत्र्यांत पलंगाच्या वरी । बसली होती समर्थस्वारी । चिलीम भरून वरच्यावरी। प्याया देई भास्कर ।। १९ ।। त्या चिलिमीच्या विस्तवाची । ठिणगीं पलंगीं पडली साची। ती पडतांना कोणाची । दृष्टि न गेली तिच्यावर ।। १२० ।। कांहीं वेळ गेल्यावर। निघूं लागला धूर । पलंग पेटला अखेर । एकदम चहूं बाजूंनी ।। २१ ।। तो प्रकार पाहतां । भास्कर बोले सद्गुरुनाथा । पलंग सोडा शीघ्र आतां । या खालीं उतरून ।। २२ ।। लाकडें हीं पलंगाचीं । आहेत कीं सागाचीं । तीं न आतां विझायाचीं । पाण्यांवाचून दयाळा ।। २३ ।। तयीं समर्थ बोलले वाचें । भास्करा अग्नि विझविण्याचें । कारण नाहीं तुला साचें। जल मुळींच आणूं नको ।। २४ ।। अहो महाराज ब्रह्मगिरी। या बैसा पलंगावरी । तुम्हां आहे अवगत खरी । भगवद्गीता साकल्यें ।। २५ ।। त्याच्या परीक्षेची वेळ । आणिली हरीनें तात्काळ । ब्रह्मा न जाळी अनळ। याचा प्रत्यय दाखवा ।। २६ ।। ''नैनं छिन्दन्ति'' श्लोकावर । व्याख्यान केलें एक प्रहर । आतां कां मानितां दर । या पलंगीं बसण्याचा ? ।। २७ ।। जा जा भास्करा लौकरी । ब्रह्मगिरीला करीं धरी। आणून बसवी अत्यादरीं। या जळत्या पलंगास ।। २८ ।। ऐशी आज्ञा होतां क्षणीं । भास्कर गेला धांवोनि । ब्रह्मगिरीचा सव्य पाणी। धरिला त्यानें निजकरें ।।२९ ।। भास्कराचें शरीर । धिप्पाड सशक्त पिळदार । तो गोसावी त्याच्या समोर। शोभूं लागला घुंगुरडें ।। १३० ।। पलंग पेटला चौफेर । ज्वाळा निघूं लागल्या थोर। परी महाराज आसनीं स्थिर। हलले मुळीं न इतकेंही ।। ३१ ।। श्री प्रल्हाद कयाधुसुत। उभा केला अग्नींत । हे लिहिलें पुराणांत । श्रीव्यासांनीं भागवतीं ।। ३२ ।। त्या लिहिल्या गोष्टीचें । प्रत्यंतर दाविलें साचें। मळ्यामाजीं कृष्णाजीचें । श्रीगजानन साधूंनीं ।।३३ ।। ब्रह्मगिरी म्हणे भास्कराशीं । मला न न्या पलंगापाशीं। महाराजांच्या अधिकाराशीं। मी नाहीं जाणितले ।। ३४ ।। तें न मानीं भास्कर। ओढीत आणिला फरफर। उभा केला समोर । आपल्या सद्गुरुरायांच्या ।। ३५ ।। नैनं दहति पावक । हें खरें करून दावा वाक्य। ऐसें बोलतां महाराज देख। गोसावी परम घाबरला ।। ३६ ।। गोसावी म्हणें

भीत भीत। मी पोटभऱ्या आहे संत। शिरापुरी खाण्याप्रत । मी झालों गोसावी ।। ३७ ।। माझ्या अपराधाची क्षमा। साच करी शांतिधामा। केला खटाटोप रिकामा। गीताशास्त्र शिकण्याचा ।। ३८ ।। तुला पिसा मी म्हणालों। आता पस्तावा पावलों । मी दातीं तृण धरून आलों। शरण तुला ! अभय दे।। ३९ ।। शेगांवच्या जनांनीं। केली समर्था विनवणी। आपणा अग्नीपासूनी । भय नाही हें खरें।। १४० ।। तरी महाराज आमच्याकरितां। खालीं यावें लवकर आतां । अशा स्थितींत पाहतां। तुम्हा ! आम्हां धडकी भरे ।। ४१ ।। म्हणून आमच्यासाठीं । उतरा खाली ज्ञानजेठी। गोसावी झाला हिंपुटी। तो न कांहीं बोलला ।। ४२ ।। लोक विनंतीस द्याया मान। खाली उतरले गजानन । तो पलंग पडला कोसळून। एक पळही न लागलें त्या ।। ४३।। अवघाच होता जळला । जो भाग शेष उरला । तो लोकांनी विझविला । साक्ष दावण्या इतरांसी ।। ४४ ।। ब्रह्मगिरी पायीं लागला। निरभिमान अवघा झाला । स्पर्श होता गंगाजला । मल कोठूनी राही तेथ ? ।। ४५ ।। मग मध्यरात्रीच्या समयाला। ब्रह्मगिरीस बोध केला। आजपासून चेष्टेला । तूं या सोडून देई रे।। ४६।। ज्यांनी राख लावावी । त्यांनी उपाधी दूर ठेवावी । अनुभवावीण न सांगावी। गोष्ट कोणा निरर्थक ।। ४७।। नुसते शब्दपांडित्य। माजलें जगीं अतोनात । तेणेंच आहे झाला घात। आपुल्या या संस्कृतीचा ।। ४८ ।। गोसावी मच्छिंद्र, जालंदर। गोरख, गहिनी, साचार। ज्ञानेश्वरांचा अधिकार। किती म्हणून सांगावा।। ४९।। स्वानुभवाचे झाले यती । श्रीशंकराचार्य निश्चिती। प्रपंची राहून ब्रह्मस्थिति । अनुभविली एकनाथांनीं ।। १५०।। स्वामी समर्थ ब्रह्मचारी । हेही ब्रह्मसाक्षात्कारी । होऊन गेले भूमीवरी। यांचीं चरित्रें आणी मना ।। ५१।। उगीच खाया शिरापुरी । भटकूं नको भूमीवरी । सार न तया माझारीं। येतुलेंही गवसणार।। ५२।। ऐसा बोध ऐकिला । ब्रह्मगिरी विरक्त झाला। प्रातःकाळींच उठोन गेला । कोणा न भेटतां शिष्यांसह ।। ५३।। ही गोष्ट दुसऱ्या दिवशीं । कळली अवघ्या गांवासी । जो तो आला पहावयासी। मळ्यांत जळलेल्या पलंगातें।।५४।। हा दासगणूविरचित । श्रीगजानन विजय नामें ग्रंथ । तारो भाविका भवाब्धींत। हेचि इच्छी दासगणू ।। १५५।। शुभं भवतु ।। श्रीहरिहरार्पणमस्तु ।।

।। इति श्रीगजानन विजय ग्रंथस्य अष्टमोऽध्यायः समाप्तः ।।

# अध्याय नववा प्रारंभ

श्रीगणेशाय नमः ।। हे सगुणस्वरूपा रूक्मिणीवरा । हे चंद्रभागातटविहारा । श्रीसंतवरदा शारंगधरा। पतितपावना दयानिधे ।। १ ।। लहानांवाचून मोठ्यांचा । मोठेपणा न टिके साचा। पतिताविण परमेश्वराचा । बोलबाला होणे नसे ।। २।। आम्ही आहोत पतित । म्हणून तुला म्हणतात । पावनकर्ता रूक्मिणीकांत । हे आतां विसरू नको ।। ३ ।। परिस लोहाला सोने करी। म्हणून त्याचे महत्त्व भूमीवरी । ओहोळ पोटी घे गोदावरी । म्हणून म्हणती तीर्थ तिला ।। ४ ।। याचा विचार करावा । चित्तीं आपुल्या माधवा । दासगणूला हात द्यावा । बुडूं न द्यावें कोठेंही ।। ५ ।। असो गोविंदबुवा टाकळीकर। एक हरिदास होता थोर । तो कराया किर्तनगजर । शेगांवासी पातला ।। ६ ।। तेथे शिवाचे मंदिर । पुरातन होते साचार। ज्याचा केला जीर्णोद्धार। मोटे नामक सावकारें ।। ७ ।। अलिकडच्या श्रीमंताला । मंदिरांचा कंटाळा । मोटारी क्लब बायसिकला । याचें प्रेम बहु असे ! ।। ८ ।। तैसा न मोटे सावकार । श्रीमंत असून भाविक फार । त्यानेच हा जीर्णोद्धार। केला असे मंदिराचा ।। ९ ।। म्हणोन मोठ्यांचें मंदिर । वदूं लागले नारीनर। आतां पुढचा प्रकार । काय झाला तो ऐका ।। १० ।। त्या मोठ्यांच्या मंदिरी । उतरले टाकळीकर कथेकरी। त्यांचा घोडा समोरी । बांधला होता मंदिराच्या ।। ११ ।। घोडा अतिद्वाड होता । कोणासही मारी लाथा। समोरून कोणी येता । त्यास चावे कुत्र्यासम ।। १२ ।। तोडी चऱ्हाटें वरच्यावरी । स्थिर न राहे क्षणभरी । कधीं कधीं कांतारीं । त्यानें जावें पळोन ।। १३ ।। खिंकाळें रात्रंदिवस । वाईट खोड्या बहुवस । आल्या होत्या मुक्कामास । श्रोते तया घोड्याच्या ।। १४ ।। लोखंडाच्या साखळ्या । होत्या त्यासी बांधण्या केल्या। त्या या समयीं राहिल्या । टाकळीमाजीं विसरून ।। १५ ।। चऱ्हाटानें कसा तरी । घोडा मंदिरासमोरी। बांधुनिया कथेकरी। निजले जाऊन शय्येला ।। १६ ।। रात्र झाली दोन प्रहर । तमें आक्रमिलें अंबर । दिवाभीतांचे घूत्कार । होऊ लागले वृक्षांवरी ।। १७ ।। टिटव्या 'टी टी' शब्द करिती । वाघुळे भक्ष्या धुंडिती । पिंगळे बसून वृक्षावरी । किलबिल करूं लागले ।। १८ ।। सामसूम जिकडे तिकडे । बंद झाली कवाडें । कोठेंही ना दृष्टि पडे।

एकही माणूस रस्त्यांनीं ।। १९ ।। ऐशा रात्रसमयास । श्रीगजानन पुण्यपुरूष । घोडा बांधल्या ठायास । येते झालें सहजगती ।। २० ।। जें जें कोणी द्वाड असती । त्यांना सुधारण्याप्रती । साधुपुरूष अवतार घेती । ईशाज्ञेनें भूमीवर ।। २१ ।। औषधाचे प्रयोजन । रोगा निवारण्याकारण । तेवि द्वाडांचे द्वाडपण । साधुसंत निवारिती ।। २२ ।। असो गजानन घोड्यापासी । आले रात्रसमयासी । जाऊनी निजले अति हर्षी । चहूं पायांत घोड्याच्या ।। २३ ।। मुखे भजन चालले होतें । 'गणी गण गणांत बोते' । या सांकेतिक भजनातें । जाणण्या कोण समर्थ हो ? ।। २४ ।। त्या सूत्ररूप भजनाचा । अर्थ ऐसा वाटतो साचा । गणी या शब्दाचा । अर्थ मोजी हाच असे ।। २५ ।। जीवात्मा म्हणजे गण । तो ब्रह्माहून नाही भिन्न । हे सुचवावया कारण । गणांत हा शब्द असे ।। २६ ।। बोते हा शब्द देखा । अपभ्रंश वाटे निका । बाते हा शब्द ऐका । तेथे असावा नि:संशय ।। २७ ।। बाया शब्दें करून । घेतले पाहिजे मन । तें हें आहे सर्वनाम । शब्दाऐवजी आलेलें ।। २८ ।। म्हणजे मना समजे नित्य । जीव हा ब्रह्मास सत्य । मानूं नको तयाप्रत । निराळा त्या तोचि असे ।। २९ ।। 'गिण गिण गिणांत बोते' । कोणी 'गणी गण गणांत बोते' । ऐशीं आहेत दोन मतें । या भजनाविषयी शेगांवी ।। ३० ।। त्यासी न आपुले प्रयोजन । आपणा कथेसी कारण । महाराज निजले येऊन । चौपायांत घोड्याच्या ।। ३१ ।। वरील भजन मुखानें । चालले होते आनंदानें । वाटे या भजनरूप सांखळीनें । घोडा बांधूनी टाकिला ।। ३२ ।। गोविंदबुवांच्या अंतरी । धास्ती होती जबर खरी । म्हणून तो वरच्यावरी । उठून पाहे वारूला ।। ३३ ।। तो ठाण्यावरी घोडा शांत । ऐसें पडता दृष्टीप्रत । गोविंदबुवांच्या चित्तांत । अति नवल वाटलें ।। ३४ ।। तो आपुल्या मनीं म्हणे । हें ऐसें झालें कशानें । कां कांही आजारानें । व्याप्त झाला घोडा हा ।। ३५ ।। म्हणूनी राहिला शांत । हें न कांही कळों येत । हा ऐसा आजपर्यंत । नाहीं कधीच स्थिरावला ।। ३६ ।। हें काय आहे तें पहाया गेलें । तो एक माणूस दिसलें । चोहों पायांत निजलेलें । त्या द्वाड घोड्याच्या ।। ३७ ।। अति निकट येऊनी । पाहूं लागले निरखूनी । तों दिसलें कैवल्यदानी । तेथे गोविंदबुवाला ।। ३८ ।। ते म्हणालें मनांत । घोडा कां झाला शांत । हें कळले कारणासहित । मजलागी येधवां ।। ३९ ।। समर्थांच्या सहवासें । घोडा शांत झालासे । जेथें कस्तुरी तेथें नसे । दुर्गंधाला थारा कदा ।। ४० ।। समर्थांच्या पायावरी । गोविंदबुवानें अत्यादरीं । शिर

ठेविलें निर्धारी । अष्टभाव दाटले ।। ४१ ।। मुखें करूं लागले स्तवन । आपण खरेच गजानन । विघ्नांचे करितसा कंदन । याचा प्रत्यय आज आला ।। ४२ ।। माझा घोडा द्वाड अती । सर्वही ज्याला भीती । तेथेच आलात गुरूमूर्ती । हरण्या त्याचा द्वाडपणां ।। ४३ ।। ह्या घोड्याच्या अचाट खोडी । चालता मध्येंच मारी उडी । क्षणाक्षणा मागल्या झाडी । हा दुगाण्या ! महाराज ! ।। ४४ ।। मी गेलों होतों कंटाळून । म्हणून बाजारालागून । गेलो विकाया कारण । परी न कोणी घेई या ।। ४५ ।। मी फुकटही लागलो द्याया । परी न कोणी तयार घ्याया । त्यावरी आपण केली दया । हें झालें फार बरें ।। ४६ ।। आम्हां कथेकऱ्याचें । घोडे पाहिजे गरीब साचें । घरामाजी धनगराचे । नाही वाघ कामाचा ।। ४७ ।। ऐसा झाला प्रकार । घोडे झाले गरीब फार । जडजीवांचा उद्धार । करण्यास स्वामी अवतरले ।। ४८ ।। घोड्यास म्हणाले, आता गड्या । करूं नकोस येथून खोड्या । त्या येथेंच रोकड्या । द्याव्या अवघ्या सोडून ।। ४९ ।। तूं शिवाच्या समोरीं । याचा विचार कांही करी । वागत जावें बैलापरीं । त्रास न देई कवणातें ।। ५० ।। ऐसे त्यासी बोलून । गेले निघून दयाघन । कृपाकटाक्षें करून । पशूही ज्यानें आकळिला ।। ५१ ।। असो श्रोते दुसरे दिवशीं । मळ्यांत असता पुण्यराशीं । आले गोविंदबुवा[1] दर्शनासी । घोड्यावरी बैसून ।। ५२ ।। घोडा गोविंदबुवांचा । शेगांवासी ठाऊक साचा । कोश अवघ्या खोड्यांचा । भीत होते त्यासी जन ।। ५३ ।। तो मळ्यांत आलेला पाहून । लोक बोलले त्याकारण । गोविंदबुवा ही घेऊन । पीडा कशास येथें आला ।। ५४ ।। मुलें बायका मळ्यांत । आहेत पहा वावरत । तुमचा घोडा करील घात । सहज लीलेने कवणाचा ।। ५५ ।। गोविंदबुवा त्यांसी वदले । तुमचें म्हणणें मी ऐकिले । माझ्या घोड्यास शहाणें केलें । काल रात्रीं समर्थांनी ।। ५६ ।। त्यानें खोड्या दिल्या टाकून । झाला गोगलगाईसमान । आता भ्यावयाचें कारण । कांहीं न उरलें कोणाशी ।। ५७ ।। चिंचेखाली उभा केला । टाकळीकरांनी[2] घोडा भला । चऱ्हाटांवाचूनी राहिला । उभा तो एक प्रहर ।। ५८ ।। भाजीपाला कोवळा घास । मळ्यांत होता विशेष । परी ना लाविलें त्यास । तोंड घोड्यानें एकाही ।। ५९ ।। पहा संतांची केवढी शक्ती । पशुही आज्ञेत वागती । पत्र्यांत[3] आरंभिली स्तुति । गोविंदबुवांनी समर्थांची ।। ६० ।।

---

1. JoopXhan02. ~eu~HSirHSa (JoopXhan0) 3. nÍmÀmPorS>V

श्लोक (पृथ्वी वृत्त)

**अचिंत्य जगताप्रती कृति तुझी न कोणा कळे । असो खलहि केवढा तव कृपे सुमार्गी वळे ।**
**उणें पुढति ये तुझ्या खचित रत्नचिंतामणी । शिरीं सतत माझिया वरदहस्त ठेवा झणीं ।। १ ।।**

ऐसी स्तुति करून । गेले गोविंदबुवा निघून । घोड्यास आपल्या घेऊन । टाकळी ग्रामाकारणें ।। ६१ ।। प्रत्येक दिनी शेगांवी । यात्रा येई नवी नवी । कांहीं तरी धरून जीवीं । हेतु आपल्या श्रोते हो ।। ६२ ।। त्या यात्रेकरू मंडळीत । बाळापूरचे दोन गृहस्थ । आले कांहीं धरूनि हेत । समर्थांच्या दर्शना ।। ६३ ।। पथीं जातां एकमेकां । बोलू लागलें ऐसें देखा । पुढल्या वारीस गांजा सुका । येऊं आपण घेऊन ।। ६४ ।। कां कीं या गांजावर । समर्थांचें प्रेम फार । तो आपण आणिला जर । तरी कृपा होईल त्यांची ।। ६५ ।। लोक आणती बर्फी खवा । आपण गांजा नेऊं बरवा । गांठ धोतरां बांधून ठेवा । ना तरी विस्मृति होईल ।। ६६ ।। पुढल्या वारीस दोघेजण । आले दर्शनाकारण । परि गेले विसरोन । गांजा तों आणावया ।। ६७ ।। शिर ठेवितां पायांवरी । आठवण त्यांना झाली खरी । कीं नाहीं आणिला बरोबरी । गांजा तो आपण ।। ६८ ।। आतां पुढच्या वारीसी । दुप्पट आणू गांजासी । ऐसे बोलून मानसीं । दर्शन घेऊन गेले हो ।। ६९ ।। पुढल्या वारीस तेंच झालें । गांजा आणण्याचें विसरलें । कर जोडून मात्र बसलें । स्मृती नसे गांजाची ।। ७० ।। तैं स्वामी म्हणाले भास्करासी । पाहा जगाची रीत कैसी । गांठ मारून धोतरासी । विसरती जिन्नस आणावया ।। ७१ ।। जातीनें आहेत ब्राह्मण । तेंच आपुलें भाषण । करिती आपण होऊन । खोटे पहा सर्वांशी ।। ७२ ।। ब्राह्मणाचें भाषण । कदा नसावें अप्रमाण । या तत्त्वालागून । न जाणती चांडाळ ते ।। ७३ ।। द्विजे निजधर्म सोडिला । आचार विचार सांडिला । ह्यामुळें श्रेष्ठत्वाला । ते मुकलें सांप्रत ।। ७४ ।। बेटें मनीं नवस करिती । आणि हात हालवित येथें येती । अशानें का पूर्ण होती । त्यांच्या मनीचें मनोरथ ? ।। ७५ ।। बोलण्यांत पाहिजे मेळ । चित्त असावें निर्मळ । तरीच तो घननीळ । कृपा करितो भास्करा ।। ७६ ।। हे शब्द त्या दोघांसी । अति लागलें मानसीं । पाहू लागले एकमेकांसी । कुतूहल दृष्टीनें ।। ७७ ।। पाहा केवढें अगाध ज्ञान । आहे

यांचें परिपूर्ण । हा जगत्चक्षू गजानन । सूर्यापरीच असे हो ।। ७८ ।। आपण नवस केला मनीं । तों जाणिला समर्थांनीं। आतां येऊं घेऊनी । चला गांजा गांवातून ।। ७९ ।। ऐसा विचार करून उठले । गांवांत जाऊं लागले । गांजा आणावया भले । तै महाराज वदलें त्या ।। ८० ।। आतां शिळ्या कढीप्रत । कां हा ऊगा आणिता ऊत । सार नाहीं किमपि यांत । मी न हपापलो गांजाला ।। ८१ ।। आतां आणण्यां गांजाप्रत । नका जाऊं पेठेत । मेळ हमेशा बोलण्यांत । ठेवा तुम्ही आपुल्या ।। ८२ ।। लबाडाचे न हेतु पुरती । ही खुणगांठ बांधा चित्ती । तुमचे काम झाल्यावरती । मर्जी असल्या गांजा आणा ।। ८३ ।। पुढील आठवड्यांत तुमचें काम । होईल जा अत्युत्तम । परी कदा न चुकवा नेम । पांच वाऱ्या येथील करा ।। ८४ ।। कां कीं हा येथें स्थिर । आहे मृडानीपती कर्पूरगौर । ज्याच्या कृपेनें कुबेर । जगीं झाला धनपती ।। ८५ ।। जा नमस्कार त्यासी करा । गांजा आणावया न विसरा । परमार्थात खोटें जरा । बोलूं नये मानवांनी ।। ८६ ।। ऐसा उपदेश ऐकून । महाराजांशी वंदून । घेतले शिवाचें दर्शन । आणि गेले बाळापुरा ।। ८७ ।। पुढील आठवड्यामाजी भले । काम त्यांचें फत्तें झालें । तेही गांजा घेऊन आलें । शेगांवांत वारीला ।। ८८ ।। त्या बाळापूरची दुसरी कथा । तुम्ही ऐका श्रोते आतां । बाळकृष्ण नामें होता । बाळापुरात रामदासी ।। ८९ ।। कांता त्याची पुतळाबाई । परम भाविक होती पाही । दरवर्षी वारीस जाई । पायी सज्जनगडाते ।। ९० ।। पतिपत्नीचा विचार एक । पौष मासीं निघती देख । ओझ्यासाठी घोडे एक । घेऊनिया बरोबरी ।। ९१ ।। कुबडी कंथा दासबोध । सवें हें सामान अति शुद्ध । साधुत्वाचा नव्हता मद । तयासीं कीं चढलेला ।। ९२ ।। मार्गी चालतां ग्रामांतरी । प्रत्यही झोळी फिरवी खरी । त्या झोळीच्या भिक्षेवरी । नैवेद्य करी रामाला ।। ९३ ।। पौष वद्यात बाळापूर । सोडी नवमीला साचार । कांता असे बरोबर । पुतळाबाई नाम जिचें ।। ९४ ।। बाळकृष्णबुवा हातीं । चंदनाच्या चिपळ्या असती । पुतळाबाई करी साथी । झांज हाती घेऊन ।। ९५ ।। रघुपतीचा नाम गजर । करी पंथानें निरंतर । शेगांव, खामगांव, मेहेकर । देऊळगांवराजा पुढें ।। ९६ ।। आनंदीस्वामींस जालनापुरीं । वंदुनिया जांब नगरीं । जाय तेथे मात्र करी । तीन दिवस मुक्काम ।। ९७ ।। कां कीं तें ठिकाण । समर्थांचें जन्मस्थान । पुढें दिवऱ्यास येऊन । वंदन करी गोदेला ।। ९८ ।। पुढे बीड आंबेजोगाईचें । मोहोरी बेलेश्वर स्वामीचे । पट्टशिष्य समर्थांचे । डोमगांवी कल्याण ।। ९९ ।।

नरसिंगपूर पंढरपूर । नातेपोते शिंगणापूर । वाई आणि सातार । असे जे गडाच्या पायथ्याशीं ।। १०० ।। माघ वद्य प्रतिपदेला । तो येऊन पहुचे भला । श्रीसज्जनगडाला । नवमीच्या त्या उत्सवासी ।। १ ।। यथाशक्तीप्रमाणें । ब्राह्मणभोजन करावें त्यानें । श्रीस्वामीसमर्थाकारणें । खरा खराच रामदासी ।। २ ।। ऐसे रामदासी आतां । होणें कठीण सर्वथा । दासनवमीचा उत्सव होता । परत जाई त्याच मार्गे ।। ३ ।। ऐसा क्रम चालला । बहुत दिवस त्याचा भला । साठ वर्षे देहाला । गेली त्याच्या उलटून ।। ४ ।। माघ वद्य द्वादशीस । सोडून सज्जनगडास । निघावे परत जावयास । त्यानें आपुल्या बाळापुरा ।। ५ ।। असो वद्य एकादशीसी । बसला समर्थ समाधीपाशीं । आले दु:खाश्रु लोचनासी । शब्द न त्यासी बोलवें ।। ६ ।। हे रामदास स्वामी समर्था ! । हे गुरूराया पुण्यवंता ! । माझे शरीर थकले आतां । वारी न पायीं होईल ।। ७ ।। जरी बसून वाहनातें । येऊं सज्जनगडाते । तरी तेंही कठीण दिसतें । मजलागीं दयाळा ।। ८ ।। नेम चालला आजवर । आतां पडूं पाहे अंतर । परमार्थासी शरीर । निकोप आधीं पाहिजे ।। ९ ।। तरीच सर्व घडें कांहीं । हे रामदासा माझे आई । हे म्हणण्याची जरूर नाहीं । आपण सर्व जाणतसा ।। ११० ।। ऐशी प्रार्थना करून । निजला शय्येस जाऊन । तों प्रभातकाळीं पडलें स्वप्न । बाळकृष्णबुवाला ।। ११ ।। स्वप्नीं म्हणालें रामदास । ऐसा न होई हताश । नको येऊं येथून खास । या सज्जनगडाते ।। १२ ।। माझी कृपा तुझ्यावरी । माझा उत्सव बाळापुरीं । करावा तूं आपुल्या घरीं । येईन मी नवमीला ।। १३ ।। तुला द्याया दर्शन । हे मानी प्रमाण वचन । आपुल्या शक्तीस पाहून । परमार्थ तो आचरावा ।। १४ ।। ऐसें स्वप्न पाहिलें । बाळकृष्ण आनंदलें । कांतेसह परत आले । बाळापुरास आपुल्या घरी ।। १५ ।। पुढे श्रोते दुसरे वर्षी । काय झालें माघमासीं । त्या बाळापुरासी । ते आतां अवधारा ।। १६ ।। माघ वद्य प्रतिपदेस । समर्थांच्या उत्सवास । आरंभ बाळापुरास । बाळकृष्णांनी घरीं केला ।। १७ ।। दासबोधाचें वाचन । रात्रीस हरिकीर्तन । दोन प्रहरीं ब्राह्मणभोजन । धुपार्ती अस्तमानाला ।। १८ ।। बाळकृष्णांच्या मनांत । विचार हाची घोळत । पाहूं कसे येतात । स्वामी समर्थ नवमीसी ।। १९ ।। बाळकृष्णांच्या वचनांनी । केली गांवकऱ्यांनीं । आपापसांत वर्गणी । उत्सवा साह्य करावया ।। १२० ।। ऐसा थाट बाळापुरा । नव दिवस झाला खरा । नववे दिवशी दोन प्रहरा । अघटित आले घडून ।। २१ ।। श्रीगजानन

साक्षात्कारी । श्रोते तया बाळापुरी । उभे राहिले दोन प्रहरी । नवमी तिथि लक्षून ।। २२ ।। बाळकृष्णांच्या द्वारांत। रामाभिषेक चालला आंत । लोक झाले विस्मित । गजाननासी पाहुनियां ।। २३ ।। म्हणूं लागले बुवासी । उठा उठा हो वेगेसीं । तुमच्या दासनवमीसी। द्वारीं पातले गजानन ।। २४ ।। त्यावरी बुवा म्हणाले । गजानन आले बरें झालें । त्याही संताचे लागले। पाय माझ्या घरासी ।। २५ ।। परी आजच्या दिनी साची । मी वाट पाहतो समर्थांची । त्या सज्जनगड निवासीयाची । आतूर होऊन ये ठायां ।। २६ ।। त्यांचा मसी करार आहे। मी नवमीला येईन पाहें । ती वाणी असत्य नोहे । ऐसा माझा भरवंसा ।।२७ ।। इकडे स्वामी गजानन। द्वारीं उभे राहून । जयजय रघुवीर म्हणोन । श्लोक बोलूं लागले ।। २८ ।।

**श्लोक - अहिल्या शिळा राघवें मुक्त केली । पदीं लागतां दिव्य होऊन गेली ।**

अशी वाणी ऐकतां उठली । स्वारी बाळकृष्णाची ।। २९ ।। पाहाती जों येऊन द्वारीं । तों गजाननाची नग्न स्वारी । आजानुबाहु साजिरी । उभी निजानंदामध्यें ।। १३० ।। करण्या गेला नमस्कार । तों रामदास दिसले साचार । हाती कुबडी जटाभार । रूळत होता पाठीवरीं ।। ३१ ।। भालीं त्रिपुंड्र उभा साचा । होता गोपिचंदनाचा । नेसलेल्या लंगोटीचा । रंग होता हिरमुजी ।। ३२ ।। ऐसें रूप पाहिलें । बाळकृष्णा भरतें आलें । प्रेमाचें तें श्रोते भलें । नयनीं संचलें आनंदाश्रु ।। ३३ ।। तों सवेंच दिसती गजानन । त्याच्या नेत्रांकारण । कुबडी लंगोटी कांहीच न । त्रिपुंड्र शिरींचा जटाभार।। ३४ ।। पुन: त्यानें हताश व्हावें । तो रामदास स्वामी दिसावें । पुन: जों निरखून पाहावें। तों मागुती गजानन ।। ३५ ।। ऐसी स्थिती झाली खरी। सिनेमाच्या खेळापरी । घोटाळलासे अंतरीं। कोडे कांहींच उमगेना ।। ३६ ।। मग म्हणाले गजानन । रामदासासी प्रेमेंकरून। नको गांगरूं देऊं मन। तुझा समर्थ मीच असे ।। ३७ ।। मागें बापा गडावरी । माझीच वस्ती होती खरी । आतां शेगांवाभीतरीं। राहिलो येऊन मळ्यांत ।। ३८ ।। तुला सज्जनगडीं दिलें वचन । कीं दासनवमीस येईन । मी बाळापुरालागून । ह्याचें स्मरण आहे कां? ।। ३९ ।। त्या वचनाची पूर्तता । करण्यास येथें आलों आतां । दे सोडोन अवघी चिंता । मीच आहे रामदास ।। १४० ।। शरीररूपी वस्त्रास । तूं किंमत देतोस । आणि आत्म्याला विसरतोस । याला काय म्हणावें ? ।। ४१ ।। श्लोक आहे गीतेठायीं।

वांसासि जीर्णानी तो पाहीं । ऐसा मुळिं न भ्रमिष्ट होई । चाल पाटीं बसवी मला ।। ४२ ।। बाळकृष्णाचा धरून हात । गजानन आलें घरात । एका मोठ्या पाटीं स्थित । स्वामी गजानन जाहले ।। ४३ ।। बाळापुरीं पुकार झाली । गजानन आल्याची ती भली । मंडळी धावूं लागली । दर्शन घ्याया पायांचें ।। ४४ ।। रामदासी अवघ्या दिवसभर । करीत राहिला विचार । शेवटीं रात्र होतां तीन प्रहर । स्वप्न पडलें बाळकृष्णा ।। ४५ ।। अरे, गजानन माझीच मूर्ति । हल्ली तुमच्या वऱ्हाड प्रांती । संशय मुळीं ना धरीं चित्ती । तो धरितां बुडशील ।। ४६ ।। मी तोच समजून । करी गजाननाचे पूजन । गीतेचें हे आहे वचन । संशयात्मा विनश्यति ।। ४७ ।। ऐसें स्वप्न पडल्यावरी । बाळकृष्ण तोषला भारी । मस्तक ठेविलें अत्यादरीं । गजाननाचे पायांवर ।। ४८ ।। महाराज आपुली लीला । मी ना समर्थ जाणण्याला । तो घोटाळा उकलिला । तुम्ही स्वप्न देऊन ।। ४९ ।। नवमी माझी सांग झाली । न्यूनता कांहीं न उरली । अर्भकावरी कृपा केली । तेणें धन्य झालो मी ।। १५० ।। आतां कांहीं दिवस । राहा या बाळापुरास । हीच आहे मनीं आस । ती पूर्ण करा हो ।। ५१ ।। महाराज म्हणाले त्यावर । ऐक माझा विचार । कांहीं दिवस गेल्यावर । येईन मी बाळापुरा ।। ५२ ।। भोजनोत्तर निघून गेले । स्वामी शेगांवासी भलें । रस्त्यानें न कोणा दिसलें । क्षणांत पोचले शेगांवी ।। ५३ ।। स्वस्ति श्रीदासगणूविरचित । हा श्रीगजानन विजय नामें ग्रंथ । सुखद होवो भाविकांप्रत । हेचि इच्छी दासगणू ।। १५४ ।। शुभं भवतु । श्रीहरिहरार्पणमस्तु ।।

।। इति श्रीगजानन विजय ग्रंथस्य नवमोऽध्यायः समाप्तः ।।

# अध्याय दहावा प्रारंभ

श्रीगणेशाय नमः ।। हे अरूपा अव्यया । पूर्णब्रह्मा पंढरीराया । सज्जनांच्या विसाविया । मजला परते लोटूं नको ।। १ ।। देवा हा दासगणू । नको परक्याचा आतां म्हणू । माझ्या पातकांचा नको आणूं । विचार चित्तीं नारायणा ।। २ ।। माझ्या करें न झालें पुण्य । हें ठाऊकें मजलागून । फार काय तुला वदन । दावण्या मी योग्य नसे ।। ३ ।। ऐशी स्थिती आहे जरी । परि देवा कृपा करी । ओहळास गोदावरी । पोटी आपल्या घेतसे ।। ४ ।। तैसें तुवा करावें । दुःख अवघे निवारावें । पातकाला न उरूं द्यावें । माझ्या ठायीं यत्किंचित् ।। ५ ।। तूं आणिल्या मनांत । अवघेंच कांहीं घडून येत । रंकाचाही राव होत । तुझा लाधतां वशिला ।। ६ ।। असो एकदां पुण्यराशी । गेले उमरावतीसी । जाऊन उतरले सदनासी । आत्माराम भिकाजीच्या ।। ७ ।। हा आत्माराम भिकाजीसुत । उमरावतीचा असे प्रांत । मोठा अधिकार हातांत । होता त्याच्या विबुध हो ।। ८ ।। कायस्थ प्रभू याची जात । हा संताचा प्रेमी अमित । सदाचारसंपन्न गृहस्थ । गृहस्थाश्रमी वर्ततसे ।। ९ ।। त्याच्या घरीं समर्थ गेले । ते त्यानें सांग पूजिलें । मंगलस्नान घातलें । उष्णोदकानें गजानना ।। १० ।। उटणीं नाना प्रकारची । अंगा लाविलीं साचीं । वृत्ति आनंदली त्याची । संतसहवासे तेधवां ।। ११ ।। कर्वतीकांठी उमरेडचा । धोतरजोडा नेसविला साचा । भालीं केशरी गंधाचा । भव्य तिलक लाविलासे ।। १२ ।। कंठामाजी पुष्पहार । नैवेद्याचे नाना प्रकार । दक्षिणेसीं शंभर । रूपये त्यानें ठेविलें ।। १३ ।। धूप दीप आरती झाली । पुष्पांजली समर्पिली । दर्शनालागी दाटी झाली । उमरावतीच्या लोकांची ।। १४ ।। प्रत्येका ऐसें वाटावें । समर्थ आपल्या घरी न्यावें । यथासांग करावे । पूजन त्यांचे येणे रितीं ।। १५ ।। इच्छा ऐसी बहुतां झाली । परी थोडक्यांचीं मनीषा पुरली । सदनीं पाऊलें लागण्या भलीं । पुण्य पाहिजे बलवत्तर ।। १६ ।। ते ज्यांच्यापाशीं होते । समर्थ गेले तेथें तेथें । कां कीं साधूस अवघे कळते । अंतर्ज्ञानें करून ।। १७ ।। गणेश श्रीकृष्ण खापर्डे । उमरावतीचे गृहस्थ बडे । वकीलींत ज्यांच्यापुढें । ढीग रूपयांचें पडती कीं ।। १८ ।। दादासाहेब यांप्रत । म्हणत होते वऱ्हाडांत । हा सज्जन भाविक अत्यंत । ब्राह्मण शुक्ल यजुर्वेदी ।। १९ ।। त्यानें विनंति करितां खरी । महाराज गेले त्याच्या घरीं । तेथेही झाली याचपरी । समर्थांची पूजा हो ! ।। २० ।। गणेश आप्पा म्हणूनी । होता लिंगायत वाणी । चंद्राबाई कामिनी । त्याची परम भाविक असे ।। २१ ।। ती बोलली पतीला । हा साधु पाहिजे नेला । कसेही करून घराला । पहा विनंती करून ।। २२ ।। आपुलें निष्पाप असल्या

मन। याच्या आगमनें करून । होईल आपुलें पवित्र सदन। भाविकांचा देव असे ।। २३ ।। गणेश आप्पा म्हणे तिला। वेड लागले आहे तुला । हा सदनी साधु न्यावयाला। वशिला पाहिजे बलवत्तर।। २४।। पहा खापर्ड्यालागुनी। हा साधु न्यावया सदनीं । श्रम पडले ते आण ध्यानीं । उगा हट्ट धरूं नको ।। २५।। चंद्राबाई म्हणे नाथा । हे न पटे माझ्या चित्ता । सांगे माझी मनोदेवता । सदनीं साधु येतील हो ।। २६।। तुम्ही करा हो त्यांना नुसती । सदनीं येण्यास विनंती । गरीबावरी असते प्रीती। संतांची ती विशेष।। २७ ।। परि आप्पा बोलेना । छाती त्याची होईना। बोलवावयासी निजसदना। श्रीगजानन साधुते ।। २८ ।। महाराज वदले अखेर । गणेश आप्पाचा धरून कर। तुझें किती आहे सदन दूर । तेवढें सांग मला ?।। २९।। तुझ्या सदनीं वाटतें यावें । कांही वेळ बसावें । अरे चित्तीं असेल ते बोलावें । भीड न धरितां कवणाची।। ३०।। ऐसें महाराज बोलतां। गणेश आप्पाचिया चित्ता । हर्ष झाला तत्वतां। तो न शब्दे बोलवें ।। ३१ ।। समर्थास नेऊन सदनीं । पूजा केली उभयतांनीं । आपुला संसार त्यांचें चरणीं। अर्पण केला तात्काळ ।। ३२ ।। असो ऐशा पूजा अमित। झाल्या उमरावतीत । त्या प्रत्येक पूजेप्रत। एक गृहस्थ हजर असे ।। ३३।। तो आत्माराम भिकाजीचा। नात्यानें हा होता भाचा । राहणार मुंबई शहरीचा । तारमास्तर असें कीं ।। ३४ ।। तो रजा घेऊन भला । उमरावतीस होता आला । भेटण्या आपुल्या मामाला। बाळाभाऊ नाम ज्याचें।। ३५।। त्या बाळाभाऊकारण । समर्थांचें लागलें ध्यान । म्हणे ऐशा साधूचे चरण । सोडून कुठें जाऊं नये।। ३६ ।। प्रपंच अवघा अशाश्वत । त्यांत कशाला गोवूं चित्त । केला आजपर्यंत । तोच आतां पुरे झाला ।। ३७ ।। कांहीं असो आजपून । मी न सोडी त्यांचे चरण । अमृताला टाकून। विष प्याया कोणी जावें ? ।। ३८ ।। म्हणून प्रत्येक पूजेला। बाळाभाऊ हजर भला । होता बुध हो राहिला। दुसरें न कांहीं कारण ।। ३९ ।। असो कांहीं दिवसांनीं । शेगांवीं आले परतोनी । मळ्यासीं न जातां जाणी । आले मंदिरीं मोट्याच्या ।। ४०।। त्या मंदिराच्या पूर्वेस । एक जागा होती ओस। गजानन पुण्य पुरुष । येऊन बसला ते ठायां ।। ४१।। बातमी महाराज आल्याची । कृष्णा पाटला कळली साची । त्यांनी जागा मळ्याची। सोडली हें समजलें ।। ४२ ।। म्हणून आला धांवत । त्या ओस जागेवरी सत्य। महाराजा करून दंडवत। अधोवदन बैसला।। ४३।। डोळ्यांतून वाहे पाणी । खंड त्याला नसे जाणी। वस्त्र टाकले भिजवोनी । त्या अश्रूंनीं छातीचें ।। ४४ ।। तैं महाराज वदले पाटलाला। ऐसा कां रे रडशी भला ? । शोक कोणता तुला झाला?। तें वेगें सांग मज ।। ४५ ।। पाटील बोले त्यावर । जोडून आपले दोन्ही कर। महाराज मळ्याचा अव्हेर । कां हो आज केलात हा? ।। ४६ ।। ऐसा अक्षम्य कोणता। अपराध झाला सांगा आतां । माझ्याकडून ज्ञानवंता । मी लेकरूं आपुलें असे ।। ४७ ।। ही देशमुखाच्या बाजूची। जागा

आहे बघा साची । एका माळ्याच्या मालकीची । येथे तुम्ही राहूं नका ।। ४८ ।। मळ्यांत मर्जी नसेल जरी । तरी चला राहत्या घरीं । तें खालीं करितों सत्वरीं । तुम्हांसाठी दयाळा ।। ४९ ।। कां कीं तुम्हांवाचून । मला न काहीं प्रिय आन । हें कळलें वर्तमान । अवघ्या पाटील मंडळीतें ।। ५० ।। तेही तेथें धावून आले । महाराजा विनवूं लागलें । निजसदना या या भले । हरी आणि नारायण ।। ५१ ।। महाराज बोलले तयासी । मी जो या जागेसी । येऊन बसलों आज दिवशीं । तें तुमच्या हितास्तव ।। ५२ ।। तें पुढें येईल कळोन । आतां न करा भाषण । वाद दोघांचे निर्मूलन । करील हे विसरूं नका ।। ५३ ।। जितके जगीं जमेदार । तितके न करिती विचार । मागचा पुढचा साचार । हेच उणें त्यांच्या ठायीं ।। ५४ ।। जा बंकटलालासी । पाहून आणा वेगेसीं । मी सोडिता तत् गृहासी । तो नाहीं रागावला ।। ५५ ।। तें कां हे त्यासी विचार । माझी कृपा तुमच्यावर । आहे ती न ढळणार । कोणत्याही कारणांनीं ।। ५६ ।। बंकटलालही आला तेथ । घालूं लागला समजूत । यांच्या मर्जीविरूद्ध मळ्यांत । तुम्ही यांना नेऊं नका ।। ५७ ।। माझ्या घरून जेव्हां आले । तेव्हां सांगा मी काय केलें । आपण आहोंत त्यांची बाळे । तें सारखे अवघ्यांना ।। ५८ ।। सखाराम आसोलकार । आहे मनाचा उदार । तो जागा देण्यांस इन्कार । करणार नाहीं वाटते ।। ५९ ।। सखाराम देईल जागा । पुढचें करूं आपण बघा । म्हणजे अवघ्यांस यांत भागा । घेता येईल सहजची ।। ६० ।। समेट अवघ्यांचा होऊनी । मठ बांधिला त्या ठिकाणीं । परशराम सावजींनी । मेहेनत घेतली विशेष ।। ६१ ।। समर्थांच्या बरोबर ! निस्सीम भक्त होते चार । भास्कर, बाळाभाऊ, पितांबर । उमरावतीचा गणेश आप्पा ।। ६२ ।। रामचंद्र गुरव त्याचपरी । राहत होता बरोबरी । हे पांच पांडव, श्रीहरी । गजानन शोभूं लागले ।। ६३ ।। वृत्ति बाळाभाऊची । अतिविरक्त झाली साची । पर्वा न त्यानें नौकरीची । केली यत्किंचित् आपुल्या ।। ६४ ।। पत्रें येतीं वरच्यावरी । बाळाभाऊस येण्या घरीं । परी परिणाम अंतरीं । कांहींच त्याच्या होईना ।। ६५ ।। भास्कर म्हणे गुरूराया । हा सोकला पेढे खाया । म्हणून ना इच्छी जाया । आपल्यापासून कोणीकडे ।। ६६ ।। तुम्ही द्यावा यातें मार । म्हणजेच हा जवळ करील घर । रत्न चौदावें पाहिल्याबिगर । हा येथून हलणें नसे ।। ६७ ।। लकडी वांचून माकड । पाहा न होई कधीं धड । मोठमोठाले ते पहाड । भिऊं लागती वज्राला ।। ६८ ।। एकदा बळेंच घालवून । दिलें बाळाभाऊकारण । परी तो आला परतून । राजीनामा देवोनिया ।। ६९ ।। बाळाभाऊ शेगांवासी । येतां भास्कर बोलला त्यासी । कां रे आम्हा त्रास देसी ? । येथें येऊन वरच्यावर ।। ७० ।। ओढाळ बैल हिरव्यावर । पाहे पडाया निरंतर । त्यास जरी दिला मार । तरी तो येई तेथ पुनः ।। ७१ ।। तैसी लोचटा तुझी कृति । तंतोतंत निश्चिति । झाली

ग. वि. १०

जयाला विरक्ति। त्यानेंच येथे यावें रे ! ।। ७२ ।। हें अहंकाराचे भाषण । समर्था न खपले जाण। त्यांनी भास्कराचें अज्ञान। निवटाया कृत्य केलें ऐसें ।। ७३ ।। एका गृहस्थाच्या हातीं । भली थोरली छत्री होती । ती गजानने घेऊन हाती । बाळास झोडूं लागले ।। ७४ ।। मारतां मारतां मोडली। बुध हो ती छत्री भली । मग एक मोठी घेतली । भरीव कांठी वेळूची ।। ७५ ।। तिनें मारणें सुरूं केलें । तें पाहता लोक भ्याले । कांहीं कांहीं पळून गेले । सोडून त्या मठाला ।। ७६ ।। परी बाळाभाऊ तसाच पडला। समर्थांच्या पुढे भला । कैक म्हणती असेल मेला। तो या अशा मारानें।। ७७ ।। भास्करही झाला चिंतातूर। बाळाभाऊचा पाहून मार । परी समर्थांच्या समोर । बोलण्या छाती होईना ।। ७८ ।। तीही काठी मोडली खरी । बाळाभाऊच्या पाठीवरी। मग ते कंटाळून अखेरीं । तुडवूं लागले तयाला ।। ७९ ।। जैसा का तो कुंभार । माती तुडवितो साचार । तैसाच केला प्रकार। महाराजांनीं तुडविण्याचा ।। ८०।। मठीं हा प्रकार चालला। शिष्यसमुदाय पळत सुटला । कोणी गेले बोलावण्याला । त्यांच्या आवडीच्या मंडळीस ।। ८१ ।। बंकटलाल, कृष्णाजी। धावूनी आले मठामाजीं। समर्थ हात धरण्या राजी । कोणी तयार होईना ।। ८२ ।। बंकटलाल म्हणे भीत भीत । समर्था हा आपुला भक्त। पुरें झालें याप्रत । आतां ऐसें तुडवणें।। ८३ ।। ऐसें ऐकतां भाषण । समर्थ वदले हांसून । हें असंबद्ध भाषण। कां करितां कळेना ।। ८४।। मीं न बाळासी मारिलें । नाही तयासी तुडविलें। निरखून पहा चांगलें। म्हणजे येईल कळोनी ।। ८५।। महाराज म्हणाले बाळासी। उठ वत्सा वेगेसी । या आलेल्या मंडळीसी । अंग तुझें दाखिव ।। ८६।। ऐसी आज्ञा होतां भला । बाळाभाऊ उठून बसला। लोक त्याच्या अंगाला । पाहूं लागले निरखून।। ८७ ।। तों वळाचें नांव नाहीं। कोठेही न लागलें कांहीं । तो पहिल्यापरीच होता पाहीं । निमग्न आपुल्या आनंदात ।। ८८ ।। त्यायोगें भास्कराला। बाळाभाऊचा अधिकार कळला। मग तोही ना पुन्हां बोलला । वेडेवांकडे बाळासी ।। ८९ ।। सोनें कसासी उतरतें । तेव्हांच त्याची किंमत कळते । आश्चर्य झालें समस्तांतें। तो प्रकार पाहून ।। ९० ।। सुकलाल नामें आगरवाला । होता बाळापुराला । श्रोते त्याच्या आगराला। गाय एक द्वाड होती ।। ९१ ।। तिनें गांवांत फिरावें। मुलामाणसां तुडवावें । सशक्तांसी हुंदडावें। शिंगानें कीं आपुल्या ।। ९२ ।। वाटेल त्याच्या दुकानांत । गाईनें शिरावें अवचित। धान्याचिया टोपल्यांत । तोंड आपुलें खुपसावें ।। ९३ ।। वाटेल तितुकें यथेच्छ खावें। राहिलेलें नासावें । तेलतुपाचें लवंडावें । पिंप अंगाच्या धक्क्यानें।। ९४ ।। घरीं बांधून ठेवितां। चऱ्हाटे तोडी हां हां म्हणतां। साखळीसी आणली लघुता। बांधतां त्या गाईने।। ९५।। ती गाय नोव्हे वाघीण । बाळापुराकारण । लोक गेले कंटाळून । त्रास सोसितां तियेचा ।। ९६ ।। गाभण मुळींच होईना । कास कधींच करीना। कोंडून ठेवितां राहीना। घरामाजीं कोठेंही ।। ९७ ।। लोक म्हणती

सुकलालाला। दे खाटकास या गाईला । किंवा मारून टाक तिला । तूंच गोळी घालून ।। ९८ ।। सुकलाल म्हणे लोकांसी । तुम्हीच मारून टाका तिसी । वाटेल त्या प्रयत्नांसी । करून या विबुध हो ।। ९९ ।। एका पठाणानें तिला। मारण्याचा यत्न केला। गोळी भरून बंदुकीला । टपून बैसला होता हो ।। १०० ।। तें कसें काय कोण जाणें। कळलें गाईकारणें । तिनें येऊन शिंगानें । पठाण पाडिला उताणा ।। १ ।। मी परगांवा नेऊन । दिली होती सोडून । परी ती आली परतून । त्याला सांगा काय करू ! ।।२ ।। ऐसें ऐकतां लोक म्हणती । आतां याला एक युक्ति । गोविंदबुवांचा घोडा म्हणती। समर्थानें गरीब केला ।। ३ ।। तूंही या गाईला । घेऊन जा शेगांवाला । अर्पण करी समर्थाला । म्हणजे अवघें संपलें ।। ४ ।। साधूस गाय दिल्याचें। पुण्य तुला लाभेल साचें । आणि संकट आमुचें। टळेल बापा त्यायोगें ।। ५ ।। तें अवघ्यांस मानवलें। गाय नेण्याचें ठरविलें । तिला धरण्यासाठीं केलें । प्रयत्न नानापरीचे ।। ६ ।। एकही यत्न नाहीं फळला । शेवटी एक्या पटांगणाला। हरळकुंद्याचा ढीग केला । सरकी ठेविली शेजारीं ।। ७ ।। ती खायालागून । गाय आली धांवून । ती येतां फांस टाकून । धरिली दहावीस जणांनीं ।। ८ ।। साखळदंडानें बांधून पुरी। गाय घातली गाडीवरी । आणिली शेगांवाभीतरीं। गजाननासी द्यावया ।। ९ ।। जवळ शेगांव जसें जसें। येऊ लागलें तसें तसें । स्वभावांत पडलासे। त्या गाईच्या पालट ।। ११० ।। समर्थांपुढें येताक्षणीं। गाय झाली दीनवाणी । तिनें लोचनीं आणून पाणी । पाहिलें त्या पुण्यपुरुषा ।। ११ ।। महाराज म्हणाले अवघ्यांना । हा काय तुमचा मूर्खपणा । गाईस ऐशा यातना। देणें कांहीं बरें नव्हे ।। १२ ।। चारही पाय बांधलेंत। गळा साखळदंड लाविलेत । शिंगाचीही तीच गत । केली चऱ्हाटें काथ्याच्या।। १३ ।। ऐसा मोठा बंदोबस्त। शोभतसे वाघिणीप्रत । ही गाय बिचारी साक्षात् । तिला न ऐसें करणें बरें ।। १४ ।। अरे खुळ्यांनो ! ही गाय । अवघ्या जगाची आहे माय । तिला बांधिलें हाय हाय । केवढा कठीण प्रसंग आला ।। १५ ।। तिला आत्ताच करा मुक्त। ती न हुंदाडी कोणाप्रत । परी लावण्या तिला हात । छाती कोणाची होईना ।। १६ ।। जो तो पाहून मागे सरे। तेथ समर्थ आले त्वरें । आपुल्या त्या पुनीत करें । बंधनें तोडिली धेनूचीं ।। १७ ।। बंधनें अवघीं तुटतां भलीं । गाय गाडीच्या खालीं आलीं । पुढले पाय टेकिती झाली। समर्था वंदन करावया।। १८ ।। खालीं घालूनिया मान । प्रदक्षिणा त्या केल्या तीन। समर्थांचे दिव्य चरण । चाटूं लागली जिभेनें ।। १९ ।। ऐसा प्रकार तेथें झाला । तो अवघ्यांनीं पाहिला। समर्थांच्या प्रभावाला । शेषही वर्णू शकेना ।। १२० ।। समर्थ म्हणाले धेनूस । बाई कोणा न द्यावा त्रास । तूं या सोडून मठास । कोठेंही जाऊं नको ।। २१ ।। ऐसा घडतां प्रकार। अवघ्यांनीं केला जयजयकार। उच्च स्वरानें त्रिवार । समर्थांच्या नांवाचा ।। २२ ।। बाळापूरची मंडळी। बाळापुरा निघून गेली। गाय तेथेंच

राहिली । शेगांवांसी मठामध्यें ।। २३ ।। त्या दिवसापासून । ठावे न तिला चऱ्हाट जाण । सुज्ञ धेनूचे अवघे गुण । तिच्या ठायीं पातले ।। २४ ।। अजून त्या शेगांवाते । तिची संतती नांदते । जे कांहीं वदती ब्रह्मवेत्ते । तेंच येतें घडोन ।। २५ ।। असो एक कारंज्याचा । लक्ष्मण घुडे नांवाचा । विप्र वाजसनीय शाखेचा । धनकनक संपन्न असे ।। २६ ।। त्यासी रोग झाला पोटात । उपाय केलें अत्यंत । परि न आला गुण किंचित । खर्च सारा व्यर्थ गेला ।। २७ ।। त्यानें समर्थांची कीर्ती । कर्णोपकर्णी ऐकली होती । म्हणून सहपरिवारें सत्वरगती । आला शेगांवाकारणें ।। २८ ।। रोगव्यथेनें चालवेना । श्रोतें तया लक्ष्मणा । दोघांतिघांनीं उचलून जाणा । आणिले त्या मठांत ।। २९ ।। करण्या नुसता नमस्कार । असमर्थ होतें शरीर । त्याच्या कुटुंबानें पदर । समर्थांपुढें पसरिला ।। ३० ।। आणि म्हणाली दयाघना ! । मी आपली धर्मकन्या । माझ्या पतीच्या यातना । हरण कराव्या आपण ।। ३१ ।। अमृताचें दर्शन । होता कां यावें मरण । माझ्या कुंकवालागून । टिकवा हीच विनंती ।। ३२ ।। त्या वेळीं समर्थस्वारी । आंबा खात होती खरी । तोच फेकिला अंगावरी । त्या लक्ष्मणकांतेच्या ।। ३३ ।। जा दे हा पतीस खाया । व्याधि त्याची बरी व्हाया । तूं शोभसी त्यास जाया । पति–भक्ति परायण ।। ३४ ।। यापुढें न कांहीं वदले । चिलीम ओढूं लागले । श्रीगजाननस्वामी भले । आपुल्या मठांत शेगांवीं ।। ३५ ।। भास्कर म्हणे 'अहो बाई' । आतां न बसा ये ठाई । आपुल्या पतीस लवलाही । जा घेऊन कारंज्यातें ।। ३६ ।। प्रसाद आंब्याचा जो कां तुला । समर्थकरीं प्राप्त झाला । तोच घाली खावयाला । आपुल्या पतीकारणें ।। ३७ ।। यानें तुझें होईल काम । गुण येईल अत्युत्तम । लक्ष्मणासी आराम । होईल आंबा खाताच ।। ३८ ।। बाई घेऊन आंब्याला । येती झाली कारंज्याला । प्रसाद खाऊ घातला । आंब्याचा आपल्या पतीस ।। ३९ ।। निजगृहीं जोडपें आलें । आप्त पुसूं लागलें । शेगांवांत काय घडलें । तें सांगावें साकल्यें ।। १४० ।। बाईनें अवघें वर्तमान । कळविलें लोकांलागून । आंब्याचा तो प्रसाद म्हणून । दिला समर्थे मजलागीं ।। ४१ ।। आणि आज्ञा केली वरीं । खाऊ घाला अत्यादरीं । आंबा प्रसाद निजकरीं । आपुल्या त्या पतीला ।। ४२ ।। त्याप्रमाणे मीही केलें । आज सकाळीं खाऊ घातलें । हें वैद्यांनी जईं ऐकलें । तई त्या वाटले वाईट ।। ४३ ।। अहो बाई तुम्ही काय । केलेत हे हाय हाय । आंबा हेंच कुपथ्य होय । या पोटातील रोगाला ।। ४४ ।। माधवनिदानीं हेंच कथिलें । सुश्रुतांनीही वर्णिलें । निघंटानें कथन केले । शारंगधर म्हणे ऐसेंच ।। ४५ ।। तुम्ही तो प्रसाद दिलेला । पाहिजे होता भक्षण केला । पत्नीचें पुण्य पतीला । उपयोगी पडतसे ।। ४६ ।। ऐसें वैद्य बोलले । आप्त अवघे घाबरले । जे ते टोचूं लागले । लक्ष्मणाच्या पत्नीस ।। ४७ ।। परी झालें अघटित । लक्ष्मणाचें पोट सत्य । रेच होऊन अकस्मात । मऊ होऊन गेले हो ।। ४८ ।। शौचावाटे व्याधि गेली । हळूंहळूं शक्ति आली । पहिल्या परीच

होती झाली । प्रकृति लक्ष्मणाची ।। ४९ ।। निसर्गाच्या बाहेरी । वैद्यशास्त्र कांही न करी । तेथें उपयोगी पडे खरी । कृपा देवसंतांची ।। १५० ।। लक्ष्मण बरा झाल्यावर । आला शेगांवी सत्वर । म्हणे महाराज माझें घर । पाय लावून पवित्र करा ।। ५१ ।। मी आलो त्याचसाठी । चला कारंज्यास ज्ञानजेठी । मला न करा हिंपुटीं । नाहीं ऐसें म्हणूं नका ।। ५२ ।। आग्रह त्याचा विशेष पडला । महाराज गेले कारंज्याला । तेधवां होते संगतीला । शंकर, भाऊ, पितांबर ।। ५३ ।। घरीं नेऊन पूजा केली । दक्षिणा ती निवेदिलीं । अवघी संपत्ती आपुली । आहे मी कोण देणार ? ।। ५४ ।। परी एका ताटांत । कांहीं रूपये ठेविले सत्य । महाराज बघून त्याप्रत । ऐशा रिती बोलले ।। ५५ ।। म्हणशी माझें कांहीं न उरलें । मग हे रूपये कोठून आणले ? । लक्ष्मणा ऐसें चाळे । दांभिकपणाचे करूं नको ।। ५६ ।। मला दिलें तूं आपलें घर । आतां उघडी अवघी दारें । फेकून देई रस्त्यावर । अवघी कुलुपें येधवां ।। ५७ ।। लक्ष्मण कांही न बोलला । मौन धरून बैसला । परी समर्थे आग्रह धरिला । खजिन्याचें दार उघडी ।। ५८ ।। भीत भीत मोकळें द्वार । केले त्याने अखेर । खजिन्याच्या उमऱ्यावर । स्वत: जाऊन बैसला ।। ५९ ।। आणि म्हणाला महाराज यावें । वाटेल तें घेऊन जावें । ऐसें बोलिला जरी बरवें । परी अन्यभाव अंतरींचा ।। १६० ।। हें त्याचें दांभिकपण । समर्था आलें कळोन । बहुरूप्याचें राजेपण । कोठून टिके बाजारी ? ।। ६१ ।। जैसें कडू वृंदावन । वरून पाहतां दिसे छान । परी अंतरीं कडवटपण । पूर्ण त्याच्या भरलें असें ।। ६२ ।। सोडून त्याच्या घरासी । उपाशी निघालें पुण्यरासी । दांभिकांच्या सदनासी । संत न होती तृप्त कदा ।। ६३ ।। तेथें त्याच्या घराची । वा धनदौलतीची । गरज समर्था नव्हती साची । ते वैराग्याचे सागर ।। ६४ ।। परी तो जें कांहीं बोलला । त्याचा सत्यपणा पाहिला । खोटेपणाचा राग आला । म्हणून गेले उठोन ।। ६५ ।। जातां जातां बोलले । माझे माझे म्हणसी भलें । भोग आतां त्याचीं फळें । माझा उपाय त्यास नसे ।। ६६ ।। मी कृपा करावया । आलों होतो या ठाया । याहीपेक्षां दुप्पट द्याया । परी ते न तुझ्या प्रारब्धीं ।। ६७ ।। तेंच पुढें झालें सत्य । एका सहा महिन्यांत । अवघी लक्ष्मी झाली फस्त । त्या भिक्षेची वेळ आली ।। ६८ ।। म्हणून श्रोते परमार्थांत । खोटेपणा न खपे किंचित् । याचसाठीं हें चरित्र । समर्थे घडवून आणिलें ।। ६९ ।। श्रीगजानन चिंतामणी । त्या गार काय शोभा आणी ? । वा सुवर्णालागूनी । भूषवावें कां कथिलानें ? ।। १७० ।। स्वस्ति श्रीदासगणूविरचित । श्रीगजाननविजय नामें ग्रंथ । सदा भाविक परिसोत । निज कल्याण व्हावया ।। १७१ ।। शुभं भवतु ।। श्रीहरिहरार्पणमस्तु ।।

।। इति श्रीगजानन विजय ग्रंथस्य दशमोऽध्याय: समाप्त: ।।

# अध्याय अकरावा प्रारंभ

श्रीगणेशाय नमः ।। हें ओंकाररूपा पशुपती । हे भवानीवरा दक्षिणामूर्ति । ब्रह्मांडांत जितुक्या विभूति । तितुकी रूपें तुझीं देवा ।। १ ।। तुझें रूप जें निराकार। जेणें हें व्यापक चराचर । जें सर्वस्वीं आधार । अविद्या माया प्रकृतीला ।। २ ।। तें स्वरूप जाणावया । अशक्य आहे देवराया । म्हणून तूं करण्या दया । सगुण रूपें धरलीस ।। ३ ।। जैसें ज्याला वाटत । तैसें तो तुला भाग देत। नामामुळें तुजप्रत । भिन्नत्व ये ना कधींहीं ।। ४ ।। शैव तुला शिव म्हणती । ब्रह्म बोलती वेदान्ती। रामानुजांचा सीतापती । वैष्णवांचा विष्णू तूं ।। ५ ।। उपासनेप्रमाणें । नांवे मिळाली तुजकारणें। परी तूं अभिन्नपणें । सर्वांठायींच गवससी ।। ६ ।। तूं सोमनाथ विश्वेश्वर । हीम केदार ओंकार। क्षिप्रातटाकीं साचार । महांकाल तूंच की ।। ७।। नागनाथ वैजनाथ । घृष्णेश्वर वेरुळांत । त्र्यंबक तुला म्हणतात। गोदावरीच्या तटाकीं ।। ८ ।। तूं भीमाशंकर । मल्लिकार्जुन, रामेश्वर । तूं गोकर्णरूपी शंकर । तूं महादेव शिंगणापुरीं ।। ९ ।। त्या अवघ्यांकारण । असो माझें साष्टांग नमन । माझ्या त्रितापांचें हरण । शीघ्र करी दीनबंधो ।। १०।। देवा तुम्ही कुबेराला । क्षणांत धनपती केला । मग माझ्याविषयीं कां हो पडला। प्रश्न तुम्हांसी गिरिजापते ? ।। ११ ।। बाळकृष्णाच्या सदनासी। समर्थ आले दुसरें वर्षी । त्या बाळापुरासी । दासनवमीकारणें ।। १२ ।। सुकलाल बाळकृष्ण। या बाळापुरालागून । निस्सीम भक्त होते दोन । त्यांची सरी न ये कोणा ।। १३ ।। या वेळीं बरोबर। होते पाटील भास्कर । बाळाभाऊ, पितांबर । गणू, जगदेव, दिंडोकार ।। १४ ।। उत्सव दासनवमीचा। सांग झाला तेथ साचा। दैवयोग भास्कराचा । तेथेंच आला ओढवून ।। १५ ।। एक कुत्रें पिसाळलेलें। भास्करा येऊन चावलें। तेणें लोक इतर भ्याले। म्हणती आतां हा पिसाळेल ।। १६ ।। उपाय अवघे व्यावहारिक । भास्करासी केले देख। कोणी म्हणती निःशंक । डॉक्टरा धाडा बोलावणें ।। १७।। भास्कर म्हणें ते अवसरीं । वैद्याची ना जरुरी खरी। माझा डॉक्टर आसनावरी । बैसला आहे गजानन ।। १८।। त्याचकडे मजला न्यावें । वृत्त अवघें कळवावें । ते सांगतील तें ऐकावें। आपला हेका करूं नका ।। १९ ।। गजाननांचे समोर । आणिला पाटील भास्कर । बाळाभाऊनें समाचार । अवघा समर्थांस श्रुत केला ।। २० ।। तो अवघा ऐकून । महाराज वदले हासून । हत्या,

वैर आणि ऋण । हे कोणासी चुकेना ।। २१ ।। सुकलालच्या गाईठायी । द्वाडपणा जो होता पाही । तो या भास्करें लवलाही । शेगांवीं दवडिला ।। २२ ।। तें तिचें द्वाडपण । कुत्रें येथें झालें जाण । तेंच चावलें येऊन । या पाटील भास्कराला ।। २३ ।। तिचा हरण्या द्वाडपणा । मशीं यानें केली प्रार्थना । इचें प्यावया दूध जाणा । ऐसा भास्कर मतलबी ।। २४ ।। दूध पिता वाटलें गोड । आतां कां रे चालले जड । नको ठेवूंस पडदा आड । वांचवूं कां मी सांग तुला ? ।। २५ ।। हें कुत्रें निमित्त झालें । तुझें आयुष्य मुळींच सरलें । आतां पाहिजे प्रयाण केलें । तूं या सोडून मृत्यूलोकां ।। २६ ।। जरी इच्छा असेल मनीं । वांचण्याची तुजलागोनी । तरी तुझें मी यापासूनी । रक्षण वेड्या करीन ।। २७ ।। परी ती होईल उसनवारी । जन्ममृत्यूची बाळा खरी । या अशाश्वताच्या बाजारीं । देणे घेणें चालतें ।। २८ ।। बोल आतां झडकर । काय तुझा विचार । ऐसी कधीं ना येणार । पर्वणी ती जाण तुला ।। २९ ।। भास्कर बोले त्यावरी । मी अजाण सर्वतोपरी । जें असेल अंतरीं । आपुल्या तेंच करावें ।। ३० ।। लेंकुराचें अवघें हित । माता एक तें जाणत । ऐसें एक्या अभंगांत । श्रीतुकोबा बोलले ।। ३१ ।। मी आपले लेंकरूं । म्हणून विनंती कशास करूं ? । तूं अवघ्या ज्ञानाचा सागरू । अवघें कांहीं कळतें तुला ।। ३२ ।। ऐसें ऐकतां भाषण । संतोषले गजानन । खऱ्याप्रती समाधान । खरें बोलतां होतसे ।। ३३ ।। कोणी म्हणाले गुरुराया । भास्करासी वांचवा सदया । या कुत्र्यापासूनिया । तो आपुला भक्त असे ।। ३४ ।। महाराज म्हणती त्याकारण । हेंच तुझें अज्ञान । अरे वेड्या जन्ममरण । हीच मुळीं भ्रांति असे ।। ३५ ।। जन्मे न कोणी, मरे न कोणी । हें जाणावयालागुनी । परमार्थाचा उपाय जाणी । शास्त्रकारें कथन केला ।। ३६ ।। त्याचाउपयोग करावा । मोह समूळ सोडावा । प्रारब्धभोग भोगावा । निमूटपणें हेंच बरें ।। ३७ ।। संचित–प्रारब्ध–क्रियमाण । हें भोगल्यावाचून । या बद्ध जीवालागून । सुटका होणें मुळींच नसे ।। ३८ ।। पूर्वजन्मीं जें करावें । तें या जन्मीं भोगावें । आणि ते भोगण्यासाठीं यावें । जन्मा हा सिद्धान्त असे ।। ३९ ।। या जन्मीं जें करावे । तें पुढच्या जन्मास उरवावें । असे किती सांग घ्यावे । फेरे जन्ममृत्यूचें ? ।। ४० ।। पूर्वजन्मींचे उर्वरित । भास्कराचें न उरलें सत्य । तो अवघ्यापून झाला मुक्त । मोक्षास जायाकारणें ।। ४१ ।। म्हणून आग्रह करूं नका । मार्ग त्याचा आडवूं नका । काय भास्करासारखा । भक्तराणा जन्मे पुन्हां ।। ४२ ।। पूर्वजन्मीचें याचें वैरी । कुत्रें होतें निर्धारीं । म्हणून तें या बाळापुरीं । चावते झाले भास्करास ।। ४३ ।।

त्यानें अवघा आपुला । डाव येथें साधिला । तैसा जरी शेष उरला । द्वेष मनीं भास्कराच्या ।। ४४ ।। तरी तो त्याचा द्वेष । कारण पुढील जन्मास । कारण होईल भास्करास । दावा आपुला उगवावया ।। ४५ ।। म्हणून पूर्वजन्मींचे वैर सरलें । आतां न कांहीं शेष उरलें । या भास्कराकारण भलें । अवघ्या उपाधि निरसल्या ।। ४६ ।। आतां मी इतकेंच करितो । दोन महिने वांचवितों । याला न पिसाळूं देतो । श्वानविषापासून ।। ४७ ।। तें न मी केलें जरी । हा जन्मास येईल पुन्हां परी । दोन महिने भूमिवरी । उरलें आयुष्य भोगावया ।। ४८ ।। ऐसें ज्ञान ऐकिलें । ते कित्येकांस नाहीं पटलें । मात्र बाळाभाऊ आनंदले । त्या बोधातें ऐकूनी ।। ४९ ।। भास्करा तूं धन्य धन्य । संतसेवा केलीस पूर्ण । चुकले तुझें जन्ममरण । काय योग्यता वानूं तुझी ? ।। ५० ।। ऐसा प्रकार झाल्यावरी । मंडळी आली शेगांवनगरी । भास्कर बोले मधुरोत्तरीं । महाराजांच्या भक्तगणा ।। ५१ ।। बाळापूरची हकीकत । सांगे प्रत्येका इत्थंभूत । माझी विनंती जोडून हात । हीच तुम्हां भास्कर म्हणे ।। ५२ ।। महाराज लाधलें शेगांवा । याचा विचार करावा । या कीर्तीचा अमोल ठेवा । सांभाळा स्मारक करून ।। ५३ ।। त्यांना स्मारकाची जरुरी नाही । तें पुढीलांसाठीं पाहीं । तें स्मारक साक्षी देई । त्यांच्या अमोल साधुत्वाची ।। ५४ ।। पाहा आळंदीस ज्ञानेश्वर । समर्थ सज्जनगडावर । पवित्र केलें देहूनगर । त्या तुकोबारायानें ।। ५५ ।। त्यांचीं स्मारकें त्या त्या ठाया । ठेविलीं भव्य करूनिया । तोच पथ अनुसराया । तुम्ही झटावें मनापासून ।। ५६ ।। ऐसें प्रत्येका सांगत । भास्कर राहिला निवांत । परी त्याच्या मनांत । ऐसें आले एकदां ।। ५७ ।। हें मला हो हो म्हणती । माझी ऐकून विनंती । परी शंका येत चित्तीं । हो म्हणण्याची यांची मला ।। ५८ ।। त्यानें एकदां ऐसे केलें । अवघ्या लोकांस मिळविलें । एक्या ठायीं मठांत भले । महाराजांच्या अपरोक्ष ।। ५९ ।। बंकटलाल पाटील हरी । मारुती चंद्रभान कारभारी । जो खंडुजींच्या दुकानावरी । होता कारभार करीत ।। ६० ।। श्रीपतराव बावीकर । ताराचंद साहुकार । आणि मंडळी होती इतर । नांवे कुठवर सांगावी ? ।। ६१ ।। मिळवुनिया त्या लोकांला । भास्करें पदर पसरीला । माझा आतां संबंध उरला । दोन महिनेच तुमच्याशीं ।। ६२ ।। माझ्या मनीं ऐशी आस । समर्थांचें स्मारक खास । भव्य व्हावें वऱ्हाडास । या शेगांवामाझारीं ।। ६३ ।। तुम्हीं हें करितों म्हणा । तेणे आनंद माझ्या मना । होऊन सुखें करीन गमना । मी वैकुंठाकारणें ।। ६४ ।। संतसेवा कधींही । अनाठायीं जाणार नाहीं । इच्छा जयाची ज्या ज्या होई । ती ती संत पुरविती ।। ६५ ।। स्मारक ऐसें करावें ।

अवघ्यांनीच वाखाणावें । पाहून त्या डोलावें । प्रत्येकाने आपुल्या मनीं ।। ६६ ।। ऐसेंच स्मारक करण्याची । शपथ वाहा समर्थांची । ही विनंती अखेरची । माझी ती मान्य करा ।। ६७ ।। तें अवघ्यांनीं कबूल केलें । भास्कराचें स्थिरावलें । यायोगें तें चित्त भलें । रुखरुख मनाची संपली ।। ६८ ।। उत्तरोत्तर आनंदवृत्ती । भास्कराची वाढत होती । जैसी लेकुरें आनंदती । पुढील सणाच्या आशेनें ।। ६९ ।। माघ वद्य त्रयोदशीस । महाराज वदले भास्करास । चाल त्र्यंबकेश्वरास । जाऊं आपण शिवरात्रीला ।। ७० ।। तो त्र्यंबकराजा कर्पूरगौर । भवभवांतक भवानीवर । जो आहे झाला स्थिर । गोदावरीच्या तटातें ।। ७१ ।। ते ज्योतिर्लिंग मनोहर । करी पातकाचा संहार । नको करूंस आतां उशीर । जाऊं गंगास्नानाला ।। ७२ ।। भास्करा, त्या त्र्यंबकेश्वरीं । पहाड एक ब्रह्मगिरी । जेथें औषधी नानापरी । बहुसाल असती उगवलेल्या ।। ७३ ।। त्या ब्रह्मगिरीवर स्थित । आहेत पहा गहिनीनाथ । ज्यांना आहेत अवगत । गुणधर्म औषधींचे ।। ७४ ।। वेड्या कुत्र्याच्या विषावरी । तेथें औषधी आहे खरी । तिचा उपयोग सत्वरीं । करून पाहूं येधवा ।। ७५ ।। भास्कर म्हणे गुरुनाथा । आतां औषधी कशाकरतां ? । तुमची आहे अगाध सत्ता । औषधीहून आगळी ।। ७६ ।। आपुल्या कृपेनें भलें । विष बाळापुरीच निमालें । आयुष्याचे आहेत उरले । दोन महिनेच आतां कीं ।। ७७ ।। म्हणून वाटे मजप्रती । शेगांवींच राहूं गुरुमूर्ती । त्र्यंबकेश्वर आम्हाप्रती । तुम्हीच आहात साक्षात् ।। ७८ ।। गोदावरी तुमचे चरण । तेथेंच मी करी स्नान । अन्य तीर्थांचे प्रयोजन । मला न आतां राहिले ।। ७९ ।। ऐसी ऐकतां त्याची वाणी । समर्थ वदले हांसोनी । हें जरी खरें जाणी । तरी तीर्थमहिमा मानावा ।। ८० ।। चाल नको करूं उशीर । पाहूं तो त्र्यंबकेश्वर । बाळाभाऊ, पितांबर । यांसही घे बरोबरी ।। ८१ ।। मग ती मंडळी निघाली । शेगांवाहून भलीं । शिवरात्रीस येती झाली । त्र्यंबकेश्वराकारणें ।। ८२ ।। कुशावर्ती केलें स्नान । घेतलें हराचें दर्शन । गंगाद्वारा जाऊन । पूजन केलें गौतमीचें ।। ८३ ।। वंदिली माय निलांबिका । तेवी गहिनीनाथ देखा । तेथून आले नाशिका । गोपाळदासास भेटावया ।। ८४ ।। हा गोपाळदास महंत । काळ्या रामाच्या मंदिरांत । धुनी लावून द्वारांत । पंचवटीच्या बसलासे ।। ८५ ।। राममंदिरासमोर । एक पिंपळाचा होता पार । शिष्यांसहित साधुवर । तेथें जाऊन बैसले ।। ८६ ।। गोपाळदासास आनंद झाला । बोलले जवळच्या मंडळीला । आज माझा बंधु आला । वऱ्हाडांतून गजानन ।। ८७ ।। जा घ्या त्याचें दर्शन । अनन्यभावें करून । माझी ही भेट

म्हणून। नारळसाखर त्यांसी द्या ।। ८८ ।। हा हार घाला कंठांत । तो मी एक साक्षात्। देह भिन्न म्हणून द्वैत । आम्हां उभयतीं मानूं नका ।। ८९ ।। शिष्यांनी तैसेंच केलें । दर्शन घ्याया अवघे आले । कंठामाजी घातिले । दिलेल्या पुष्पहाराला ।। ९० ।। नारळ आणि खडीसाखर। ठेविली स्वामींसमोर । ती पाहून गुरुवर । ऐसें बोलले भास्कराला ।। ९१ ।। हा प्रसाद अवघ्यांस वाटी । परी न होऊ देई दाटी । माझ्या बंधूची झाली भेटी । आज या पंचवटीत ।। ९२ ।। माझें येथील काम झालें । आतां नाशकाचे राहिलें । म्हणून पाहिजे तेथें गेलें । धुमाळ वकीलाच्या घरा।। ९३ ।। महाराज आले नाशकांत । लोक दर्शना जमले बहुत । बारीक सारीक गोष्टी अमित । तेथें असता जहाल्या ।। ९४ ।। त्या अवघ्या सांगतां । विस्तार होईल उगीच ग्रंथा । म्हणून देतों संक्षेप आतां । त्याची क्षमा करा हो।। ९५ ।। तेथें राहून कांही दिवस । महाराज आले शेगांवास । तो अडगांवी नेण्यास । झ्यामसिंग पातला ।। ९६ ।। त्यानें आग्रह केला फार । समर्थे दिले उत्तर । रामनवमी झाल्यावर । येऊं आम्ही अडगांवा ।। ९७ ।। आता तूं जावें परत । उगा न पडे आग्रहांत। झ्यामसिंग मुळींच भक्त । निस्सीम होता समर्थांचा ।। ९८।। तो आला तैसा परत गेला । आपुल्या त्या अडगांवाला । पुन्हा श्रोते येतां झाला । रामनवमीस शेगांवीं ।। ९९ ।। उत्सव करून शेगांवांत। समर्थांना शिष्यांसहित । आला घेऊन अडगांवांत । हनुमानजयंतीकारणें ।। १०० ।। अडगांवीं असतां समर्थस्वारी । चमत्कार झाले नानापरी । एके दिवशीं दोन प्रहरी । भास्कर लोंळविला फुपाट्यात ।। १ ।। छातीवरी बैसून। भास्करा केलें ताडन । लोक पहाती दुरून। परी जवळी कोणी जाईना ।। २ ।। बाळाभाऊ जवळ होता । तो म्हणाला सद्गुरुनाथा । भास्करासी सोडा आतां । बेजार झाला उन्हानें ।। ३ ।। तैं म्हणाला भास्कर । बाळाभाऊ न जोडा कर । माझा हा साक्षात् ईश्वर । काय करील तें करू दे ।। ४ ।। लोकांसी वाटती चापट्या दिल्या । मला होतात गुदगुल्या । अनुभवाच्या गोष्टी भल्या । अनुभवीच जाणती ।। ५।। पुढें घेऊन भास्करासी । महाराज आले बिऱ्हाडासी । त्या अडगांव ग्रामासी । उतरलेल्या ठिकाणास ।। ६।। बाळाभाऊस बोलले । अवघे आतां दोन उरले । भास्कराचे दिवस भले । पंचमीला जाईल तो।। ७ ।। आज मीं जें केलें कृत्य । ताडनाचें रानांत । तें कां हें तुजप्रत । आलें असेल कळोनी ।। ८ ।। तुजला या भास्करानीं। मारविलें होतें छत्रीनीं । शेगांवी माझ्या करानी । तें आहे कां ध्यानात ? ।। ९।। ते क्रियमाण नासावया । त्यास मारिले ये ठायां । ह्या

एकाच गोष्टीवांचूनिया । अन्य नव्हता हेत कांहीं ।। ११० ।। उत्सव पूर्ण झाल्यावर । त्या अडगांवींचा साचार । काय घडला प्रकार । तो आतां परियेसा ।। ११ ।। उत्सवाचा काला झाला । वद्य पंचमी दिवस आला । एक प्रहर दिवसाला । समर्थ म्हणती भास्करासी ।। १२ ।। भास्करा तुझें प्रयाण । आज दिवशी आहे जाण । पद्मासन घालून । पूर्वाभिमुख बैसावें ।। १३ ।। चित्त अवघें स्थिर करी । चित्तीं साठवावा हरी । वेळ आली जवळ खरी । आतां सावध असावें ।। १४ ।। इतर जनाकारण । म्हणूं लागले करा भजन । ''विठ्ठल विठ्ठल नारायण'' । ऐसें उच्च स्वरानें ।। १५ ।। हा तुमचा बंधु भला । जातो आज वैकुंठाला । त्याच्या करा पूजनाला । माळबुक्का वाहून ।। १६ ।। भास्करें घातलें पद्मासन । नासाग्रीं दृष्टि ठेवून । वृत्ति अवघ्या केल्या लीन । अंतर्मुख होऊनिया ।। १७ ।। भक्त भास्करा पूजिती । माळा बुक्का वाहती । तें कौतुक पाहाती । समर्थ दूर बैसून ।। १८ ।। भजन झालें एक प्रहर । माध्यान्हीस आला दिनकर । महाराजांनी ''हरहर'' । शब्द केला मोठ्यानें ।। १९ ।। त्यासरसा प्राण गेला । भास्कराचा वैकुंठाला । संतांनीं हाती धरिलें ज्याला । तो पाहुणा हरीचा ।। १२० ।। लोक पुसती महाराजांस । कोठे करणें समाधीस । या भास्कराच्या शरीरास । कोठें न्यावें ठेवावया ? ।। २१ ।। समर्थ अवघ्यांस सांगती । द्वारकेश्वर जो पशुपती । ज्याच्या सन्निध आहे सती । तेथे ठेवा भास्कराला ।। २२ ।। ऐसी आज्ञा होतांक्षणी । विमान बांधिलें लोकांनी । केळीचे खांब लावूनी । चहूं बाजूंस विबुध हो ।। २३ ।। आंत ठेविलें कलेवर । पुढे भजनाचा होय गजर । मिरवित आणिला भास्कर । द्वारकेश्वराचियापाशीं ।। २४ ।। सांगविधि समाधीचा । ते ठायीं झाला साचा । लोक म्हणती महाराजांचा । परमभक्त गेला हो ।। २५ ।। दुसरें दिवसापासून । समाधीच्या सन्निध जाण । होऊं लागले अन्नदान । गोरगरीबांकारणें ।। २६ ।। स्थान द्वारकेश्वराचें । अडगांवाच्या सन्निध साचे । अंतर एक मैलाचें । गांवापासून उत्तरेस ।। २७ ।। जागा द्वारकेश्वराची । परमरमणीय होती साची । झाडी चिंचवृक्षांची । होती विशेष ते ठायां ।। २८ ।। निंब अश्वत्थ मांदार । आम्र वट औदुंबर । ऐसे वृक्ष होते इतर । शिवाय कांहीं फुलझाडें ।। २९ ।। अडगांव अकोलीच्या मध्यंतरी । हें ठिकाण निर्धारी । तेथें समाधि दिधली खरी । समर्थांनीं भास्कराला ।। १३० ।। दहा दिवस अन्नदान । झालें याचें वर्णन । तुम्हीं नुकतेंच केलें श्रवण । संतभंडारा नांव ज्याचें ।। ३१ ।। चिंचवृक्षांच्या सावलींत । जेवाया बसें पंगत । तयीं कावळे अतोनात । त्रास देऊं लागले ।। ३२ ।। काव काव ऐसें करिती । द्रोण

पात्रींचे उचलून नेती । मलोत्सर्ग तोही करिती । जेवणारांच्या अंगावर ।। ३३ ।। त्या योगें लोक त्रासले । कावळ्यास हाकूं लागले । भिल्लांनी ते तयार केले । तीरकमटे त्या मारावया ।। ३४ ।। तईं बोलले गजानन । अवघ्या लोकांलागून । नका मारूं त्याकारण । अपराध त्यांचा कांही नसे ।। ३५ ।। या भंडाऱ्यांत येण्याचा । हेतु इतकाच आहे त्यांचा । प्रसाद आपणा भास्कराचा । इतरांपरीच मिळावा ।। ३६ ।। कां की हा भास्कर । वैकुंठीं गेला साचार । हा पितृलोकावर । नाहीं मुळींच राहिला ।। ३७ ।। दहा दिवसपर्यंत । प्राण अंतरिक्षांत । राहे परिभ्रमण करित । सपिंडी होतां जाय पुढें ।। ३८ ।। त्या अकराव्या दिवशीं । बळी देती कावळ्याशीं । काक जेव्हां स्पर्शेल त्यासी । तेव्हांच प्राण जातो पुढें ।। ३९ ।। त्या बलीदानाचें । कारण भास्करा नुरलें साचें । म्हणून या कावळ्यांचे । पित्त गेले खवळून ।। १४० ।। आत्मा या भास्कराचा । मुळींच मुक्त झाला सांचा । तो पाहुणा वैकुंठीचा । झाला आहे येधवां ।। ४१ ।। या सोमसूर्य लोकांचे । कारण त्यासी नुरलें साचें । म्हणून पिंडदानाचें । नुरलें पहा प्रयोजन ।। ४२ ।। जयाला न ऐसी गती । त्याच्यासाठीं पिंड देती । कावळ्यांची वाट पाहाती । पिंड ठेवून कलेशावर ।। ४३ ।। म्हणून कावळे रागावले । त्यांनी हे जाणीतलें । भास्करानें गमन केलें । एकदम वैकुंठ लोकाला ।। ४४ ।। म्हणून आम्हां प्रसाद त्यांचा । मिळूं द्या या भंडाऱ्याचा । ऐसा विचार कावळ्यांचा । दिसतो या कृतीनें ।। ४५ ।। तुम्ही त्यांस मारूं नका । मीच तया सांगतो देखा । अहो जिवांनो माझे ऐका । गोष्ट आतां सांगतों जी ।। ४६ ।। तुम्ही उद्यापासोन । वर्ज्य करा हे ठिकाण । ना तरी भास्करालागून । येईल माझ्या कमीपणा ।। ४७ ।। आज प्रसाद घेऊन । तुम्ही तृप्त व्हा अवघे जण । मात्र उद्यांपासोन । या स्थळासी येऊं नका ।। ४८ ।। ऐसें महाराज बोललें । तें भाविकांसी अवघें पटलें । परि कुत्सित जे कां बसले । होते त्या मंडळींत ।। ४९ ।। ते एकमेकांलागुनी । म्हणते झालें हांसोनी । ही गजाननानें केली वाणी । अस्थानीं कीं निरर्थक ।। १५० ।। पक्षी कुठे कां वागतात । मानवाच्या आज्ञेंत ? । पाहूं याची प्रचीत । उद्यां मुद्दाम येऊनी ।। ५१ ।। हे वेडे कांहीं बोलती । भाविकां नादी लाविती । आपले स्तोम माजविती । संतत्वाचें निरर्थक ।। ५२ ।। अहो साजेल तें बोलावें । जें कां पचेल तेंच खावें । उसनें न कधी आणावें । अवसान तें अंगांत ।। ५३ ।। दुसरे दिवशी ते कुत्सित । मुद्दाम पाहाया आले तेथ । तों एकही ना दृष्टीप्रत । पडला त्यांच्या कावळा ।। ५४ ।। मग मात्र चकित झाले । समर्थांसी शरण आले । बारा वर्षे तेथ भले ।

कावळे न आले श्रोते हो ।। ५५ ।। चौदा दिवस झाल्यावरी । गजानन फिरलें माघारीं । येते झाले शेगांव नगरी । आपल्या उर्वरित शिष्यांसह ।। ५६ ।। श्रोते त्या शेगांवांत । एक गोष्ट घडली अघटित । ती ऐका सावचित्त । सांगतों मी येधवां ।। ५७ ।। होतें साल दुष्काळाचें । म्हणून एका विहिरीचें । काम चाललें खोदण्याचें । सुरुंगाते लावून ।। ५८ ।। विहीर दोन पुरुषांवर । गेली खोल साचार । खडक काळा लागला थोर । गती खुंटली पहारीची ।। ५९ ।। म्हणून भोकें करून । आंत दारू ठांसून । सुरुंगाच्या साह्ये करून । काम फोडण्याचें सुरूं झालें ।। १६० ।। चारी बाजूंस भोकें चार । केली पहारीनें तयार । दारू ठासिली अखेर । आंत दोऱ्या घालूनी ।। ६१ ।। एरंड पुंगळ्या पेटवून । सोडल्या चारी दोऱ्यांतून । तो मध्येंच बैसल्या अडकून । दोऱ्यांचीया गांठीवरी ।। ६२ ।। पुंगळी खालीं जाईना । दारूस विस्तव लागेना । पाणी दम धरीना । आलें जवळीं सुरुंगाच्या ।। ६३ ।। तैं कामावरचा मिस्तरी । विचार करी अंतरीं । सुरुंगास लागल्या वारी । सुरुंग वाया जाईल कीं ।। ६४ ।। म्हणून गणू जवऱ्याला । मिस्तरी तो बोलला । तूं उतरून विहिरीला । पुंगळ्या थोड्या सरकीव ।। ६५ ।। आणि तूं येई लौकर वरी । पुंगळ्या जातील तोवरी । बाराचिया शेजारी । म्हणजे काम होईल ।। ६६ ।। त्या पुंगळ्या सरकवण्यासी । कोणी न धजे जावयासी । म्हणून या गणू जवऱ्यासी । मिस्तरीनें दटाविलें ।। ६७ ।। काय करितो बिचारा । दारिद्र्य होतें ज्याच्या पदरां । त्याच्यावरी चाले जोरा । यज्ञास बळी बोकडाचा ।। ६८ ।। या गणू जवऱ्याची । निष्ठा समर्थांवरी साची । आज्ञा होतां मिस्तरीची । गणू आंत उतरला ।। ६९ ।। एक पुंगळी सरकविली । ती तात्काळ तळा गेली । दारूप्रती जाऊन भिडली । गणू आंत सांपडला ।। १७० ।। दुसरीस जों घाली हात । पुंगळी सरकवण्याप्रत । तों पहिला सुरुंग उडाला सत्य । मग काय विचारतां ? ।। ७१ ।। गणू म्हणे विहिरींतून । समर्थां ये धांवून । माझें आतां रक्षण । तुझ्यावीण कोण करी ? ।। ७२ ।। विहिरीमाजी धुराचा । डोंब झाला होता साचा । दुसरा सुरुंग पेटण्याचा । अवधि उरला थोडका ।। ७३ ।। तों गणू जवऱ्या भली । कपार हाती लागली । त्या कपारींत बैसली । स्वारी गणू जवऱ्याची ।। ७४ ।। एकामागून एकांनी । पेट घेतला सुरुंगांनी । उडाले सुरुंग ऐसे तिन्ही । दगड अपार निघाले ।। ७५ ।। लोक जे कां होते वरती । ते बोलले ऐशा रिती । बहुधा मिळाली असेल मुक्ती । विहिरीमाजी गणूला ।।७६ ।। छिन्न भिन्न शरीर । झाले असेल साचार । डोकावून पाहाती नारीनर । आंत गणू जवऱ्याला ।। ७७ ।। तो कोठें दिसेना ।

जनांच्या नाना कल्पना । दगडाप्रमाणे गणू जाणा । उडाला असेल बाहेर ।। ७८ ।। त्याचें आसमंत भागांत । कोठें तरी असेल प्रेत । पडलेलें त्या शोधण्याप्रत । माणूस कोणी पाठवा ।। ७९ ।। मिस्तरीचा शब्द ऐकिला । आंतून गणू बोलला । अहो मिस्त्री नाहीं मेला । गणू आहे विहिरींत ।। ८० ।। गजाननांच्या कृपेनीं । मी वाचलों या ठिकाणीं । बसलों आहे दडोनी । या पहा कपारींत ।। ८१ ।। परी कपारीच्या तोंडाला । धोंडा एक मोठा पडला । त्यामुळें बाहेर मला । येतां येत नाहीं कीं ।। ८२ ।। गणूचे शब्द ऐकिले । लोक अवघे आनंदले । लोक खालीं उतरले । तो धोंडा काढावया ।। ८३ ।। दहापांच जणांनी । धोंडा सरकविला पहारींनी । गणूस बाहेर काढूनी । घेऊन आले वरते त्या ।। ८४ ।। वरती येतांच गांवांत । गणू गेला पळत पळत । समर्थांच्या मठांत । दर्शन त्यांचे घ्यावया ।। ८५।। गणू दर्शना येतांक्षणीं । बोलले त्या कैवल्यदानी । गण्या कपारींत बैसोनी । किती धोंडे उडविलेस ? ।। ८६ ।। त्यांत मोठा धोंडा तुला । रक्षण्यास येऊन बैसला । कपारीच्या तोंडाला । म्हणून तूं वांचलास ।। ८७ ।। पुन्हां ना ऐसें साहस करी । पुंगळीवरून सुटल्यापरी । मधेच तिला जाऊन करीं । कशाही प्रसंगी धरूं नये।। ८८ ।। जा तुझें गंडांतर । आज निमालें साचार । गणूप्रती पाहाया इतर । लोक आले गांवींचें ।। ८९ ।। गणू म्हणे सद्गुरुनाथा । सुरुंग चारी पेटतां । तूंच मला देऊन हातां । कपारींत बैसविले ।। ९० ।। म्हणून मी वांचलों । तुझें पाय पाहाया आलों । ना तरी असतों मेलों । विहिरीमाजी गुरुराया ! ।। ९१ ।। ऐसें गजानन कृपेचें । महिमान आहे थोर साचें । तें साकल्ये वर्णण्याचें । मसीं नाहीं सामर्थ्य ।। ९२ ।। श्रीदासगणूविरचित । हा श्रीगजानन विजय नामें ग्रंथ । आल्हादावो भाविकांप्रत । हेंच इच्छी दासगणू ।। १९३ ।। शुभं भवतु ।। श्रीहरिहरार्पणमस्तु ।।

।। इति श्रीगजानन विजय ग्रंथस्य एकादशोऽध्यायः समाप्त : ।।

# अध्याय बारावा प्रारंभ

श्रीगणेशाय नमः ।। हे गणाधीशा गणपती । मयुरेश्वरा विमलकीर्ति । माझ्या हृदयीं करुन वस्ती । ग्रंथ कळसास नेई हा ।। १ ।। तूं ज्ञानबुद्धीचा दाता । तूं भक्तमनोरथ पुरविता । विघ्ननगातें संहारिता । तूंच एक गणराया ।। २ ।। तूं साक्षात् चिंतामणी । चिंतिलेलें देशी जाणीं । आपुल्या भक्तांलागुनी । ऐसें पुराणे म्हणतात ।। ३ ।। माझ्या मनीची अवघी चिंता । लयास नेई एकदंता । लंबोदरा पार्वतीसुता । भालचंद्रा सिंदुरारे ।। ४ ।। असो बच्चुलाल अग्रवाला । होता एक अकोल्याला । धन-कनक-संपन्न भला । मनाचाही उदार जो ।। ५ ।। त्यानें हकिकत कारंज्याची । म्हणजे लक्ष्मणपंत घुड्याची । कर्णोपकर्णी ऐकिली साची । तेणें साशंक जाहला ।। ६ ।। तें खरें खोटें पहाण्यास । विचार करी चित्तास । तों एके समयास । महाराज आले अकोल्याला ।। ७ ।। येऊन बच्चुलाला घरीं । बैसते झाले ओट्यावरी । कीं गजानन साक्षात्कारीं । भक्त आपुला जाणून ।। ८ ।। बच्चुलाला आनंद झाला । तो समर्थांसी ऐसे वदला । आज गुरुराया वाटतें मला । आपली पूजा करावी ।। ९ ।। ऐसें ऐकतां भाषण । समर्थे तुकविलीं मान । जें साक्षात् असे चिन्ह । श्रोते संमती दिल्याचें ।। १० ।। बच्चुलालानें तयारी । तात्काळ केली ओट्यावरी । षोडशोपचारे अत्यादरीं । पूजन त्यानें आरंभिले ।। ११ ।। प्रथमतः घातले मंगलस्नान । नानाविध उटणीं लावून । मग करविलें परिधान । वस्त्र पितांबर जरीचा ।। १२ ।। शालजोडी अंगावरीं । बहुमोल घातली काश्मिरी । एक जरीचा रुमाल शिरीं । अभ्रेस्मि आणूनि बांधिला ।। १३ ।। गोफ घातिला गळ्यांत । सलकडी ती हातांत । करांच्या दाही बोटांत । मुद्रिका घातल्या नानापरी ।। १४ ।। बहुमोल हिऱ्याची । वामकरी घातली पौची । रत्नजडीत कंठ्याची । कंठीं शोभा विशेष ।। १५ ।। जिलेबी राघवदास पेढे । नैवेद्यास ठेविलें पुढें । त्रयोदश गुणी ठेविलें विडे । एक्या लहान तबकांत ।। १६ ।। अष्टगंध अर्गजा अत्तर । सुवासिक लाविलें फार । त्यानें अवघ्या अंगभर । गुलाबपाणी शिंपडीलें ।। १७ ।। एका सुवर्णाच्या ताटी । दक्षिणा ठेविली शेवटीं । ती होतीं फार मोठी । रुपये होन मोहोरांची ।। १८ ।। बेरीज करता दहा हजार । येईल ती साचार । ऐशी दक्षिणा होती थोर । किती वर्णन करूं तिचें ।।१९।। श्रीफळ पुढें ठेवून । विनये केलें भाषण ।

महाराज माझें इच्छी मन । राममंदिर बांधावया ।। २० ।। या माझ्या ओट्यावरी । अडचण होतसे भारी । मंडप तो घातला जरी । उत्सवासी गुरुराया ।। २१ ।। त्या माझ्या मनोरथा । पूर्ण करी ज्ञानवंता । ऐसे म्हणून ठेविला माथा । अनन्यभावें पायावरी ।। २२ ।। त्यावरी साधु गजानन । देते झाले आशीर्वचन । श्रीजानकीजीवन । तुझा करील पूर्ण हेतू ।। २३ ।। असो, आज तूं हे काय केलें ? । मला पोळ्याचा बैल बनविलें । हे अलंकार घालून भलें । त्याचें काय कारण ? ।। २४ ।। मी न बैल पोळ्याचा । अथवा घोडा दसऱ्याचा । मला या दागदागिन्यांचा । काय सांग उपयोग ? ।। २५ ।। अरे हें अवघे विष । मला नको त्यांचा स्पर्श । या नसत्या उपाधीस । माझ्या मागे लावू नको ।। २६ ।। अथवा तूं मोठा श्रीमान । हे दाखवाया कारण । केलेंस कां हें प्रदर्शन । सांग मसी बच्चुलाला ? ।। २७ ।। जे आवडते जयासी । तेंच द्यावें तयासी । मी वेडापिसा संन्यासी । नागवा फिरतो गांवभर ।। २८ ।। हे अवघें तुझें तुला । लखलाभ असो बच्चुलाला । तुम्हां प्रापंचिकाला । या द्रव्याची जरूर ।। २९ ।। माझा यजमान भीमातटीं । उभा विटेसी जगजेठी । तो काय माझ्यासाठीं । हे वैभव द्याया तयार नसे ।। ३० ।। ऐसें म्हणून काढिले । दागिने अंगावरचे भले । चहूं बाजूस फेकियले । वस्त्रांचीही तीच गती ।। ३१ ।। दोन पेढे खाऊन । निघून गेले गजानन । हा प्रकार अवलोकून । केला शोक अकोल्यांत बहुतांनी ।। ३२ ।। त्यांत कांहीं कारंज्याचें । लोक हजर होते साचें । ते म्हणती आपुल्या वाचें । अभागी आमुचा लक्ष्मण ।। ३३ ।। त्याने बच्चुलालापरी । पूजन केलें आपुल्या घरीं । परी कचरला अंतरीं । मोह धनाचा धरून ।। ३४ ।। वरघडीचें भाषण । केले विनय दाखवून । ते कां समर्थांकारण । समजणे अशक्य आहे हो ? ।। ३५ ।। जेवीं पूजा दांभिकांची । शब्दमयीं असते साची । पूर्तता महावस्त्राची । होते त्यांची अक्षतेनें ।। ३६ ।। 'शर्कराखंडखाद्यानि' । ऐसे म्हणूनिया वदनीं । कुचका दाणा आणोनि । ठेवी पुढें भुईमूगाचा ।। ३७ ।। अशा दांभिक पूजनाचें । फलही त्याच स्वरूपाचें । वाटोळे लक्ष्मणाचें । याच कृतीनें झाले हो ।। ३८ ।। हा बच्चुलाल धन्य धन्य । जैसें केलें भाषण । तैसेच ठेविलें वर्तन । जवाहून न आगळें ।। ३९ ।। आतां याच्या वैभवाला । ओहोट हा ना शब्द उरला । संतकृपा झाली ज्याला । तो सुखीच राहातसे ।। ४० ।। बच्चुलालांनी तपास । केला अवघ्या अकोल्यास । परी न लागला थांग त्यास । समर्थांचा कोठेंही ।। ४१ ।। असो एक पितांबर नांवाचा । शिष्य शिंपी जातीचा । होता गजानन महाराजांचा । शेगांवीं मठामध्यें ।। ४२ ।। त्यानें सेवा बहुत केली । तपश्चर्या फळा आली । एके

दिनीं ऐसी झालीं । गोष्ट ऐका मठांत ।। ४३ ।। फाटकें तुटकें धोतर । नेसला होता पितांबर । ते पाहून गुरुवर । ऐशा रीतीं बोललें ।। ४४ ।। अरे तुझें नांव पितांबर । नेसण्या न धडकें धोतर । ढुंगणास पाहती नारीनर । तें तरी झांक वेड्या ! ।। ४५ ।। नांव म्हणे सोनुबाई । हातीं कथलाचाही वाळा नाहीं । नांव पाहतां गंगाबाई । आणि तडफडे तहानेनें ।। ४६ ।। तशांतलाच प्रकार । आहे तुझा साचार । हे फाटके धोतर । पोतेऱ्याच्या उपयोगी ।। ४७ ।। तेंच नेसून बैससी । ढुंगण जगाला दाविसी । हा घे दुपेटा देतो तुसी । नेसावयाकारणें ।। ४८ ।। तो न करितां अनमान । राहे बाळा नेसून । यासी नको सोडू जाण । कोणी कांहीं केले तरी ।। ४९ ।। पितांबर दुपेटा नेसला । हे असह्य झालें इतराला । भाऊच घातकी भावाला । होतो स्वार्थ दृष्टीनीं ।। ५० ।। तो वेडावांकडा प्रकार । कशास बोलूं साचार । गटाराचें उघडीतां द्वार । घाण मात्र सुटते हो ।। ५१ ।। श्रीगजानन स्वामीप्रत । शिष्य होते असंख्यांत । परी अधिकारी तयांत । दोन्ही हातांच्या बोटांइतके ।। ५२ ।। पाहा श्रोते कांतारी । वृक्ष असती नानापरी । त्यांतून क्वचित् कोठें तरी । नजरेस पडती चंदनतरू ।। ५३ ।। त्यापरीच होते येथें । त्यांच्या शिष्यमंडळींते । कांही शिष्य पितांबरातें । टोचूं लागले निरर्थक ।। ५४ ।। हेंच कां तुझें शिष्यपण । वस्त्र करिसी परिधान । जें कां समर्थांकारण । ल्यावयाच्या उपयोगी ।। ५५ ।। तुझी भक्ती कळून आली । तूं खुशालचंद असशी मुळीं । तूं राहूं नको ये स्थळीं । अपमान करण्या सद्गुरूंचा ।। ५६ ।। तैं पितांबर म्हणाला । मी न गुरूचा अपमान केला । उलट मान ठेविला । आज्ञा ऐकून तयांची ।। ५७ ।। वस्त्र हे मज त्यांनीं दिलें । नेसावया सांगितले । तेंच मी हो परिधान केलें । ही का झाली अवज्ञा ? ।। ५८ ।। ऐसी भवति न भवति झाली । शिष्यांत तेढ माजली । ती मिटवावया माव केली । ऐशा रीतीं गजाननें ।। ५९ ।। पितांबरास म्हणती गुरुवर । तूं येथून जावे दूर । जाणते मूल झाल्यावर । आई त्याला दूर ठेवी ।। ६० ।। माझी कृपा आहे खरी । हे पितांबरा तुजवरी । जा हिंडून भूमीवरी । पदनतासी तारावें ।। ६१ ।। डोळ्यांत आसवें आणून । करूनिया साष्टांग नमन । मागे पाहें फिरफिरून । सोडून जातां मठासी ।। ६२ ।। पितांबर आला कोंडोलीसी । बसला वनांत आंब्यापासी । चिंतन चालले मानसी । निजगुरूचें सर्वदा ।। ६३ ।। तेथें होता रात्रभर । उदया येता दिनकर । जाऊन बसला झाडावर । मुंगळ्यांचिया त्रासानें ।। ६४ ।। अवघ्या आम्रवृक्षावरी । मुंग्या मुंगळे होते भारी । लहान थोर फांद्यांवरी । आला पितांबर जाऊन ।।६५।। परी निर्भय ऐसे सापडेना । स्थान तयासी बसण्या जाणा । हेच कृत्य गुराख्यांना ।

कौतुकास्पद वाटले ।। ६६ ।। ते म्हणाले आपापसांत । हा माकडापरी कां रे फिरत ? । ह्या वृक्षावरी सत्य । हें कांहीं कळेना ।। ६७ ।। लहान सान फांदीला । निर्भयपणे फिरून आला । परीं नाहीं खाली पडला । हेंच आहे आश्चर्य ! ।। ६८ ।। दुसरा म्हणाला यांत कांहीं । आश्चर्य वाटण्याजोगे नाहीं । गजाननाच्या शिष्याठायीं । ऐसे सामर्थ्य असते रे ।। ६९ ।। यावरून हा त्यांचा । शिष्य असावा खचित साचा । चला हा येथ आल्याचा । वृत्तांत सांगू गांवात ।। ७० ।। गोपमुखें वृत्त कळलें । कोंडोलीचे लोक आलें । आम्रवृक्षापाशी भले । कोण आलें तें पहावया ।। ७१ ।। म्हणाले पौरवासी नर । हा ढोंगी असावा साचार । बळेंच करतो वेडेचार । गजाननाच्या शिष्यापरी ।। ७२ ।। शिष्य गजानन महाराजांचा । भास्कर पाटील होता साचा । झाला नुकताच अंत त्याचा । अडगांव नामें ग्रामांत ।। ७३ ।। समर्थांचें शिष्य । येथे येतील कशास ? । बळें करण्या उपवास । सोडून बर्फी पेढ्याला ।। ७४ ।। पुसून एकदा यांस पाहावें । तो काय म्हणतो ते ऐकावें । मग खरें खोटें ठरवावे । उगीच तर्क नाही बरा ।। ७५ ।। एक मनुष्य पुढे झाला । पितांबरासी पुसूं लागला । तूं कोण कोठील कशास आला ? । गुरू तुझा कोण असे ।। ७६ ।। पितांबर बोले त्यावर । मी शेगांवचा राहणार । मी शिंपी पितांबर । शिष्य गजानन स्वामींचा ।। ७७ ।। त्यांची आज्ञा मजलागून । करण्या झाली पर्यटन । म्हणून येथें येऊन । वृक्षापाशी बैसलो ।। ७८ ।। तो आंब्याच्या मुळाशी । मुंगळे होते बहुवसी । म्हणून बैसलो फांदीसी । वृक्षावरी जाऊन ।। ७९ ।। ऐसे ऐकतां तद्भाषण । लोक कोपले दारुण । अरे मोठ्याचें नांव सांगून । चेष्टा ऐशा करूं नको ।। ८० ।। काय म्हणे मी राजाची । राणी आवडती आहे साची । खळगी भरण्या पोटाची । आले मजुरी करावया ।। ८१ ।। देशमुख त्या गांवीचा । शामराव नामें साचा । तो बोलला ऐसी वाचा । अरे सोंगाड्या ऐक हे ।। ८२ ।। स्वामी समर्थ गजानन । प्रत्यक्ष आहे भगवान । त्यांचें नांव सांगून । बट्टा त्यांना लावू नको ।। ८३ ।। अरे वेड्या एक्या काळी । त्यांनीं ऐसी कृति केली । ऋतु नसतां आणवली । फळें आम्रवृक्षाला ।। ८४ ।। त्यांनी फळें आणवली । तूं नुसतीं पानें आण भलीं । नाहीं तरी या स्थलीं । तुझी न धडगत लागेल ! ।। ८५ ।। हा बळीराम पाटलाचा । वृक्ष वठलेला आंब्याचा । तो पर्णयुक्त करी साचा । आमच्या देखत ये काळीं ।। ८६ ।। ऐसें न जरीं करशील । तरी मार खाशील । खरा असल्यास होशील । वंद्य आम्हांकारणे ।। ८७ ।। कां कीं शिष्य सद्गुरूंचे । कांही अंशी निघती साचे । बापा त्यांच्याच तोडीचें । हा आहे न्याय जगी ।। ८८ ।। नको करूं उशीर । हा आंबा करी हिरवागार ।

ते ऐकता पितांबर । गेला असे घाबरून ।। ८९ ।। बोलला ऐसे नाडूं नका । माझी सारी कथा ऐका । एका खाणीत निघती देखा । हिरे आणि गारा हो ।। ९० ।। तैसाच मी गार परी । गजानन शिष्याभितरी । बोललो नाही वैखरी । यत्किंचित् खोटे हो ।। ९१ ।। गारेवरून खाणीस । नाही येत जगी दोष । मी निज गुरूच्या नांवास । चोरून कैसें ठेवावें ? ।। ९२ ।। शामराव म्हणें त्यावर । नको करूं चरचर । संकट शिष्यास पडता थोर । ते धांवा करिती सद्गुरूंचा ।।९३ ।। मग तो शिष्य त्यांचा जरी । नसला कृतीनें अधिकारी । तरी सद्गुरूंचा प्रभाव करी । साह्य त्या आपल्या शिष्यास ।। ९४ ।। ऐसी झाली आड-विहीर । पितांबरासी साचार । झाला बिचारा चिंतातुर । कांहीं न सुचे तयासी ।। ९५ ।। त्या वठलेल्या झाडापाशी । मिळाले अवघे पौरवासी । काय होतें ते पाहावयासी । मुलें बायका समवेत ।। ९६ ।। निरुपाय होऊनि अखेर । पितांबरानें जोडिले कर । स्तवन मांडिले अपार । आपुल्या सद्गुरुरायांचे ।। ९७ ।। हे स्वामी समर्थ गजानना ! । ज्ञानांबरीच्या नारायणा । पदनताच्या रक्षण्या । धांव आतां ये काळी ।। ९८ ।। माझ्यामुळें दोष तुला । येऊं पाहतो भक्तपाला । आपुल्या ब्रीदासाठी पाला । आणीव आम्रवृक्षासी ।। ९९ ।। माझी भिस्त तुझ्यावरी । पाव मातें लवकरीं । ना तरी आली पाळी खरी । मजला येथें मरण्याची ।। १०० ।। प्रल्हाद खरा करण्याला । स्तंभीं नरहरी प्रगटला । जनी चढवितां सुळाला । त्याचें पाणी जहालें ।। १ ।। जनीचा भार देवावर । माझा आहे तुजवर । संतदेवांत अंतर । मुळींच नाही राहीलें ।। २ ।। देव तेची असती संत । संत तेचि देव साक्षात् । मला लोक म्हणतात । शिष्य गजाननाचा ।। ३ ।। माझे कांहीं महत्त्व नाहीं । ते अवघे तुझ्या ठायीं । पुष्पामुळें किंमत येई । जगी सुत्राकारणें ।। ४ ।। तूं पुष्प मी आहे सूत । तूं कस्तुरी मी माती सत्य । तुझ्यामुळेंच आले येथ । संकट हें माझ्यावरी ।। ५ ।। आतां न माझा अंत पाही । गुरुराया ! धांव घेई । या वठलेल्या वृक्षाठायीं । आणी पर्णे कोमल ।। ६ ।। लोकांस म्हणें पीतांबर । करा सद्गुरूंचा नामगजर । जय जय गजानन साधुवर । शेगांवच्या अवलिया ।। ७ ।। लोक अवघे गजर करिती । तों पालवी फुटली वृक्षाप्रती । जन नयनी पाहती । त्या अगाध कौतुकाला ।। ८ ।। कोणी म्हणती असेल स्वप्न । तें जे पडले आपणालागुन । पाहा चिमटा घेऊन । आपुल्याला करांनी ।। ९ ।। चिमटे घेऊन पाहती । तो निमाली स्वप्नभ्रांति । यावरी कोणी ऐसे म्हणती । ही नजरबंदी असेल ? ।। ११० ।। गारुड्यांच्या खेळांत । वाद्या होती सर्प सत्य । खापऱ्या असून दृष्टीप्रत । त्यांचें रुपये दिसती कीं ।। ११ ।। तोही भ्रम निमाला । तोडून

पाहता पर्णाला । फांदीवाटे तत्काळ आला । चीक शुभ्रसा बाहेर ।। १२ ।। मग मात्र खात्री झाली । वाळल्या वृक्षा पालवी फुटली । श्रीगजानन माऊली । खरीच आहे महासंत ।। १३ ।। आतां पितांबराविशीं । शंका न धरणें मानसीं । चला घेऊन गांवासी । हा त्यांचा शिष्य असे ।। १४ ।। याच्यायोगें करून । कधीतरी गजानन । येतील कोंडोलीकारण । वांसरासाठीं गाय जैसी ।। १५ ।। तें अवघ्यासी मानवलें । पितांबरासी मिरवीत नेलें । ऐसे जेंव्हा दिव्य झालें । तेंव्हा भाव उदेला ।। १६ ।। जैसा समर्थांनी आपुला । शिष्य डोमगांवी पाठविला । कल्याण नामें करून भला । कल्याण करण्या जगाचें ।। १७ ।। तैसेच केले गुरुवरें । श्रीगजानने साजिरे । उदेले हे भाग्य खरें । त्या कोंडोली गांवचे ।। १८ ।। श्रोते अजूनपर्यंत । तो आंबा आहे कोंडोलीत । इतरांपेक्षा असंख्यात । फळे येती तयाला ।। १९ ।। त्या पितांबराचे भजनी । कोंडोली गांव लागला जाणी । जेथे जाईल हिरकणी । तेथे ती मोल पावे ।। १२० ।। मठ पितांबराचा । कोंडोलीत झाला साचा । आणि अंतही तयाचा । ते ठायीं झाला हो ।।२१ ।। आतां इकडे शेगांवांत । महाराज आपुल्या मठांत । एके दिवशी उद्विग्न चित्त । होऊनिया बैसले ।। २२ ।। शिष्य त्यांचें कारण । पुसूं लागलें कर जोडून । महाराज आपुले मन । कां हो अस्थिर जाहलें ? ।। २३ ।। तैं महाराज वदले लोकांला । आमुचा कृष्णा पाटील गेला । जो चिकणसुपारी आम्हांला । रोज आणून देत असे ।। २४ ।। त्याची झाली आठवण । राम त्याचा मुलगा लहान । आतां सुपारी चिकण । कोण देतो या ठायां ।। २५ ।। राम थोर झाल्यावरी । करील माझी चाकरी । म्हणून मी या मठांतरी । आतां ना तयार राहावया ।। २६ ।। ऐसे महाराज बोलतां । जनालागी लागली चिंता । महाराजांचा विचार आतां । दिसतो येथून जाण्याचा ।। २७ ।। म्हणून कसेंही करून । जाऊं न द्यावें त्याकारण । चला आपण धरू चरण । महाराजांचे येवेळां ।। २८ ।। ऐसा विचार मिळून केला । मंडळी आली मठाला । श्रीपतराव बंकटलाला । ताराचंद मारुती ।। २९ ।। मंडळींनीं धरिले चरण । महाराज आम्हां सोडून । तुम्ही आपुले ठिकाण । राहण्याचें अन्य करूं नये ।। १३० ।। तुमची इच्छा असेल जेथ । तेथेच राहा शेगांवांत । परी सोडण्याचें मनांत । ग्राम हें आणूं नका ।। ३१ ।। तैं महाराज वाणी निघाली । तुमच्या गावांत आहे दुफळी । मला कोणाची जागा मुळीं । नको येथें राहावया ।। ३२ ।। जी कोणाची नसेल । ऐसी जागा जरी द्याल । तरीच राहणें होईल । माझें या शेगांवी ।। ३३ ।। ऐसी गोष्ट ऐकिली । तेंव्हा मंडळीं

चिंतावली। समर्थांनीं आज्ञा केली । मोठ्या पेंचाची आपणां ।। ३४ ।। कोणाच्या जागेंत । राहण्या तयार नाहींत। सरकार यांच्या प्रीत्यर्थ । जागा ती देईल कशी ? ।। ३५ ।। भूषण आपल्या साधूचें। सरकारास नाहीं साचें। बंकटलाल बोलला वाचें । ऐसे संकट घालूं नका ।। ३६ ।। सरकार धार्मिक कृत्याला। जागा देईल हा न उरला। भरंवसा तो आम्हांला । हें राज्य परक्याचें ।। ३७ ।। म्हणून आम्हांपैकी कोणाची। जागा घ्या मागून साची । आहे तयारी आमुची । ती तुम्हां द्यावयास ।। ३८ ।। समर्थे केलें भाषण। काय हे तुमचें अज्ञान । जमिनीची मालकी पूर्ण । आहे सच्चिदानंदाची ।। ३९ ।। राजे कित्येक भूमीवरी । आजवरी झाले तरी । जागा कशाची सरकारी । इचा मालक पांडुरंग ।। १४०।। व्यवहारदृष्ट्या मालकपण । येते राजालागून । त्याचें नाहीं भूषण। तुम्ही प्रयत्न करा जा ।। ४१ ।। जागा मिळेल प्रयत्न करितां । पुढें नका बोलूं आतां । हरी पाटलाच्या हातां । यश येईल नि:संशय ।। ४२ ।। हरी पाटलाकडे आली । मंडळी ती अवघी भली । त्याच्या सल्ल्यानें मागितली। जागा अर्ज करून ।। ४३ ।। बुलढाण्याचा सर्वाधिकारी। साहेब होता नामे 'करी' । त्यानें एक एकर जागा खरी । अर्जावरून दिली असे ।। ४४ ।। आणि ऐसें म्हणाला । तुम्ही दोन एकरांस्तव अर्ज केला । परी मी तूर्त तुम्हांला । एक एकर देतसे ।। ४५ ।। तुम्ही एक वर्षात। जागा केल्या व्यवस्थित। तुमचा मी पुरवीन हेत। जागा आणिक देऊनिया ।। ४६ ।। तो ठराव सरकारचा । आहे दप्तरीं नमूद साचा । समर्थांच्या वाणीचा। प्रभाव खचित लोकोत्तर ।। ४७ ।। मग हरी पाटील, बंकटलाला। निघते झाले वर्गणीला । द्रव्यनिधी क्षणांत जमला। आणि काम झाले सुरूं ।। ४८ ।। या पुढील अवघे वृत्त । येईल पुढल्या अध्यायांत । सत्पुरुषाचा पुरविण्यात हेत । देव राहे तत्पर सदा ।। ४९ ।। विठू पाटील डोंगरगांवचा । लक्ष्मण पाटील वाडेगांवचा । जगु आबा शेगांवचा । हे पुढारी वर्गणीचे।। १५०।। श्रीदासगणूविरचित । हा श्रीगजानन विजय नामें ग्रंथ । ऐका श्रोते सावचित्त। निजकल्याण व्हावया ।। १५१ ।। शुभं भवतु ।। श्रीहरिहरार्पणमस्तु ।।

।। इति श्रीगजानन विजय ग्रंथस्य द्वादशोध्याय: समाप्त: ।।

# अध्याय तेरावा प्रारंभ

श्रीगणेशाय नमः ।। हे संतवरदा श्रीधरा । हे दयेच्या सागरा । हे गोपगोपीप्रियकरा । तमालनीळा पाव हरी ।। १ ।। तुझें ईशत्व पाहण्याकरितां । जेंव्हां झाला विधाता । गाई वासरें चोरितां । यमुनातटीं गोकुळांत ।। २ ।। तेव्हां तूं निजलीलेंकरून । गाई वासरें होऊन । ब्रह्मदेवाकारण । आपलें ईशत्व दाविले ।। ३ ।। दुष्ट ऐशा कालियाला । यमुनेमाजी तुडवून भला । रमणकद्वीपा धाडिला । गोप निर्भय करण्यास ।। ४ ।। तेवीं माझ्या दुर्दैवा । तुडवुनीया वासुदेवा । दासगणू हा करावा । निर्भय सर्व बाजूंनी ।। ५ ।। मी अजाण भक्त तुझा हरी । परी देवा कृपा करी । मी आहे अनधिकारी । योग्य न तुझ्या कृपेस ।। ६ ।। ऐसें जरी आहे सत्य । परी नको पाहूंस अंत । माझी चिंता वार त्वरित । आपुल्या कृपाकटाक्षें ।। ७ ।। आतां श्रोते सावधान । बंकट, हरी, लक्ष्मण । विठू जगदेवादि मिळून । गेले वर्गणी जमवावया ।। ८ ।। भाविकांनीं वर्गणी दिली । कुत्सितांनीं कुटाळी केली । वर्गणीची कां हो पडली । जरूर तुमच्या साधूस्तव ।। ९ ।। गजानन म्हणतां महासंत । जें न घडे तें घडवीत । मग त्यांच्या मठाप्रत । वर्गणी ही कशाला ? ।। १०।। कुबेर त्यांचा भांडारी । मग कशास फिरता दारोदारी ?। चिठ्ठी कुबेराच्यावरी । करा म्हणजे काम झालें ।। ११ ।। ऐसें ऐकतां भाषण । जगदेव बोलला हांसोन । या भिक्षेचें कारण । आहे तुमच्या बऱ्यासाठीं ।। १२ ।। श्रीगजाननासाठीं । नको बांधणें मठमठी । ह्या अवघ्या आटाआटी । तुमचें कल्याण व्हावयास ।। १३ ।। स्वामी गजाननाचा । त्रैलोक्य हाचि मठ साचा । अवघीं वनें हा बगीचा । पलंग ज्यांचा मेदिनी ।। १४ ।। अष्टसिद्धी दासीपरी । राबताती ज्याच्या घरीं । तो न तुमची पर्वा करी । त्याचें वैभव निराळें ।। १५ ।। सविता सूर्यनारायण । त्यासी दीप कोठून । प्रकाश देऊ शकेल जाण । प्रतिकार करण्या तमाचा ।। १६ ।। तो मुळींच प्रकाशमयीं । त्याला दीपाचें काज नाहीं । हलकारा तो कोठून होई । सार्वभौमा भूषवितां ?।। १७ ।। इच्छा ऐहिक वैभवाची । असते मानवांप्रति साची । ती आहे व्हावयाची । पूर्ण या पुण्यकृत्यानें ।। १८ ।। रोग बरा करण्या भली । औषधाची योजना केली । प्राणासाठीं नसे झाली । ती हे ध्यानी धरा हो ।। १९ ।। रोग भय शरीरास । नाहीं मुळींच प्राणास । जन्ममरण हेंही त्यास । नाही मुळी राहिलें ।। २० ।। तैसी तुमची सुसंपन्नता । रक्षण व्हाया

सर्वथा । पुण्यरूप औषधी आतां । मिळणें भाग आहे की ।। २१ ।। संपन्नता हें शरीर । रोग त्याचे अनाचार । त्याचा नाश होणार । या पुण्यरूप औषधीनें ।। २२ ।। म्हणून पुण्यसंचय करा । कुतर्क ना चित्तीं धरा । पुण्य मेदिनींमाजीं पेरा । करा आपुल्या संपत्तीचा ।। २३ ।। बीज पेरिता खडकावर । तें वायां जातें साचार । त्यास कधीं ना येणार । मोड हें ध्यानीं धरावें ।। २४ ।। अनाचार दुर्वासना । हे खडक असती जाणा । तेथें टाकिल्यावरी दाणा । ते किडे पांखरें भक्षिती ।। २५ ।। संतसेवेसमान । कोणतें नाहीं पुण्य आन । स्वामी सांप्रत गजानन । मुगुटमणी संतांचें ।। २६ ।। संतकार्यास कांहीं देता । अगणित होतें सर्वथा । एक दाणा टाकितां । मेदिनीमाजी कणीस होतें ।। २७ ।। त्या कणसास दाणे येती । एकाचेच बहुत होती । तीच पुण्याची आहे स्थिती । हें बुध हो विसरूं नका ।। २८ ।। ऐसें बोलतां साचार । कुटाळ झाले निरुत्तर । खरें तत्त्व असल्यावर । कुंठित गती तर्काची ।। २९ ।। नेता असल्या वजनदार । वर्गणी ती जमे फार । क्षुल्लकाच्यानें न होणार । कार्य कधीं वर्गणीचें ।। ३० ।। असो मिळाल्या जागेवरी । कोट बांधिला सत्वरीं । झटूं लागलें गांवकरी । मग वाण कशाची ? ।। ३१ ।। बांधकाम कोटाचें । चालतां शेगांवीं साचें । दगड चुना रेतीचें । सामान गाड्या वाहती ।। ३२ ।। त्या वेळीं समर्थ स्वारी । होती जुन्या मठावरी । त्यांनी विचार अंतरीं । ऐशा रीती केला हो ।। ३३ ।। आपण तेथें बसल्याविणें । काम न चालें झपाट्यानें । म्हणून कौतुक समर्थानें । केले कसें ते परियेसा ।। ३४ ।। एका रेतीच्या गाडीवरी । समर्थांची बसली स्वारी । तो गाडीवान झाला दुरी । महार होता म्हणून ।। ३५ ।। तयीं महाराज वदले तयास । कां रे खालीं उतरलास ? । आम्हां परमहंसांस । विटाळाची बाधा नसे ।। ३६ ।। महार बोले त्यावरी । महाराज तुमच्या शेजारीं । मी न बसे गाडीवरी । तें आम्हां उचित नसे ।। ३७ ।। मारुती रामरूप झाला । परी रामासन्निध नाहीं बसला । तो उभाच पहा राहिला । कर जोडुनी रामापुढें ।। ३८ ।। बरें बापा तुझी मर्जी । त्यास हरकत नाहीं माझी । बैलांनो, नीट चला आजी । गाडीवाल्यामागून ।। ३९ ।। बैल तैसें वागले । नाही कशास बुजले । गाडीवाल्यावांचून आलें । नीट सांकेतिक स्थलास ।। ४० ।। समर्थ खालीं उतरले । मध्यभागीं येऊन बसले । तेथेंच हल्लीं काम झालें । त्यांच्या भव्य समाधीचें ।। ४१ ।। ही जागा शेगांवांत । आहे दोन नंबरांत । त्रेचाळीस पंचेचाळीस । सातशें सव्वे नंबराच्या ।। ४२ ।। महाराज बसले ज्या ठिकाणीं । तीच यावी मेदिनी । मध्यभागा म्हणूनी । हें करणें भाग पडलें ।। ४३ ।। त्या दोन नंबरांतून । जागा थोडथोडी घेऊन । साधिला तो मध्य जाण । ऐसें चतुर कारभारी

।। ४४ ।। एक एकराचा हुकूम झाला । परी बांधकामाच्या वेळेला । समाधिमध्य साधण्याला । जागा थोडी पडली कमी ।। ४५ ।। त्यासाठी म्हणून। अकरा गुंठे जास्त जाण । जमीन ती घेऊन । बांधकाम चालविलें ।। ४६ ।। पुढाऱ्यांच्या होतें मनीं । वचन दिलें अधिकाऱ्यांनी । आणिक एक एकर तुम्हांलागुनी। काम पाहून जागा देऊं ।। ४७ ।। यास्तव केलें धाडस। अकरा गुंठे घेण्यास । परी तें गेलें विकोपास । एका दुष्टाच्या बातमीमुळें ।। ४८ ।। यामुळें पुढारी। थोडे घाबरले अंतरीं । त्यांत जो पाटील होता हरी । तो बोलला समर्था ।। ४९ ।। अकरा गुंठे जागेचा । तपास करावया साचा । एक जोशी नांवाचा। आला असे अधिकारी ।। ५०।। हांसत हांसत पाटलाला। समर्थानें शब्द दिला । जागेबद्दल जो कां झाला । दंड, तुम्हा तो माफ होईल।। ५१।। त्या अधिकारी जोशाप्रती। समर्थानें दिली स्फूर्ती । चाललेल्या प्रकरणावरती। शेरा त्यांनी मारिला ।। ५२ ।। कीं हा दंड झालेला । विनाकारण आहे भला । दंड ! गजानन संस्थेला। परत द्यावा म्हणून ।। ५३ ।। मी करून आलों चौकशी । जाऊन त्या शेगांवासी । या घडलेल्या प्रकारासी । दंड होणें उचित नाहीं ।। ५४ ।। म्हणून तो माफ केला। ऐसा हुकूम जेव्हां आला। तैं हरी पाटलाला। आनंद झाला विशेष ।। ५५।। तो म्हणे समर्थांचे । वाक्य ना खोटें व्हावयाचें । मजवरी किटाळ महाराचें । येऊन गेलें नुकतें एक ।। ५६ ।। त्या वेळीं महाराजांनीं । भिऊं नकोस म्हणोनी । तुझ्या एकाही केसालागुनी । धक्का न त्याचा बसेल ।। ५७।। तेंच खरें अखेर । घडून आलें साचार । तैसाच हाही प्रकार । आज दिनीं झालासे ।। ५८ ।। समर्थवाक्य खोटें झालें । ऐसें कोणी न कधी ऐकिलें । असो शेगांवाचे लागले। लोक भजनी स्वामींच्या ।। ५९ ।। आतां नव्या जागेंत आल्यावर । जें कांहीं घडलें प्रकार । म्हणजे समर्थांचे चमत्कार । ते आतां वर्णितो ।। ६०।। मेहेकरच्या सान्निध्याला। सवडद नामें ग्राम भला । त्या गांवीचा एक आला । गंगाभारती गोसावी ।। ६१ ।। यास होता महारोग । कुजून गेलें अवघें अंग । उरली न पडल्यावांचून भेग । जागा दोन्ही पायांला ।। ६२ ।। करपद बोटें झडून गेली । तनुप्रती चढली लाली । कानाच्या सुजल्या पाळी । कंडू सुटला तनूतें ।। ६३ ।। म्हणून गंगाभारती। त्या महारोगा त्रासला अती । समर्थांची ऐकोन कीर्ति । शेगांवासी पातला ।। ६४ ।। श्रोते त्या गोसाव्याप्रत । लोक आडवूं लागले बहुत । तुला रक्तपिती आहे सत्य। तूं न जावें दर्शना।। ६५ ।। महाराज दिसतील ऐशा ठायीं। उभा राहून दर्शन घेई । कधींही ना जवळ जाई । त्यांचे चरण धरावया ।। ६६ ।। हा स्पर्शजन्य रोग फार। म्हणून वैद्य डॉक्टर । सांगती याचा विचार । तूं आपुल्या मनीं करी ।। ६७ ।। परी एके दिनी गंगाभारती ।

चुकवून अवघ्या लोकांप्रती। येता झाला सत्वर गती। प्रत्यक्ष दर्शन घ्यावया।। ६८।। डोई ठेवितां पायावर । समर्थांनी चापट थोर । मारिली त्याच्या डोक्यावर । अति जोरानें विबुध हो ।। ६९ ।। म्हणून तो उभा ठेला । समर्थांस न्याहाळू लागला । स्वामींनी त्याचे थोबाडाला। दोन्ही करें ताडिलें ।। ७० ।। फडाफड मारिल्या मुखांत। आणिक वरती एक लाथ । खाकरोनी बेडक्याप्रत । थुंकले त्याच्या तनूवरी ।। ७१ ।। तोच त्याने मानिला। समर्थांचा प्रसाद भला। बेडका होता जो कां पडला । तयाचिया अंगावर ।। ७२।। तो त्याने घेऊन करी । चोळून अवघ्या शरीरी । लाविता झाला मलमापरी । आपुल्या सर्व अंगास।। ७३।। तो प्रकार पाहतां । एक कुटाळ तेथे होता । तो गोसाव्यासी बोलतां । झाला पाहा येणें रीति ।। ७४ ।। आधीच शरीर नासलें। तुझें आहे बापा भलें । त्यावरी यांनीं टाकिले। या अमंगळ बेडक्यातें।। ७५।। तो तूं प्रसाद मानिला । अवघ्या अंगातें चोळिला । जा लावून साबणाला। धुवून टाकी सत्वर ।। ७६ ।। हे ऐसे वेडे पीर । विचरूं लागतां भूमीवर । त्यांशीं अंधश्रद्धेचें नर । साधू ऐसे मानिती ! ।। ७७ ।। त्याचा परिणाम ऐसा होतो । अविधि कृत्यांस ऊत येतो । तो येतां सहज जातो । समाज तो रसातळां ।। ७८ ।। यासी तुझेंच उदाहरण । तूं औषध घेण्याचे सोडून। आलास की रे धांवून । या वेड्यापिशापाशीं ।। ७९ ।। गोसावी तें ऐकतां । हसूं लागला सर्वथा । म्हणे तुम्ही येथेंच चुकतां। याचा करा विचार ।। ८० ।। अमंगळ साधूपासी। कांहीं न राहातें निश्चयेसी । कस्तुरीच्या पोटाशी। दुर्गंधी ना वसे कदा ।। ८१ ।। तुम्हां दिसला बेडका । तो हा प्रत्यक्ष मलम देखा । कस्तुरीच्या सारखा। सुवास येतो यालागीं ।। ८२ ।। तुम्हां संशय असल्यास। पाहा माझ्या अंगास । हात लावूनिया खास । म्हणजे कळून येईल कीं ।। ८३ ।। त्यांत थुंक्याचें नांव नाहीं । अवघी औषधी आहे पाही । मी इतुका वेडा नाहीं । बेडक्यास मलम मानणारा ।। ८४ ।। तुझा त्यासी संबंध नव्हतां। म्हणून बेडका दिसला तत्त्वतां । समर्थांची योग्यता। त्वां न मुळीं जाणिली।। ८५।। त्याचें पाहण्या प्रत्यंतर । चाल जाऊं एकवार। स्नान केलेल्या जागेवर । वेळ आतां करूं नको।। ८६।। समर्थ स्नान प्रतिदिवशीं । करतील ज्या जागेसी। तेथल्या ओल्या मातीसी । मी लावितों निजांगा ।। ८७ ।। ऐसा संवाद तेथे झाला । दोघे गेले स्नानस्थला । तो कुटाळासी आला। अनुभव गोसाव्यापरीच ।। ८८ ।। मृत्तिका स्नानस्थलाची । दोघांनीही घेतली साची । तो गोसाव्याच्या हातीं । बैसली औषधी होऊन ।। ८९ ।। कुटाळाच्या हातांत। ओलीच माती आली खचित् । दुर्गंधीही किंचित् । येत होती तियेला ।। ९० ।। तो प्रकार पाहतांक्षणीं । कुटाळ घोटाळला मनीं। कुत्सित कल्पना

सोडूनी । शरण गेला समर्था ।। ९१ ।। असो कोणी गोसाव्यातें । जवळ बसू देत नव्हते । हा दूर बसून भजनातें । करी स्वामीपुढें नित्य ।। ९२ ।। आवाज गंगाभारतीचा । पहाडी गोड मधुर साचा । अभ्यास होता गायनाचा । त्या गंगाभारतीला ।। ९३ ।। ऐसें पंधरा दिवस गेले । रोगाचें स्वरूप पालटलें । लालीनें तें सोडिलें । तयाचिया अंगाला ।। ९४ ।। चाफे झाले पूर्ववत् । भेगा पदींच्या निमाल्या समस्त । दुर्गंधीचा मोडला त्वरित । ठाव त्याचा श्रोते हो ।। ९५ ।। गोसाव्याचें ऐकून भजन । होई संतुष्ट समर्थमन । प्रत्येक जिवाकारण । गायन हें आवडतें ।। ९६ ।। बायको गंगाभारतीची । अनसूया नांवाची । ती शेगांवीं आलीं साची । न्याया निज पतीला ।। ९७ ।। संतोषभारती कुमार । होता तिच्या बरोबर । येऊन पतीस जोडिले कर । चला आतां गांवातें ।। ९८ ।। तुमची व्याधी बरी झाली । ती मी दृष्टीं पाहिली । समर्थ साक्षात् चंद्रमौळी । आहेत हेंच खरें असे ।। ९९ ।। मुलगा तेंच बोलला । म्हणे बापा गांवीं चला । पुसून गजानन महाराजाला । येथें राहणें पुरें झालें ।। १०० ।। गंगाभारती म्हणे त्यावर । मला नका जोडू कर । आजपासून साचार । मी तुमचा खचित नाहीं ।। १ ।। ही अनाथांची माऊली । स्वामी गजानन येथें बसली । त्यांनी माझी उतरविली । धुंदी चापट मारून ।। २ ।। राख लाविली अंगाप्रत । आणि चित्त तुझें संसारात । केलीस विटंबना बहुत । या भगव्या वस्त्राची ।। ३ ।। ऐसें संकेतें बोलले । थापट्या मारून जागें केलें । आतां डोळे उघडिलें । संसाराचा संबंध नको ।। ४ ।। हे संतोषभारती कुमारा । तूं तुझ्या आईस नेई घरा । येथें नकोस राहूं जरा । सवडद जवळ करावें ।। ५ ।। हिचें जीवमान जोंवरी । तोंवरी हिची सेवा करी । ही तुझी माय खरी । हिला अंतर देऊं नको ।। ६ ।। मातोश्रींची करितां सेवा । तो प्रिय होतो वासुदेवा । पुंडलिकाचा ठेवावा । इतिहास तो डोळ्यांपुढे ।। ७ ।। मी येता सवडदांत । पुन्हां रोग होईल पूर्ववत् । म्हणून त्या आग्रहांत । तुम्हीं न पडावे दोघांनी ।। ८ ।। आजवरी तुमचा होतो । आतां देवाकडे जातो । नरजन्माचा करून घेतों । कांहीं तरी उपयोग ।। ९ ।। हा वाया गेला खरा । नराचा जन्म साजिरा । चुकेल चौऱ्याशींचा फेरा । ऐसें साच सांगितलें ।। ११० ।। समर्थकृपेनें निश्चिती । झाली मला ही उपरती । या परमार्थखिरींत माती । टाकूं नका रे मोहाची ।। ११ ।। ऐसें सांगून कुटुंबाला । मुलासह सवडदाला । दिले धाडून राहिला । आपण तसाच शेगांवी ।। १२ ।। पदपदांतरें समर्थांचीं । आवडीने म्हणावीं साची । त्यास कला गायनाची । येत होती विबुध हो ।। १३ ।। प्रत्यहीं तो अस्तमाना । एकतारा घेऊन जाणा । समर्थांच्या सान्निधाना । बैसून भजन करीतसे ।। १४ ।। ऐकून त्याचें भजन । इतरांचेही हर्षे मन ।

वस्तु अशीच आहे गान । रंजविणारी सर्वांते ।। १५ ।। हा गंगाभारती बरा झाला । रोगाचा पत्ता मोडला। मलकापुरास पुढें गेला । गजाननाच्या आज्ञेनें ।। १६ ।। असो एकदां पौषमासी । झ्यामसिंग आला शेगांवासी । बोलतां झाला समर्थांसी । माझ्या गांवास चला हो ।। १७ ।। मम भाच्याच्या गृहाला। अडगांवीं नेण्याला । मी आलों होतों आपणाला । तयीं आपुला करार ।। १८ ।। ऐसा होता समर्था। मी नाहीं येत आतां । नको करूं आग्रह वृथा। पुढें मागें येईन ।। १९ ।। त्याला दिवस झालें बहुत। आतां चला मुंडगांवांत । मी आहे आपुला भक्त। माझी इच्छा पूर्ण करा ।। १२० ।। मुंडगांवांत माझे घरीं । कांहीं दिवस राहा तरी । मी अवघी करून तयारी। न्याया आलो आपणां ।। २१ ।। झ्यामसिंगा बरोबर । मुंडगांवी आले साधुवर । दर्शना लोटले नारीनर । तो न आनंद वर्णवे ।। २२ ।। झ्यामसिंगानें भंडारा । घातिला असे थोर खरा । मुंडगांव झाले गोदातीरा । दुसरें कीं हो पैठण ।। २३ ।। पैठणामाजी एकनाथ। मुंडगांवीं गजानन संत। भजनी दिंड्या अमित । आल्या भजन करावया ।। २४ ।। आचारी लागले स्वैंपाका । अर्धा स्वैंपाक झाला निका । तैं महाराज बोलले देखा। ऐसे झ्यामसिंगासी ।। २५ ।। झ्यामसिंगा, आज चतुर्दशी। मुळींच आहे रिक्त तिथी। भोजनाच्या पंक्ती । पौर्णिमेला होऊं दे ।। २६ ।। झ्यामसिंग बोलला यावर । स्वयंपाक झाला तयार । लोक जमले आहेत फार । आपला प्रसाद घ्यावया ।। २७ ।। स्वामींनीं केले बोलणें । तुझें व्यवहारदृष्टीनें। योग्य परी हें न माने । त्या जगदीश्वराला ।। २८ ।। झ्यामसिंगा ! हें अन्न । न येईल उपयोगाकारण। तुम्हां प्रापंचिकालागून। आपलेंच व्हावें वाटते ।। २९ ।। पंक्ती बसल्या भोजना । तों एकाएकी आकाश जाणा। भरून आलें गर्जना । होऊं लागली मेघांची ।।१३० ।। चमकें वीज माथ्यावरी। झंझावात सुटला भारी । कडकडा तीं कांतारीं। लागलीं झाडें मोडावया ।। ३१ ।। घटकेंत पाणी पाणी झालें । अन्न अवघे वाया गेलें। मग झ्यामसिंगानें विनविलें । महाराजांस येणें रीतीं ।। ३२ ।। आतां महाराज उद्यां तरी। मुळी न व्हावें आजच्या परी। हिरमुष्टी होऊन बसली खरी । अवघी मंडळी गुरुराया ।। ३३ ।। निवारा या पर्जन्याला । हा नव्हे पावसाळा । अगांतुक बेटा आला। आमचा नाश करावया ।। ३४ ।। आतां पाऊस पडेल । तरी शेतीचें होईल । वाटोळें तें पाहा सकळ। मग म्हणतील लोक ऐसें ।। ३५ ।। झ्यामसिंगे केलें पुण्य। हा भंडारा घालून। तें भोवलें आम्हा लागून । वा खूप तऱ्हा पुण्याची ।। ३६ ।। तैं महाराज म्हणाले झ्यामसिंगा ! । ऐसा सचिंत होसी कां गा। तुला न उद्यां देईल दगा । हा पर्जन्य कधींही ।। ३७ ।। आत्तांच मी वारितो त्यासी। ऐसें बोलोन आकाशासी ! पाहूं

लागलें पुण्यराशी । तों आभाळ फांकलें ।। ३८ ।। मेघ क्षणांत निघून गेले । सर्व ठायीं ऊन पडलें । हें एका क्षणांत झालें । अगाध सत्ता संतांची ।। ३९ ।। दुसरे दिवशी पौर्णिमेला । थोर भंडारा पुन्हां झाला । तो नियम चालला । अजून त्या मुंडगांवी ।। १४० ।। झ्यामसिंगानेआपुली । इस्टेट सर्व अर्पण केली । महाराजांचे चरणी भली । त्या मुंडगांव ग्रामांत ।। ४१ ।। लोक त्या मुंडगांवात । समर्थांचे झाले भक्त । पुंडलीक भोकरे म्हणूनी त्यांत । एक जवान पोऱ्या असे ।। ४२ ।। हा उकिरड्या नामक कुणब्याचा । पुत्र एकुलता एक साचा । भक्त झाला महाराजांचा । ऐन तारुण्यामाझारी ।। ४३ ।। हे उकीर्डा नाम वऱ्हाडांत । पोर नसल्या वांचत । लोक नवसें ठेवितात । ऐसा प्रघात त्या प्रांती ।। ४४ ।। तें पेंटय्या तेलंगणांत । केर पुंजा महाराष्ट्रांत । तैसा उकीर्डा वऱ्हाडांत । नांव ठेविती बालकाचें ।। ४५ ।। हा पुंडलीक वद्य पक्षासी । करावया वारीसी । येत नियमें शेगांवासी । घ्याया दर्शन समर्थांचें ।। ४६ ।। जैसें कां तें वारकरी । वद्य पक्षामाझारीं । जाती इंद्रायणीचें तीरीं । देहू आळंदी गांवाला ।। ४७ ।। तैसाच हा वऱ्हांडात । वारी वद्य पक्षात । करी येऊन शेगांवात । परम भावभक्तीनें ।। ४८ ।। असो एकदां वऱ्हाडांत । रोग ग्रंथिक सन्निपात । बळावला अत्यंत । गांव बाहेर पडले कीं ।। ४९ ।। या तापांत ऐसें होतें । प्रथमतां थंडी वाजते । अंग ज्वरानें तप्त होतें । डोळें होती लाल बहु ।। १५० ।। आणि कोठेतरी सांध्यावर । ग्रंथि उठें सत्वर । ती होता करी जोर । वात तिच्या मागूनी ।। ५१ ।। मग रोगी बरळतसे । शुद्धि न कांहीं राहतसे । तलखी अंगाची होत असे । बेशुद्ध होई क्षणाक्षणां ।। ५२ ।। पूर्वी हा रोग विपरीत । नव्हतां भरतखंडांत । त्याचा वास युरोपांत । होता मोठ्या प्रमाणी ।। ५३ ।। ती सांथ इकडे आली । गांवोगांव पसरली । त्याच्या प्रतिकारा सोडून दिलीं । लोकांनीं ती घरेंदारें ।। ५४ ।। त्या दुर्धर सांथीची स्वारी । आली पाहा मुंडगांवावरी । तो पुंडलीकाची आली वारी । शेगांवास निघाला ।। ५५ ।। कसकस त्याला घरीच आली । परी ती त्याने चोरिली । शेगांवाची वाट धरली । आपुल्या पित्यासमवेत ।। ५६ ।। येतां पांच कोसांवर । शरीरासी भरला ज्वर । एक पाऊल भूमीवर । तयाच्यानें टाकवेना ।। ५७ ।। गांठ उठली बगलेंत । हैराण झाला रस्त्यांत । ऐसें पाहून पुसें तात । कां रे पुंडलीका ऐसें करिशी ? ।। ५८ ।। पुंडलीक म्हणे बापाला । बाबा मशीं ताप आला । गोळा एक कांखेला । उठला आहे येधवा ।। ५९ ।। शक्ति सारी क्षीण झाली । आतां मशीं न चालवें मुळीं । काय करूं ही राहिलीं । वारी हाय रे दुर्दैवा ।। १६० ।। हे स्वामी दयाघना ! । वारीस खंड पाडी ना । दाव तुझ्या दिव्य चरणा । भक्तवत्सला कृपानिधी ।। ६१ ।। वारी

सांग झाल्यावर । मग येऊं दे खुशाल ज्वर । जरी सांडले शरीर । तरी न त्याची पर्वा मला ।। ६२ ।। माझा पुण्यठेवा हीच वारी । ती रक्षण आतां करी । ही साथ झाली वैरी । नाश तिचा करावयातें ।। ६३ ।। शरीरसामर्थ्य जोंवर । परमार्थ घडे तोंवर । बापही झाला चिंतातुर । ती मुलाची पाहून स्थिती ।। ६४ ।। तोही रडू लागला । हा एकुलता एक पुत्र मला । देवा न दिवा नेई भला । हा माझ्या वंशाचा ।। ६५ ।। उकीर्डा म्हणे पुत्रास । गाडीघोडे बसावयास । आणूं कां या समयास । तुला बाळा बसावया ।। ६६ ।। पुंडलीक वदे तयावरी । झाली पाहिजे पायींच वारी । उठत बसत कसें तरी । जाऊं चला शेगांवा ।। ६७ ।। मध्येंच मृत्यु आल्यास । शव तरी ने शेगांवास । नको करूं शोकास । हेंच आतां सांगणें ।। ६८ ।। बसत उठत पुंडलीक आला । अति कष्टे शेगांवाला । पाहून स्वामी समर्थाला । घातलें त्यानें दंडवत ।। ६९ ।। तो समर्थांनी माव केली । एका हातानें दाबिली । कांख त्यांनीच आपुली । अति जोर करोनिया ।। १७० ।। आणि केलें मधुरोत्तर । पुंडलीका ! तुझें गंडांतर । टळले आतां तिळभर । चिंता त्याची करूं नको ।। ७१ ।। तैसे महाराज वदतां क्षणी । पुंडलीकाची गांठ जाणी । गेली जागच्या जागी जिरोनी । ताप तोही उतरला ।। ७२ ।। कंप अशक्ततेनें । राहिला देहाकारणें । करी पुंडलीकाच्या मातेनें । आणिला नैवेद्य वाढून ।। ७३ ।। घांस त्या नैवेद्याचे । समर्थे घेतां दोन साचे । कांपरें तें पुंडलीकाचें । गेले बंद होवोनिया ।। ७४ ।। पुंडलीक झाला पूर्ववत् । अशक्तता राहिली किंचित् । हे गुरुभक्तीचें फळ सत्य । उघडा डोळे अंधांनो ! ।। ७५ ।। गुरू योग्य असल्यावरी । वायां न जाई सेवा खरी । कामधेनु असल्या घरीं । कां न इच्छा पुरतील ? ।। ७६ ।। सांग करून वारीला । पुंडलीक गेला मुंडगांवाला । हें जो चरित्र वाची भला । त्याचें टळेंल गंडांतर ।। ७७ ।। संतचरित्र ना कहाणी । अनुभवाची खाण जाणी । मात्र अविश्वास मनीं । संतकथेचा न यावा हो ।। ७८ ।। श्रीदासगणूविरचित । हा श्रीगजानन विजय नामें ग्रंथ । सुखद होवो भाविकांप्रत । हेंच देवा मागणें ।। १७९ ।। ।। शुभं भवतु ।। श्रीहरिहरार्पणमस्तु ।।

।। इति श्रीगजानन विजय ग्रंथस्य त्रयोदशोऽध्यायः समाप्तः ।।

# अध्याय चौदावा प्रारंभ

श्रीगणेशाय नमः ।। हे कौसल्यात्मज रामराया । हे रघुकुलभूषणा करुणालया । सीतापते करा दया । आतां या लेंकरासी ।। १ ।। त्राटिकां त्वां उद्धरली । अहिल्या शिळा सजीव केली । शबरीची पुरविली । इच्छा तूं दाशरथें ।। २ ।। भक्तरक्षणा कारण । सोडिलें नृपसिंहासन । वानर केलेस बलवान । केवळ आपुल्या कृपेंनें ।। ३ ।। शिळा तरल्या सागरी। तुझ्या नामें रावणारी । बसविलास गादीवरीं । भक्त आपला बिभीषण ।। ४ ।। जो जो आला शरण पदा । तुझ्या कीं हें आनंदकंदा । दैन्य, दुःख , आपदा । त्याच्या त्वां वारिल्यास ।। ५ ।। हें मनीं आणावें । दासगणूस सांभाळावें । बालकानें धावावें । जननिविण कोणाकडे ? ।। ६ ।। तूं जननी जनिता सद्गुरू । तूं भक्तांना कल्पतरू । भवनदीचें भव्य तारूं । तूंच कीं रे रामराया ! ।। ७ ।। एक खेर्डेगांवचा । रहिवासी मेहकर तालुक्याचा। बंडूतात्या नांवाचा । ब्राह्मण होता विबुध हो ।। ८ ।। हा बंडूतात्या ब्राह्मण । सदाचारसंपन्न। उदार होते ज्याचें मन । गृहस्थाश्रम चालवी ।। ९ ।। श्रोते या प्रपंचात। संकटें येती अतोनात । परी नाहीं पाहा सुटत । लोभ त्याचा मानवा ।। १०।। या बंडूतात्या घरीं। पाहुणे येती वरच्यावरी । तों अवघ्यांची साच करी । सरबराई निजांगें ।। ११ ।। ऐसा क्रम चालला। संचय अवघा संपला । आली पाळी बिचाऱ्याला। कर्ज काढणें साहूचें ।। १२।। घरदार पडलें गहाण । अगणित झाले तया ऋण । लोकांप्रती दावण्या वदन । लाज वाटूं लागली।। १३।। विकावया न कांहीं उरले । सदन अवघे साफ झाले । भांडेकुंडें तेंही गेलें । काय विपत्ती वर्णावी ? ।। १४।। तगादे करिती सावकार । शिपाई धाडून वरच्यावर । भागवण्यासी दोन प्रहर । अडचण पडूं लागली।। १५ ।। कांता बोले टाकून । मुलें करिती अपमान । पत गेली उडून । उसने न कोणी देती हो।। १६ ।। ऐशा तापें तापला। जीव द्याया तयार झाला। पैसा संपतां प्रपंचाला । कांहीं नसे किंमत ।। १७ ।। जें सुखाचें वाटें स्थान । तेच दुःखाचें निकेतन । संपून गेल्यावरी धन । सहज होतें न्याय हा ।। १८ ।। बंडूतात्या विचार करी । जीव कोठें देऊं तरी । अफू खाऊन मरूं जरी। तरी ती घ्याया पैसा नसे ।। १९ ।। जरी जाऊन विहिरीवरी। जीव हा मी देऊ तरी । तितुक्यांत कोणी येऊन वरी । जरी मला काढल्यास ।। २०।। जीवही ना जाईल ।

उलटी फजिती होईल । सरकार शिक्षा देईल । आत्महत्यारा म्हणून मला ।। २१ ।। यापेक्षां हिमालया । जावे वाटे जीव द्याया । आत्महत्येचा ते ठायां । दोषही ना लागेल ।। २२ ।। ऐसा करूनि विचार । पडला घराच्या बाहेर । अखेरचा तो नमस्कार । केला त्यानें प्रपंचाला ।। २३ ।। एक लंगोटी घातली । राख अंगा लाविली । तयानें ही युक्ति केली । ओळख आपुली बुजवावया ।। २४ ।। श्रोते अब्रुदारासी । जननिंदेचे मानसी । भय वाटे अहर्निशीं । हें सकळासी ठाऊक ।। २५ ।। बंडूतात्या म्हणे मनीं । हे दीनदयाळा चक्रपाणी । अवकृपा मजलागोनी । कां रे ऐसी केलीस ? ।। २६ ।। तुझ्यावरी विश्वास माझा । पूर्ण होता अधोक्षजा । तूं रंकाचा करिसी राजा । ऐसें ऐकिलें पुराणीं ।। २७ ।। ते सर्व खोटें झालें । प्रत्ययासी माझ्या आले । व्यर्थ कवींनीं रंगविलें । चरित्र तुझें नारायणा ।। २८ ।। आतां जीव देतो परी । तुझ्यावरी मी श्रीहरी । याचा विचार कांहीं करी । हत्या नको घेऊ मम ।। २९ ।। ऐसें मनीं बोलला । तिकीट घ्याया लागला । तों एक भेटला । विप्र त्यासी स्टेशनांत ।। ३० ।। आतांच हरिद्वाराचे । तिकीट नको घेऊं साचें । घेऊन दर्शन संताचें । मग जावें हरिद्वारा ।। ३१ ।। आपल्या वऱ्हाड प्रांतांत । श्रीगजानन महासंत । आहेत अवतरले सांप्रत । त्यांच्या दर्शना जाय तूं ।। ३२ ।। संतदर्शन आजवरी । वायां न गेलें भूमीवरी । उगीच त्रासून अंतरीं । भलतें कांहीं करूं नको ।। ३३ ।। ऐसें बोलतां ब्राह्मण । तात्या गेला गोंधळून । म्हणे हा मनुष्य कोण ? । अवचित मसी भेटला ।। ३४ ।। किंवा यानें ओळखिलें । मी बंडूतात्या म्हणून भलें । कांही न माझा तर्क चाले । पुसूं तरी यातें कसा ? ।। ३५ ।। कांहीं असो शेगांवासी । जाऊन वंदूं समर्थांसी । ऐसें बोलून मानसीं । शेगांवासी पातला ।। ३६ ।। दर्शना गेला ब्राह्मण । तो महाराज वदले हांसून । कां रे देशी जाऊन प्राण । हिमालयासी बंडूतात्या ।। ३७ ।। अरे आत्महत्या करूं नये । हताश कदापि होऊं नये । प्रयत्न करण्या चुकूं नये । साध्य वस्तु साधण्यास ।। ३८ ।। आतां जरी दिलास प्राण । प्रपंचाशीं त्रासून । तरी येशील घेऊन । जन्म पुन्हां ते भोगावया ।। ३९ ।। नको जाऊं हिमालया । गंगेमाजीं प्राण द्याया । परत आपुल्या घरीं जाया । वेळ वेड्या करूं नको ।। ४० ।। तिकीट घेतां जो भेटला । स्टेशनावरी ब्राह्मण तुला । ओळखिलें कां सांग त्याला ? । तो कोण होता हें कांहीं ।। ४१ ।। जा आतां घरीं परत । राहूं नको लवही येथ । बापा तुझ्या मळ्यांत । आहे एक म्हसोबा ।। ४२ ।। त्या म्हसोबाच्या पूर्वेसी । बाभुळीच्या झाडापासी । खोदून पाहा मेदिनीसी । दोन प्रहर रात्रीला ।। ४३ ।। काम जमीन खोदण्याचें । तूंच एकटा करी साचें । खाली तीन फुटांचें । द्रव्य तुजला सांपडेल

।।४४।। त्यांतून थोडे कर्जदारां । देऊनी ऋणमुक्त होई खरा। नको सोडूंस बायकापोरां । उसनें वैराग्य वाहूं नको ।। ४५ ।। ऐसें बोलतां गजानन । आनंदला तो ब्राह्मण । आला खेड्यास परतून। राख पुसून अंगाची ।। ४६ ।। रात्रीचिया वेळेला । मळ्यांत म्हसोबापासी आला । बाभुळीखालीं लागला । जमीन खोदाया कारण ।। ४७ ।। तों तीन फुटांवर । लागली श्रोते घागर । एक तांब्याची साचार । वेळणी होती जिच्या मुखा ।। ४८ ।। त्या तांब्याच्या घागरींत । मोहरा सोन्याच्या चार शत । पडल्या त्याच्या दृष्टीप्रत । मग काय विचारतां ? ।। ४९ ।। करीं घागर घेऊनियां । लागला तेथेच नाचावया । जय जय गजानन गुरुराया । ऐसें मुखें बोलून।। ५० ।। त्याच द्रव्येंकरून। फेडिलें त्यानें अवघें ऋण । मळा होता पडला गहाण । तोही आणिला सोडवोनी ।। ५१।। घडी बसली प्रपंचाची। ही गजाननकृपेनें साची । वृत्ति बंडूतात्याची । गेली अती आनंदून ।। ५२ ।। जेवीं मृत्यूची घटका भरतां। अमृतकलश यावा हातां । वा सागरामाजीं बुडतां । तारूं दृष्टीस पडावे ।। ५३ ।। बंडूतात्यास तैसें झालें । दु:खाचे ते दिवस सरलें । मग त्यानें पुढें केलें । येणे पाहा शेगांवा ।। ५४ ।। दानधर्म तेथे केला । मोठ्या प्रमाणामाजीं भला । गजाननाच्या पदीं झाला । लीन अनन्यभावानें ।। ५५ ।। तईं महाराज वदले त्यासी । आम्हांस कां रे वंदिसी? । ज्यानें दिला आहे तुसी । द्रव्यघट तो वंदी तया ।। ५६ ।। आतां तरी येथून । खर्च करावा सांभाळून । उगे न करी उधळेपण। त्यांत नसे सार कांहीं ।। ५७ ।। जन सुखाचे सोबती । निर्वाणीचा श्रीपती । त्याची सदैव करी भक्ती । तो न उपेक्षी कदा तुला ।। ५८।। ऐसा उपदेश ऐकिला। समर्थांसी वंदून भला। बंडूतात्या गांवास गेला । आपुल्या अती आनंदे ।। ५९ ।। एकेकाली सोमवती । पर्व आले निश्चिती। जी कां अमावस्या येती। सोमवारीं ती सोमवती हो ।। ६० ।। या सोमवतीचें महिमान । पुराणांत केलें कथन। या दिवशीं नर्मदास्नान । अवश्य म्हणती करावे ।। ६१ ।। म्हणून शेगांवची मंडळी। नर्मदेस जाया तयार झाली। तयारी त्यांनी अवघी केली । पडशा वगैरे भरून ।। ६२।। मार्तंड पाटील, बंकटलाल। मारुती चंद्रभान, बजरंगलाल। यांनीं केला एक मेळ। ओंकारेश्वरी जाण्याचा ।। ६३ ।। बंकटलाल म्हणे अवघ्यांसी । आपण जातो नर्मदेसी । घेऊ सांगाते महाराजांसी। स्नान कराया नर्मदेचें ।। ६४ ।। चौघे मठामाजीं आलें । समर्था विनवूं लागलें । ओंकारेश्वरी गुरुमाऊले । चला आमुच्या समवेत।। ६५।। तुम्ही असल्या बरोबर । काळाचाही नाहीं दर। घाला आम्हांस पायावर । त्या ओंकारेश्वराच्या ।। ६६ ।। हा अधिकार मातेविना। नाहीं पाहा इतरांना। आमुची विनंती

हीच चरणा । न्यावे आम्हां नर्मदेसी ।। ६७ ।। तुम्ही आल्यावाचून । आम्ही न हालूं येथून । बालहट्टालागून । जननी तीच पुरवितसे ।। ६८ ।। महाराज म्हणाले तयासी । आहे नर्मदा माझ्यापाशीं । उगीच त्रास द्यायासी । जाऊं कशाला तिला मग? ।। ६९ ।। मी या मठांत बैसून । करीन नर्मदेचें स्नान । तुम्ही या सारे जाऊन । श्री ओंकारेश्वराला ।। ७० ।। तेथे राजा पूर्वकाली । मान्धाता भाग्यशाली । होऊन गेला महाबली । दिगंत ज्याची कीर्ति असे ।। ७१ ।। श्रीशंकराचार्य गुरुवर । यांनी कराया जगदोद्धार । तेथेंच दीक्षा साचार । परमहंसाची घेतली ।। ७२ ।। जा जा तुम्ही तया स्थला । भेटा माझ्या नर्मदेला । मात्र नेऊं नका मला । उगाच आग्रह करून ।। ७३ ।। आतां पर्वाचे प्रयोजन । नाहीं राहिलें मजलागून । ऐसें ऐकतां चौघे जण । घट्ट धरिती पायांला ।। ७४ ।। कांही असो तेथवरी । चला आमुच्या बरोबरी । लगेच येऊं माघारी । स्नान करूनी नर्मदेचें ।। ७५ ।। महाराज म्हणाले ठीक ठीक । तुम्हीं दिसता दांभिक । नर्मदेचे आहे उदक । या आपुल्या विहिरीमध्यें ।। ७६ ।। तिला टाकून आपण । तेथें कराया गेलो स्नान । तरी राग येईल दारुण । माझ्या त्या नर्मदेला ।। ७७ ।। म्हणून सांगतो तुम्हींच जावें । मला न आग्रहा करावें । माझे वचन मानावें । यांत तुमचें कल्याण ।। ७८ ।। मग मारुती चंद्रभान । करूं लागला भाषण । आम्ही घेतल्यांवाचून । आपणां न जाऊं कीं ।। ७९ ।। समर्थ म्हणाले मी तेथ। आल्या होईल विपरीत । मग तुम्ही दोष मात्र । देऊं नये आम्हांला ।। ८० ।। ऐसें मठांत बोलणें झालें । अवघे ओंकारेश्वरा आलें । पर्वासाठी मिळाले । लोक तेथें अपार ।। ८१ ।। नर्मदेचे अवघे घाट । स्त्रीपुरुषांनीं भरलें दाट । मुंगीलाही नसे वाट । जाया हराच्या मंदिरी ।। ८२ ।। कोणी स्नानास उतरले । कोणी संकल्प ऐकू लागलें । कोणी घेऊन बेलफुलें । जाऊं लागले मंदिरांत ।। ८३ ।। कोणी बर्फी पेढे खवा । बसून खाऊं लागले मेवा । थव्यामागें लागला थवा । तेथे भजनकऱ्यांचा ।। ८४ ।। पर्व संपेपर्यंत । अभिषेकाची मंदिरांत । गर्दी झाली अत्यंत । शब्द कोणाचा कोणा न कळे ।। ८५ ।। रम्यशा त्या ओंकारी । समर्थांची बैसली स्वारी । पद्मासन घालूनी कांठावरी । त्या महानदी नर्मदेच्या ।। ८६ ।। चौघे दर्शन घेऊन आले । समर्था विनवूं लागले । आतां पाहिजे सोडिले । जाणें सडकेनें आपणा ।। ८७ ।। कां की भीड झाली फार । गाड्या मोडती वरचेवर । बैल गाडीचे बुजार । आहेत आपुल्या त्यांतूनी ।। ८८ ।। खेडीघाट स्टेशनाला । जाण्यायेण्याचा करार केला । गाडीवाल्यानें तो भला । न सांगतां गुण बैलांचें ।। ८९ ।। ते बसतां आले कळून । आपण होतां म्हणून । पोंचलों

येथें येऊन । बैल द्वाड गाडीचें ।। ९० ।। परत बसून गाडींत। जाणें न निर्भय वाटत । म्हणून या नावेंत । बसून जाऊं स्टेशनाला ।। ९१ ।। गर्दी झाली रस्त्यांनी । नदीतून जाऊं शांतपणीं । ऐसेच केलें कित्येकांनीं । त्या पाहा नावा चालल्यात ।। ९२ ।। तुम्हांस वाटेल, तेच करा । आम्हां न कांहीं विचारा । मी वचनांत गुंतलो खरा। तुम्ही बसाल तेथे येऊं ।। ९३ ।। ऐसें समर्थ बोलले । त्यांच्यासवे नावेंत बैसले । नदीतून जाऊं लागले । खेडीघाट स्टेशनाला ।। ९४ ।। तों नदींत मध्यंतरी । नाव आदळली खडकावरी । फळी फुटून गेली सारी । तिच्या बुडाची एक हो ।। ९५ ।। छिद्र पडलें आरपार। येऊं लागले आंत नीर । नावाड्यानें सत्वर। नदींत उड्या टाकिल्या ।। ९६ ।। परी महाराज निर्धास्त होते । 'गिनगिन गणांत बोते' । ऐसे भजन मुखातें । चाललें होतें अखंड ।। ९७ ।। मार्तंड बजरंग मारुती । घाबरून गेले अती । उडू लागली धडाधडा छाती । बंकटलालाची विबुध हो ।। ९८ ।। चवघे समर्था बोलले । आम्ही अपराधी आहों भले । आम्ही न तुमचे ऐकिले । शेगांवांत दयाळा ।। ९९ ।। त्याचें दिले आम्हां फळ । तुम्ही आज तात्काळ । नर्मदाच झाली काळ । आम्हालागी बुडवावया ।। १०० ।। गुरुराया ! आपुली वाणी । वेदतुल्य मानू येथूनी । वांचवा या संकटातूनी। शेगांव दृष्टी पडू द्या ।। १ ।। ऐसें जो ते बोलतात। तो निम्म्यावरी पाण्यांत । नाव बुडाली लोटत लोटत । एक फर्लांग गेली हो ।।२ ।। कांठी लोक बोलती ऐसें । मेली ही पांच माणसें । आतां यांचा भरंवसा नसे । अथांग पाणी नर्मदेला ।। ३ ।। तई म्हणाले गजानन । नका होऊं हैराण । तुमच्या जीवालागून । धक्का न लावी नर्मदा ।। ४ ।। ऐसें म्हणून स्तवन केलें । नर्मदेचें त्यांनी भले । हे चवघे बैसले । हात जोडून नावेंत ।। ५ ।।

### श्लोक (अनुष्टुप् छंद)

**नर्मदे मंगले देवी । रेवे अशुभनाशिनी । मंतु* क्षमा करी यांचा । दयाळू होऊन मनीं ।।**

ऐसें स्तवन चाललें । तों आतील पाणी निघून गेलें । नर्मदेनें लाविलें । आपुल्या करांस त्या छिद्रा ।। ६ ।। नाव श्रोते पहिल्यापरी । आली जलाचिया वरी । त्या नावेच्या बरोबरी । होती प्रत्यक्ष नर्मदा ।। ७ ।। कोळीणीचा धरिला वेष । मस्तकावरी कुरळ केश । भिजविले जियेच्या वस्त्रास । कंबरेपर्यंत जलानें ।। ८ ।। नौका कांठास लागली । अवघ्यांनी ती पाहिली । आश्चर्यचकित मुद्रा केली । पाहून तळाच्या छिद्राला ।। ९ ।। ही बाई होती

* अपराध

म्हणून । आमुचे हे वांचले प्राण । बाई आपण कोठील कोण? । हे कांही सांगा हो ।। ११० ।। सोडा वस्त्र भिजलेले । आम्ही नवें देतो भलें । तई नर्मदेनें पाहा केलें । अशा रीतीनें भाषण ।। ११ ।। मी ओंकार कोळ्याची कन्यका । माझें नांव नर्मदा ऐका । आम्हां परिपाठ आहे देखा । ओले वस्त्र नेसण्याचा ।। १२ ।। मी ओलीच राहतें निरंतर । माझें रूप आहे नीर । ऐसें बोलून नमस्कार । करून गेली गजानना ।। १३ ।। क्षणामाजी नाहीशी । झाली ती नर्मदेसी । वीज चमकून आकाशी । घनीं जैसी लीन होते ।। १४ ।। तो पाहतां प्रकार । चवघे आनंदले फार । कळला स्वामींचा अधिकार । नर्मदा आली दर्शना ।। १५ ।। बंकट विचारी खोदून । समर्था ही स्त्री कोण? । ते सांगावें फोडून । गुप्त कांहीं ठेवूं नका ।। १६ ।। तई महाराज वदलें तत्त्वतां । तुम्ही जे कां विचारितां । तो कथिला आहे गाथा । नर्मदेनें तुम्हांस ।। १७ ।। कोळी जो कां ओंकार । तोच हा ओंकारेश्वर । माझेंच रूप आहे नीर । ऐसे नर्मदा वदली ना ।। १८ ।। अरे ती प्रत्यक्ष नर्मदा । संशय तेथें न घ्यावा कदा । संकटामाजी देते सदा । हात ती आपुल्या भक्तातें ।। १९ ।। म्हणून तिचा जयजयकार । करा मोठ्यानें एक वार । जय जय नर्मदे निरंतर । ऐसेंच रक्षण अंबे करी ।। १२० ।। ऐसे ऐकतां वचन । बंकटलालादि चवघे जाण । समर्थांचे दिव्य चरण । वंदूं लागलें क्षणक्षणां ।। २१ ।। परत आले शेगांवांत । ज्यांना त्यांना हीच मात । होऊनिया हर्षभरीत । सांगू लागले विबुध हो ।। २२ ।। सदाशिव रंगनाथ वानवळे । एक्या गृहस्थासमवेत भलें । शेगांवांत येते झाले । महाराजांच्या दर्शना ।। २३ ।। या सदाशिवाकारण । टोपण नांव तात्या जाण । हे माधवनाथाचे छात्रगण । चित्रकूटच्या होते हो ।। २४ ।। या माधवनाथाप्रत । योगांगें होती अवगत । ज्यांचा शिष्यगण माळव्यांत । आहे मोठ्या प्रमाणीं ।। २५ ।। सदाशिव आले शेगांवाला । जेव्हा श्रींच्या दर्शनाला । तेंव्हा महाराज भोजनाला । बसले होते मठांत ।। २६ ।। सदाशिवासी पाहून । माधवाची झाली आठवण । गजाननाकारण । संत संता जाणती ।। २७ ।। वानवळे येतांक्षणी । महाराज बोलले मोठ्यांनीं । अरे नाथाच्या शिष्यालागुनी । बसवा आणून माझ्यापुढें ।। २८ ।। त्यांचे गुरू माधवनाथ । गेले जेवून इतक्यांत । मठीं माझ्या समवेत । तो हे दोघे पातले ।। २९ ।। थोडा वेळ आधी जरी । हे आले असते तरी । भेट त्यांच्या गुरूची खरी । होती यांना मठांत ।। १३० ।। आतां हे मागून आले । गुरू त्यांचे निघून गेले । विडा न घेता भले । त्याची करू पूर्तता ।। ३१ ।। वानवळ्यासी आलिंगन । देते झाले दयाघन । पोरे बंधूंचीं म्हणून । ऐसा तो संतप्रेमा ।। ३२ ।। रितीप्रमाणें सत्कार केला । वानवळ्याचा शेगांवला ।

जातांना त्या निरोप दिला। समर्थांनी येणे रीति ।। ३३ ।। तुम्हीं माधवनाथाला । असेंच जा भेटण्याला । त्यांचा येथें राहिला। विडा तो त्या द्यायास ।। ३४ ।। मी म्हणतो तेच सांगा । पदरचे न घाला बघा । आमच्या वाक्यामाजी उगां। फरक तुम्हीं करूं नये ।। ३५।। म्हणा ''साथें भोजन हुआ । बिडा तुम्हारा याही रहा । तो आम्ही आणिला पाहा। नाथा तुम्हा द्यावयास''।। ३६ ।। हें सारें बोलणें। ऐकलें त्या वानवळ्यानें। घेऊन विड्याची दोन पानें । गमन करिता जाहला ।। ३७ ।। माधवनाथा हकीकत । त्यानें कथिलीं इत्थंभूत। महाराज आपण शेगांवांत । आला होता कां ते दिनीं? ।। ३८ ।। गजानन जे बोलले । तैसेच आहे जाहलें । भोजनसमयीं त्यांनी केलें । स्मरण माझें तीच भेट ।। ३९ ।। ऐशा रीति एकमेकां । आम्ही भेटतो सदैव देखा । येथें शंका घेऊं नका । स्मरण तीच भेट होय ।। १४० ।। त्यांचा माझा एक प्राण। शरीरें ही मात्र भिन्न भिन्न । हें आहे खोल ज्ञान। तें न इतुक्यात कळें तुम्हां ।। ४१ ।। बरें झालें आणिला । आमुचा विडा तुम्हीं भला। जो होता राहिला । शेगांवी शिष्य हो।। ४२ ।। पानें देता वानवळ्यांनीं । ती भक्षिली नाथांनी । खलबत्त्यांत कुटूनी । थोडा प्रसाद दिला त्याला ।। ४३ ।। संतभेटी होती कैसी। हें चांगदेवपासष्टीसी । सांगतें झालें ज्ञानराशी । श्रीज्ञानेश्वर महाराज ।। ४४ ।। ती पासष्टी मनीं आणा। म्हणजे ह्या कळतील खुणा । स्वानुभवाच्या ठायीं जाणा । वाव न तर्काकारणें ।। ४५ ।। योगी वाटेल तेथोनी । भेटे एकमेकां लागुनी। भेट ठायींच बैसोनी । होते त्यांचे कौतुक हें ।। ४६ ।। शेख महंमद श्रीगोंद्यांत । तुकाराम होतें देहूंत । आग लागतां मंडपाप्रत। देहूमाजीं कीर्तनाच्या।। ४७ ।। ती शेख महंमदांनी। विझविली श्रीगोंद्यांत बैसूनी । हें महिपतींनीं लिहूनी । ठेविले भक्तिविजयांत ।। ४८ ।। जाऊन हळी खेड्यांत । विहिरींत बुडतां पाटीलसुत। वांचविले देऊन हात । महाराज माणिकप्रभूंनी ।। ४९ ।। खरा योगी असल्याविना। ऐसे कौतुक होईना । हें न साधे दांभिकांना । त्यांनीं गप्पाच माराव्या ।। १५० ।। योग अवघ्यांत बलवत्तर। त्याची न ये कोणां सर । करणें असल्या राष्ट्रोद्धार । त्याचा अवलंब करा हो ।। ५१।। श्रीदासगणूविरचित। हाश्रीगजानन विजय नामें ग्रंथ । ऐकोत सदा प्रेमळ भक्त । निष्ठा ठेवून ग्रंथावरी।। १५२ ।। शुभं भवतु ।। श्रीहरिहरार्पणमस्तु ।।

।। इति श्रीगजानन विजय ग्रंथस्य चतुर्दशोऽध्यायः समाप्तः ।।

# अध्याय पंधरावा प्रारंभ

श्रीगणेशाय नमः ।। हें कश्यपात्मज वामना । हे बटुरूपधारी नारायणा । तूं बलीच्या घेऊनी दाना । कृतार्थ त्याला केलेंस ।। १ ।। राज्य मृत्युलोकीचें । घेतले त्वां जरी साचें । तरी दिलें पाताळाचें। राज्य बलीकारणें ।। २ ।। आंवळा घेऊन नारळ दिला। तुम्ही त्या पुण्यवंत बलीला । आणि त्याच्या भक्तिस्तव झाला । द्वारपाल द्वारीं तुम्हीं ।। ३ ।। या मन्वन्तरानंतर। बलीच आहे होणार। देवांचा राजराजेश्वर । देवा तुझ्या वरानें ।। ४।। एका घटकेत अनंता। चहू वेदांच्या संहिता । पठण केल्या बुद्धिमत्ता । केवढी तुझी अगाध तरी ! ।। ५ ।। अवघ्यां तुझ्या अवतारी । हा सोंवळा अवतार श्रीहरी। कोणाचाही भूमीवरी । वध तुम्हीं न केलांत ।। ६ ।। शत्रुमित्रांच्या घरी दिवा । ये अवतारी लाविला बरवा । देव आणि दानवा । तूं वंद्य सारखाच ।। ७ ।। देव तेही आनंदविले । राक्षस तेही रक्षिलें । आपलें ईशत्व सांभाळिले । याच अवतारी देवा तूं ।। ८ ।। तुला माझा नमस्कार । असो वामना वारंवार । मस्तकीं ठेवा वरदकर । तुम्ही दासगणूच्या ।। ९ ।। टिळक बाळ गंगाधर । महाराष्ट्राचा कोहिनूर । दूरदृष्टीचा सागर । राजकारणीं प्रवीण जो ।। १०।। निज स्वातंत्र्यासाठी । ज्याने केल्या अनंत खटपटी। ज्याची धडाडी असे मोठी । काय वर्णन तिचें करूं? ।। ११ ।। करारी भीष्मासमान। आर्य महीचे पाहून दैन्य । सतीचे झाला घेता वाण । भीड न सत्यांत कोणाची।। १२ ।। वाक्चातुर्य जयाचे । बृहस्पतीच्या समान साचें । धाबें दणाणें इंग्रजांचे। पाहून ज्याच्या लेखाला।। १३ ।। कृति करून मेळविली । ज्यानें लोकमान्य ही पदवी भली । ती न त्यांना कोणी दिली । ऐसा होता बहाद्दर ।। १४ ।। तो एके वेळी अकोल्याला । शिवजयंतीच्या उत्सवाला। लोकाग्रहें येतां झाला । व्याख्यान द्यायाकारणें ।। १५ ।। झाली तयारी उत्सवाची । त्या अकोल्यामध्यें साचीं । मोठमोठाल्या विद्वानांची । गेली गडबड उडून ।। १६ ।। दामले, कोल्हटकर, खापर्डे । आणखी विद्वान बडेबडे। जमते झाले रोकडे । तया अकोल्या ग्रामासी ।। १७ ।। अध्यक्ष त्या उत्सवाचें । नेमिले होते टिळक साचे । नांव ऐकता टिळकांचे । वऱ्हाड सारे आनंदलें ।। १८।। शिवरायांची जयंती । याच्या आधीच या प्रांतीं । झाली पाहिजे होती । त्याचें कारण ऐसें पहा।। १९।। शिवाजीची जन्मदात्री । जी वीरमाता जिजा सती । ती वऱ्हाडीच आपुली होती । सिंदखेडी जन्म जिचा ।। २०।। त्या वीरगाजी शिवाजीला । जिनें पोटी जन्म दिला । वऱ्हाड – महाराष्ट्र एक झाला। या सतीच्या कर्तृत्वे ।। २१ ।। माता होती वऱ्हाडी । पिता महाराष्ट्री शहाजी गडी। अवघ्या दांपत्यांत

ही जोडी । खचित होती अनुपम ।। २२ ।। आधीच उत्सव शिवाजीचा । जो कलिजा महाराष्ट्राचा । आणखी वरी अध्यक्ष त्याचा । टिळक बाळ गंगाधर ।। २३ ।। आधीं एक महिना तयारी । उत्सवाची चालली खरी । ज्याच्या त्याच्या अंतरीं । आनंद होत चालला ।। २४ ।। अध्यक्ष उपाध्यक्ष निवडीले । स्वयंसेवक तयार झालें । तईं कइकांचें म्हणणें पडलें । ऐशा रीति विबुध हो ।। २५ ।। या शिवजयंती उत्सवाला । आणा शेगांवचे महाराजाला । श्रीस्वामीसमर्थ गजाननाला । म्हणजे दुधात साखर पडेल कीं ।। २६ ।। शिवाजीच्या राष्ट्रोद्धारा । आशीर्वाद होता खरा । समर्थांचा साजिरा । म्हणून तडीस गेला तो ।। २७ ।। टिळकांचे राजकारण । हेच जिजाई हृदयरत्न । त्याला पाहिजे आशीर्वचन । समर्थांचेच विबुध हो ।। २८ ।। ते कित्येकां पसंत पडलें । कित्येकांस नाही रुचलें । ज्या न रुचलें ते बोललें । उघड उघड येणें रीति ।। २९ ।। तो शेगांवचा अवलिया । कशास आणितां ये ठायां । तो कांहीं तरी करूनियां । विक्षोभ करील सभेचा ।। ३० ।। फिरेल नागवा सभेत । ''गिण गिण गणांत'' ऐसे म्हणत । मारील वाटे कदाचित । तो लोकमान्याला ।।३१ ।। कांहीं लोक बोलले । हें न म्हणणें चांगले । गजाननाची पाऊलें । लागलीं पाहिजेत सभेला ।। ३२ ।। त्याचें जे कां वेडेपण । तें आहे वेड्याकारण । जे कोणी विद्वान सज्जन । त्यासी न वदती वेड्यापरी ।। ३३ ।। खरेंखुरे राष्ट्रोद्धारक । जरी टिळक असती एक । तरी महाराज नि:शंक । सभेसी येतील ये ठायां ।। ३४ ।। खऱ्याखोट्याची परीक्षा । साधूच हे करिती देखा । म्हणून सांगतो भिऊं नका । त्यांना आमंत्रण देण्यास ।। ३५ ।। ऐसी भवति न भवति झाली । मंडळी शेगांवास आली । आमंत्रण ते द्याया भली । सभेचे श्रीगजानना ।। ३६ ।। येतांच दादा खापर्ड्यासी । बोलते झाले पुण्यराशी । आम्ही येऊ सभेसी । तुमच्या शिवाजी उत्सवाच्या ।। ३७ ।। वेड्यापरी न तेथें करू । जागीच बसून मौन धरूं । सुधारकांचा कधीं न करूं । मनोभंग मनाचा ।। ३८ ।। करावयासी राष्ट्रोद्धार । योग्य बाळ गंगाधर । याच्या परी न होणार । राष्ट्रप्रेमी पुरुष पुढें ।। ३९ ।। स्नेही त्या टिळकांचा । अण्णा पटवर्धन नांवाचा । शिष्य नरसिंह सरस्वतीचा । आळंदीचा असें जो ।। ४० ।। त्या दोघा पुरुषा पाहण्यांस । आम्ही येऊं अकोल्यास । ते ऐकतां खापर्ड्यास । अती आनंद जाहला ।। ४१ ।। पाहा पाहा कोल्हटकरा । वऱ्हाडप्रांताचा ज्ञानहिरा । यानें वृत्तांत जाणिला सारा । जो कां झाला अकोल्यात ।। ४२ ।। यावरून संतांचे । ज्ञान केवढें अगाध साचें । खऱ्या राष्ट्रपुरुषाचें । प्रेम यांना पहा किती ।। ४३ ।। बोलावयाची आपणास । जरूर पडली कांहीं न खास । तेच होऊन आपणांस । येतो म्हणून म्हणाले ।। ४४ ।। मुहूर्त या उत्सवाला । अती उत्तम लागला । चला वंदून समर्थाला । आपण जाऊं अकोल्यास ।। ४५ ।।

खापर्डे, कोल्हटकर । निघून गेले साचार । आला आठ दिवसांवर । सभेचा तो दिवस पाहा ।। ४६ ।। वऱ्हाड सारे आनंदले । ज्यांना त्यांना वाटले । कधीं टिळकांची पाऊलें। पाहूं आम्ही अकोल्यांत ।। ४७।। शके अठराशें तिसासी । ती सभा होती वैशाखमासीं । वऱ्हांडप्रांती अकोल्यासी। उभारिलेल्या मंडपात ।। ४८ ।। सण अक्षयतृतीयेचा । वऱ्हाडप्रांतीं महत्त्वाचा। परी समुदाय जनांचा । मिळतां झाला प्रचंड ।। ४९ ।। तोच अखेरचा दिन। त्या सभेचा होता जाण । लोक आले लांबलांबून । लोकमान्यासी पाहावया ।। ५० ।। शिवाय श्रोते त्या दिवशीं । महाराज येणार सभेसी । ऐसी खबर लोकांसी । आधींच होती विबुध हो।। ५१ ।। मंडप चिकार भरून गेला । जो तो पाहूं लागलां । म्हणती कां हो सभेला । अजूनी न आले महाराज।। ५२ ।। परी ते सभा भरण्याआधीं। येऊन बैसलें मंडपामधीं । साधू आपल्या वाणीस कधीं। असत्यता न येऊं दे ।। ५३ ।। सभेमाजी उच्चस्थानीं । बसले होते कैवल्यदानी । गादीस लोडा टेकूनी । जीवन्मुक्त साधुवर ।। ५४।। सिंहासनाच्या अग्रभागा । टिळकांस दिली होती जागा। त्यांच्या सन्निध बसले बघा । अण्णासाहेब पटवर्धन ।। ५५ ।। श्रीकृष्णाचा नंदन । गणेश ज्याचें नामाभिधान । खापर्डे कुलाचा कुलभूषण । एक्या बाजूस टिळकांच्या ।। ५६ ।। दामले कोल्हटकर त्या ठायीं । भावे व्यंकटराव देसाई । सभेचे पुढारी पाही । चमकत होते ते ठाया।। ५७ ।। आणिक व्याख्याते विव्दानेतर । बसले होते सभोवार । त्यांचें वर्णन कोठवर । करावें मी एक्या मुखें।। ५८ ।। सभेलागी आरंभ झाला। हेतू प्रथम निवेदिला । मग व्याख्यानसिंह उठला । टिळक बोलावयातें ।। ५९ ।। ''दिवस आजचा धन्य धन्य। आहे पाहा हो सज्जन । स्वातंत्र्यासाठीं ज्यानें प्राण । खर्चिले आपुले पूर्वकालीं ।। ६० ।। त्या धनुर्धर योद्ध्याची । वीर गाजी शिवाजीची। जन्म जयंति आहे साची । म्हणून आपण मिळालो ।। ६१ ।। त्या रणगाजी शिवाजीला । रामदासें हाती धरिला । म्हणून त्याचा बोलबाला । झाला भरतखंडामध्यें ।। ६२ ।। तेवीच आज येथे झालें । आशीर्वाद द्याया आलें । श्रीगजानन साधु भले। आपुलिया सभेस ।। ६३ ।। म्हणून शिवाजीचें परी। सभा यशस्वी होवो खरी । अशाच सभेची जरुरी। आहे सांप्रत राष्ट्राला ।। ६४ ।। स्वातंत्र्यसूर्य मावळला । दास्यत्वाचा काळोख पडला । स्वातंत्र्य नाहीं जगीं ज्याला। तो समाज प्रेतवत् ।। ६५।। यासाठीं म्हणून । आहे करणें प्रयत्न । ज्या शिक्षणेंकरून। राष्ट्रप्रेम वाढेल हो ।। ६६।। ऐसे शिक्षण पुढिल्यांप्रती। देणें भाग निश्चिती । ते शिक्षण हा भूपती । देईल कां हो अर्भकाला?''।। ६७।। ऐसे टिळक म्हणाले । महाराज आसनीं उठून बसले । गर्जून त्रिवार बोलले । नाहीं नाहीं ऐसें पाहा ।। ६८।। आवेशाच्या भरांत । बोलले गंगाधरसुत । जें बोलणें किंचित । टोचून होतें राजाला ।। ६९ ।। त्या भाषणाचा रोख भला । समर्थांनी जाणिला । आणि हांसत हांसत शब्द केला। ऐशा रीतिं

श्रोते हो ।। ७० ।। अरे अशानेंच पडतात । काढण्या दोन्ही दंडाप्रत । ऐसें बोलून गणगणांत । भजन करूं लागले ।। ७१ ।। सभा निर्विघ्न पार पडली । टिळकांची वाहवा झाली । खरें झालें त्याच सालीं । समर्थांचे भाकित ।। ७२।। भूपतीनें टिळकाला । एकशे चोवीसाखाली धरिला । दोऱ्या पडल्या दंडाला । आला प्रसंग शिक्षेचा ।। ७३ ।। राजसत्तेचिया पुढें। कोणाचेंही न चाले घोडें । वकील होते बडे बडे । ते झटूं लागले टिळकांस्तव ।। ७४।। प्रेमी मंडळी टिळकांची । जी कां होती जिव्हाळ्याची । त्यांनी पारमार्थिक उपायांची । केली योजना एक अशी ।। ७५।। दादासाहेब खापर्डे । हेही होते गृहस्थ बडे । ते उमरावतीहून मुंबईकडे । जाऊं लागले खटल्यास्तव ।। ७६ ।। अकोल्याच्या स्टेशनावरी । कोल्हटकरास मधुरोत्तरी । बोलते झाले ऐशापरी । ते थोडके सांगतो ।। ७७ ।। तुम्ही जावें शेगांवासी । समर्था विनंती करा ऐसी । सोडवा बाळ टिळकासी । प्रसंग मोठा दुर्धर ।। ७८ ।। मीच गेलो असतो तेथें । परी मी जातो मुंबईतें । तुम्हीं जाऊन शेगांवातें। विनंती करा महाराजा ।। ७९ ।। लगेच बसला गाडीत। कोल्हटकर टिळकभक्त । येतां झाला शेगांवांत । स्वामी गजाननाकडे ।। ८० ।। तईं महाराज मठातें । निज आसनीं निजून होते । तीन दिवस जाहलें पुरते । परी न उठले यत्किंचित् ।। ८१।। कोल्हटकरही तोवरीं । बसला मठाभीतरीं। जो कां असेल बिगारी । तो न ऐसे वागे कदा ।। ८२।। कळकळ टिळकांविषयींची। कोल्हटकरा पूर्ण साची । कमाल त्यानें चिकाटीची। केली असे आपुल्या ।। ८३ ।। जाळावांचून नाही कड । मायेवाचून नाही रड। ऐसी आहे एक जाड । म्हण मराठी भाषेमध्यें ।। ८४ ।। चवथे दिवशीं समर्थ उठलें। कोल्हटकरास बोलते झालें। तुम्ही अलोट प्रयत्न केले । परी फळ न येईल त्या।। ८५।। अरे छत्रपति शिवाजीला । रामदासांचा वशिला । होता परी तो कैद झाला। बादशाही अमलांत।। ८६।। सज्जनांस त्रास झाल्याविना । राज्यक्रांति होईना । कंसाचा तो मनीं आणा। इतिहास म्हणजे कळेल ।। ८७ ।। ही मी देतो भाकर । ती खाऊं घाला लौकर । टिळकांप्रती अंतर। यांत कांहीं करूं नका ।। ८८ ।। या भाकरीच्या बळावरी । तो करील मोठी कामगिरी । जातो जरी फार दूरी । परी न त्याला इलाज ।। ८९ ।। ऐसें ऐकतां उत्तर। साशंक झाले कोल्हटकर। समर्थां करून नमस्कार । भाकर करीं घेतली ।। ९० ।। ती नेऊन मुंबईला । घातली टिळकास खावयाला। वृत्तान्त तोही कथन केला । अथपासून इतिवरी ।। ९१ ।। तो ऐकून लोकांप्रत । टिळक बोलले हंसत हंसत । स्वामींचे ते अगाध सत्य। ज्ञान आहे खचित पाहा ।। ९२।। यश तुमच्या प्रयत्नांसी। येणार नाहीं निश्चयेसी । आपली बाजू रक्षण्यासी । सरकार न्याया पाळील ना ।। ९३ ।। जेंव्हा स्वार्थाचा संबंध नसतो । तेव्हां न्याय आठवतो । हा जगाचा सिद्धांत तो । होईल खोटा कोठूनी ?

।। ९४ ।। माझ्या हातें कामगिरी । मोठी होणार आहे खरी । ऐसी समर्थांची वैखरी । बोलली हे गूढ एक ।। ९५ ।। भूत भविष्य वर्तमान । जाणताती साधुजन । आपण मनुष्य सामान्य । पाहूं पुढें काय होतें ।। ९६ ।। प्रसाद म्हणून भाकरी । ती कुसकरून भक्षिली खरी । दंत न मुखाभीतरीं । परी प्रसाद टाकवेना ।। ९७ ।। झाली शिक्षा टिळकांस । नेले ब्रह्मदेशी मंडाल्यास । तेथे जन्मला गीतारहस्य । गीतेवरील ग्रंथ त्यांचा ।। ९८ ।। हीच मोठी कामगिरी । झाली त्यांच्या हस्ते खरी । मान जगद्गुरूपरी । मिळता झाला टिळकांतें ।। ९९ ।। या गीताशास्त्रावर । टीका झाल्या अपार । त्या सांगू तरी कोठवर ! । मति नाही दासातें ।। १०० ।। बुध हो प्रत्येक आचार्यांनीं । कालमानातें पाहुनीं । केली गीतेची मांडणी । जगदोद्धार करावया ।। १ ।। कोणी लाविली अद्वैतपर । कोणी लाविली द्वैतपर । कोणी लाविली कर्मपर । त्याच एका गीतेला ।। २ ।। हीच मोठी कामगिरी । त्यांच्या हस्तें झाली खरी । या कामाची न ये सरी । कोणत्याही कृत्यातें ।। ३ ।। येणेंच बाळ गंगाधर । जगतीं होतील अजरामर । कीर्ति त्यांची दूरवर । पसरवील ग्रंथ हा ।। ४ ।। स्वातंत्र्य जरी मिळविलें असतें । तरी न ऐसी कीर्ति टिकते । पाहा करून चित्तात । पूर्णपणें विचार ।। ५ ।। स्वातंत्र्य हे साचार । येतें जातें वरच्यावर । त्यांत फारसें नाही सार । तो व्यवहार लौकिकीं ।। ६ ।। गीताशास्त्राचें तसें नाहीं । तें मोक्षपदाप्रती देई । आणि समाजाची बसवी पाही । विस्कळित घडी हें ।। ७ ।। यावच्चंद्रदिवाकर । पुरुष बाळ गंगाधर । चिरंजीव निरंतर । राहील कीर्तिरूपानें ।। ८ ।। असो करवीर कोल्हापुरीचा । द्विज चित्पावन जातीचा । श्रीधर गोविंद नांवाचा । काळे उपनांव जयाचें ।। ९ ।। तो गरिबीच्या स्थितींत । गेला इंग्रजी शाळेत । आंग्लविद्या शिकण्याप्रत । मॅट्रिक परीक्षा पास झाला ।। ११० ।। पुढें कॉलेजात गेला । परी इन्टर नापास झाला । म्हणून फिरत राहिला । वर्तमानपत्रे वाचीत ।। ११ ।। तो 'केसरी' पत्रांत । वाचलें ओयामा टोगो चरित्र । तेणें त्याच्या मनांत । वृत्ति एक उठली अशी ।। १२ ।। आपण जावें विलायतेला । यंत्रविद्या शिकण्याला । उगे भार भूमीला । होण्यामाजीं अर्थ काय ? ।। १३ ।। टोगो यामा दोघे जण । प्रथमत: ज्ञान संपादून । अभ्युदयाकारण । जपान आणिते जहाले ।। १४ ।। तैसें आपण करावें । मायभूमीस उद्धरावें । ऐसा विचार त्याच्या जीवे । घेतला परी इलाज ना ।। १५ ।। द्रव्याची न लागे संगत । कोणीही ना करी मदत । घरची गरिबी अत्यंत । काय करितो बिचारा ।। १६ ।। तो आपल्या मित्रासी । आला भेटण्या भंडाऱ्यासी । जो मन्रो हायस्कूलासी । होता एक शिक्षक ।। १७ ।। त्यासी विचार आपुला । श्रीधरानें कळविला । तो त्याला ही पसंत पडला । परी पैशाची वाट काय ? ।। १८ ।। मित्रा, एक पैशाविणें । कांहीं नाहीं जगीं होणें । दारिद्र्याने मनींच करणें । मनोराज्य बापा रे ।। १९ ।। चाल जाऊं गांवाला । आपुल्या जन्मभूमीला । त्या करवीर कोल्हापूराला । इकडे उन्हाळा विशेष ।। १२० ।। दोघे

बसले गाडीत । समर्थांची ऐकून कीर्त । उतरते झाले शेगांवात । साधु कसा तो पहावया ।। २१ ।। पोस्टमास्तराच्या दारी । सामान ठेविलें सत्वरी । आतुरता मोठी अंतरीं । समर्थांना पाहण्याची ।। २२ ।। दोघें आलें मठात । समर्था केले दंडवत । बैसते झाले जोडून हात । स्वामींचिया सन्मुख ।। २३ ।। मनोदय श्रीधराचा । समर्थांनी जाणिला साचा । म्हणाले उगीच परदेशाचा । विचार वेड्या करूं नको ।। २४ ।। अवघेच कांहीं आहे येथ । अर्थ ना भौतिकशास्त्रात । सेवी अध्यात्मविद्येप्रत । म्हणजे कृतार्थ होशील तूं ।। २५ ।। त्यायोगें विचारक्रांति । श्रीधराच्या झाली चित्तीं । कोल्हापूरची एक व्यक्ती । आठवली या समयास त्या ।। २६ ।। ते स्वामी कुंभारगल्लीचे । होते कोल्हापुरीचे । बोलणे याच परीचें । होतें हमेशा भक्तांसी ।। २७ ।। तैसेच हेही गुरुमूर्ती । भक्तांसवे भाषण करिती । याचा उलगडा चित्ती । कांहीच माझ्या होईना ।। २८ ।। ऐसे श्रीधर आणिता मनीं । महाराज वदले गर्जोनी । हिंदुस्थाना सोडूनी । उगाच कोठे जाऊ नको ।। २९ ।। अगणित करावें पुण्य । तेंव्हाच होतें येथें जनन । या भौतिक शास्त्राहून । योगशास्त्र समर्थ असे ।। १३० ।। ते योगशास्त्र येतें ज्याला । तो न मानी या भौतिकाला । योगशास्त्राहून भला । अध्यात्मविचार श्रेष्ठ असे ।। ३१ ।। तो जमल्यास करून पाही । कोठे न आतां जाई येई । ऐसे समर्थ बोलतां पाहीं । श्रीधर चित्तीं आनंदला ।। ३२ ।। पश्चिमेचा मावळला । तोच पूर्वेकडे आला । विचारसूर्य त्याचा भला । श्रीधरा सुखी करण्यास ।। ३३ ।। एक संतावाचून । विचाराचें परिवर्तन । कोणी न करूं शके आन । सत्य एक त्यांनाच कळें ।। ३४ ।। महाराज म्हणालें या ठायीं । तुझा अभ्युदय होईल पाही । कांता वाट पहाते गेहीं । तुझी कोल्हापुराला ।। ३५ ।। जा आता मित्रासहित । आपुल्या कोल्हापुराप्रत । तेच पुढें झालें सत्य । श्रीधर लौकिका चढले हो ।। ३६ ।। श्रीधर बी. ए., एम. ए. झाले । प्रिन्सिपॉल त्या नेमिलें । शिवपुरी कॉलेजाशीं भलें । सिंद्याचिया राज्यांत ।। ३७ ।। संत साक्षात् ईश्वर । चालते बोलते भूमीवर । त्यांच्या कृपेचा आधार । जया मिळे तोच मोठा ।। ३८ ।। पाहा काळे श्रीधराला । दर्शनाचा योग आला । म्हणून वृत्तीत फरक पडला । खरें तेंच शोधावया ।। ३९ ।। हें पीक संतांचें । याच देशीं यावयाचें । वृक्ष नंदनवनीचे । अन्य ठायीं न येती हो ।। १४० ।। स्वस्ति श्रीदासगणूविरचित । हा श्रीगजानन विजय नामें ग्रंथ । दावो सर्वदा सत्पथ । परम भाविकांकारणें ।।१४१ ।। शुभं भवतु ।। श्रीहरिहरार्पणमस्तु ।।

।। इति श्रीगजानन विजय ग्रंथस्य पंचदशोऽध्यायः समाप्तः ।।

# अध्याय सोळावा प्रारंभ

श्रीगणेशाय नमः ।। जयजयाजी परशुधरा । हे जमदग्नीच्या कुमारा । परशुरामा परमेश्वरा । आतां उपेक्षा करूं नको ।। १ ।। तूं सहस्त्रर्जुनाते दंडून । केलें द्विजांचें संरक्षण । ब्राह्मणाचा अपमान । सहन झाला नाहीं तुला ।। २ ।। आतां मात्र डोळे मिटिसी । कां रे देवा ब्राह्मणांविशीं ? । काय आहे लागली तुसी । गाढ निद्रा येधवां ।। ३ ।। म्हणून डोळे मिटू नका । स्वस्थ ऐसे बसूं नका । आणीबाणीचा प्रसंग देखा । आहे हरी सांप्रत ।। ४ ।। तुझ्या वशिल्यावांचून । अवघी कृत्यें आहेत शीण । आर्यसंस्कृतीचें रक्षण । होणें नाहीं तुझ्याविण ।। ५ ।। गजानन माया अघटित । कोण जाणें तिजप्रत । महाराजांचा एक भक्त । पुंडलीक नामें मुंडगांवी ।। ६ ।। हा शेगांवची करी वारी । समर्थांविषयीं प्रेम भारी । हमेशा त्यांचें चिंतन करी । एकाग्रशा मनानें ।। ७ ।। त्याच गांवी भागाबाई । एक ठाकरीण होती पाही । निष्ठा तिची एक्याही । ठिकाणासी बसत नसे ।। ८ ।। ती दांभिक होती फार । सदा दंभाचा बाजार । भरवून भोंदी नारीनर । हाच धंदा तियेचा ।। ९ ।। ती बोलली पुंडलीकाला । तुझा जन्म वायां गेला । कां कीं तूं नाही केला । सद्‌गुरू तो आपणातें ।। १० ।। गजाननाच्या वाऱ्या करिसी । सद्‌गुरू त्याला मानिसी । परी त्यानें सांग तुसी । मंत्र कानीं कथिला कां ? ।। ११ ।। अरे विधीवाचून । गुरू न होत कधी जाण । शेगांवचा गजानन । वेडापिसा साच असे ।। १२ ।। तुझा ताप झाला बरा । म्हणून तूं मानिसी त्याला । या काकतालीयन्यायाला । बळी पुंडलीका पडूं नको ।। १३ ।। 'गिन गिन गणातें' हें भजन । पिशापरी आचरण । कोणाचेही खाई जाण । ऐसा मुळी भ्रष्ट तो ।। १४ ।। म्हणून तुला सांगतें । चाल अंजनगांवातें । केजाजीच्या शिष्यातें । आपण दोघे गुरू करूं ।। १५ ।। उद्यां त्याचें कीर्तन । अंजनगांवी असें जाण । तें ऐकावया कारण । उठून जाऊं प्रातःकाळी ।। १६ ।। गुरू असावा महाज्ञानी । चातुर्य – शास्त्र – चिंतामणी । गुरू असावा परमगुणी । भक्तिपंथाते दावितां ।। १७ ।। यांतील लक्षण एकही । गजाननाच्या नसे ठायीं । म्हणून वेळ न करीं कांहीं । चाल अंजनगांवाते ।। १८ ।। तो भोकरे पुंडलीक । होता मनाचा भाविक । भागीच्या भाषणें देख । चित्त त्याचें घोटाळलें ।। १९ ।। त्यानें ऐसा विचार केला । उदईक अंजनगांवाला । जाऊं कीर्तन ऐकण्याला । पुढचा विचार पुढें करूं ।। २० ।। ऐसा विचार करून । भागीसी बोलला जाण । अंजनगांवालागून । चाल येतों तुझ्यासवें ।। २१ ।। दोघांचा विचार झाला । पुंडलीक रात्री स्वस्थ निजला । तो तीन प्रहर रात्रीला । काय घडलें तें ऐका ।। २२ ।। पुंडलीकाच्या समोर । एक पुरुष दिगंबर । उभा राहिला साचार ।

थेट समर्थांच्या परी ।। २३ ।। पुरुष म्हणे रे पुंडलीका । अंजनगांवासी जातोस कां ? । गुरू करायातें निका । त्या भागीच्या सल्ल्यानें ।। २४ ।। जातोस तरी जावें त्वरित । त्याचें नांव काशिनाथ । तेथें जाता फिटेल भ्रांत । तुझी वेड्या निश्चयें ।। २५ ।। कानांत कांहीं बोलला । म्हणून कां तो गुरू झाला । लोक कानगोष्टीला । किती तरी करतात ।। २६ ।। मग ते एकमेकांचे । काय गुरू होती साचे । नादी दंभाचाराचें । त्वां पुंडलीका पडूं नये ।। २७ ।। तूं इकडे करी कान । मंत्र देतो तुजकारण । 'गण गण' ऐसे बोलून । महाराज स्तब्ध जहाले ।। २८ ।। आणखी काय आहे आस । ती मी आज पुरवीन खास । ऐसे ऐकतां पुंडलीकास । आनंद अति जहाला ।। २९ ।। पाहूं लागला निरखून । स्वप्नीं त्या पुरुषालागून । तों पाहिले गजानन । शेगांवचे स्वामी पाहा ।। ३० ।। पुंडलीक म्हणे गुरुराया । पादुका द्या ह्या मला सदया । नित्य पूजा करावया । यावीण आणखी आस नसे ।। ३१ ।। बरें ! उद्या दोन प्रहर । दिवस येतां साचार । पादुकांची पूजा कर । ह्या मी दिधल्या घेई तुला ।। ३२ ।। पादुका त्या घ्यावयाला । स्वप्नीं पुंडलीक उठून बसला । तोंच आली तयाला । साक्षात् जागृति श्रोते हो ।। ३३ ।। जागा होऊनी सभोवार । पाहूं लागला साचार । तो कोणीच दिसेना अखेर । नाहीं पत्ता पादुकांचा ।। ३४ ।। उलगडा कांहीं होईना । संशय मनींचा जाईना । म्हणे स्वामींच्या भाषणा । बाट न लागला आजवरी ।। ३५ ।। स्वप्नीं येऊन दर्शन । त्यांनी दिलें मजकारण । कशी भागी ठाकरीण । तेंही स्वप्नी कथन केले ।। ३६ ।। तैसेच उद्या दोन प्रहरीं । पादुकांची पूजा करी । ऐसे बोलले साक्षात्कारी । त्याचा समजू काय अर्थ ? ।। ३७ ।। किंवा नव्या पादुका करून । म्यां करावें पूजन । ऐसे त्यांचें आहे मन । हें कांही कळेना ।। ३८ ।। मीं पदींच्या मागितल्या । पादुका त्या होत्या भल्या । त्याच त्यांनी मसी दिल्या । मग नव्या घेऊं कशास ? ।। ३९ ।। ऐसे नाना तर्क करी । पुंडलीक आपल्या अंतरीं । तो इतक्यांत आली घरीं । भागी ठाकरीण बोलावण्या ।। ४० ।। अंजनगांवी चाल आतां । मोक्ष गुरू करण्याकरितां । दिसूं लागला आहे रस्ता । अरुणोदयाचे प्रकाशें ।। ४१ ।। पुंडलीक म्हणें भागाबाई । मी कांही येत नाहीं । मर्जी असल्यास तूंच जाई । अंजनगांवाकारणें ।। ४२ ।। मीं जो एकदां गुरू केला । श्रीगजानन महाराजाला । तो न आतां सोडी भला । हाच माझा निश्चय ।। ४३ ।। ते ऐकतां भागाबाई । अंजनगांवास गेली पाही । आतां मुंडगांवाचें ठाई । काय झालें तें ऐका ।। ४४ ।। झ्यामसिंग रजपूत । गेला होता शेगांवात । दर्शन स्वामींचें घेण्याप्रत । दोन दिवस याच्या आधी ।। ४५ ।। तो जेव्हा मुंडगांवाला । येण्या परत निघाला । तईं बाळाभाऊला । ऐसे बोलले महाराज ।। ४६ ।। या पादुका पुंडलीकासी । द्याया देई याच्यापासी । समर्थ आज्ञा होतां ऐशी । तैसेंच केलें बाळानें ।। ४७ ।। करीं घेऊन पादुका । झ्यामसिंगास बोलला देखा । भोकरे जो का पुंडलीका । तुमच्या गांवींचा असे हो ।। ४८ ।। त्यास ह्या

द्या नेऊन । करावयासी पूजन । ते झ्यामसिंगे ऐकून । पादुका घेतां जाहला ।। ४९ ।। झ्यामसिंग आला मुंडगांवांत । तों पुंडलीक भेटला वेशीत । पुसूं लागला त्याप्रत । कुशलवृत्त समर्थांचें ।। ५० ।। प्रसाद मला द्यावयासी । कांही दिला कां तुम्हापासी ? । हें ऐकतां झ्यामसिंगासी । महदाश्चर्य वाटलें ।। ५१ ।। सवें घेऊन पुंडलीकाला । झ्यामसिंग घेऊनी घरी गेला । खोदून विचारू लागला । तूं ऐसें कां विचारलें ? ।। ५२ ।। पुंडलीकानें स्वप्नाची । गोष्ट त्याला कथिली साची । ती ऐकतां झ्यामसिंगाची । भ्रांति नष्ट झाली हो ।। ५३ ।। लगेच पादुका काढिल्या । पुंडलीकाच्या हातीं दिल्या । त्याच अजून आहेत भल्या । मुंडगांवांत त्याच्या घरीं ।। ५४ ।। दोन प्रहरीं पूजन । पुंडलीकानें केले जाण । मनोभावें करून । त्या प्रसादी पादुकांचें ।। ५५ ।। पहा श्रोते खरें संत । सांभाळिती आपुले भक्त । आडमार्गानें किंचित् । जाऊं न देती तयाला ।। ५६ ।। निज भक्तांचे मनोरथ । समर्थ कैसे पुरवितात । तें येईल ध्यानांत । या कथेतें ऐकता ।। ५७ ।। एक वाजसनिय ब्राह्मण । कवर राजाराम म्हणून । होता धंदा करून । अकोल्यांत सराफीचा ।। ५८ ।। सोने चांदी भुसार । घेणें देणें साचार । मध्यम प्रतीचा सावकार । हा राजाराम कवर असे ।। ५९ ।। या राजारामाप्रती । महाराजांची होती भक्ति । म्हणून त्याची संतती । मानूं लागली समर्था ।। ६० ।। या कवराकारण । दोन पुत्र होते जाण । गोपाळ त्र्यंबक म्हणून । लव्हांकुशांसारिखे ।। ६१ ।। कनिष्ठ पुत्र त्र्यंबकाप्रती । भाऊ व्यवहारीं बोलती । तो हैद्राबादेप्रती । गेला डॉक्टरी शिकावया ।। ६२ ।। लहानपणापासून । भाऊस होते देवध्यान । म्हणजे त्र्यंबकालागून । हें येथें विसरूं नका ।। ६३ ।। कांहीं संकट पडल्यावरी । तो समर्थांचा आठव करी । राहून त्या भागानगरीं । मुसा नदीच्या कांठाला ।। ६४ ।। एवंच भाऊ भक्तिमान । होता लहानपणापासून । त्याचे दैवत गजानन । स्वामी शेगांवग्रामीचें ।। ६५ ।। तो सुटीमाजी आला घरीं । इच्छा उपजली अंतरीं । जाऊनिया शेगांवनगरीं । जेवूं घालावे महाराजा ।। ६६ ।। पदार्थ त्यांच्या आवडीचें । करोनिया सर्व साचे । परी हें कैसे व्हावयाचें ? । हाच विचार पडला कीं ।। ६७ ।। भाऊ म्हणे गुरुनाथा । काय तरी करू आतां । मरून गेली माझी माता । लहानपणींच दयाळा ।। ६८ ।। घरीं माझें नाहीं कोणी । एक बंधूची कामिनी । जिचें नांव आहे नानी । स्वभाव तापट तियेचा ।। ६९ ।। माझ्या आहे ऐसे मनीं । आपणा करावी मेजवानी । आपुल्या आवडीचें करोनी । पदार्थ सारे गुरुराया ।। ७० ।। भाकरी ती जवारीची । कांदा भाजी अंबाड्याची । ऊन पिठलें हिरवी मिर्ची । ऐसें तयार करावें ।। ७१ ।। हें पदार्थ करण्याला । सांगू कसा मी भावजयीला ? । हट्ट एक करण्याला । माता तेच स्थान असे ।। ७२ ।। ऐसा विचार करीत । भाऊ राहिला निवांत । तो कांहीं कामानिमित्त । नानी आली ते ठायां ।। ७३ ।। नानी दिराला बोलली । चिंता कशाची लागली ? । मुखश्री ती म्लान झाली । तुमची कशाने ये वेळां ? ।। ७४ ।।

भाऊ वदे दीनवाणी । काय तुला सांगू वहिनी ? । माझे जे कां आले मनीं । विचार ते ये वेळां ।। ७५ ।। पूर्ण सत्तेवाचून । मनोरथ ना होती पूर्ण । म्हणून तुला सांगून । काय करणे आहे गे ।। ७६ ।। नानी म्हणें त्यावर । सांगून पहा एकवार । तूं माझा धाकटा दीर । मशी पडदा ठेवूं नये ।। ७७ ।। ज्येष्ठ भ्राता पित्यापरी । तत् कांता माय खरी । मानिली पाहिजे साजिरी । तें तुम्ही जाणतसा ।। ७८ ।। तें ऐकून भाऊ हंसला । नानीप्रती बोलता झाला । नानी माझ्या मनाला । आज ऐसें वाटतें ।। ७९ ।। गजाननाच्या आवडीचें । सर्व पदार्थ करून साचे । आहेत मला न्यावयाचे । त्यांना द्याया शेगांवी ।। ८० ।। ते तूं जरी करशील । तरी तुलाही लागेल । पुण्य आणि होईल । काम माझें त्यायोगें ।। ८१ ।। तें ऐकतां बोले नानी । दिराप्रती हास्यवदनीं । यासाठींच कां हो मनीं । सचिंत तुम्हीं बैसलात ? ।। ८२ ।। सांगा आहे काय करणें । मजला स्पष्ट शब्दानें ? । कांही ना आपुल्या गेही उणें । कृपेनें गजाननाच्या ।। ८३ ।। मग भाऊनें सर्व कांहीं । निवेदन केलें तिला पाही । तीही लागली लवलाही । आनंदानें स्वयंपाका ।। ८४ ।। भाजी चून भाकर । हिरव्या मिरच्या ओंजळभर । ठेविल्या आणून समोर । आपुल्या त्या दिराच्या ।। ८५ ।। भाकरी तीन कांदे तीन । हरभऱ्याचें चून जाण । लोणी ठेविलें माखून । प्रत्येक त्या भाकरीला ।। ८६ ।। नानी म्हणाली दीराला । जा आतां शेगांवाला । वेळ थोडका राहिला । आहे पाहा गाडीस ।। ८७ ।। ती गाडी चुकल्यावरी । वाया जाईल तयारी । भोजनाच्या वेळेवरी । गेलात तरी उपयोग ।। ८८ ।। ऐसे नानी बोलतां । भाऊ निघाला तत्त्वतां । पुसूनिया आपुल्या ताता । येतां झाला स्टेशनासी ।। ८९ ।।तो गाडी बाराची । निघूनिया गेली साची । तेणे चित्तवृत्ति भाऊची । होती झाली शोकाकुल ।। ९० ।। अति हिरमोड त्याचा झाला । पाणी आलें लोचनाला । म्हणें महाराज कां हो केला । अव्हेर माझा ये कालीं ? ।। ९१ ।। मी मुळींच हीन दीन । कोठून घडावें मला पुण्य ? । आम्हा कावळ्यांकारण । लाभ केवी मानसाचा ।। ९२ ।। अक्षम्य ऐसी कोणती । चूक झाली माझ्या हातीं । म्हणून माझी गुरुमूर्ति । गाडी चुकली ये वेळां ? ।। ९३ ।। हाय हाय हे दुर्दैवा ! । त्वां माझा साधिला दावा । माझ्या करीं गुरुसेवा । घडूं न दिली आज तूं ।। ९४ ।। ही माझी शिदोरी । ऐशीच आज राहिली जरी । नाही करणार भोजन तरी । सत्य सत्य त्रिवाचा ।। ९५ ।। गुरुराया कृपाराशी । नका उपेक्षूं लेंकरासीं । ही शिदोरी सेवण्यासी । यावें धांवून सत्वर ।। ९६ ।। थोर आपुला अधिकार । क्षणांत पाहता केदार । मग याया येथवर । कां हो अनमान करितसां ? ।। ९७ ।। मी न आज्ञा तुम्हां करितो । प्रेमानें हाका मारितों । म्हणूनियां हा न होतो । अपमान तुमचा यत्किंचित् ।। ९८ ।। तीन घंटे अजून । अवकाश गाडीकारण । तोंवरी आपुलें भोजन । होईल ऐसें वाटतें ।। ९९ ।। ऐसा विचार करीत । तेथेच बैसला उपोषित । चतुर्थ प्रहरी शेगांवात । आला तिहीच्या गाडीनें

।। १०० ।। कवर गेला दर्शना । तई तो योगीराणा । न करिता भोजना । बसला होता आसनीं ।। १ ।। नैवेद्याची अतोनात । ताटें होती मठांत । पक्वान्नानी परिलुप्त । ती वर्णावी कोठवरी ? ।। २ ।। कोणाच्या जिलब्या घीवर । कोणाचा तो मोतीचूर । कोणाची ती नुसती खीर । श्रीखंड पुऱ्या कोणाच्या ।। ३ ।। परी त्या नैवेद्याला । समर्थांनी ना स्पर्श केला । वरच्यावरी ताटाला । बाळा आणून ठेवीं पुढें ।। ४ ।। आणि म्हणे हे करा ग्रहण । गेला एक वाजून । आपुलें न झाल्या जेवण । प्रसाद भक्ता मिळतो कसा ? ।। ५ ।। त्याची ते वाट पाहती । करण्या आपणा विनंती । त्यांची नसे होत छाती । म्हणून मी बोललो ।। ६ ।। तैं महाराज म्हणती थांब जरा । आग्रह नको करूंस खरा । भोजन आज चौथे प्रहरा । माझें होणार आहे रे ।। ७ ।। मर्जी असल्यास थांबावें । ना तरी खुशाल जेवावें । नैवेद्य घेऊन घरा जावें । पर्वा नाहीं त्याची मला ।। ८ ।। ऐसा प्रकार तेथें झाला । तो इतक्यांत भाऊ आला । समर्थ पाहतां आनंदला । भाऊ आपल्या मानसीं ।। ९ ।। दुरावलेली माय जेवीं । बाळकें दृष्टी पहावी । झालें असे पहा तेवीं । भाऊ कवराकारणें ।। ११० ।। समर्थांसी नमस्कार । केला साष्टांग साचार । उभा राहिला जोडोनी कर । वाट पहात आज्ञेची ।। ११ ।। त्या भाऊस पाहून । समर्थे केलें हास्यवदन । बरेंच दिलेस आमंत्रण । ही कां वेळ जेवण्याची ? ।। १२ ।। तुझ्या भाकेंत गुंतलो । मी उपोषित राहिलों । नाहीं अजून जेवलों । आण तुझी शिदोरी ।। १३ ।। ऐसें महाराज बोलतां । हर्षलासे कवर चित्ता । म्हणे काय करू गुरुनाथा । गाडी चुकली बाराची ।। १४ ।। कवरास म्हणे बाळाभाऊ । आता नको दु:खित होऊं । काय आणले आहेस पाहूं ? । समर्थांसी जेवावया ।। १५ ।। ऐसे ऐकतां सत्वरीं । कांदे भाजी भाकरी । कवरानें ठेविल्या समोरी । स्वामी गजाननाच्या ।।१६ ।। त्यातील भाकरी दोन । समर्थे केल्या भक्षण । एकीचा तो प्रसाद म्हणून । अवघ्या भक्तां वाटिली ।। १७ ।। तो प्रकार पाहतां । आश्चर्य झाले समस्तां । कळली स्वामींची योग्यता । खरेंच भक्तवत्सल तें ।। १८ ।। जेवीं हस्तिनापुरांत । भगवंतानें ठेविला हेत । सोडून पक्वान्नाप्रत । विदुराच्या हुलग्यावरी ।। १९ ।। तैसेंच येथें आज झाले । आमचें पक्वान्न नाही रुचलें । भाकरीवरी गुंतलें । चित्त कवराच्या स्वामींचें ।। १२० ।। भाऊंनीहीं घेतला । समर्थप्रसाद शेगांवला । सद्भाव जेथें उदेला । तेथें ऐसेच होणार ।। २१ ।। समर्थ बोलले कवरासी । जा आतां अकोल्यासी । पास होशील पुढचे वर्षी । तूं डॉक्टरी परीक्षेत ।। २२ ।। भाऊ म्हणें गुरुराया । आपली असूं द्यावी दया । यावीण दुसरें मागावया । मी न आलो ये ठायीं ।। २३ ।। आपुले हे दिव्यचरण । हेच माझें धनमान । सर्वदा घडो चिंतन । आपल्या दिव्य मूर्तीचे ।। २४ ।। ऐसे बोलून अकोल्याला । भाऊ कवर निघून गेला । समर्थ आपल्या भक्ताला । नुपेक्षिती कधीहीं ।। २५ ।। शेगांवीचा राहणार । तुकाराम शेगोकार । एक होता भाविक नर । कृषिकर्म करीतसे ।। २६ ।। घरची गरिबी होती

खरी । काम करोनी शेतांतरी । अस्तमानाचे अवसरी । दर्शना यावें मठांत ।। २७ ।। चिलीम द्यावी भरून । घ्यावें पदाचें दर्शन । कांही वेळ बसून । जावें पुन्हा शेतातें ।। २८ ।। ऐसा नित्यक्रम तयाचा । बहुत दिवस चालला साचा । घाला विचित्र दैवाचा । तो न कोणा सोडितसे ।। २९ ।। जें जें असेल दैवात । तें तें श्रोते घडून येत । एके दिनी शेतात । असतां तुकाराम आपुल्या ।। १३० ।। तो एक आला शिकारी । बंदुक ज्याच्या खांद्यावरी । नेम धरून ससे मारी । छर्रे घालून बंदुकींत ।। ३१ ।। ती प्रभातीची होती वेळा । सूर्य नुकतां उदयाला । तुकाराम होता बसला । आपुल्या शेती शेकत ।। ३२ ।। तों त्याच्या मागें कुपाटिला । एक होता बसलेला । ससा शुभ्र तोचि पडला । शिकाऱ्याच्या दृष्टीसी ।। ३३ ।। त्याची शिकार करण्या भली । शिकाऱ्यानें आपुली । नेम धरून झाडीली । खांद्यावरील बंदुक ।। ३४ ।। त्यायोगें ससा मेला । एक छर्रा लागला । त्या तुकाराम माळ्याला । कानामागें अवचित ।। ३५ ।। छर्रा मोठा जोरदार । मस्तकीं शिरला अखेर । थकले अवघे डॉक्टर । प्रयोग करून त्याचेवरी ।। ३६ ।। कांहीं केल्या निघेना । छर्रा तो डॉक्टरांना । होऊं लागल्या यातना । तुकारामासी अतिशय ।। ३७ ।। मस्तक दुखे अहोरात्र । निद्रा न लागे किंचित् । नवस सायास केलें बहुत । परी गुण येईना ।। ३८ ।। ऐशाही अवस्थेत । यावें त्यानें मठांत । तो समर्थांचा एक भक्त । ऐसे बोलला तयाला ।। ३९ ।। डॉक्टर वैद्य सोडा आतां । साधुचिया सेवेपरता । नाही उपाय कोणतां । उत्तम या जगांमध्यें ।। १४० ।। कृपा त्यांची झाल्यास । चुकेल हा तुझा त्रास । झाडीत जा आसपास । या मठाच्या नित्य तूं ।। ४१ ।। तेव्हां सेवाही घडेल । पुण्य तेंही लाधेल । कृपा झाल्या होशील । त्रासापासून मोकळा ।। ४२ ।। मात्र आपुल्या पित्यापरी । दांभिकतेनें हे न करीं । शुद्ध भाव अंतरीं । सर्वकाळ धरावा ।। ४३ ।। तें तुकारामासी मानवलें । झाडणें त्यानें सुरू केलें । अवघ्या मठास ठेविलें । स्वच्छ त्यानें आरशापरी ।। ४४ ।। ऐसी चौदा वर्षे झालीं । तुकारामाची सेवा भली । तई गोष्ट घडून आली । ऐशा रीति श्रोते हो ।। ४५ ।। झाडतां झाडतां कानांतून । छर्रा पडला गळून । जैसी कां ती भोकरांतून । दाबितां सुटे आंठोळी ।। ४६ ।। तैसे साच येथें झालें । छर्रा पडतां थांबलें । दुखावयाचें मस्तक भलें । ऐसा प्रभाव सेवेचा ।। ४७ ।। ही सेवा झाडण्याची । अखेरपर्यंत केली साची । प्रचीतिवीण कवणाची । परमार्थी न निष्ठा बसे ।। ४८ ।। ती एकदां बसल्यावर । मग मात्र होते स्थिर । संतसेवा महाथोर । हे भाविक जाणती ।। ४९ ।। स्वस्ति श्रीदासगणूविरचित । हा श्रीगजानन विजय नामें ग्रंथ । तारक होवो भाविकांप्रत । भवसिंधुमाझारी ।। १५० ।। शुभं भवतु । श्रीहरिहरार्पणमस्तु ।।

।। इति श्री गजानन विजय ग्रंथस्य षोडशोऽध्याय: समाप्त: ।।

# अध्याय सतरावा प्रारंभ

श्रीगणेशाय नमः ।। जयजयाजी महामंगला । जयजयाजी भक्तपाला । जयजयाजी तमालनीला । पतितपावन नरहरे ।। १ ।। हिरण्यकश्यपू महाक्रूर । सज्जनांचा शत्रू थोर । तयाचें तूं फाडून उदर । मरण त्याचें साधिलें ।। २ ।। प्रल्हाद रक्षणासाठीं । तूं जन्मलास स्तंभापोटी । रूप अनुपम जगजेठी । धारण तें करून ।। ३ ।। दांत दाढा भयंकर । आयाळ रुळे मानेवर । नेत्र जेवीं खदिरांगार । ब्रह्मांड जाळू पाहती ।। ४ ।। त्या भयंकर रूपाची । भीति नसे भक्ता साची । पिलें जेवीं वाघिणीची । अंगावर खेळती तिच्या ।। ५ ।। तुम्हां पाहून देवराया । लक्ष्मी न धजे पुढें यावया । ऐशा स्थितीत लागला पाया । भक्त तुझा नरहरे ।। ६ ।। तूं भक्तवत्सल लक्ष्मीकांत । ऐसें सांगत आलें संत । पुरविशी भक्तमनोरथ । नाहीं न त्यासी म्हणसीं कदा ।। ७ ।। त्या आपुल्या ब्रीदासी । जाग आतां हृषीकेशी । दासगणू लागला पायांसी । अभय असू दे पांडुरंगा ।। ८ ।। गजाननाचे परमभक्त । होते कांहीं अकोल्यांत । तयांचिया सदनाप्रत । हमेशा यावें समर्थांनीं ।। ९ ।। चापडगांवचे बापू कृष्ण । खटाऊ शेटाचें कुटुंब जाण । गोंडुलालाचा नंदन । बच्चुलाल नाम ज्याचें ।। १० ।। जीजीबाई पंडित । आणीकही होते बहुत । त्यांची नांवे तुम्हांप्रत । किती सांगू विबुध हो ।। ११ ।। एके वेळीं अकोल्यांत । आले गजानन स्वामी समर्थ । खटाऊच्या गिरणींत । मुक्काम त्यांनी ठेविला ।। १२ ।। एक भक्त मलकापुरी । विष्णुसा नामें निर्धारी । त्याच्या वाटलें अंतरीं । समर्थ आणावें मलकापुरा ।। १३ ।। त्यानें आमंत्रणाचा वशिला । भास्कराच्या द्वारे लाविला । हाच भास्कर होता झाला । समाधिस्थ अडगांवी ।। १४ ।। तो त्या वेळी होता जवळ । करी कारभार अंगे सकळ । विष्णुसाला होते बळ । याच भास्कर पाटलाचे ।। १५ ।। भास्कर म्हणे मलकापुरी । चला समर्था लवकरी । भक्त विष्णुसाच्या घरीं । बोलावण्यास आला तो ।। १६ ।। मनोरथ येथील भक्तांचें । तुम्ही पुरविलें असती साचे । आतां मलकापुरीचे । लोक वाट पाहती ।। १७ ।। तईं समर्थ म्हणाले भास्करा । सध्यांच मी मलकापुरा । येत नाही जाण खरा । तूं आग्रह करूं नको ।। १८ ।। फार आग्रह करशील । तरी फजीत पावशील । याचा विचार करी खोल । मी न बोललो कांहींतरी ।। १९ ।। दोरीसी दिधल्या फार ताण । ती मध्येंच तुटतसे जाण । मी न हलणार येथून । तूं या फंदांत पडूं नको ।। २० ।। भास्कर बोले त्यावरी । कांही असो मलकापुरी । चला विष्णुसाचे

घरी। हीच विनंती गुरुराया ! ।। २१ ।। मी तुमचा लाडका । मसी धक्का देऊं नका । मी भरवंसा दिला देखा । तुम्हां घेऊनि येण्याचा ।। २२।। ती प्रतिज्ञा माझी पुरी । तुम्ही करावी आज खरी । चला आतां स्टेशनावरी । गाडीत बसावयाकारणें ।। २३ ।। ऐसा आग्रह करून । घेऊन आला गजानन। मलकापुराकारण। न्यावयासी श्रोते हो ! ।। २४ ।। भास्करानें विनवणी । स्टेशनमास्तरा करोनी। बारा जणांचा डबा त्यांनी । खाली करविला संतास्तव ।। २५ ।। महाराज तैसेच बैसलें । ते न कांहीं बोलले । जागेवरून नाही उठले । गाडी सुटेपर्यंत ।। २६ ।। तो गाडी सुटण्याचा। घंटा झाला अखेरीचा । डोळा चुकवून भास्कराचा । लीला केली ऐशा रीति ।। २७ ।। जो डबा मोकळा केला। तो त्यांनी सोडून दिला। योगीराज जाऊन शिरला । बायकांच्या डब्यामध्यें ।। २८ ।। आधीच मूर्ति दिगंबर । स्त्रिया घाबरल्या असती फार । त्यांनी वर्दी अखेर । दिली असे पोलिसाला ।। २९।। पोलिसांचा अधिकारी । तेथें आला सत्वरीं । महाराजाला धरून करीं । खालीं ओढूं लागला।। ३०।। अरे वेड्या नंग्या पीरा। अक्कल कैसी तुज ना जरा । बायकांच्या डब्यांत खरा । येऊन कैसा बैसलास? ।। ३१ ।। हिसडा देऊन त्याच्या हाता । तेथेच बैसले तत्त्वतां । अधिकाऱ्याची भीति चित्ता । मुळीं न त्यांच्या वाटली ।। ३२ ।। मग तो अधिकारी भला । स्टेशनमास्तराकडे गेला । म्हणे डब्यापाशी आतां चला । बायकांच्या माझ्यासवें ।। ३३।। दोघे डब्याजवळ आलें। तों मास्तराने पाहिलें । योगीराज बसलेलें । बायकांच्या डब्यात ।। ३४।। मास्तर पोलिसाच्या अधिकाऱ्याला। ऐशा रीति बोलला । तुम्ही जाऊं द्यावे याला । याच डब्यांत बसून ।। ३५ ।। हा आहे संत थोर। चालता बोलता ईश्वर । याच्या हातें न होणार । गुन्हा तो केव्हाही ।। ३६ ।। तें ऐकून अधिकारी । बोलता झाला ऐशापरी। मी दिली आहे तार खरी। येविषयी वरिष्ठाला ।। ३७ ।। आतां माझ्या हातांत । कांहीं न राहिलें यत्किंचित् । मी वर्दी दिली तुम्हांप्रत । तुम्ही वाटेल तें करा ।। ३८।। स्टेशनमास्तरांनी। आपली टोपी काढूनी । बहु आदर दाखवोनी । विनंती केली महाराजा ! ।। ३९।। तुम्ही खालीं उतरावें । माझें एवढें ऐकावें । कायद्याचें आणावें । प्रयोजन आपुल्या मानसीं।। ४०।। महाराज उतरलें खालती । पुढें खटला भरला त्यांचेवरती । कायद्याप्रमाणें निश्चिती। जठारसाहेबासमोर ।। ४१ ।। त्यांनी फिर्याद घेतली । त्याची तारीख नेमली । शेगांवावरती भली। चौकशीची श्रोते हो! ।। ४२ ।। बापूसाहेब जठार । आले शेगांवाच्यावर । डाक बंगल्यात झाले स्थिर । करण्या चौकशी खटल्याची ।। ४३ ।। व्यंकटराव देसाई । अकोल्याचे होते पाही। तेही आले त्या ठायी । कांहीं कामानिमित्त ।। ४४ ।। महाराजांच्या खटल्याची। गांवीं पुकार झाली साची। म्हणून मंडळी शेगांवाची । फार मिळाली बंगल्यावर

।। ४५ ।। तैं देसाई म्हणती जठारास । आज कोणता खटला विशेष । तुम्हांपुढें आहे खास । म्हणून मिळाले लोक हें ।। ४६ ।। जठार म्हणालें त्यातें । याचें कारण तुम्हांतें । कैसे न कळलें? वाटतें । हेंच मला आश्चर्य! ।। ४७ ।। तुमचें स्वामी गजानन । नंगे फिरती म्हणून । पोलिसांनी भरून । हा खटला पाठविला ।। ४८ ।। त्या खटल्याची चौकशी । होणार आहे आज दिवशी । म्हणून वाटतें ऐसें मसी । लोक हे जमले असावेत ।। ४९ ।। हें ऐकतां भाषण। व्यंकटराव झाले खिन्न । बोलते झाले कर जोडून। खटला हा न चालवावा ।। ५० ।। श्रीगजाननसाधुची। योग्यता आहे थोर साची। ती मूर्ति भगवंताची । आहे पाहा प्रत्यक्ष ।। ५१ ।। तो विदेही पुरुष जाणा । बंधन त्याला कशाचें ना । तो योग्यांचा योगीराणा। वंदनीय अवघ्यांतें ।। ५२ ।। खटला भरला हीच केली । पोलिसांनी चूक भलीं । ती पाहिजे दुरुस्त झाली । आज आपुल्या करानें ।। ५३ ।। जठार म्हणती वकिलाला । तुम्हीं जाणता कायद्याला। याचा पाहिजे होता केला। विचार तो पोलिसांनीं ।। ५४ ।। कारकुना म्हणती बोलावणें। धाडा गजाननाकारणें । तें ऐकूनी एक त्यानें । जवान पोलिस पाठविला ।। ५५ ।। तो येऊन समर्थांसी। म्हणे चला आतां कचेरीसी । अधिकाऱ्यानें तुम्हांसी । मज धाडिलें बोलावण्या ।। ५६ ।। बऱ्या बोलानें चलावें । फजितीस ना करून घ्यावें। ना तरी मला लागेल न्यावें । तुमच्या हाता धरून।। ५७।। तई वदले गजानन । आम्हीं न उठू येथून। तुझें पहातों शिपाईपण । ये धरी माझ्या करा ।। ५८ ।। शिपायाचा हात धरिला । तो ना सुटे किमपि त्याला । रक्तप्रवाह बंद झाला। त्या दाबाच्या योगानें ।। ५९।। हातासी लागली कळ । जीव झाला व्याकुळ। करूं लागला तळमळ। शिपाई तो त्याच ठाई ।। ६० ।। शिपायासी वेळ झाला । म्हणून पाठविले वकिलाला । त्या व्यंकटराव देसायाला। समर्थांसी आणावया ।। ६१ ।। जठार म्हणती तुम्हीं जावें । समर्थांसी घेऊन यावें। लोकांसी न जमूं द्यावे । बंगल्याभोंवती निरर्थक ।। ६२।। इतक्यांत आला समाचार । पोलिसाचा धरला कर । बसविला एक्या जागेवर। महाराजांनी सहजलीलें ।। ६३।। मग देसाई तेथें आलें । त्यांच्या भक्तांसी बोललें । या वेळीं नेसविलें। पाहिजे समर्था धोतर ।। ६४ ।। ऐसा सल्ला मिळतांक्षणी। धोतर नेसविले भक्तांनी । तें टाकिले सोडोनीं । समर्थांनी रस्त्यांत ।।६५।। गेले नागवे कचेरीस। सवें होता भास्कर शिष्य । जठारांनी पाहतां त्यांस । दिली खुर्ची बसावया ।। ६६ ।। या महाराज बसा येथ । तुम्ही नागवे गांवांत । कां फिरतां सदोदित । हे कांहीं बरें नव्हे !।। ६७ ।। नागवे फिरणें हाच गुन्हा । कायद्यांनी ठरविला जाणा । म्हणून विनंती आपणा। द्या हे सोडून नंगेपण ।। ६८।। ऐसे जठाराचें भाषण । घेतलें स्वामींनी ऐकून । आणि केलें हास्यवदन । उत्तर त्यासी द्यावया ।। ६९।। तुला काय

करणें यासी । चिलीम भरावी वेगेंसी । उगीच नसत्या गोष्टींशी । महत्त्व न यावें निरर्थक ।। ७० ।। तें ऐकतां भाषण । जठार गेलें विरघळोन । जनरीतीचें याला भान । मुळींच नाहीं राहिलें ।। ७१ ।। हा वृषभदेव भागवतीचा । किंवा शुकाचार्य साचा । किंवा वामदेवाचा । हा दुसरा अवतार ।। ७२ ।। हा निजानंदीं सदा रत । खचित आहे जीवन्मुक्त । नये लावितां याप्रत । गुन्हा विचारे केंव्हांही ।। ७३ ।। जेवीं अग्नीचा अग्नीपणा । अग्नि सोडित नसे जाणा । परी अग्निहोत्र्यांना । कुंडांत ठेवणें भाग त्यासी ।। ७४ ।। अग्निदेव म्हणोन । ठेविल्या कुंडावाचून । तो करील दग्ध सदन । हा दोष त्याचा नसे ।। ७५ ।। तैसे यांचे नागवेपण । आहें अग्नीचें समान । म्हणून यांचा शिष्यगण । आहे अपराधी येविषयीं ।। ७६ ।। वस्त्ररूपीं कुंडाठायीं । जरी हा ठेविला असतां पाहीं । तरी हरकत नव्हती कांहीं । सर्वांस सुखद होतें तें ।। ७७ ।। ऐसा विचार पूर्ण केला । जठारांनी चित्ती भला । आणि हुकूम फर्माविला । त्यांनीं पुढीलप्रमाणें ।। ७८ ।। महाराज मूळचे जीवन्मुक्त । त्या ठेवणें व्यवस्थित । भास्कराचे काम सत्य । होतें न तें केलें त्यांनीं ।। ७९ ।। म्हणून मी भास्कराला । पांच रुपये दंड केला । ऐसा खटल्याचा निकाल झाला । जठारांपुढें शेगांवीं ।। ८० ।। समर्थ म्हणालें भास्करासी । पुन्हां ऐशा आग्रहासी । करशील कां सांग मशीं । निज फजिती करून घ्याया ? ।। ८१ ।। भास्कर कांहीं न बोलला । मौन धरून राहिला । तेथोन मंडळींनीं केला । ऐशा प्रकारे विचार ।। ८२ ।। समर्थांसी अग्निरथीं । न बसवा येथून कल्पांती । विनाकारण कटकटी होती । तें कांहीं बरें नव्हें ।। ८३ ।। हा क्रम कित्येक दिवस । चालला असे शेगांवास । भक्त बैलांच्या गाडीस । बसवूं लागले महाराजा ।। ८४ ।। या रीती अकोल्यासी । आले एकदां पुण्यराशी । बापुरावाच्या सदनासी । जाऊनिया उतरलें ।। ८५ ।। याच वेळीं यवन जातीचा । साधु महेताबशा नांवाचा । होता कुरूम गांवीं साचा । मूर्तिजापुरासन्निध ।। ८६ ।। त्यानें बापुरावाप्रती । सांगितलें होतें ऐशा रीति । जेंव्हा समर्थ अकोल्यास येती । तेव्हां आम्हां कळवावें ।। ८७ ।। अकोल्यांत आल्यावर । श्रीगजानन साधुवर । बापुरावानें सत्वर । मनुष्य धाडिला कुरूमासी ।। ८८ ।। तो ऐशा रीती घडून आलें । महेताबशा येण्या निघाले । अकोल्यास याया भलें । समर्थांसी भेटावया ।। ८९ ।। अकोल्याचा मनुष्य । मध्यें भेटला रस्त्यास । जो आला होता न्यावयास । महेताबशा कारणें ।।९० ।। तो मनुष्य भेटतांक्षणीं । कीं पुसूं लागले मधुरवचनीं । त्या मनुष्यालागुनीं । महेताबशा श्रोते हो ।। ९१ ।। तूं न जावें कुरूमाला । बैस आमच्या गाडीला । आपण जाऊं स्टेशनाला । मीच आहे महेताबशा ।। ९२ ।। पाहा संत आल्याचें वर्तमान । कळलें संतालागून । कोणी न सांगतां जाण । त्रिकालज्ञ ते खरोखरीं ।। ९३ ।। महेताबशाच्या

संगाते । दोन चार यवन होते । अवघे येऊन सदनातें । उतरले बापुरावाच्या ।। ९४ ।। दुसरे दिवशीं प्रात:काळा । महेताबशा होता जेथें बसला । महाराज आलें तया स्थळा । निजलीलें करून ।। ९५ ।। महेताबशाचे धरून केस । समर्थांनी ताडिले त्यास । त्या ताडण्याचा उद्देश । हाच होता विबुध हो ।। ९६ ।। यवनजातींत जन्मून । कांहीं न केला उपयोग जाण । यवनाचे आडदांडपण । नाहीं अजून गेलें रे ।। ९७ ।। या आडदांडपणानी । तत्त्वघात होईल जाणी । मृत्युलोकीचे अवघे प्राणी । चिंताग्रस्त होतील ।। ९८ ।। तुझें महेताब आहे नांव । त्याची काय आठवण ठेव । द्वेषरूपी तमा वाव । तुझ्यापुढें मिळूं नये ।। ९९ ।। हा द्वेषरूपी अंधार । वाढत चालला वरचेवर । याची नाहीं तुला खबर । म्हणून तुजला ताडिलें ।। १०० ।। ऐसा मिळतां इशारा । महेताबशा तोषला खरा । साधुच साधूच्या अंतरा । जाणताती नि:संशय ।। १ ।। जेव्हां महेताबशातें ताडिलें । तई संगतीचे यवन भलें । कावरेबावरे होते झालें । तो प्रकार पाहून ।। २ ।। महेताबशा बोलला त्यासी । तुम्ही न राहावें आम्हांपासी । जावें निघून कुरूमासी । हेंच आहे उत्तम ।। ३ ।। शेख कडू शिवाय जाण । गेले चौघे निघून । तों द्यावयासी आमंत्रण । बच्चुलाल पातला ।। ४ ।। म्हणें उद्यां दयाघना ! । यावें तुम्ही भोजना । या दासाचिया सदना । हीच आहे विनंति ।। ५ ।। दुसरे दिवशीं तांग्यांत । बसवुनी समर्थांप्रत । मोठ्या थाटानीं मिरवित । निज सदना आणिले ।। ६ ।। परी समर्थ तांग्याखालीं । उतरले नाहींत मुळीं । तेणें मंडळी चिंतावली । म्हणें कां न उतरती हे ।। ७ ।। तसाच तांगा नेला परत । बापुरावाच्या सदनाप्रत । मंडळी पडली घोटाळ्यांत । समर्थे ऐसें कां केलें ? ।। ८ ।। काल आमंत्रण घेतलें । आज तांग्याखाली न उतरले । याचे कारण शोधिते झाले । आपापल्या बुद्धीनें ।। ९ ।। त्यांत होता एक धूर्त । तो बोलला अवघ्यांप्रत । मला समजले इंगित । या गोष्टीचे ये वेळां ।। ११० ।। महेताबशाला वगळीलें । म्हणून महाराज नाहीं उतरलें । भोजनाचें कां न केलें । महेताबशाला आमंत्रण ।। ११ ।। आतां घेऊन दोघांसी । बसवून एका तांग्यासी । म्हणजे ते निश्चयेसीं । उभयतांहीं येतील ।। १२ ।। तेंच वाक्य खरें झालें । दोघांलाही मिरवित नेलें । महेताबशाला उतरविले । मंदिराजवळील थेटरांत ।। १३ ।। श्रीरामाच्या मंदिरी । गजाननाची उतरली स्वारी । परी तेही गेले अखेरी । उठोनिया थेटरांत ।। १४ ।। अवघ्यांची झाली भोजनें । मग महेताबशा लोकांस म्हणे । मला तुम्ही तिकिट देणे । पंजाबचें काढून ।। १५ ।। तैं शेख कडू बोलला । त्या महेताबशा फकिराला । तुम्ही कुरूमच्या मशिदीला । टाकून कैसे जातां हो ? ।। १६ ।। ती मशीद बांधून । पंजाबाशी जावें आपण । काम अर्धे टाकून । जाणें उचित नसे तुम्हां ।। १७ ।। महेताब शेख कडूशीं । बोलता

झाला प्रेमेशीं । आग्रह धरूं नका मशीं । ये वेळीं निरर्थक ।। १८ ।। गजाननाचा हुकूम झाला । मजसी पंजाबांत जाण्याला । आतां एक क्षणही या स्थळा । मी न राहूं शके हो ।। १९ ।। समर्थांच्या कृपेकरून । मशिदीचें काम पूर्ण । होईल माझे हे वचन । सत्य तुम्ही मानावे ।। १२० ।। धर्माविषयी द्वैत । संताठाई नसतें सत्य । तें अवघ्या धर्माप्रत । समसमान मानिती ।। २१ ।। खुळें देऊळ मशिदीची । तुम्ही नका वाढवूं साची । ती वाढतां दोघांची । आहे हानि होणार ।। २२ ।। सामान देऊळ मशिदीचें । एकची आहे साचें । आकारानें भिन्नत्व त्याचें । मानून भांडू नये हो ।। २३ ।। यवन तेवढा खुदाचा । आणि हिंदु काय भूताचा ? । पोक्त विचार करा याचा । मनुष्यपण टिकवावया ।। २४ ।। तरीच होईल कल्याण । हिंदु आणि मुसलमान । हे एकाच देवापासून । निर्माण असती जाहले ।। २५ ।। धर्म बापा ज्याचा त्यांनी । प्रिय मानावा प्राणाहुनी । परी विधर्म्यांच्या ठिकाणीं । अलोट प्रेम धरावें ।। २६ ।। हें न झालें जोंवरी । सौख्य लांब तोवरी । जा मशीद होईल पुरी । गजाननाच्या कृपेनें ।। २७ ।। महेताबशा निघून गेले । पुन्हां न इकडे परत आले । या गोष्टीचें पाहिजे केलें । मनन हिंदुयवनांनी ।। २८ ।। पाहा महेताबशाला जरी । ताडिते झाले साक्षात्कारी । परी द्वेष नव्हता अंतरी । प्रेम अलोट होते हो ।। २९ ।। शहालागीं घेतल्याविना । भोजना न गेला योगीराणा । हे मुद्दे मनीं आणा । या गोष्टीचें श्रोते हो! ।। १३० ।। असो या बापुरावाची । कांता एक होती साची । तिला भानामतीची । बाधा होती विबुध हो ! ।। ३१ ।। मळवट यावा घटकेंत । घटकेमाजी कंठी तात । घटकेमाजी वस्त्राप्रत । अग्नी तो लागावा ।। ३२ ।। बिब्याच्या पाठीवर । फुल्या याव्या अपरंपार । कधी दांडीवरील चीर । जळून जावें अकस्मात ।। ३३ ।। या भानामतीच्या त्रासांनी । ती बापुरावाची कामिनी । क्षीण गेली होवोनी । अन्नपाणी न रुचे तिला ।। ३४ ।। भानामती काढण्याला । बापुरावे जाणत्याला । आणलें बाहून अकोल्याला । परी न झाला उपयोग ।। ३५ ।। खर्चही झाला अतोनात । गुण न आला किंचित् । अखेर त्यानें जोडिले हात । श्रीगजानन स्वामीला ।। ३६ ।। महाराज माझ्या कुटुंबाला । भानामतीचा त्रास झाला । केलें नाना उपायाला । आतां मात्र कंटाळलो ।। ३७ ।। तुझीं पाऊलें माझ्या घरा । आज लागलीं गुरुवरा ! । तेथेच कां आसरा । भानामतीस मिळावा ? ।। ३८ ।। ज्या दरींत पंचानन । बसला आहे येऊन । तेथेच कां ओरडून । दिमाख दाखवावा कोल्ह्यांनीं ।। ३९ ।। जेथें कस्तुरी दरवळली । तेथेंच कां हो राहावी भली । गुरुराया ही ओंगळी । घाण भानामतीची ।। १४० ।। ऐसी विनंती ऐकून । गजाननांनी अवलोकन । केले निजकृपे करून । बापुराव कांतेला ।। ४१ ।। त्यायोगें श्रोते तिची । भानामती निमाली साची । नाही किंमत माकडाची ।

सिंहाचिया पुढें हो ।। ४२ ।। असो एकदां फिरत फिरत । महाराज आले आकोटांत । नरसिंगजीला भेटण्याप्रत । बंधु आपला म्हणोनी ।। ४३ ।। त्याच्या मठाशेजारीं । एक विहीर होती खरी । जाऊन त्या विहिरीवरी । बसले गजानन महाराज ।। ४४ ।। पाय आंत सोडिलें । डोकावून पाहूं लागले । आंतील जलालागीं भलें । वरच्यावरी श्रोते हो ।। ४५ ।। पाहून त्यांची ऐशी कृति । लोक साशंक झाले चित्ती । नरसिंग महाराज विचारती । अरे हे काय करतोस ? ।। ४६ ।। गोदा यमुना भागीरथी । तुम्हांसाठी येथें असती । आणखीं तीर्थे आहेत किती ? । हें पाहातों डोकावून ।। ४७ ।। तुला त्यांचें घडते स्नान । मी कां राहूं तसाच जाण ? । या तीर्थांनी मला स्नान । आज येऊन घालावें ।। ४८ ।। त्यांनी स्नान घातल्याविना । मी न येथून हले जाणा । ऐशा ऐकून भाषणा । कैक म्हणाले या रीति ।। ४९ ।। खरोखरी हा आहे पिसा । शेगांव नादीं लागला कैसा । जरा थांबा येथेंच बसा । काय करी हा पाहूं पुढें ।। १५० ।। तों विहिरीतील जलांप्रत । उकळ्या उठल्या अगणित । श्रोते एका निमिषांत । विहीर भरली पाण्यानें ।। ५१ ।। हजारी कारंजाच्या परी । गजाननाच्या अंगावरीं । वर्षू लागलें पाहा वारी । त्या विहिरीचें तेधवां ।। ५२ ।। लोकां म्हणती गजानन । यारे स्नानालागून । नाही उरलें प्रयोजन । विहिरीमाजी उतरण्याचें ।। ५३ ।। गंगा यमुना गोदावरी । वरती आली आहे खरी । स्नान साधा ये अवसरीं । या पुण्य सरितेचें ।। ५४ ।। भाविकांनी केले स्नान । निंदकांनीं खाली मान । घातली तो पाहून । प्रकार त्या पाण्याचा ।। ५५ ।। संत जें जें आणती मनीं । तें तें पुरवी चक्रपाणी । त्यांच्या वाणीलागुनीं । असत्यता न दे परमात्मा ।। ५६ ।। स्नान होतां समर्थ उठलें । पाणी पहिल्यापरी झालें । विहिरीच्या त्या तळास गेलें । उकळ्या बंद जाहल्या ।। ५७ ।। नरसिंगजीसी भेटून । निघून गेले दयाघन । शेगांवासी बैसून । मनोवेगाच्या वारूवरी ।। ५८ ।। स्वस्ति श्रीदासगणूविरचित । हा श्रीगजानन विजय नामें ग्रंथ । तारक होवो भवाब्धींत । भाविक भक्तांकारणें ।। १५९ ।। शुभं भवतु ।। श्रीहरिहरार्पणमस्तु ।।

।। इति श्रीगजानन विजय ग्रंथस्य सप्तदशोऽध्यायः समाप्तः ।।

# अध्याय अठरावा प्रारंभ

श्रीगणेशाय नमः ।। जयजयाजी चिद्विलासा । हे गोविंदा श्रीनिवासा । हे आनंदकंदा परेशा । पाहि माम् दीनबंधो ।। १ ।। हे केशवा केशीमर्दना । हे माधवा मधुसूदना । हे पूतनाप्राणशोषणा । पांडुरंगा रुक्मिणीपते ।। २ ।। काय माझ्या आहे मनीं । तें तूं जाणसी चक्रपाणी । तेंच कां रे तुजलागुनी । बोलून दावूं पद्मनाभा ।। ३ ।। भक्त जी जी इच्छा करी । ती तूं पुरविसी श्रीहरी । ऐसें पुराणाभीतरीं । आहे वर्णन बहुसाळ ।। ४।। म्हणून माझ्या मनोरथा । पूर्ण करा पंढरीनाथा । सोडा मनीची कठोरता । दासगणू हा तुझा असे ।। ५ ।। आकोटाचे शेजारीं । मुंडगांव नामें एक नगरी । तेथें बायजा नामें खरी । समर्थांची भक्तीण असे ।। ६ ।। हळदी माळ्याच्या वंशांत । इचा जन्म झाला सत्य । शिवराम नामें इचा तात । भुलाबाई जननी असे ।। ७ ।। बायजाचे बाळपणीं । लग्न झालें होतें जाणी । ललाटीं जें विधात्यांनीं । लिहिलें असेल तेंच घडे ।। ८।। बायजा आली तारुण्यांत । गर्भाधान करण्याप्रत । घेऊन गेला तिचा तात । जामाताच्या गृहासी ।। ९ ।। परी उपयोग नाहीं झाला । जामात षंढ होता भला । तेणें जनकजननीला । शोक झाला अनावर ।। १०।। बायजेकडे पाहून । जननी करी रोदन । माझ्या बाईचें तारुण्य । वांझ पाहूं राहातें ।। ११ ।। भुली म्हणे शिवरामासी । बायजा न ठेवा ऐशी । दुसरा नवरा करून इसी । देणें आहे भाग पाहा ।। १२ ।। शिवराम म्हणे त्यावर । ऐसा नको सोडूं धीर । हा पुरुषत्वाचा प्रकार । खरा एकदम कळेना ।। १३।। कांहीं दिवस वाट पाहूं । नको ऐसी अधीर होऊं । बायजासी येथेंच ठेवूं । तिच्या सासुरवाडीला ।। १४।। नपुंसकत्व अधोपरी । आलें असेल त्याला जरी । तें औषधाने होईल दुरी । वाट पाही यास्तव ।। १५ ।। ऐसें उभयतां बोलून । बायजासी तेथें ठेवून । आले मुंडगांवाकारण । आपुल्या घरातें ।। १६।। बायजाचें वय पंधरा-सोळा । वर्ण काळासांवळा । तारुण्याने मुसमुसलेला । होता जिचा शरीरभाग ।। १७ ।। डोळे नाक पाणीदार । बांधा उंच मनोहर । जिला पाहतां अंतर । कामुकाचें मोहित होई ।। १८।। तिच्या थोरल्या दिरासी । पाहूनिया बायजासी । इच्छा जाहली मानसी । संभोग तिचा करावया ।। १९ ।। त्यानें प्रयत्न केले नाना । वळवावया तिच्या मना । म्हणूं लागला क्षणाक्षणा । ऐसें बायजाकारणें ।। २०।। हताश ऐशी मुळीं न होई । मीच तुला पतीचें ठायीं ।

आमरण करीन पाही । तुझें वेडे संगोपन ।। २१ ।। झुरणें दे हें सोडून । आनंदित ठेवी मन । वेडे आजपासून । मीच नवरा समज तुला ।।२२।। ऐसें त्यानें सांगावें । चाळे नाना करावें । कांहीं आमिष दावावें । चित्त तिचें भुलवावया ।। २३ ।। परी उपयोग होईना । बायजीच्या न हें येई मना । ती म्हणे हे नारायणा ! । कां रे दैन्य मांडलेंस ? ।। २४ ।। बालपणापासून । ध्याइलें मी तुझे चरण । त्याचेंच कां हें मजलागून । फळ दृष्टीं पडावें ? ।। २५ ।। जयाचा मी हात धरीला । तो ना पुरुष कळून आला । दैवयोग समजून चुकला । संसार नशिबीं नाहीं मम ।। २६ ।। बरें झालें तुझ्या ठायीं । चित्त आतां रमेल पाही । कृपा करी रे शेषशायी । स्पर्श पुरुषाचा न होवो मला ।। २७ ।। ज्येष्ठ दीर एके दिवसीं । येता झाला बायजापासीं । आपुला हेतु कळविण्यासी । रात्रीचिया समयाला ।। २८ ।। तो बायजानें इन्कार । करून केलें उत्तर । कैसी लाज तिळभर । नाहीं उरली चित्तीं तुझ्या ।। २९ ।। तूं माझा ज्येष्ठ दीर । पित्यापरीस साचार । सोड हा अविचार । स्वैर ऐसा होऊं नको ।। ३० ।। ह्या तियेच्या भाषणा । तो ना आणी मुळीं मना । होतां कामाची वासना । नीति विलया जातसे ।। ३१ ।। अंगावरी टाकण्या हात । जों तों पाही इतक्यांत । तयाचा तो थोरला सुत । माडीवरून पडला हो ।। ३२ ।। खोक पडली डोक्यासी । बायजेनें धरिले त्यासी । बसवून आपुल्या मांडीसी । औषध लावूं लागली हो ।। ३३ ।। बायजा म्हणे ज्येष्ठ दीरा । या गोष्टीचा विचार करा । अभिलाष तो नाहीं बरा । परस्त्रियेचा केव्हांही ।। ३४ ।। मुलगा पडलेला पाहून । भय पावलें त्याचें मन । अनुताप त्यासी झाला पूर्ण । केलेलिया कर्माचा ।। ३५ ।। त्यानें नाद सोडिला । सदनीं निवांत राहिला । पुढे शिवराम घेऊन गेला । कन्येस आपुल्या मुंडगांवी ।। ३६ ।। भुलाई म्हणे पतीसी । चला जाऊं शेगांवासी । महाराजातें पुसायासी । पुढील भाकीत बायजेचें ।। ३७ ।। तें मानलें शिवरामासी । आला घेऊन कन्येसी । महाराजांतें पुसायासी । आपुल्या त्या कांतेसह ।। ३८ ।। बायजा घातली पायांवर । केली विनंति जोडून कर । कृपा करा या मुलीवर । पुत्र पौत्र द्यावे हिला ।। ३९ ।। तें समर्थांनीं ऐकिलें । शिवरामासी हांसत वदले । अरे नशिबीं नाहीं लिहिलें । विधात्यानें पुत्र हिच्या ।। ४० ।। जेवढे पुरुष जगतांत । तेवढे असती हिचे तात । उगे न पडा फंदांत । लग्न हिचें करण्याच्या ।। ४१ ।। तें ऐकतां शिवरामाला । अनावर शोक झाला । घेऊन त्या बायजाला । परत आला मुंडगांवी ।। ४२ ।। परी त्या समर्थवचनांनीं । बायजा आनंदली मनीं । निष्ठा गजाननाच्या चरणीं । जडली तेव्हांपासून ।। ४३ ।। समर्थांचा एक भक्त । पुंडलीक नामें मुंडगांवात । त्याच्या संगें शेगांवात । बायजा येऊं लागली ।। ४४ ।। पहिल्या

प्रथम अडथळा । जननीजनकें नाहीं केला । शेगांवास जाण्याला । पुंडलीकाचे बरोबर ।। ४५ ।। त्यांना ऐसें वाटलें । साधुचरण इनें धरिलें । तेच तिच्या करतील भले । निजकृपेने कल्याणा ।। ४६ ।। पुरुषत्व देतील जामातासी । अशक्य ना कांहीं संतांसी । ऐसा विचार मानसीं । करून राहिले स्वस्थ ते ।। ४७ ।। पुंडलीकाचे बरोबरी । बायजा जाऊं लागली खरी । तेणें पुकार जगभरी । ऐशा रीतिं जाहली ।। ४८ ।। हें शेगांवच्या वारीचें । ढोंग आहे दोघांचें । तरुणपणीं मानवाचें । मन परमार्थी लागेना ।। ४९ ।। बायजा आहे तरणीज्वान । पुंडलीकासीही तारुण्य । यांची वारी विषयभान । हीच आहे नि:संशय ।। ५० ।। परस्परें प्रीति जडली । विषयसुखाची नवाळी । भोगण्या ही युक्ति केली । वाटते या उभयतांनीं ।। ५१ ।। पुंडलीक जरी माळी असतां । तरी हा संबंध योग्य होता । बायजाच्या धरण्या हाता । कां की तरुण दोघेही ।। ५२ ।। पुंडलीक आहे मराठी । ही माळ्याच्या आली पोटीं । म्हणून यांची ताटातुटी । केलीच पाहिजे जातीस्तव ।। ५३ ।। या दोघांचे अंतर । शुद्ध होतें साचार । नव्हतां कामाचा विकार । मनीं उत्पन्न जाहला ।। ५४ ।। भुलाई म्हणे बायजासी । तूं कां कारटे अहर्निशीं । पुंडलीकाच्या घरा जासी । हें कांहीं कळेना ? ।। ५५ ।। ऐशा तरुण वयांत । तुम्हां कशाचा परमार्थ ? । कोल्हा न राही उपोषित । ऊंसाचिया फडामधीं ।। ५६ ।। वा पाहून बाटुकाला । बैल नाहीं पुढें गेला । कारटें आमुच्या नांवाला । काळें उगें लावूं नको ।। ५७ ।। भुलाई म्हणे नवऱ्यासी । हिला नका ठेवूं ऐसी । लावून द्यावें मोहतरासी । पाहा पोरगा माळ्याचा ।। ५८ ।। ही पुंडलीकाच्या घरी जातें । सदा त्यासी हितगुज करितें । एकमेकां पाहून भरतें । येत दोघां प्रेमाचें ।। ५९ ।। जाऊं चला शेगांवास । घेऊन या कारटीस । सांगूं अवघे महाराजांस । चाळे या बायजीचे ।। ६० ।। संतांसी अवघें कळतें । ते सन्नीतीचे चाहाते । पोटामाजीं कधीं न निघते । चंदनाच्या दुर्गंधी ।। ६१ ।। भुला शिवराम बायजाबाई । पुंडलीक भोकऱ्या आला तोही । चौघे येऊन लागले पायीं । शेगांवीं श्रीसमर्थांच्या ।। ६२ ।। पुंडलीकासी पाहून । बोलूं लागले दयाघन । कीं बायजा तुझी बहीण । पूर्वजन्मीची पुंडलीका ।। ६३ ।। लोक निंदा जरी करिती । तरी अंतर न द्यावे इजप्रती । दोघे मिळून करा भक्ति । सच्चिदानंद हरीची ।। ६४ ।। भुले आपुल्या पोरीस । लावूं नको भलतां दोष । हीं बहीणभाऊ आहेत । मुळींच पूर्वजन्मींचे ।। ६५ ।। शिवाय या बायजांला । कोठेंही न नवरा भला । ही न आली करायाला । संसार मुळीं जगामध्यें ।। ६६ ।। ही राहील ब्रह्मचारी । अशीच गे जन्मभरी । जनाबाई पंढरपुरीं । अशाच रीतिं राहिले गे ।। ६७ ।। तिनें नामदेव गुरू केला । ही शरण आली

आम्हांला । माझ्या जनाबाईला । कोणी न आतां छळावें ।। ६८ ।। ऐसें समर्थांचें भाषण । शिवरामानें ऐकून । गेला असे गहिंवरून । शब्द न कांहीं बोलवे ।। ६९ ।। घेऊन आपुल्या मुलीला । शिवराम मुंडगांवासी आला । पुढें बायजाच्या वारीला । अडथळा कोणी केला नसे ।। ७० ।। महाराज आपुल्या भक्ताप्रत । सदैव रक्षण करितात । तें कसें, ही थोडक्यांत । गोष्ट सांगतों ये ठाईं ।। ७१ ।। भाऊ राजाराम कवर । एक होता डॉक्टर । पाहा खामगांवावर । दवाखान्याचा अधिकारी ।। ७२ ।। त्यास दुर्धर फोड झाला । आणविलें मोठ्या डॉक्टराला । औषधपाणी करायाला । खामगांवा माझारीं ।। ७३ ।। बुलढाणा अकोला उमरावती । येथून डॉक्टर आणिले असती । शस्त्रक्रिया करण्याप्रती । त्या भाऊच्या फोडाला ।। ७४ ।। नाना औषधें पोटांत दिली । विविध पोटीसें बांधिलीं । शस्त्रक्रिया ही असे केली । त्या झालेल्या फोडाला ।। ७५ ।। कशाचा ना उपयोग झाला । फोड वाढूं लागला । वडील बंधूस धाक पडला । त्या भाऊच्या दुखण्याचा ।। ७६ ।। भाऊ तळमळे शय्येवरी । व्याधि असह्य झाली खरी । शेवटीं त्यानें अंतरी । विचार ऐसा केला हो ।। ७७ ।। आतां हाच उपाय । आठवावे सद्गुरुपाय । याविणें दुसरी सोय । कांही नसे राहिली ।। ७८ ।। पडल्या पडल्या जोडी हात । म्हणे धांव धांव हे सद्गुरुनाथ । या लेंकराचा वृथा अंत । किमपि आता पाहूं नको ।। ७९ ।। ऐसी श्रोते विनवणी । करूं लागला क्षणोक्षणीं । रात्र गेली उलटोनी । सुमारे समय एकाचा ।। ८० ।। तमानें भरलें अंबर । रात्रीचा तो शब्द किर्र । कोल्हेहुकेनें कांतार । दणाणून गेलें हो ।। ८१ ।। तों एक दमणी आली । तट्ट्यावरी लागलेली । गाडीस होती जुंपिली । जोडी खिलाऱ्या बैलांची ।। ८२ ।। कंठामाजीं घांगरमाळा । वाजूं लागल्या खळखळा । मागें पुढें सोडिला । होता पडदा दमणीस ।। ८३ ।। दवाखान्याच्या दारापाशीं । दमणी आली निश्चयेंसी । डॉक्टर पाहात होता तिसी । पडून आपल्या शय्येवर ।। ८४ ।। तों एक उतरला । ब्राह्मण दमणीच्या खाली भला । दार ठोठावूं लागला । डॉक्टराच्या बंगल्याचें ।। ८५ ।। डॉक्टराच्या बंधूनी । दार उघडले ते क्षणीं । प्रश्न केला कोठूनी । आपण आलांत ये ठायां ? ।। ८६ ।। ब्राह्मण बोले त्याकारण । माझें गजा नामाभिधान । तीर्थ अंगारा घेऊन । शेगांवाहून आलों मी ।। ८७ ।। डॉक्टर भाऊ कवराला । जो कां आहे फोड झाला । हा अंगारा पाठविला । लावण्या त्या फोडासी ।। ८८ ।। प्यावयासी दिलें तीर्थ । हें घ्या आपुल्या हातांत । मी जातों आतां परत । वेळ न मशीं राहावया ।। ८९ ।। तीर्थअंगारा देऊन । निघून गेला ब्राह्मण । त्या शोधायाकारण । भाऊनें शिपाई पाठविला ।। ९० ।। परी न पत्ता लागला । गाडी न दिसली

कवणाला । भाऊ मनीं घोटाळला । कशाचा ना तर्क चाले ।। ९१ ।। फोडास लावितां अंगारा । तो तात्काळ फुटला खरा। येऊं लागला भराभरा । पूं त्या श्रोते फोडांतून ।। ९२।। एक घटका गेल्यावर। पूं गेला निघून पार। पाहा किती आहे जोर । समर्थांच्या अंगाऱ्याचा ! ।। ९३।। भाऊस निद्रा लागली । व्याधी पुढें बरी झाली। हळुं हळुं शक्ति आली । भाऊ झाला पूर्ववत्।। ९४ ।। दर्शना गेला शेगांवास । तों समर्थ वदले ऐसें त्यास । माझ्या गाडी बैलास । नुसता न चारा दिलास तूं ।। ९५ ।। हें सांकेतिक भाषण । कळलें भाऊलागून । हृदय आलें उंचबळून । त्या भाऊ कवराचें ।। ९६ ।। त्या रात्रीचा ब्राह्मण । खचित माझा गजानन । लेंकरासाठीं धांवून। खामगांवास आला हो।। ९७।। कवरें केलें अन्नदान । त्या व्याधीच्या निमित्त जाण । अंतर्ज्ञानी असती पूर्ण। श्रीगजानन अवलिया ।। ९८ ।। असो एकदां समर्थस्वारी । निघती झाली पंढरपुरीं । त्या श्रीचंद्रभागेतीरीं । विठ्ठलासी भेटावया ।। ९९।। होती मंडळी बरोबर। दिवस वारीचा साचार । स्पेशल गाड्या वरचेवर । जाऊं लागल्या पंढरीला।। १००।। जगु आबा, पाटील हरी । बापुना व मंडळी दुसरी । सोडूनिया शेगांव नगरी । नागझरीला आले हो ।। १ ।। त्या गांवीं माळावर । आहे एक भुयार । येथें गोमाजी नामें साधुवर । समाधिस्थ झालासे ।। २ ।। झरे जिवंत पाण्याचे । आसपास त्या माळाचे । आहेत म्हणून गांवाचें। नांव पडलें नागझरी ।। ३ ।। हा गोमाजी बोवा साचा । गुरू महादजी पाटलाचा । प्रथम आशीर्वाद झाला याचा । शेगांवींच्या पाटीलवंशा ।। ४।। म्हणून पाटील शेगांवचे । गोमाजीला वंदून साचे । रस्त्यास लागती पंढरीचे। ऐसा त्यांचा परिपाठ ।। ५।। या परिपाठें म्हणून । नागझरीसी येऊन । अग्निरथांत बैसून । निघते झाले पंढरीला।।६।। हरी पाटलाबरोबरी । समर्थांची होती स्वारी। बापुना* आणि दुसरी । माणसे पांचपन्नास ।। ७ ।। आषाढ शुद्ध नवमीचा। तो दिवस होता साचा। समुदाय वारकऱ्यांचा । येऊं लागला पंढरीसी ।। ८।। मेघ दाटले अंबरीं। क्वचित् कोठें भूमिवरी । पर्जन्याची वृष्टि खरी । होऊं लागली श्रोते हो !।। ९ ।। तें भूवैकुंठ पंढरपूर । गजबजून गेलें फार। भरती येतां सागर । जेवीं जाय उंचबळोनी ।। ११०।। प्रदक्षिणेच्या रस्त्यावरी। टाळांची ती गर्दी खरी । 'जय जय रामकृष्ण हरी' । भक्त म्हणती उच्च स्वरें ।। ११ ।। शब्द कवणाचा कवणाला । न ये ऐकावयाला । ऐसा आनंदी आनंद चालला। तो वानूं कोठवर ।। १२ ।। नाथ निवृत्ति ज्ञानेश्वर । सांवता गोरा कुंभार । श्रीतुकोबा देहूकर ।

* बापुना काळे

सोपान मुक्ता जनार्दन ।। १३ ।। या संतांच्या पालख्या । पंढरीस आल्या देखा । भक्तांनी उधळिला बुक्का । आदर करायाकारणें ।। १४ ।। त्यायोगें आकाशांत । बुक्क्याचें जणू झालें छत । सुवास उठला घमघमीत । गर्दी तुळशीफुलांची ।। १५ ।। श्रोते त्या समयाला । समर्थ आले पंढरीला । उतरले जाऊन वाड्याला । त्या कुकाजी पाटलाच्या ।। १६ ।। हा प्रदक्षिणेच्या वाटेवरी । वाडा चौफाळ्याशेजारीं । दर्शनाला भीड खरी । झाली असे राऊळांत ।। १७ ।। पोलिस हाताहातावरी । उभे राहिले रस्त्यांतरीं । पथें चालले वारकरी । भजन करीत हरीचें ।। १८ ।। एकादशीस साचार । हरी पाटलाबरोबर । बापुनाविना इतर । गेले दर्शना हरीच्या ।। १९ ।। बापुना मागें राहिला । तो होता स्नानासी गेला । म्हणून त्यासी वेळ झाला । मंडळी गेली निघून ।। १२० ।। स्नान करून आला घरीं । तों समजलें ऐशापरी । दर्शनासी गेली सारी । आत्तांच मंडळी विठ्ठलाच्या ।। २१ ।। मग तोही निघाला पळत पळत । दर्शनाचा धरून हेत । राऊळाच्या भोंवतीं अमित । गर्दी झाली लोकांची ।। २२ ।। मुंगीस वाट मिळेना । तेथे हा बापुना । केवीं जाईल दर्शना । शिवाय गरिबी पदरांत ।। २३ ।। बापुना म्हणे मानसीं । हे विठ्ठला हृषीकेशी । कां रे निष्ठुर झालासी ? । मजला देई दर्शन ।। २४ ।। तूं सांवत्या माळ्याकारण । अरणीं गेलास धांवून । तेवीं येई राउळातून । मज भेटाया पांडुरंगा ।। २५ ।। 'अरण' होतें आठ कोस । तैसें नव्हे येथें खास । मी मंदिराच्या सान्निध्यास । उभा आहे वाटेवरी ।। २६ ।। तुला लोक म्हणतात । तूं अनाथाचा असशी नाथ । मग कां रे देवा मजप्रत । उपेक्षिलें या वेळीं ? ।। २७ ।। ऐसा बहुत धांवा केला । शेवटीं बापुना हताश झाला । परत बिऱ्हाडासी आला । अस्तमानाचे समयास ।। २८ ।। मुख झालें होतें म्लान । अवघ्या दिवसाचें उपोषण । बापुनाचे अवघें मन । विठ्ठलाकडे लागलें ।। २९ ।। शरीर मात्र होतें घरीं । मन मंदिराच्या सभोंवारी । फिरत होतें भिरीभिरी । याचें नांव ध्यास हो ।। १३० ।। बापुनासी पाहून । हंसूं लागले अवघे जण । हा बेटा अभागी पूर्ण । कळून आला आपणां ।। ३१ ।। शेगांवाहून दर्शना । पंढरीसी आला जाणा । येथें येऊन खेळ नाना । फिरला पाहात गांवामध्यें ।। ३२ ।। याची दांभिक अवघी भक्ति । यास कशाचा श्रीपती ? । ऐन वेळेला राहती । गैरहजर दुर्दैवी ! ।। ३३ ।। कोणी म्हणाले बापुनाला । वेदान्त आहे अवघा आला । तो कशाशीं दर्शनाला । जाईल सांगा राऊळांत ? ।। ३४ ।। त्याचा भगवंत हृदयांत । आहे सर्वदा खेळत । वेदान्त्यांचे ऐसें मत । दगडांमाजीं काय आहे ? ।। ३५ ।। आपण वेडे म्हणून । घ्याया गेलों दर्शन । बापुनाचा नारायण । वाटेल तेथे उभा असे ।। ३६ ।। मग दुसरा म्हणाला ।

मग हा येथे कशाला आला ? । कां शेगांवी तयाला । भेटला नसता ईश्वर ? ।। ३७ ।। अहो हे वेदान्ती । लोकां ज्ञान सांगती । शब्द चावटी हमेशा करिती । अनुभवाचा लेश नसे ।। ३८ ।। सगुणोपासना झाल्या पूर्ण । मग होणार आहे ज्ञान । न आल्यासी लहानपण । तरुणपणा येतो कसा ? ।। ३९ ।। ऐसा उपहास तयाचा । प्रत्येकानीं केला साचा । अवघ्यांपुढें एकट्याचा । टिकाव लागावा कोठूनी ? ।।१४०।। तो बापुना बसला उपोषित । दांतांसी लावूनी दांत । ते होते अवघे पहात । स्वामी निजल्या जाग्याहून ।। ४१ ।। गरिबाचें सांकडें । साधुलाच एक पडे । सत्संगती ज्याला घडे । तेच खरे भाग्यवान ।। ४२ ।। समर्थ म्हणती बापुना । दु:ख नको करूंस मना । ये तुला रुक्मिणीरमणा । भेटवितों ये काळीं ।। ४३ ।। तों महाराज उभे राहिले । कटीं हात ठेविले । पाय खालीं जुळविले । समचरण दावावया ।। ४४ ।। तुळशीफुलांच्या माळा कंठीं । मूर्ति सांवळी गोमटी । बापुनाच्या पडली दृष्टि । शीर ठेविलें पायांवर ।। ४५ ।। पुन्हां जो पाहे वरी । समर्थ दिसले पहिल्यापरी । तेणें बापुनाच्या अंतरीं । अति आनंद जाहला ।। ४६ ।। धोतर, पागोटें आणि शेला । जो घरी दृष्टि पडिला । तोच त्यानें पाहिला । दर्शना जातां राऊळांत ।। ४७ ।। इतर म्हणाले महाराजांस । तसेंच दर्शन आम्हांस । होऊ द्या आम्हां आहे आस । पुनरपि श्रीच्या दर्शनाची ।। ४८ ।। ऐसें ऐकतां भाषण । बोलते झाले गजानन । बापुनासारिखें आधीं मन । तुम्ही करा रे आपुलें ।। ४९ ।। तें तसें झालियावरी । दर्शन घडवीन निर्धारीं । ही दर्शन वस्तु खरी । काय मिळे बाजारांत ? ।। १५० ।। म्हणून ती आणून । देऊं तुम्हांकारण । निष्पाप करा आधीं मन । तरीच पुढचें घडेल हें ।। ५१ ।। पहा समर्थांनी बापुनाला । विठ्ठल साक्षात् दाखविला । कुकाजीच्या वाड्याला । संतत्व हा खेळ नसे ।। ५२ ।। संत आणि भगवन्त । एकरूप साक्षात् । गुळाच्या त्या गोडीप्रत । कैसें करावें निराळें ? ।। ५३ ।। काला घेऊन अखेरी । मंडळी फिरली माघारी । बापुनाच्या अंतरीं । दर्शन तें ठसावलें ।। ५४ ।। याच पुण्यें करून । पुत्र झाला त्याकारण । रसिक चतुर विद्वान् । संतसेवा न जाई वृथा ।। ५५ ।। पंढरीच्या प्रसादानें । पुत्र झाला त्याकारणें । म्हणून नांव त्यानें । ठेविलें नामदेव बालकासी ।। ५६ ।। कवठे बहादूर गांवाचा । एक माळकरी होता साचा । तो वऱ्हाड प्रांताचा । म्हणून उतरला वाड्यांत ।। ५७ ।। तेथें आषाढी द्वादशीसी । मरी आली मुक्कामासी । त्या पंढरपूरक्षेत्रासी । मग काय विचारितां ? ।। ५८ ।। प्रेतामागें चाले प्रेत । पोलिस शिरती घरांत । यात्रा काढून देण्याप्रत । डॉक्टराच्या हुकुमानें ।। ५९ ।। वारकऱ्याला ओढिती । गाडीमाजीं बसविती । चंद्रभागेच्या पार करिती । कुर्डुवाडी रस्त्याला ।। १६० ।। हा कवठे

बहादूरचा वारकरी । झाला मरीनें आजारी । ढाळ होती वरच्यावरी । उलटी मुळींच थांबेना ।। ६१ ।। गोळे हातांपायांसी । येऊं लागले बहुवशी । कोणी न जाई त्याजपाशीं । शुश्रूषा त्या करावया ।। ६२ ।। पोलिसभयानें हें वृत्त । कळविलें ना कोणाप्रत । शेगांवीचे समस्त । लोक जाया निघाले ।। ६३ ।। वाडा घटकेंत मोकळा झाला । हा वारकरी मात्र होता पडला । कठीण काळच्या समयाला । कोणी न येती उपयोगी! ।। ६४ ।। लोक सुखाचे सोबती । संकटकालीं अव्हेरिती । तेथें एक रक्षण करिती । संत अथवा देव हो ।। ६५ ।। तो पाहून प्रकार । श्रीगजानन साधुवर । म्हणाले हा ओसरीवर । निजला यास घेऊन चला ।। ६६ ।। लोक म्हणती गुरुराया! । हा बहुतेक मेला सदया । याच्या नादीं लागतां वाया । संकट येईल आपणांतें ।। ६७ ।। पन्नास माणूस बरोबर । आपल्या येधवां साचार । मरीचा तो झाला जोर । सांप्रत या पंढरीसी ।। ६८ ।। अशा स्थितींत ये ठाईं । थांबणें हें कांहीं बरें नाहीं । चला जाऊं लवलाही । चंद्रभागेच्या पलीकडे ।। ६९ ।। तों महाराज म्हणती अवघ्यांला । तुम्ही कैसें खुळावला ? । आपल्या देशबंधूला । सोडितां हें बरें नव्हे ! ।। १७० ।। ऐसें वदून जवळ गेले । वारकऱ्याच्या करा धरलें । त्यासी उठून बसविलें । आणि केलें मधुरोत्तर ।। ७१ ।। चाल बापा ऊठ आतां । जाऊं आपल्या वऱ्हाडप्रांता । वारकरी म्हणे गुरुनाथा ! । आतां वऱ्हाड कशाचें हो ? ।। ७२ ।। समीप आला माझा अंत । जवळ नाहीं कोणी आप्त । तईं म्हणाले सद्गुरुनाथ । वेड्या ! ऐसा भिऊं नको ।। ७३ ।। तुझें टळलें गंडांतर । ऐसे वदोन ठेविला कर । त्या वारकऱ्याच्या शिरावर । ढाळ उलटी बंद झाली ।। ७४ ।। वाटूं लागली थोडी शक्ति । उभा राहिला त्वरित गती । संतानें ज्या धरिलें हातीं । त्यातें निजमनें यम नेई कैसा ? ।। ७५ ।। घटकेंत झाला पहिल्यापरी । मंडळींच्या बरोबरी । चंद्रभागेच्या पैलतीरीं । आला समर्थांसमवेत ।। ७६ ।। आनंद झाला फार त्यासी । वंदी समर्थचरणांसी । म्हणे दयाळा काढिलें मशीं । दाढेंतून काळाच्या ।। ७७ ।। ऐसा घडतां चमत्कार । भक्त करिती जयजयकार । आले कुर्डुवाडीवर । निर्धास्तपणें सर्वही ।। ७८ ।। पंढरीची करून वारी । आली शेगांवाप्रती सारी । मंडळी ती बरोबरी । श्रीगजाननस्वामींच्या ।। ७९ ।। एक कर्मठ ब्राह्मण । घ्याया आला दर्शन । त्या शेगांवाकारण । श्रीगजाननस्वामीचें ।। १८० ।। तयानें स्वामींची कीर्ति । निजदेशीं ऐकिली होती । म्हणून आला दर्शनाप्रती । फार लांबून त्या ठायां ।। ८१ ।। सोंवळे ओंवळें त्याचें अती । तो होता मध्वमती । खट्टु झाला परम चित्तीं । समर्थांसी पाहातां ।। ८२ ।। व्यर्थ आलों म्हणे येथ । या वेड्यासी वंदण्याप्रत । हा भ्रष्टाचा आहे सत्य ।

सार्वभौम शिरोमणी ।। ८३ ।। सोवळे ओंवळें येथ मेलें । अनाचाराचें राज्य झालें । अशा पिशाला म्हणूं लागले । साधु लोक हाय हाय ।। ८४ ।। तो तया मठांत । काळें कुत्रें झालें मृत । पडले होतें त्याचें प्रेत । येण्याजाण्याच्या वाटेवरी ।। ८५ ।। त्या श्वानातें पाहून । ब्राह्मण झाला मनीं खिन्न । आणूं कसें जीवन। श्वान मध्यें पडला हा ।। ८६ ।। याला न कोणी उचलती। गांजा सदैव धुनकिती । या वेड्यातें वंदिताती । ''महाराज, महाराज,'' म्हणून ।। ८७ ।। जळो याचें साधुपण। मला बुद्धि कोठून । झाली याचें दर्शन । घ्याया कां हे कळेना ? ।। ८८ ।। त्याचा संशय फेडावया। समर्थ आसन सोडोनिया । येते झाले तया ठायां । जेथें होता ब्राह्मण ।। ८९ ।। आणि म्हणाले तयाप्रत । पूजा करावी यथास्थित । कुत्रें झालें नाही मृत । संशय उगा घेऊं नका ।। १९० ।। तें ऐकून रागावला। नीज समर्था बोलूं लागला । अरे नाहीं वेड मला। तुझ्यासम लागलेलें ।। ९१ ।। कुत्रें मरून झाला प्रहर । त्याचें प्रेत रस्त्यावर । पडलें याचा विचार । तुम्ही न कोणी केला कीं ।। ९२।। ऐसें ऐकतां विप्राला । समर्थांनीं जाब दिला। आम्ही भ्रष्ट आम्हांला । तुमच्या सम ज्ञान नाहीं।। ९३।। परी खंति न करा तिळभर । पाणी आणाया घागर। घेऊन चलावे सत्वर । माझ्यामागें विप्रवरा।। ९४।। ऐसें बोलून कुत्र्यापासी। येते झाले पुण्यराशी। स्पर्श पदाचा करतां त्यासी । कुत्रें बसलें उठोन ! ।। ९५।। तो पाहतां चमत्कार । ब्राह्मण झाला निरुत्तर। म्हणे याचा अधिकार। थोर आहे देवापरी।। ९६।। मीं व्यर्थ निंदा केली । योग्यता ना जाणली । ऐसें म्हणून घातली। समर्थांच्या मिठी पायां ।। ९७ ।। माझे अपराध गुरुवरा ! । आज सारे क्षमा करा । वरदहस्त ठेवा शिरा। मी अनंत अपराधी ।। ९८।। तूंच सोंवळा साचार । एक आहेस भूमिवर । करण्या जगाचा उद्धार। तुम्हां धाडिलें ईश्वराने ।। ९९।। श्रोते त्याच दिवशीं भली । समाराधना त्यानें केली। कुशंका मनाची पार फिटली । लीन झाला अत्यंत ।। २००।। प्रसाद घेऊन गेला परत । आपुल्या तो देशाप्रत । समर्थ साक्षात् भगवंत । ऐसी प्रचीति आली तया ।। १ ।। स्वस्ति श्रीदासगणूविरचित। हा श्री गजानन विजय नामें ग्रंथ । भाविकां लाभो सत्पथ । हेंचि इच्छी दासगणू ।। २०२ ।। शुभं भवतु ।। श्रीहरिहरार्पणमस्तु ।।

।। इति श्रीगजानन विजय ग्रंथस्य अष्टादशोऽध्यायः समाप्तः ।।

# अध्याय एकोणिसावा प्रारंभ

श्रीगणेशाय नमः ।। जयजयाजी आनंदकंदा । जयजयाजी अभेदा । माझें नमन तुझ्या पदा । असो सर्वदा अनन्यभावें ।। १ ।। हे राघवा रघुपती । पाव आतां शीघ्र गती । माझा अंत पहाशी किती ? । हें कांहीं कळेना ।। २ ।। खऱ्या थोराशीं कठोरता । नाहीं शोभत अनंता । याचा विचार कांहीं चित्ता । करा आपुल्या ये काळीं ।। ३ ।। मी दीनवाणें मारितों हांका । मला दगा देऊं नका । हे जगदीशा जगन्नायका । पावा दासगणूस ।। ४ ।। महाराज असतां शेगांवांत । विप्र एक काशिनाथ । जो खंडेरावाचा होय सुत । गर्दे उपनांव जयाचें ।। ५ ।। तो आला दर्शना । समर्थांच्या वंदिले चरणां । मूर्ति पाहून त्याच्या मना । आनंद झाला अतिशय ।। ६ ।। माझ्या सन्माननीय वडिलानें । जीं जीवन्मुक्ताचीं लक्षणें । लिहिलीं अनुभवानें । त्याची प्रत्यक्ष मूर्ति ही ।। ७ ।। माझें भाग्य धन्य धन्य । म्हणून हें पाहण्या चरण । आलों खामगांवाहून । त्याचें सार्थक झालें कीं ।। ८ ।। तो समर्थांनीं लीला केली । कोपरखिळी मारली । काशिनाथाच्या पाठीस भली । आपुल्या परमकृपेनें ।। ९ ।। जा तुझा हेत पुरला । वाट पाहे तारवाला । या भाषणें घोंटाळला । काशिनाथ मानसी ।। १० ।। म्हणे काम ना माझें ये ठाईं । मी न आलों मागण्या कांहीं । तारवाला शिपाई । वाट पहातो काय हें ? ।। ११ ।। त्याचें गूढ कळेना । पुसण्या छाती होईना । निमुटपणें वंदून चरणा । गेला निघून खामगांवीं ।। १२ ।। तों तारवाला शिपाई । उभा दारांत होता पाही । तार घेतली घाई घाई । कशाची ती बघण्यास ।। १३ ।। तारेंत हा मजकूर । तुमचा केला तक्रूर* । मुनसफीच्या हुद्दयावर । मोर्शी तालुक्याकारणें ।। १४ ।। तें पाहतां आनंदला । कोपरखिळीचा अर्थ कळला । त्या काशिनाथपंताला । पहा संतांचें ज्ञान कैसें ? ।। १५ ।। असो एकदा नागपुरीं । समर्थांची गेली स्वारी । गोपाळ बुटीचिया घरीं । त्याच्या अति आग्रहानें ।। १६ ।। ही भोसल्याची राजधानी । पूर्वकालीं होती जाणी । त्या शहराची आज दिनीं । दैना झाली विबुध हो ।। १७ ।। स्वातंत्र्यरूपी प्राण गेला । खरा धनी याचक ठरला । परक्यांचा बोलबाला । झाला जया शहरांत ।। १८ ।। गज घोडे पालख्या अपार । नाहींशा झाल्या साचार । रस्त्यानें फिरे मोटार । अति जोराने विबुध हो ।। १९ ।। असो हा महिमा काळाचा । नाहीं दोष कवणाचा । वाडा गोपाळ बुटीचा । होता सीताबर्डीवर ।।२० ।।

---

* नेमणूक

त्या भव्य सदनांत । नेऊन ठेविले सद्‌गुरुनाथ । जैसा वाघ किल्ल्यांत । कोंडोनिया टाकावा ।। २१ ।। बुटीचा ऐसा विचार । या सीताबर्डीवर । महाराज ठेवावे निरंतर । जाऊं न द्यावें शेगांवा ।। २२ ।। अक्रुरानें कृष्णाला । जैसा मथुरेमाजीं नेला । तोच प्रकार येथें झाला । काय वर्णन करावें ? ।। २३ ।। शेगांव पडलें भणभणीत । अवघे लोक दु:खित । विनविती हरी पाटलाप्रत । महाराज येथें आणा हो ।।२४ ।। कुडीमधून गेला प्राण । कोण पुसे तिजलागुन ? । तैसें समर्थांवांचून । शेगांव हें प्रेत पाहा ।।२५ ।। तुम्हीं गांवचे जमेदार । करा याचा विचार । बुटी मोठा सावकार । तेथें न आमुचा लाग लागे ।। २६ ।। टक्कर हत्तीहत्तींची । होणें आहे योग्य साची । येथें आम्हांसम कोल्ह्यांची । नाहीं मुळीं किंमत ।। २७ ।। जंबुमाळीसी लढायाला । मारुती हाच योग्य ठरला । जिंकावया कर्णाला । झाली योजना अर्जुनाची ।। २८ ।। तुम्हीं नागपुराप्रती जावें । समर्थांसी घेऊन यावें । आम्हां अवघ्यांस सुखवावें । हीच आहे विनंति ।। २९ ।। इकडे बुटीच्या घरांत । आजुर्दे राहिलें संत । जेवीं हस्तिनापुरांत । कृष्ण नाहीं आनंदला ।। ३०।। महाराज म्हणती बुटीसी । जाऊं दे मज शेगांवासी । या आपुल्या भव्य सदनासी । ठेवून आम्हां घेऊं नको ।।३१।। तें बुटी मुळींच मानीना । समर्था जाऊं देईना । अनागोंदीचा रामराणा । बुटी वाटे नि:संशय ।। ३२ ।। बुटी भाविक होता जरी । अहंता नव्हती गेली खरी । श्रीमंतीचा गर्व भारी । त्याच्या ठाईं वसतसें ।। ३३ ।। रोज ब्राह्मणभोजन । समर्थांपुढे सदा भजन । परी शेगांवचे येत जन । बंदी त्या तो करीतसे ।।३४ ।। जाऊं न देई दर्शना । शेगांवचे लोकांना । बिगरपरवानगी श्रीमंतसदना । जातां नये कवणासी ।। ३५ ।। शेगांवचे लोक भले । जरी आणावया गेले । परी न कांही उपाय चाले । गेले तसेंच आले परत ।।३६।। इकडे भक्त पाटील हरी । कांहीं मंडळीं बरोबरी । घेऊन निघाला नागपुरीं । समर्थांसी आणावया ।। ३७ ।। बसला अग्निरथांत । त्याच वेळीं वदलें संत । त्या गोपाळ बुटीप्रत । येणें रीति तें ऐका ।।३८।। अरे गोपाळा ! पाटील हरी । निघाला यावया नागपुरीं । तो येण्याच्या आंत परी । मला येथून जाऊं दे ।। ३९ ।। तो येथें आल्यावर । शांतता नाहीं राहणार । तो पडला जमेदार । याचा विचार करावा ।। ४० ।। तुझ्या धनाच्या जोरावरी । उड्या या जाण निर्धारी । तो मनगटाच्या बळावरी । नेईल मजला येथून ।।४१।। हरी पाटील तेथें आला । शिपायानें अटकाव केला । परी तो न त्यानें मानिला । प्रवेश केला सदनांत ।।४२।। गोपाळ बुटीचिया घरीं । पंगत होती थोर खरी । पाटील आल्याच्या अवसरीं । आले ब्राह्मण भोजना ।।४३।। ताटें चांदीचीं अवघ्यांस । शिसमचे पाट बसण्यास । होत्या पातळ पदार्थांस । वाट्या जवळ चांदीच्या ।। ४४ ।। नानाविध पक्वान्नें । होती भोजनाकारणें । मध्यभागा आसन त्यानें ।

मांडिले समर्थ बसण्यास ।। ४५ ।। ऐशी बुटीची श्रीमंती । तिचे वर्णन करूं किती ? । ज्याला कुबेर बोलती । लोक नागपूर प्रांतींचा ।। ४६ ।। असो हरी पाटील सदनांत । आले समर्था नेण्याप्रत । तों महाराज निघाले धांवत । द्वारीं त्यास भेटावया ।। ४७ ।। वांसरा गाय पाहून । जैसी येई धांवून । तैसे स्वामी गजानन । पाटलासाठीं धांवलें ।। ४८ ।। चाल हरी शेगांवासी । येथे मुळी न राहणें मसी । तूं आलास न्यावयासी । हें फार बरें झालें ।। ४९ ।। समर्थ जाऊं लागले । ते गोपाळाने पाहिले । अनन्यभावें चरण धरिले । समर्थांचे येऊन ।। ५० ।। विक्षेप माझा गुरुराया ! । नका करूं या समया । दोन घांस घेऊनिया । इच्छित स्थला मग जावें ।। ५१ ।। तैसेंच बुटी पाटलासी । बोलूं लागले विनयेसी । तुम्ही घेऊन प्रसादासी । जावें हेंच मागणें ।। ५२ ।। येथें न रहाती महाराज । हें समजून आलें आज । पंक्तित माझी राखा लाज । तुम्हीच पाटील येधवां ।। ५३ ।। आत्तांच समर्थ गेले जरी । लोक उपाशी उठतील तरी । आणि अवघ्या नागपुरीं । टीका माझी होईल पहा ।। ५४ ।। भोजनें होईपर्यंत । महाराज राहिले तेथ । शेगांवची समस्त । मंडळी पंक्तीस जेवली ।। ५५ ।। भोजनोत्तर तयारी । निघण्याची ती झाली खरी । दर्शनाची भीड भारी । झाली बुटीच्या वाड्यांत ।। ५६ ।। कुटुंब गोपाळ बुटीचें । जानकाबाई नांवाचें । परम भाविक होतें साचें । गृहलक्ष्मीच होती जी ।। ५७ ।। तिनें केली विनवणी । महाराजांचे चरणीं । माझा हेतु मनींच्या मनीं । बसूं पाहतो गुरुराया ! ।। ५८ ।। तईं महाराज बोलले । तुझ्या मना मीं जाणीतलें । ऐसें म्हणून लाविलें । कुंकूं तिच्या कपाळास ।। ५९ ।। आणखी एक पुत्र तुला । परम सद्गुणी होईल भला । अंती जाशील वैकुंठाला । सौभाग्यासह बाळे तूं ! ।। ६० ।। ऐसा आशीर्वाद देऊन । निघते झाले दयाघन । त्या सीताबर्डीहून । आले रघुजीच्या घरीं ।। ६१ ।। हा भोसला राजा रघुजी । उदार मनाचा भक्त गाजी । ज्यानें ठेविला राम राजी । आपुल्या शुद्ध वर्तनें ।। ६२ ।। त्याचें लौकिकीं राज्य गेलें । जें अशाश्वत होतें भलें । शाश्वत स्वरूपाचें आलें । सद्गुरुभक्तीचें राज्य घरा ।। ६३ ।। उत्तम प्रकारचा आदर । केला राजानें साचार । त्याचा घेऊन पाहुणचार । रामटेकासी गेले पुढें ।। ६४ ।। तेथें रामाचें दर्शन । घेऊन आले परतून । शेगांवाच्या मठा जाण । हरी पाटलासमवेत ।। ६५ ।। धार–कल्याणचे रंगनाथ । जे थोर साधु मोंगलाईत । होते ते भेटण्याप्रत । समर्थां आले शेगांवीं ।। ६६ ।। अध्यात्माचीं बोलणीं । सांकेतिक केलीं दोघांनी । त्याचा भावार्थ जाणण्या कोणी । तेथें नव्हता समर्थ ।। ६७ ।। श्रीवासुदेवानंदसरस्वती । कर्ममार्गीं ज्याची प्रीति । कृष्णातटाका ज्यांची महती । माणगांवी जन्म ज्यांचा ।। ६८ ।। ते येण्याचे अगोदर । बाळाभाऊस साचार । बोलते झाले गुरुवर । स्वामी

गजानन सिद्धयोगी ।। ६९ ।। अरे बाळा उदयिक । माझा बंधु येतो एक । मजलागीं भेटण्या देख । त्याचा आदर करावा ।। ७० ।। तो आहे कर्मठ भारी । म्हणून उद्यां पथांतरीं । चिंध्या न पडूं द्या निर्धारी । अंगण स्वच्छ ठेवा रे ।।७१।। चिंधी कोठें पडेल जरी । तो कोपेल निर्धारी । जमदग्नीची आहे दुसरी । प्रतिमा त्या स्वामीची ।।७२।। तो कऱ्हाडा ब्राह्मण । शूचिर्भूत ज्ञानसंपन्न । हें त्याचें कर्मठपण । कवचापरी समजावें ।। ७३ ।। ऐसें बाळास आदले दिवशीं । सांगते झाले पुण्यराशी । तों एक प्रहर दिवसासी । स्वामी पातले तें ठायां ।। ७४ ।। एकमेकांसी पाहतां । दोघे हंसले तत्त्वतां । हर्ष उभयतांच्या चित्ता । झाला होता अनिवार ।। ७५ ।। एक कर्माचा सागर । एक योगयोगेश्वर । एक मोगरा सुंदर । एक तरू गुलाबाचा ।। ७६ ।। एक गंगा भागीरथी । एक गोदा निश्चिती । एक साक्षात् पशुपती । एक शेषशायी नारायण ।। ७७ ।। स्वामी जेव्हां मठांत आले । तेव्हां गजानन होते बैसले । आपल्या पलंगावरी भले । चिटक्या करानें वाजवीत ।। ७८ ।। स्वामी येतां चिटकी थांबली । दृष्टादृष्ट दोघां झाली । तैं स्वामींनीं विचारिली । आज्ञा परत जावया ।। ७९ ।। फार बरें म्हणून । गजाननें तुकविली मान । स्वामी गेले निघून । बाळास कौतुक वाटलें ।। ८० ।। बाळ म्हणे गुरुराया । हें दृश्य पाहूनिया । संशय उपजला चित्ता ठायां । त्याची निवृत्ति करा हो ।। ८१ ।। त्यांचा मार्ग अगदी भिन्न । तुमच्या ह्या मार्गाहून । ऐसें साच असून । तुमचा बंधु कसा तो ? ।। ८२ ।। ऐसा प्रश्न ऐकिला । समर्थ देती उत्तर त्याला । बरवा प्रश्न बाळा केला । त्वां हा आज आम्हांतें ।। ८३ ।। ईश्वराकडे जाण्याचे । तीन मार्ग असती साचे । हे तिन्ही मार्ग ज्ञानाचे । गांवा जाऊन मिळतात ।। ८४ ।। स्वरूपें त्यांचीं भिन्न भिन्न । दिसतीं पाहाणारांकारण । तेणें घोटाळा वरितें मन । पाहाणारांचें राजसा ! ।। ८५ ।। सोवळें ओवळें संध्यास्नान । व्रत उपोषणें अनुष्ठान । या कृत्यांलागून । अंगें म्हणावीं कर्माचीं ।। ८६ ।। ही अंगे जो आचरी । निरालसपणें खरी । तोच समजावा भूवरीं । ब्रह्मवेत्ता कर्मठ ।। ८७ ।। अधिक न्यून येथें होता । कर्ममार्ग न ये हातां । म्हणून विशेष तत्परता । ठेविली पाहिजे आचरणीं ।। ८८ ।। येथें एवढीच खबरदारी । घ्यावी लागते जाण खरी । परांकारणें दुरुत्तरीं । कदा त्यानें ताडूं नये ।। ८९ ।। आतां भक्तिमार्गाचें । ऐक हें लक्षण साचें । भक्तिपंथानें जाणाराचें । मन पाहिजे शुद्ध अती ।। ९० ।। मलीनता मनाठायीं । अंशेही राहिल्या पाही । त्याच्या हातां येत नाहीं । भक्तिरहस्य बापा रे ! ।।९१।। दया प्रेम लीनता । अंगीं पाहिजे तत्त्वतां । श्रवणीं पूजनीं आस्था । पाहिजे त्याची विशेष ।। ९२ ।। मुखामाजीं नामस्मरण । करणें हरीस जाणून । ऐशीं अंगे असती जाण । या भक्तिमार्गाला ।। ९३ ।। या अंगांसह जो भक्ती करी । त्यालाच भेटे श्रीहरी । भक्तिमार्गाची

न ये सरी । त्याचा विधी सोपा असे ।। ९४ ।। परी तो करण्या आचरण । कर्माहून कठीण जाण । जेवीं गगनाचें जवळपण । नेत्रांलागीं दिसतसे ।।९५ ।। आतां योगमार्ग तिसरा । सांगतों मी ऐक खरा । या योगमार्गाचा पसारा । दोघांपेक्षां जास्त असे ।। ९६ ।। परी हा पसारा निश्चयेंसी । आहे ज्याचा त्याचे पासीं । योगमार्ग साधण्यासी । बाहेरचें न कांहीं लागे ।। ९७ ।। जेवढें आहे ब्रह्मांडांत । तेवढें आहें पिंडांत । त्या पिंडांतील साहित्य । घेऊन योग साधावा ।।९८ ।। आसनें रेचक कुंभक । इडापिंगलेचे भेद देख । धौती मुद्रा त्राटक । कळलें पाहिजे मानवां ।।९९।। कुंडली आणि सुषुम्ना । यांचे ज्ञान पाहिजे जाणा । आधी योग करणारांना । तरीच तो साधेल ।। १०० ।। या तिन्ही मार्गांचें । अंतिम फळ ज्ञान साचें । परी तें ज्ञान प्रेमाचें । वीण* असतां कामा नये ।। १ ।। जें जें कृत्य प्रेमावीण । तें तें अवघें आहे शीण । म्हणून प्रेमाचें रक्षण । करणें तिन्ही मार्गांत ।। २ ।। काळा गोरा खुजा थोर । कुरूप आणि सुंदर । हे शरीराचे प्रकार । त्याची न बाधा आत्म्यातें ।। ३ ।। आत्मा अवघ्यांचा आहे एक । तेथें न पडे कदा फरक । शरीरभेद व्यावहारिक । त्याचें कौतुक कांहीं नसे ।। ४ ।। तीच या तिन्हीं मार्गांची । स्थिति तंतोतंत साची । बाह्य स्वरूपें भिन्न त्यांचीं । परी मूळ कारण एक असे ।। ५ ।। मुक्कामास गेल्यावर । मार्गांचा न उरें विचार । जो मार्गी चालतो नर । महत्त्व त्याचें त्यास वाटे ।। ६ ।। पथ चालण्या आरंभ झाला । परी मुक्कामास नाहीं गेला । अशाचाच होतो भला । तंटा पंथाभिमानानें ।। ७ ।। या तिन्ही मार्गांचे ते पांथ । मुक्कामीं पोंचल्या होती संत । मग तयांच्या संबंधांत । द्वैत नसे एतुलेंही ।। ८ ।। वसिष्ठ, वामदेव, जमदग्नी । अत्री, पाराशर, शांडिल्य मुनी । हे कर्ममार्गाच्या सेवनीं । मुक्कामासी पोंचले ।। ९ ।। व्यास, नारद, कयाधूकुमर । मारुती, शबरी, अक्रूर । उद्धव, सुदामा, पार्थ, विदूर । हे गेले भक्तिमार्गें ।। ११० ।। श्री शंकराचार्य गुरुवर । मच्छिंद्र, गोरख, जालंदर । हे चढले जिना थोर । या योगमार्गाचा ।। ११ ।। जो वसिष्ठा लाभ झाला । तोच विदुराच्या पदरीं पडला । तोच मच्छिंद्रानें भोगिला । फळामाजीं फरक नसे ।। १२ ।। तीच प्रथा पुढें चालली । येथें न शंका घ्यावी मुळीं । कर्ममार्गाची रक्षिली । बूज श्रीपादवल्लभें ।। १३ ।। नरसिंहसरस्वती यतिवर । तैसेच झाले साचार । ठिकाण ज्यांचे गाणगापूर । वाडी, औदुंबर ख्यात जगीं ।। १४ ।। नामा, सावता, ज्ञानेश्वर । सेना, कान्हु, चोखा महार । दामाजीपंत ठाणेदार । गेले भक्तिमार्गांनीं ।। १५ ।। शेख महंमद श्रीगोंद्यांत । आनंदी स्वामी जालन्यांत । सुर्जीअंजनगांवांत । देवनाथ चाहाते योगाचे ।। १६ ।। तैसेंच आहे सांप्रत । कर्ममार्गी वासुदेव रत ।

---

* शिवाय

मी धरला भक्तिपंथ। आणिक बहुता जणांनीं ।। १७।। पळुसचे धोंडीबुवा। सोनगीरचा नाना बरवा । जालन्याचें यशवंतरावा । भक्तिपंथ साध्य झाला।। १८।। खाल्ला आम्मा ती विदेही। तेंवीं शिर्डीचे बाबा साई। गुलाबरावांचें ठायीं । ज्ञानदृष्टि असे रे।। १९ ।। पहा चांदूर तालुक्याचा । वरखेडें नामें ग्रामाचा। आडकूजी नामें संत साचा। गेला याच वाटेनें ।। १२० ।। मुऱ्हा गांवचें संतरत्न । झिंग्राजी तो होय जाण । तेवीं नागपूरचे ताजुद्दीन। भक्तिमार्गासी चाहाते ।। २१ ।। या अवघ्या संतांचें । आचरण भिन्न प्रकारचें। परी अधिकारी कैवल्याचे। ते बैसले होऊनी ।। २२ ।। मार्ग असो कोणताही। त्याचें मुळीं महत्त्व नाहीं । जो मुक्कामास जाई । त्याचें कौतुक करणें असे ।। २३ ।। आम्ही ही भावंडें सारी । येतों झालों भूमिवरी। कैवल्याच्या मार्गावरी । भाविक आणून सोडावया ।। २४ ।। जें ज्याला आवडेल । तिकडे तो जाईल। आणि मोक्षरूपी भोगील फल । त्या त्या पंथा आचरोनी ।। २५।। आतां नको पुसूंस कांहीं । हें न कोणा सांगे पाही । निवांत बसूं दे ये ठायीं । पिसेंपणाच्या पासोडीनें ।। २६ ।। ज्याची निष्ठा बसेल । वा ! जो माझा असेल । त्याचेंच कार्य होईल। इतरांची ना जरूर मला ।। २७ ।। ज्यासी अनुताप झाला । ब्रह्मज्ञान सांगणे त्याला। उगीच तर्कटी वात्रटाला । स्फोट त्याचा करूं नये ।। २८ ।। कोणी कांहीं म्हणोत । आपण असावें निवांत। तरीच भेटे जगन्नाथ । जगद्गुरू जगदात्मा।। २९ ।। ऐसा उपदेश ऐकिला । बाळाभाऊच्या नेत्रांला । प्रेमाश्रूंचा लोटला । पूर तो न आवरे त्या ।। १३०।। अष्टभाव दाटले । शरीरा रोमांच उमटले। वैखरीचें संपलें। काम तेणें सहजची।। ३१।। मौनेंच केला नमस्कार । श्रीगजानन साधु थोर । वऱ्हाड प्रांताचा उद्धार । करावयासी अवतरला ।। ३२ ।। साळुबाई नांवाची । एक असे कण्व शाखेची। ती होती महाराजांची । मनापासून भक्तिण ।। ३३ ।। तिला महाराज एके दिनीं । ऐशा परी वदले वाणी। डाळ पीठ घेऊनी । स्वयंपाक करी अहोरात्र ।।३४।। जे येतील तयांना । साळु घाल भोजना । येणेच तूं नारायणा। प्रिय होशील नि:संशय ।। ३५ ।। ती साळुबाई मठांत । आहे अजूनपर्यंत। जी वैजापूरची असे सत्य । माहेर वाडेंघोडें जिचें ।। ३६।। प्रल्हादबुवा जोशाला । होता कृपेचा योग आला। तो न तया फलद झाला। तयाचिया दुर्दैवें ।। ३७ ।। खामगांवच्या सान्निध्यासी । जलंब गांव परियेसी । त्या गांवचा रहिवासी। तुळशीराम एक असे ।।३८।। पुत्र या तुळशीरामाचा। आत्माराम नांवाचा । होता तैलबुद्धीचा। वेदाध्ययनीं प्रेम ज्याचें ।। ३९।। हा धर्मपीठ वाराणसी। जी भागीरथीच्या तटा काशी । तेथें गेला अध्ययनासी । वेदवेदांग स्मृतीच्या ।।१४०।। प्रत्यहीं भागीरथीचें स्नान। माधुकरीचें सेवी अन्न। गुरुगृहातें जाऊन। करी अध्ययन श्रुतीचें ।। ४१ ।।

श्रोते विद्यार्थी ना तरी । अध्ययना जाती देशावरी । शिकण्याऐवजीं परोपरी । करूं लागती चैन ते ।। ४२ ।। चैनीमाजीं गुंतल्या मन । मग कशाचें अध्ययन ? । बिरूड आंब्यालागून । लागतां नाश रसाचा ।। ४३ ।। आत्माराम नव्हता यापरी । विवेकसंपन्न सदाचारी । विद्या अवघी करून पुरी । आला निजदेशातें ।।४४ ।। स्वदेशीं येतां शेगांवासी । गेला असे अति हर्षी । हजिरी ती द्यावयासी । श्रीगजाननमहाराजा ।। ४५ ।। तो वेदविद्येचा जाणता । गजानन केवळ ज्ञानसविता । आत्माराम वेद म्हणतां । कोठें कोठें चुकतसे ।। ४६ ।। त्या चुकीची दुरुस्ती । करूं लागले सद्गुरुमूर्ती । आत्मारामाचे संगती । वेद म्हणती महाराज ।। ४७ ।। ऐकतां त्यांचें वेदाध्ययन । तन्मय होती विद्वान् । न होय सराफावांचून । किंमत त्या हिऱ्याची ।। ४८ ।। शेवटीं समर्थांचेपाशीं । आत्माराम राहिला आदरेंसी । मधु टाकुनी मक्षिकेसी । जाणें कैसें आवडेल ? ।। ४९ ।। प्रत्यहीं सेवेकारण । यावें त्यानें जलंबाहून । चुकविला ना एकही दिन । ऐसा एकनिष्ठ भक्त तो ।। १५० ।। समर्थांच्या पश्चात् । हाच होता मठांत । पूजा अर्चा करण्याप्रत । सद्गुरूंच्या समाधीची ।। ५१ ।। मोबदला न घेतां भली । एकनिष्ठ सेवा केली । शेवटीं त्यानेंच अर्पिली । इस्टेट आपली महाराजा ।।५२ ।। इस्टेट अल्प साचार । एक जमीन एक घर । येथें न दृष्टि किंमतीवर । देणें आहे भाग पाहा ।।५३ ।। भिल्लिणीनें रामाला । बोरें देऊन वश केला । तैसाच प्रकार हाही झाला । म्हणून केलें वर्णन ।। ५४ ।। स्वामी दत्तात्रय केदार । दुसरा नारायण जामकर । निव्वळ दुधाचा ज्यांचा आहार । तो दुधाहारी बुवा ।। ५५ ।। ऐसे श्रोते तिघे जण । स्वामींचे भक्त निर्वाण* । ज्यांनी आपुलें तनमन । समर्थचरणीं अर्पिलें ।।५६ ।। मोरगांव भाकरे नांवाचा । गांव बाळापूर तालुक्याचा । तेथील मारुतीपंत पटवाऱ्याचा । वृत्तान्त ऐका थोडासा ।। ५७ ।। श्रोते ! त्या मोरगांवांत । मारुतीपंताच्या शेतांत । पिकांचें रक्षण करण्याप्रत । तिमाजी नामें माळी होता ।। ५८ ।। तो माळी खळ्याभीतरीं । निजला निशिच्या अवसरीं । गाढ झोंप लागली खरी । ते अवसरी तयाला ।। ५९ ।। उलटून गेले दोन प्रहर । कुंभाराचे दहावीस खर । खळ्यांत येऊनी दाण्यावर । पडले असती पांड्याच्या ।। १६० ।। राखणदार झोंपी गेला । गर्दभासी आनंद झाला । ते खाऊं लागले जोंधळ्याला । राशींत तोंड घालूनी ।। ६१ ।। हा पांड्या मारुतीपंत । महाराजांचा होता भक्त । म्हणून सद्गुरुरायाप्रत । लीला करणें भाग आले ।। ६२ ।। क्षणांत जाऊनी मोरगांवासी । हांक मारिली तिमाजीसी । अरे ! जागा होई त्वरेसी । रासेसी गाढवें पडलीं ना ।। ६३ ।। ऐसें मोठ्यानें बोलून । तिमाजीस जागे करून । महाराज पावले अंतर्धान ।

* एकनिष्ठ

खळ्यामधून तेधवां ।। ६४ ।। तिमाजी उठून पाहतां । गाढवें दिसली तत्त्वतां । म्हणे काय करूं आतां । मालक रागे भरेल कीं ।। ६५ ।। पिकाचें रक्षण करण्यासी । त्यानें ठेविलें आहे मसीं । विश्वासघात आज दिशीं । झाला त्याचा माझ्या हातें ।। ६६ ।। तो विश्वासला माझ्यावर । मी निजतां झालों निसूर । रास ही निम्यावर । खाऊन टाकली गाढवांनी ।।६७ ।। आतां समजूत मालकाची । कोण्या रीतिं घालूं साची । पहा त्या वेळीं इमानाची । किंमत होती लोकांस ।।६८।। ना तरी हल्लींचे नोकर । निमकहराम शिरजोर । नफातोट्याची तिळभर । काळजी न त्यांना मालकाच्या ।। ६९ ।। तिमाजी तैसा नव्हता । हळहळ लागली त्याच्या चित्ता । म्हणे काय जाऊन सांगू आतां । मी पांड्याकारणें ।। १७० ।। कांहीं असो चुकीची । माफी मागितली पाहिजे साची । उदार बुद्धि मारुतीची । आहे तो क्षमाच करील ।।७१ ।। ऐसें मनाशीं बोलून । उदयास येतां नारायण । तिमाजी गांवांत येऊन । पाय धरी पंतांचे ।। ७२ ।। महाराज माझ्या झोंपेनीं । बुडविलें तुम्हांलागूनी । दहावीस गाढवांनी । येऊन रास खाल्ली कीं ।। ७३ ।। ती नुकसान किती झाली । ती पाहिजे पाहिली । खळ्यामाजीं जाऊनि भली । म्हणजे मज वाटेल बरें ।। ७४ ।। मारुती म्हणाले त्यावर । खळ्यांत यावया साचार । वेळ ना मला तिळभर । मी निघालों शेगांवा ।। ७५ ।। दर्शन घेऊन सद्गुरूचें । त्या गजानन महाराजांचें । उद्यां सकाळीं धान्याचें । काय झालें ते पाहीन ।। ७६ ।। ऐसें बोलून शेगांवाला । मारुतीपंत येतां झाला । दर्शनासाठी मठांत गेला । दहा अकराचे सुमारास ।। ७७ ।। महाराज होते आसनावरी । जगू पाटील समोरी । बाळाभाऊ बद्ध करीं । बसला जवळ पाटलाच्या ।। ७८ ।। मारुतीनें दर्शन । घेतां केलें हास्यवदन । तुझ्यासाठी मजकारण । त्रास झाला रात्रीसी ।।७९।। तुम्ही माझे भक्त होतां । मला राखण्या लावितां । झोपाळू नोकर ठेवितां । आणि आपण निजतां खुशाल घरीं ।।१८०।। मारुती काल रात्रीला । खळ्यांत तिमाजी झोपीं गेला । गाढवांचा सुळसुळाट झाला । ते रास भक्षूं लागले ।।८१ ।। म्हणून मी जागें केलें । जाऊन तिमाजीसी भले । रास सांभाळण्या सांगितलें । आणि आलों निघून ।। ८२ ।। ऐसी खूण पटतांक्षणीं । मारुतीनें जोडून पाणि । मस्तक ठेवूनियां चरणीं । ऐसें वचन बोलला ।। ८३ ।। आम्हां सर्वस्वीं आधार । आपुलाच आहे साचार । लेंकराचा अवघा भार । मातेचिया शिरीं असे ।। ८४ ।। आमुचें म्हणून जें जें कांहीं । तें अवघेंच आहे आपुले आई ! । सत्ता त्यावरी नाहीं । तुम्हांवीण कवणाची ।। ८५ ।। खळें आणि जोंधळा । अवघाची आहे आपला । तिमाजी नोकर नांवाला । व्यवहार दृष्टीं आहे कीं ।।८६।। ब्रह्मांडाचें संरक्षण । आपण करितां येथून । लेंकरासाठीं त्रास पूर्ण । माता सोसी वरच्यावरी ।। ८७ ।। मी लेंकरूं आपुलें । म्हणूनिया आपण केलें । खळ्यांत

तें जाऊन भलें । मोरगांवी संरक्षण ।।८८।। ऐसीच कृपा निरंतर। स्वामी असावी माझ्यावर । आतांच जाऊन करितों दूर । नोकरीवरून तिमाजीला ।। ८९ ।। ऐसें बोलतां मारुती । कौतुक वाटले समर्थांप्रती। आणि भाषण केलें येणे रीति । तें आतां अवधारा ।। १९० ।। छे ! छे ! वेड्या ! तिमाजीस । नको मुळींच काढूंस। नोकरीवरून खास । त्याचे वर्म सांगतों तुला ।। ९१ ।। तिमाजी नोकर इमानी । खळ्यांत गाढवें पाहूनी । दु:खी झाला असे मनीं । तें म्यां तेव्हांच जाणिलें ।। ९२ ।। रात्रीची हकीकत । तुला सांगावया प्रत । आला होता भीत भीत । सकाळी ना तुजकडे ।। ९३ ।। तैं तूं म्हणालास त्याला । मी जातों आहे शेगांवाला। उद्यां सकाळीं खळ्याला । येऊनिया पाहीन ।। ९४ ।। ऐसें गुरुवचन ऐकिलें । मारुतीसी चोज जहालें । पहा संतांचे कर्तृत्व भलें । कैसें आहे अगाध ।।९५।। गाढवें खळ्यांत पडलेली । कोणीं न त्या सांगितलीं। ती अंतर्ज्ञानें जाणिलीं । गजाननानें श्रोते हो ।।९६।। शके अठराशें सोळासी। महाराज बाळापुरासी। असतां गोष्ट झाली ऐसी। ती थोडकी सांगतों ।। ९७ ।। तेथें सुखलाल बन्सीलालाची । एक बैठक होती साची । त्या बैठकीसमोर महाराजांची । स्वारी बैसली आनंदांत ।।९८।। मूर्ति अवघी दिगंबर। वस्त्र नव्हतें तिळभर । त्या पाहून भाविक नर । नमन करून जात होते ।। ९९ ।। तो होता हमरस्ता। बाजारपेठेचा तत्त्वतां । त्या पंथानें जात होता । एक पोलीस हवालदार ।। २०० ।। नांव त्या हवालदाराचें । नारायण आसराजी होतें साचें । समर्था पाहून डोकें त्याचें । फिरून गेलें तात्काळ ।। १ ।। तो म्हणे हा नंगा धोत । मुद्दाम बसला पथांत । साधू ना हा भोंदू सत्य। त्याची उपेक्षा न करणें बरी ।। २ ।। ऐसे बोलून जवळीं गेला । अद्वातद्वां बोलूं लागला। लाज कैसीं नाहीं तुजला । नंगा बसतोस रस्त्यावरी ।। ३ ।। हें घे त्याचें प्रायश्चित्त। तुला मी देतों आज येथ । ऐसें बोलून स्वामीप्रत । मारूं लागला छडीनें ।। ४ ।। वळ पाठपोटावरी । उठते झाले निर्धारी। परी ना हवालदार आवरी । मारता हात आपुला ।। ५ ।। ऐसे तेधवां पाहून । एक गृहस्थ आला धांवून । आपुल्या दुकानामधून । हुंडीवाला नाम ज्याचें ।। ६ ।। तो म्हणे हे हवालदार । तूं विचार कांहीं कर। उगेंच सत्पुरुषावर । हात टाकणें बरें नव्हे ।। ७ ।। कां कीं, संतांचा कैवारी। एक आहे श्रीहरी । वळ त्यांच्या पाठीवरी। उठले ते कां न दिसले तुला ? ।। ८।। या कृत्यानें तुझा अंत। जवळीं आला अत्यंत। आजारीच मोडतो पथ्य। मरावयाकारणें ।। ९।। तेंच तूं आज केलें । हें न कांहीं बरें झालें। अजून तरी उघडी डोळें । माफी माग गुन्ह्याची ।। २१०।। हवालदार म्हणे माफीचें। कारण मसीं न मागण्याचें । कावळ्याचे शापें साचें । काय ढोरें मरतील ! ।। ११ ।। हा नंगा धोत हलकट। बसला पाहून बाजारपेठ । तोंडानें गोष्टी चावट । अचाट ऐसा

करीत हा ।। १२ ।। ऐशा ढोंग्याला मारणें । ईश्वर जरी मानील गुन्हे । तरी मग न्याया कारणें । जागाच नाहीं राहिली ।। १३ ।। तेंच पुढें सत्य झालें । हवालदार पंचत्व पावले । त्या बाळापूर नगरींत भले । आपण केलेल्या कृत्यानें ।।१४।। एका पंधरवड्यांत । हवालदाराचे अवघे आप्त । होते झाले भस्मीभूत । एका साधूस मारल्यानें ।।१५।। म्हणून अवघ्या लोकांनीं । साधूसमोर जपूनी । वागावें प्रत्येकानीं । खरें कळेपर्यंत ।।१६।। नगर जिल्ह्यांत संगमनेर । प्रवरा नदीचे कांठावर । गांव अति टुमदार । त्याचें वर्णन करवेना ।। १७ ।। अनंतफंदी नांवाचा । कवि जेथें झाला साचा । तेथील हरी जाखड्याचा । ऐका तुम्ही वृत्तान्त हा ।। १८ ।। हा हरी जाखडी माध्यंदिन । होता यजुर्वेदी ब्राह्मण । गांवोगांव फिरून । पोट आपुलें भरितसे ।।१९।। तो फिरत फिरत शेगांवासी । आला समर्थ दर्शनासी । बसतां झाला पायांपासीं । श्रीगजानन स्वामींच्या ।।२२०।। तों हजारों घेती दर्शन । कोणी ब्राह्मणभोजन । कोणी खडीसाखर वांटून । नवस केलेला फेडितीं ।। २१ ।। तईं हरी म्हणे चित्तासी । हा केवढा ज्ञानरासी । येऊनिया पायांपासीं । विन्मुख जाणें भाग मला ।।२२।। कां कीं दैव खडतर । माझें आहे साचार । निव्वळ पर्वत खडकावर । हरळ उगवेल कोठोनी ? ।।२३ ।। आज अन्न मिळालें । उद्यांचे कोणीं पाहिलें । ऐसें करीत संपले । दिवस माझे आजवर ।। २४ ।। संग्रहासी नाहीं धन । शेतवाडा मळा जाण । मी ना मुळींच विद्वान् । मला कन्या कोण देईल ? ।। २५ ।। हे स्वामी गजानना । सच्चिदानंदा दयाघना ! । संसारसुखाची वासना । जहाली मनीं बलवत्तर ।। २६ ।। ती तूं पूर्ण करावी । मुलें लेंकरें मला व्हावी । प्रथम बायको मिळावी । कुलीन आज्ञाधारक ।। २७ ।। ऐसें जो इच्छी मनांत । तोंच त्याच्या अंगावर्त । थुंकते झाले सद्गुरुनाथ । इच्छेस त्याच्या जाणूनी ।। २८ ।। या हरी जाखड्यानें । बावंच्या मागला मजकारणें । म्हणून आलें थुंकणें । या मूर्खाच्या अंगावर ।। २९ ।। संसारापासून सुटावया । लोक भजती माझ्या पाया । यानें येथें येऊनिया । संसारसुख मागितलें ।। २३० ।। पहा जगाची रीत कैसी । अवघेच इच्छिती संसारासी । सच्चिदानंद श्रीहरीसी । पहाण्या न कोणी तयार ।। ३१ ।। ऐसें आपणासी बोललें । पुन्हां जाखड्यासी पाहिलें । जें जें तूं इच्छिलें । सांप्रतकालीं मनांत ।। ३२ ।। तें तें अवघें होईल पूर्ण । पुत्रपौत्र तुजलागून । होतील संग्रहासी धन । तेंही थोडकें राहील ।। ३३ ।। जा आतां परत घरा । सुखें करी संसारा । करीत असावा परमेश्वरा । आठव वेड्या! विसरूं नको ।। ३४ ।। ऐसें तयासी बोलून । प्रसाद म्हणून थोडकें धन । दिलें हरी जाखड्याकारण । लग्न स्वत:चे करावया ।। ३५ ।। हरी जाखड्या संगमनेरीं । सुखी जाहला संसारीं । महाराजांची वाणी खरी । ती कोठून खोटी होईल ।। ३६ ।। ऐसाच एक निमोणकर ।

गोविंदाचा कुमार । रामचंद्र नामें साचार । ओव्हरसिअरच्या हुद्यावरी ।।३७ ।। बेंद्रे वासुदेव सर्व्हेअर । होता त्याच्या बरोबर । तो आणि निमोणकर । आले मुकना नदीवरी ।।३८ ।। हा मुकना नाला डोंगरांत । आहे सह्याद्री पर्वतांत । इगतपुरी तालुक्यांत । बुध हो नाशिक जिल्ह्याच्या ।। ३९ ।। वनश्री ती रमणीय अती । तिचें वर्णन करूं किती । हरीण बालकें बागडती । निर्भयपणें काननांत ।। २४० ।। फलभारें तरूवर । वांकले असती अपार । वन्य पशु फिरती स्वैर । बिब्बट लांडगे ते ठायां ।। ४१ ।। असो या मुकन्या नाल्यापासी । जवळ एका खोऱ्यासी । एका जलाच्या प्रवाहासी । कपीलधारा नाम असे ।। ४२ ।। तेथें प्रत्येक पर्वणीस । भाविक येती स्नानास । लौकिक याचा आसपास । तीर्थ म्हणून पसरलासे ।। ४३ ।। असो एक्या पर्वणीसी । निमोणकर गेले स्नानासी । योगाभ्यास थोडा यासी । येत होता विबुध हो ।। ४४ ।। तो पूर्ण व्हावा म्हणून । इच्छीत होतें त्याचें मन । गोसावी बैराग्यालागून । पुसूं लागला तेथल्या ।।४५।। नाहीं नाहीं माहीत मात । ऐकूं येई सर्वत्र । तेणें निमोणकर चित्तांत । हताश पूर्ण जहाला ।। ४६ ।। काय करूं देवा आतां । मला योगाभ्यास शिकवितां । कोठे भेटेल तत्त्वतां । ती कृपा करून सांगणें ।।४७ ।। तो कपीलधारेवरी । एक पुरुष देखिला अधिकारी । ज्याचे हात गुडघ्यावरी । येऊन सहज लागले ।। ४८ ।। उंच बांधा मुद्रा शांत । बसला होता ध्यानस्थ । त्यास घातलें दंडवत । निमोणकरानें अष्टांगेसी ।। ४९ ।। बराच वेळ झाला जरी । योगी न कांहीं बोले परी । अस्तमानाची वेळ खरी । समीप येऊं लागली हो ।। २५०।। पोटीं ना अन्न तिळभर । बिऱ्हाड राहिलें बहु दूर । कपीलधारेचे धरून नीर । तुंब्यांत गोसावी निघाले ।। ५१ ।। तैं निमोणकर म्हणे समर्था ! । अंत माझा किती पहातां । ठाऊक असल्या योगगाथा । मशीं कांहीं शिकवा हो !।। ५२ ।। तो अखेर अस्तमानीं । बोलते झाले कैवल्यदानी । हा चित्रपट घेऊनी । जा आपुलें काम करी ।। ५३ ।। षोडशाक्षरी त्यावर । मंत्र लिहिला आहे थोर । त्याचा वाणीनें निरंतर । जप आपुला करावा ।। ५४ ।। मंत्रप्रभावें थोडाबहुत । योग येईल तुजप्रत । योगमार्ग हा अत्यंत । कठीण सर्व योगामध्यें ।। ५५ ।। गोगलगाय शेप किडा । हिमालया न देईल वेढा ! । सागरीचा सिंप किडा । मेरू पर्वता न जाय कधीं ।। ५६ ।। नेटाचा केला यत्न । ब्रह्मचर्य संभाळून । येतील दहापांच आसन । धौती नौती केल्यावरी ।। ५७ ।। जा पुढें न विचारी मला । हा घे देतों प्रसाद तुला । ऐसें बोलून उचलिला । एक तांबडा खडा करें ।। ५८ ।। तो देऊनियां मजसी । गुप्त झाले पुण्यरासी । तेच पुढें नाशिकासी । गंगेवरी भेटले त्या ।। ५९ ।। त्या पाहून निमोणकर । गेले धांवत साचार । शिर ठेवून पायांवर । प्रश्न त्यांसी ऐसा केला ।। २६० ।। महाराज माझा कंटाळा । कां हो !

आपणच कां केला ? । आपुल्या नांव गांवाला । न सांगतांच गेला कीं ।। ६१ ।। महाराज डोळे वटारून । बोलते झाले त्याकारण । तांबडा खडा देऊन । नांव माझें कथिलें म्यां ।। ६२ ।। नर्मदेचा गणपती । तांबडा असतो निश्चिती । तूं मूळचाच मूढमती । रहस्य त्याचें न जाणिलें ।। ६३ ।। म्हणून त्याचें गूढ तुला । पडतें झालें जाण मुला ! । मी रहातों शेगांवाला । गजानन हे नांव माझें ।। ६४ ।। धुमाळ सदनापर्यंत । चाल माझ्या समवेत । पुन्हां भेटी तुजप्रत । होईल माझी ते ठायां ।। ६५ ।। ऐसें बोलूनी निघाले । महाराज रस्त्यांत गुप्त झाले । भिरभिरी पाहूं लागले । चहूंकडे निमोणकर ।। ६६ ।। कंटाळून अखेरी । धुमाळाच्या आले घरीं । तो गजानन महाराज ओसरीवरी । बसलें ऐसें पाहिले ।। ६७ ।। मौनेंच करून वंदन । कथिलें धुमाळाकारण । कपीलधारेपासून । जें कां झालें इथवरी ।।६८ ।। तें ऐकून धुमाळाला । अतिशय आनंद जहाला । तो म्हणे योगीराजाला । वाण कशाची सांग मज ।। ६९ ।। हे अवघ्या सामर्थ्यांची । खाण निःसंशय आहेत साची । सार्वभौमपदाची । त्यांच्या पुढें न किंमत ।।२७०।। जो तांबडा खडा तुसी । दिला तो ठेवून पाटासी । करणें पूजा अर्चेसी । सद्भावें निरंतर ।। ७१ ।। योगाभ्यास ही समोरी । त्या खड्याच्या आदरें करी । त्याच्या कृपेनें कांही तरी । योगाभ्यास येईल ।। ७२ ।। तेंच पुढें झालें सत्य । योगाभ्यास थोडाबहुत । आला निमोणकराप्रत । श्रीगजाननकृपेनें ।। ७३ ।। एक शेगांवचा रहिवासी । तुकाराम कोकाटे परियेसी । त्याची संतति यमसदनासी । जाऊं लागली उपजतांच ।। ७४ ।। म्हणून त्यानें समर्थांला । एकदां नवस ऐसा केला । जरी देशील संततीला । दीर्घायुषी गुरुराया ।। ७५ ।। तरी एक मुलगा त्यांतून । तुसी करीन अर्पण । मनोरथ त्याचें पूर्ण । केले श्रीगजाननस्वामींनें ।। ७६ ।। दोन तीन मुलें झाली । परी नवसाची न राहिली । आठवण तुकारामा भली । संततीच्या मोहानें ।। ७७ ।। तो थोरला मुलगा नारायण । रोग झाला त्याकारण । औषधोपचार केलें जाण । परी न आला गुण कांहीं ।। ७८ ।। नाडी बंद होऊ लागली । नेत्रांची ती दृष्टि थिजली । धुगधुगी मात्र उरली । होती त्याच्या छातीला ।। ७९ ।। ती स्थिती पाहून । तुकारामा झाली आठवण । नवस केल्याची ती जाण । एकदम त्या समयाला ।। २८० ।। तुकाराम म्हणे गुरुराया । हा पुत्र माझा वांचलिया । अर्पण करीन सदया । सेवा तुमची करण्यास ।। ८१ ।। ऐसा वचनबद्ध होतां क्षणीं । नाडी आली ठिकाणीं । हळुहळुं नेत्र उघडोनी । पाहूं लागला बाल तो ।। ८२ ।। व्याधि बरी झाल्यावर । तो नारायण नामे कुमार । आणून सोडला मठावर । नवस आपला फेडावया ।। ८३ ।। तो नारायण अजूनी । आहे तया ठिकाणीं । बोलिलेला नवस कोणी । महाराजांचा चुकवूं नये ।।८४।। हेंच सांगण्या लोकांप्रत । नारायण आहे

जिवंत । शेगांवी त्या मठांत । संतचरित्र ना कादंबरी ।।८५ ।। असो पुढें आषाढमासीं । महाराज गेले पंढरीसी । घेऊन हरी पाटलासी । विठ्ठलासी भेटावया ।।८६।। जो सर्व संतांचा । ध्येयविषय साचा । जो कल्पतरू भक्तांचा । कमलनाभसर्वेश्वर ।।८७।। जो जगदाधार जगत्पति । वेद ज्याचे गुण गाती । जो संतांच्या वसे चित्तीं । रुक्मिणीपती दयाघन ।। ८८ ।। पंढरीस आले गजानन । चंद्रभागेचें केलें स्नान । गेलें घ्याया दर्शन । पांडुरंगाचे राऊळीं ।। ८९ ।। हे देवा पंढरीनाथा । हे अचिंत्या अद्वया समर्था । हे भक्तपरेशा रुक्मिणीकांता । ऐक माझी विनवणी ।। २९० ।। तुझ्या आज्ञेनें आजवर । भ्रमण केलें भूमिवर । जे जे भाविक होते नर । त्यांचे मनोरथ पूर्ण केले ।। ९१ ।। आतां अवतारकार्य संपलें । हें तूं जाणसी वहिले । पुंडलीक वरदा विठ्ठले । जाया आज्ञा असावी ।। ९२ ।। देवा ! मी भाद्रपदमासीं । जावया इच्छितों वैकुंठासी । अक्षईचे रहावयासी । तुझ्या चरणासन्निध ।।९३।। ऐसी करून विनवणी । समर्थांनीं जोडिले पाणि । अश्रु आले लोचनीं । विरह हरीचा साहवेना ।।९४।। हरी पाटील जोडून हातां । पुसूं लागला पुण्यवंता । अश्रु कां हो सद्गुरुनाथा । आणिलें लोचनीं ये वेळां ? ।।९५।। किंवा मी कांहीं सेवेला । चुकलों आहे दयाळा । म्हणून आपणां खेद झाला । ते सांगा लवलाही ।।९६ ।। महाराज म्हणाले त्यावर । हरी पाटलाचा धरून कर । सांगितले तरी न कळणार । त्याचें वर्म बापा तुला ।।९७।। तो विषय खोल भारी । तूं न पडावें त्या भीतरीं । इतकेंच सांगतों श्रवण करी । संगत माझी थोडी असे ।।९८।। चाल आतां शेगांवाला । तूं आपल्या ठिकाणाला । तुमच्या पाटील वंशाला । कांहीं न कमी पडेल ।।९९।। पंढरीचें मावंदे केलें । शेगांवामाजी भलें । चित्त चिंतेनें व्याप्त झालें । मात्र हरी पाटलाचें ।। ३०० ।। तो म्हणे मंडळींस । महाराज वदले पंढरीस । संगत राहिली थोडे दिवस । माझी विठूच्या राऊळीं ।।१।। पुढें श्रावणमास गेला । क्षीणता आली तनूला । पुढें भाद्रपदमास आला । काय झालें तें ऐका ।। २ ।। गणेश चतुर्थीचें दिवशीं । महाराज म्हणाले अवघ्यांसी । आतां गणपती बोळवण्यासी । यावें तुम्ही मठांत ।।३।। कथा गणेशपुराणांत । ऐशापरी आहे ग्रंथित । चतुर्थीच्या निमित्त । पार्थिव गणपती करावा ।।४।। त्याची पूजा अर्चा करून । नैवेद्य करावा समर्पण । दुसरे दिवशीं विसर्जून । बोळवावा जलामध्यें ।।५।। तो दिवस आज आला । तो साजरा पाहिजे केला । या पार्थिव देहाला । तुम्ही बोळवा आनंदें ।। ६।। दुःख न करावें यत्किंचित् । आम्ही आहों येथें स्थित । तुम्हां सांभाळण्याप्रती सत्य । तुमचा विसर पडणें नसे ।। ७ ।। हें शरीर वस्त्रापरी । बदलणें आहे निर्धारी । ऐसें गीताशास्त्रांतरीं । भगवान् वदला अर्जुना ।।८।। जे जे ब्रह्मवेत्ते झाले । त्यांनी त्यांनी ऐसेंच केलें । शरीरवस्त्रांसी बदलिलें । हें कांही विसरू नका ।। ९ ।। चतुर्थीचा

अवघा दिवस। आनंदामाजीं काढिला खास । बाळाभाऊच्या धरिलें करास । आसनीं आपल्या बसविलें ।। ३१० ।। मी गेलों ऐसें मानूं नका। भक्तीत अंतर करूं नका । कदा मजलागी विसरूं नका। मी आहे येथेंच ।। ११।। ऐसें भाषण करून । योगें रोधिला असे प्राण। दिला मस्तकी ठेवून। त्या महात्म्या पुरुषानें ।।१२।। शके अठराशें बत्तीस । साधारणनाम संवत्सरास। भाद्रपद शुद्ध पंचमीस। गुरुवारी प्रहर दिवसाला ।। १३ ।। प्राण रोधितां शब्द केला। 'जय गजानन' ऐसा भला । सच्चिदानंदीं लीन झाला । शेगांवामाझारीं ।। १४ ।। देहाचें तें चलनवलन। पार गेलें मावळोन । स्वामी समाधिस्थ पाहून। लोक हळहळूं लागले ।। १५ ।। पुकार झाली गांवांत । स्वामी झाले समाधिस्थ । ऐसी ऐकतां मात । हृदय पिटतीं नारीनर ।। १६ ।। गेला गेला साक्षात्कारी । चालता बोलता श्रीहरी। गेला गेला कैवारी । आज दीनजनांचा ।। १७ ।। गेला आमुचा विसांवा। गेला आमुचा सौख्यठेवा। विझाला हा ज्ञानदिवा । कालरूपी वाऱ्यानें ।। १८ ।। अहो गजाननस्वामी समर्था ! । आतां आम्हांस कोण त्राता ? । कां रे इतक्यांत पुण्यवंता । गेलास आम्हां सोडून ? ।। १९ ।। मार्तंड पाटील, हरी पाटील । विष्णुसा, बंकटलाल। ताराचंद प्रेमळ । भक्त स्वामींचा जो असे ।। ३२० ।। श्रीपतराव कुळकर्णी । मठामाजीं जमले जाणी। विचार केला अवघ्यांनी । ऐशा रीतिं श्रोते हो ।। २१ ।। आज आहे पंचमीचा दिवस। समाधि न द्या स्वामीस । हाळोपाळीच्या लोकांस । येऊं द्या हो दर्शना ।। २२ ।। आतां पुढें ही मूर्ति । लोपणार आहे निश्चिती। अस्तमानापर्यंत ती। लोकांची ती वाट पाहा ।। २३ ।। ज्यांच्या नशिबीं असेल । तयांना दर्शन घडेल । नका करूं आतां वेळ । जासूद धाडा चोहींकडे ।। २४ ।। गोविंदशास्त्री डोणगांवचे । एक विद्वान् होते साचे । ते बोलिले आपुल्या वाचें । सर्व लोकांस येणें रीतिं ।। २५ ।। त्यांच्या आवडत्या भक्तांसी । ते दर्शन देतील निश्चयेंसी। तोपर्यंत प्राणासी । मस्तकीं धारण करतील ।। २६ ।। त्याची प्रचीति पहावया । नको कोठें लांब जाया । पहा लोणी ठेवूनिया । येधवां मस्तकीं स्वामींच्या ।। २७ ।। लोणी ठेवितां शिरावरी। तें पघळूं लागलें निर्धारी । जो तो त्याचें कौतुक करी । बल हें योगशास्त्राचें ।।२८।। तो प्रकार पहातां। गोविंदशास्त्री झाला बोलतां । एक दिवसाची काय कथा । हे राहतील वर्षभर ।। २९।। नि:संशय ऐशा स्थितींत । परी हें करणें अनुचित । आवडते अवघे आलिया भक्त । समाधि द्या स्वामीला ।। ३३० ।। तें अवघ्यांस मानवलें । स्वामींपुढें आदरें भलें। भजन त्यांनी मांडिलें । हजार टाळ जमला हो ।। ३१ ।। दूरदूरच्या भक्तांप्रत। स्वामी जाऊन स्वप्नांत । आपुल्या समाधीची मात। कळविते झालें विबुध हो ।। ३२ ।। तया ऋषिपंचमीला । अपार मेळा

मिळाला । लोकांचा तो शेगांवाला । घ्याया दर्शन स्वामींचें ।।३३ ।। रथ केला तयार । दिंड्या आल्या अपार । सडे घातले रस्त्यांवर । गोमयाचे बायांनी ।।३४ ।। रंगवल्या नानापरी । काढूं लागल्या चतुर नारी । दीपोत्सव झाला भारी । त्या शेगांवग्रामाला ।।३५।। मूर्ति ठेविली रथांत । मिरवणूक निघाली आनंदांत । रात्रभरी शेगांवांत । तो ना थाट वर्णवे ।। ३६ ।। वाद्यांचे नाना प्रकार । दिंड्या मिळाल्या अपार । होऊं लागला भजनगजर । विठ्ठलाच्या नांवाचा ।। ३७ ।। तुळशी बुक्का गुलाल फुलें । भक्त उधळूं लागले । फुलांखाली झांकून गेले । श्रीगजानन महाराज ।। ३८ ।। बर्फी पेढ्यांस नाहीं मिती । लोक वांटिती खिरापती । कित्येकांनी रथावरती । रुपये पैसे उधळीले ।। ३९ ।। ऐशी मिरवणूक रात्रभर । शेगांवीं निघून अखेर । उदयास येतां दिनकर । परत आली मठांत ।।३४०।। समाधीच्या जागेवरी । मूर्ति नेऊन ठेविली खरी । रुद्राभिषेक केला वरी । अखेरचा देहाला ।। ४१ ।। पूजा केली पंचोपचार । आरती उजळली अखेर । भक्तांनीं केला नामगजर । गजाननाचे नांवाचा ।। ४२ ।। जय जय अवलिया गजानना ! । हे नरदेहधारी नारायणा ! । अविनाशरूपा आनंदघना ! । परात्परा जगत्पते ।।४३।। ऐशा भजनाभीतरीं । मूर्ति ठेविली आसनावरी । उत्तराभिमुख साजिरी । शास्त्रमार्गाप्रमाणें ।।४४ ।। अखेरचें दर्शन । अवघ्यांनी घेतलें जाण । 'जय स्वामी गजानन' । ऐसें मुखें बोलोनी ।। ४५ ।। मीठ अर्गजा अबीर । यांनीं ती भरली गार । शिळा लावूनी केलें द्वार । बंद भक्तांनी शेवटीं ।।४६।। दहा दिवसपर्यंत । समाराधना चालली तेथ । घेऊन गेले असंख्यात । लोक स्वामींच्या प्रसादा ।। ४७ ।। खरोखरीच संतांचा । अधिकार तो थोर साचा । सार्वभौम राजाचा । पाड नाहीं त्यांच्या पुढें ।। ४८ ।। स्वस्ति श्रीदासगणूविरचित । हा श्रीगजानन विजय नामें ग्रंथ । भाविकां दावो सत्पथ । भक्ति हरीची करावया।। ३४९ ।। शुभं भवतु ।। श्रीहरिहरार्पणमस्तु ।।

।। इति श्रीगजानन विजय ग्रंथस्य एकोनविंशोऽध्यायः समाप्त : ।।

# अध्याय विसावा प्रारंभ

श्रीगणेशाय नमः ।। जयजयाजी रुक्मिणीवरा । हे चंद्रभागातटविहारा । देवा वरदपाणीधरा । दासगणूच्या मस्तकीं ।।१।। तूं भूपांचा भूपती । अवघेंच आहे तुझ्या हातीं । मग माझी फजिती । कां रे ऐसी मांडलीस ? ।। २ ।। माझें पाप ताप दहन । करा कृपाकृशानें करून । राहो आनंदी सदा मन । तुझें भजन करावया ।। ३ ।। यांत अंतर केल्यांस । वृथा तुला लागेल दोष । खऱ्या थोरांनी आपणांस । बट्टा लावून घेऊं नये ।। ४ ।। म्हणून हे श्यामसुंदरा । राही रुक्मिणीच्या वरा । पांडुरंगा परम उदारा । माझी इच्छा पूर्ण करी ।। ५ ।। असो समाधिस्थ झाल्यावर । श्रीगजानन साधुवर । म्हणूं लागले नारीनर । आतां काय ह्या शेगांवीं ।। ६ ।। शेगांवींचा ज्ञानगभस्ती । अस्ता गेला निश्चिती । आतां काय तेथें माती । राहिली आहे निव्वळ ।। ७ ।। समुद्राचे आटल्या नीर । वा पुष्पतरूंचा गेला भर । कोण त्याचें करणार । कौतुक या जगामध्यें ? ।। ८ ।। आतां खेपा शेगांवांत । करणें आहे कीं निमित्त ? । देव नसतां देव्हाऱ्यांत । माळा बांधणे व्यर्थची ।। ९ ।। ऐसें कित्येक बोलती । परी ती असे साच भ्रांती । महाराजांची दिव्य ज्योति । अदृश्य आहे तेच ठायां ।। १० ।। जेवीं इंद्रायणीचे तीरीं । ज्ञानेश्वर समाधिस्थ जरी । ते आहेत भेटले परी । तेंच ठायीं भाविकां ।। ११ ।। तैशीच शेगांवांत । श्रीगजाननस्वामी समर्थ । ऐसा जयांचा सिद्धान्त । दर्शन त्यांना तेथ होतें ।। १२ ।। तेविषयींची एक कथा ! सांगतों मी येथ आतां । गणपत कोठाडे नामे होता । एक भाविक गृहस्थ ।। १३ ।। हा रायली कंपनीचा । एजंट शेगांव दुकानीचा । नित्य नेम होता त्याचा । दर्शनाचा श्रोते हो ।। १४ ।। अस्तमानीं प्रति दिवशीं । यावें त्यानें मठासीं । बैसोनिया समाधीपासीं । स्तवन करावें एकनिष्ठें ।। १५ ।। एकदां ऐसें वाटलें त्यास । अभिषेक करून समाधीस । उद्यांच्या विजयादशमीस । ब्राह्मणभोजन घालावें ।। १६ ।। केली सर्व तयारी । अभिषेकाची साजिरी । शिधा मठाभितरीं । धाडिला मोठ्या प्रमाणांत ।। १७ ।। तैं कांता म्हणे हो प्राणनाथा ! । हें तुम्ही काय करितां । हाड नाहीं तुमच्या हातां । खर्च करण्याच्या बाबतींत ।। १८ ।। उद्यां आहे विजयादशमी । म्हणून पोरांबाळांसी । कपडे अलंकार अंगासी । करून घाला कांही तरी ।। १९ ।। हे अभिषेक ब्राह्मणभोजनें । वरचेवरी न योग्य करणें । दिलीं आपणां ईश्वरानें । चार पोरेंबाळें हो ।। २० ।। फुटका मणि ना अंगावरती । मी लंकेची पार्वती । गृहस्थाची ही कां रीती ? । संचय

करावा धनाचा ।। २१ ।। हें कांतेंचें भाषण । गणपतरावा न रुचलें जाण । तो म्हणे प्रपंचाहून । श्रेष्ठ परमार्थ वाटे मला ।।२२।। तोच त्याच्या कांतेसी । स्वप्न पडलें रात्रीसी । उगे न छळी पतीसी । तो करतो तें करूं दे ।।२३।। त्यांत तुझ्या बापाचें । काय जातें सांग साचें । प्रेम अशाश्वताचें । वेडे ! हें बाळगूं नको ।। २४ ।। यामध्यें न कांहीं सार । धन भूचें भूमिवर । येतें मात्र बरोबर । पाप पुण्य मानवाच्या ।। २५ ।। अभिषेक ब्राह्मणभोजन । हे पारमार्थिक आहे पुण्य । त्याच्यासाठीं वेंचितां धन । तें न जाय अनाठायीं ।। २६ ।। पेरलेल्या बिजापरी । त्याची स्थिति होते खरी । म्हणून सांगतों तुला पोरी । अडथळा त्या करूं नको ।। २७ ।। ऐशा पाहून स्वप्नास । सांगती झाली पतीस । तेणें गणपतरावास । हर्ष झाला विबुध हो ।। २८ ।। आलें कां हें प्रत्यंतर । महाराज येथेंच साचार । सोडून द्यावा कुविचार । आजपासून कांहीं तरी ।। २९ ।। मुलेंबाळें कोणाचीं । धनदौलत कोणाची । तूं न वाही चिंता त्यांची । तें अवघे समर्थांचें ।।३०।। असो गणपतरावानें । पूजन केले आनंदानें । त्या दसऱ्याच्या मुहूर्तानें । खर्चही केला अत्युत्तम ।। ३१ ।। या गणपतरावाची । निष्ठा समर्थपदीं साची । जडली शुद्ध स्वरूपाची । होती पहिल्यापासून ।। ३२ ।। लक्ष्मण हरी जांजळाला । ऐसाच अनुभव एक वेळां । बोरीबंदरावरी आला । तो ऐका सांगतों ।। ३३ ।। कांहीं कामानिमित्त । लक्ष्मण गेला मुंबईत । हा समर्थांचा होता भक्त । पहिल्यापासून विबुध हो ।। ३४ ।। घरच्या कांहीं कटकटीनें । वैताग त्याच्या घेतला मनें । कांहीं व्यापारासंबंधानें । आला होता मुंबईस ।। ३५ ।। असो बोरीबंदरावरी । लक्ष्मण आला जाया घरीं । तो आगगाडीच्या धक्क्यावरीं । एक भेटला परमहंस ।। ३६ ।। आजानुबाहु उंच बांधा । दृष्टि नासाग्रासी सदा । ओंकाराचा सर्वदा । जप चालला त्याच्या मुखीं ।।३७।। तो बोलला लक्ष्मणास । तूं गजाननाचा आहेस शिष्य । ऐसें असून हताश । कां होतोस कळेना ? ।।३८।। तूं आपल्या जेव्हां घरीं । पुण्यतिथि केलीस खरी । चारशें पानांची तयारी । करून अमरावतीला ।। ३९ ।। गोपाळराव पेठकर । आणि बापट मास्तर । यांचा कैसा प्रकार । घडला तो आण मना ।। ४० ।। पुत्रशोक बापटासी । झाला असून प्रसादासीं । तो तुझ्या गेहासी । आला होता ना सांग तें ।। ४१ ।। पेठकराचे ब्राह्मण भले । सांग कशानें राहिलें ? । अरे गजाननस्वामी गेले । त्या उभयतांच्या स्वप्नांत ।। ४२ ।। उपदेश करून दोघांस । आणिले होतें प्रसादास । हें कैसें विसरलास ? । सांग मला ये वेळीं ।। ४३ ।। खुणेच्या गोष्टी ऐकून । साशंक झाला लक्ष्मण । म्हणे हा असावा कोण । हें कांहीं कळत नसे ।। ४४ ।। लक्ष्मणें त्या संन्याशाला । आदरें नमस्कार केला । तो पाहातां पाहातां गुप्त झाला । बोरीबंदर स्टेशनासी ।। ४५ ।। मग लक्ष्मण येऊन घरीं । वागूं

लागला पहिल्यापरी । प्रतिवर्षी आपुल्या घरीं । पुण्यतिथीचा प्रारंभ केला ।।४६।। अवधूत जयराम खेडकरासी । राहीत साहीत गांवांसी । भेटते झाले पुण्यराशी । संन्याशाच्या वेषानें ।। ४७ ।। एक माधव मार्तंड जोशी । कळंब कसूर ग्रामासी । आला मोजणी करावयासी । जमिनीची श्रोते हो ।। ४८ ।। हा सरकारी नोकर । होता रेव्हेन्यु ऑफिसर । त्याचा गजानन साधुवर । पूर्ण होता भरंवसा ।। ४९ ।। दिवसभर मोजणी केली । पुढें त्यास इच्छा झाली । अस्तमानाचे समया भली । शेगांवास जाण्याची ।। ५० ।। आज गुरुवारचा आहे दिन । घेऊं समर्थांचें दर्शन । ऐसा विचार करून । आज्ञा केली शिपायाला ।। ५१ ।। जोड आपुली वेगें दमणी । जाऊं शेगांवालागुनी । रात्र तेथें काढूनी । येऊं सकाळीं परत पुन्हां ।। ५२ ।। तईं तो शिपाई कुतुबुद्दीन । बोलला कर जोडून । आभाळ आलें भरून । याचा विचार करावा ।। ५३ ।। मन नदीला पाणी भलें । आहे थोडकें आतां आलें । पाही पाणी गढूळ झालें । म्हणून केली विनंती ।।५४।। जोशी म्हणाले त्यावर । अरे आतां होऊं नदीपार । जा दमणी करी तयार । उगीच सबबी सांगू नको ।।५५।। शिपायानें जोडिली दमणी । आला लगेंच घेऊनी । जोशी आंत बैसोनी । जाऊं लागले शेगांवा ।। ५६ ।। दमणी घातली नदींत । तो पाणी आलें अकस्मात् । जाण्या पैल तटाप्रत । अवसर नाहीं राहिला ।।५७।। झंझावात बळावला । कडकडाट करी चपला । मन नदीला पूर आला । क्षणामाजीं भयंकर ।।५८ ।। मेघ वर्षे मुसळधारा । झंझावात सुटला खरा । शेतकऱ्यांचिया छपरा । तो उडवूं लागला हो ।। ५९ ।। शिपाई म्हणे कुतुबुद्दीन । साहेब येथेंच आलें मरण । तुम्हां आम्हांलागून । उपाय यासी आतां नसे ।।६०।। तईं माधव मार्तंड जोशी । घाबरे झाले निजमानसीं । बाहूं लागले समर्थांसी । करुणायुक्त वचानें ।।६१।। हे समर्थ गजानना । रक्षणा आमुच्या करी प्राणां । अशा संकटीं तुझ्याविणा । त्राता न कोणी आम्हांतें ।। ६२ ।। कथा ऐकिली पुराणांत । जहाज बुडतां समुद्रांत । त्यास संतानें देऊन हात । रक्षण केलें सर्वस्वीं ।। ६३ ।। तूंही संत असामान्य । ब्रह्मवेत्ता करुणाघन । करी आमुचें रक्षण । येऊन या पुरामध्यें ।। ६४ ।। दमणींत आलें जीवन । बैल गेले घाबरोन । मग जोशी पुढें होऊन । बोलते झाले शिपायास ।। ६५ ।। तूं आतां मागें सर । अवलीयाचें भजन कर । तेच नेतील आपणां पार । त्याची चिंता करूं नको ।। ६६ ।। जोशी म्हणाले समर्था । अगाध आहे तुझी सत्ता । वाटेल तें करी आतां । तारी अथवा मारी आम्हां ।। ६७।। कासरा दिला सोडून । दोघांनीही मिटले नयन । तों काय घडलें वर्तमान । तें आतां परियेसा ।।६८।। ऐशा महापुरांतूनी । पैल तटा पावली दमणी । उभी राहिली येऊनी । सडकेवरी शेगांवाच्या ।। ६९ ।। ऐसा प्रकार पाहातां । आनंदले उभयतां । पाहा केवढीं अगाध सत्ता ।

आहे अवलीया बाबांची ।। ७० ।। पुरामाजीं रक्षण केलें । निज भक्तां ना बुडूं दिलें । जोशी शेगांवाप्रती आले । एक घटका रात्रीस ।। ७१ ।। वंदन केलें समाधीला । पालखीचा पाहिला सोहळा । दुसरे दिवशीं बहुत केला । दानधर्म जोशांनी ।। ७२ ।। बाळाभाऊचियापासीं । ब्राह्मणभोजन घालण्यासी । कांही रुपये अतिहर्षी । जोशी देते जाहले ।। ७३ ।। साकल्यें कथिलें वर्तमान । बाळाभाऊलागून । हे नवसाचे ब्राह्मण । तुम्ही घाला माझ्यास्तव ।। ७४ ।। कां कीं मला रजा नाहीं । काम जरूरीचें पाही । ऐसें सांगून लवलाही । जोशी गेले निघून ।। ७५ ।। एक यादव गणेश सुभेदार । होता हिंगणीचा राहाणार । हा करितसे व्यापार । वऱ्हाडांत कापसाचा ।। ७६ ।। यास एके सालीं भला । दहा हजार तोटा आला । त्या चिंतेनें क्षीण झाला । कांहीं न सुचे मानसीं ।। ७७ ।। परी व्यापार सोडवेना । चिंता मनींची जाईना । फायदा कांही होईना । त्याच्या मनाप्रमाणें ।। ७८ ।। फायद्यासाठीं खटपट करी । नाना प्रकारें साजिरी । स्वस्थ ना बसती व्यापारी । राहाती सदा प्रयत्नांत ।। ७९ ।। हा एकदां वर्ध्यांत । आला कांहीं कामानिमित्त । उतरण्या गेला घरांत । विनायक असिरकराच्या ।। ८० ।। तों इतक्यात तेथें आला । एक भिकारी बुध हो भला । भिक्षां कांही मागण्याला । असिरकराच्या घरांत ।। ८१ ।। पोषाख अवघा मराठी । करामाजीं भव्य काठी । डोईस होती टोपी मोठी । बनातीची मळकट ।।८२ ।। कंपवायुनें शरीर । कांपत होते वरच्यावर । त्यास पाहातां असिरकर । चित्तीं परम कोपले ।। ८३ ।। जा बेट्या मागल्या द्वारीं । तेथे मिळेल भिक्षा खरी । नको चढूंस पायरी । ओसरीची ये वेळां ।।८४।। परी हे बोल त्याचे । भिक्षेकरी न मानी साचे । येऊनी वरती ओसरीचे । यादवासन्निध बैसला ।। ८५ ।। घाल भिक्षा कांहीं तरी । असें म्हणून पुढें करी । भिक्षापात्र भिकारी । यादव सुभेदाराच्या ।। ८६ ।। यादव म्हणे मनांत । भिकारी हा लोचट बहुत । नको म्हणत असतां येथ । हा बैसला येऊनी ।। ८७ ।। त्यातें पाहातां न्याहाळून । तईं तो भासला गजानन । सुभेदाराकारण । शेगांवचा राजयोगी ।। ८८ ।। दृष्टीस तेज अत्यंत । स्वरही त्यांच्या परी सत्य । फरक इतुकाच होता त्यांत । कंप होता तनूला ।। ८९ ।। तेज मुद्रा बोलणें । होतें समर्थाप्रमाणे । तें पाहून ऐसें म्हणे । सुभेदार निज चित्तीं ।। ९० ।। हा जरी मानूं गजानन । तरी ते गेले समाधिस्थ होऊन । आतां महाराज कोठून । पडतील आमुच्या दृष्टींशीं ? ।। ९१ ।। कांहीं असो पैसे दोन । देऊं भिकाऱ्याकारण । श्रीगजानन समजून । ऊहापोह ज्याचा नको ।। ९२ ।। पैसे घेतले भिकाऱ्यानें । आणिक कांही देई म्हणे । श्रीगजाननाकारणें । शेरणी वाट गुळाची ।। ९३ ।। ते वायदे करिसी वरचेवर । ते मी न आतां मानणार । तोटा दहा हजार । तुज व्यापारीं आला ना ? ।।९४।। त्याचा विचार अंतरीं ।

करून देई कांहीं तरी । रुपये मजला लवकरी । काढ पाकीट खिशांतून ।। ९५ ।। ऐसें भिकारी बोलतां । सुभेदार झाला देतां । कांही रुपये तत्त्वतां । पाकीटाचे काढून ।।९६ ।। भिकारी म्हणे ते अवसरी । संतुष्ट मी इतुक्यावरी । होत नाहीं दे लवकरी । आणखी रुपये कांहीं मला ।। ९७ ।। पुन्हां रुपये काढिले । भिकाऱ्यासी अर्पिले । तों इतुक्यात घरांत गेले । विनायकराव असिरकर ।।९८।। यादवराव एकटा बसला । होता असिरकराच्या ओसरीला । तें पाहून बोलला । सुभेदारासी येणें रीतीं ।। ९९ ।। संशय गजाननाविषयीं । कां घेतोंस चित्तीं पाही ? । कपडे काढून उभा राही । माझ्यापुढें ये वेळां ।। १०० ।। तुझ्या अवघ्या अंगावर । दृष्टि पडूं देई एकवार । माझीं तेणें होईल दूर । व्याधि तुझी यादवा ।। १ ।। तूं मजला मुलापरी । कां रे लाजसी अंतरी ? । ऐसें म्हणून पाठीवरी । हात फिरविला तयांनी ।। २ ।। फिरविला नखशिखांत । अंगावरून त्यानें हात । तों आले इतक्यांत । असिरकर ओसरीला ।।३।। रुपये घेऊन भिक्षेकरी । गेला द्वाराच्या बाहेरी । यादवानें बहुतापरी । तपास केला गांवांत ।।४।। परी न थांग लागला । शेवटी त्यानें निश्चय केला । ऐसा आपुल्या चित्ताला । कीं हा असावा गजानन ।। ५ ।। सुभेदार म्हणे मानसीं । हें समर्थ असल्या आज दिवशीं । फायदा होईल व्यापारासी । कांहींतरी नि:संशय ।। ६ ।। तो सुभेदाराच्या । गाड्या आल्या कापसाच्या । विकावयासाठीं साच्या । वर्ध्याचिया बाजारीं ।। ७ ।। विक्री होता किंमत । येती झाली तया बहुत । तेणें यादव चित्तांत । समाधान पावला ।।८।। आणि निश्चय ऐसा केला । जो भिकारी भेटला । तो होता समर्थ भला । श्रीगजानन योगीराज ।।९।। समर्थ आपुल्या भक्तांसी । रक्षण करिती अहर्निशीं । निष्ठा मात्र त्यांचेविषयीं । दृढतर पाहिजे मनांत ।।११०।। भाऊ राजाराम कवर । खामगांवीं होता डॉक्टर । त्याची तेल्हाऱ्यावर । बदली असे जाहली ।।११।। म्हणून तेथें जाण्याला । खामगांवाहून निघाला । सहकुटुंब मठांत आला । घ्याया श्रींचें दर्शन ।। १२ ।। गाडी केली तेल्हाऱ्याची । तयारी केली निघण्याची । वेळ अस्तमानाची । असती झाली ते वेळां ।। १३ ।। बाळाभाऊ मठाधिपती । तो त्या बोलला येणें रीति । अहो ऐका माझी विनंती । प्रसाद घेऊन जावें तुम्ही ।। १४ ।। तुम्ही आजपर्यंत । गेला न येथून उपोषित । आज ऐसें विपरीत । कां हो मनीं आणिलें ।। १५ ।। ह्यांतून आहे व्यतिपात । हें आणावें मनांत । कवर सांगे त्याप्रत । मला निकड आहे बहु ।।१६।। आज रात्रीं प्रसाद घेतों । मागल्या रात्रीं निघून जातों । नसतां आग्रह मला तो । तुम्ही न करा ये काळीं ।।१७ ।। बोलल्याप्रमाणें निघाला । तेल्हाऱ्यासी डॉक्टर भला । घेऊन मुलांमाणसांला । दमणीमाजीं बसून ।।१८।। रात्र होती अंधारी । महा भयंकर साजरी । वाटे निशा शोक करी । निज पतीच्या वियोगें ।। १९ ।। तों

चमत्कार ऐसा झाला । तेल्हाऱ्याचा रस्ता चुकला । कोणी न भेटे पंथाला । विचारावें कोणा जरी ।। १२० ।।
गाडी अरुंद रस्त्यावर । दोन्ही बाजूंस कांटे फार । गाडी उभी कांठावर । एका भव्य तलावाच्या ।। २१ ।। म्हणतां
झाला गाडीवाला । साहेब रस्ता आहे चुकला । हें ऐकून कवराला । आश्चर्य वाटलें मानसीं ।। २२ ।। खालीं
उतरून जों पाहात । तों अवघें दिसलें विपरीत । अपशब्द बोलला बहुत । तो त्या गाडीवाल्याला ।। २३ ।। तूं
तेल्हाऱ्याचा म्हणून । तुझी गाडी केली जाण । आडमार्गें आणून । आम्हां कैसें सोडिलें ? ।।२४ ।। काय होतास
दारू प्याला । म्हणून हा रस्ता चुकला । वाट तुझ्या डोळ्यांला । दिसली कशी ना सांग मज ? ।। २५ ।।
तेल्हाऱ्याचा रस्ता थोर । आम्ही हमेशा वाहातों साचार । मग आडमार्गावर । गाडी कैसी आली तुझी ? ।।२६ ।।
ऐसें कवर बोलतां । गाडीवाला जोडी हातां । कां हो मजला शिव्या देतां ? । म्यां न अपराध केला कीं ।।२७ ।।
मी हमेशा भाडें करतों । तेल्हाऱ्याहून येथे येतो । वाटेल तेव्हां गाडी हांकतो । रस्ता अवघा माहीत मज ।।२८ ।।
बैलही ना कोठें वळलें । ते नीट येथेंच आले । तलाव पाहातां स्तब्ध झाले । हा न रस्ता तेल्हाऱ्याचा ।। २९ ।।
मग कवर समजला मनांत । हें समर्थांचें आहे कृत्य । प्रसाद घेतल्याविरहित । कां कीं मी निघालों
।। १३० ।। बाळाभाऊच्या विनंतीला । मीं नाहीं मान दिला । म्हणून माझा रस्ता चुकला । आतां वाट गवसे
कशी ? ।।३१ ।। हें भयंकर कानन । येथें मशी त्राता कोण । गजानना ! तुजवांचून । रक्षण माझें कराया ।। ३२ ।।
तो तळ्याच्या दुसऱ्या बाजूला । घांगरमाळांचा आवाज झाला । डॉक्टरांच्या कानीं पडला । तेणें आला थोडा धीर
।।३३ ।। गाडीवाल्यासी म्हणे कवर । रस्ता नाहीं फार दूर । या चाहुलीचा सुमार । धरून गाडी हाण आतां ।।३४ ।।
तें त्यानें ऐकिलें । काट्यांकुपाट्यांमधून नेलें । नीट रस्त्याला लाविलें । या आपल्या गाडीस ।।३५ ।। हमरस्ता
लागतां भली । डॉक्टरानें चौकशी केली । तों ऐशापरी समजली । गोष्ट त्या कवरातें ।। ३६ ।। हें शेगांवचें शिवार ।
आहे अजून साचार । मग म्हणाला डॉक्टर । चाल शेगांवीं परत आतां ।। ३७ ।। सूर्योदयाचे समयाला । शेगांवासी
कवर आला । वृत्तान्त बाळाभाऊला । केला सर्व निवेदन ।। ३८ ।। मग बाळाभाऊ म्हणाले । हेंच आज बरें झालें ।
व्यतिपाती न जाऊं दिलें । समर्थांनीं तुम्हांस ।। ३९ ।। आज प्रसाद ग्रहण करा । उद्यां जा हो तेल्हारा । करूं नये
कधींच खरा । प्रसादाचा इन्कार ।। १४० ।। समर्थांचे तुम्ही भक्त । म्हणून तुम्हां आणिलें परत । मानवाचे अवघे
बेत । सिद्धीस जाणें अशक्य ।। ४१ ।। संतांच्या जें असेल मनीं । तेंच येईल घडोनी । भरंवसा त्यांचे चरणीं ।
ठेवून स्वस्थ असावें ।। ४२ ।। दुसरे दिवशीं प्रसादासी । घेऊन गेला तेल्हाऱ्यासी । आतां पुढील गोष्टीसी ।

अवधान द्यावें श्रवणातें ।। ४३ ।। एक रतनसा नामें नर । होता जातीनें भावसार । तयाचा मुलगा दिनकर । होता एक वर्षाचा ।। ४४ ।। त्यासी सोबणीचा रोग झाला । कोणी म्हणती सटावला । बालक अवघा सुकून गेला । रक्त न राहिलें अंगांत ।। ४५ ।। दिसूं लागलीं अवघीं हाडें । वरती नुसतें कातडें । वैद्य आणले बडेबडे । परी न झाला उपयोग ।।४६ ।। मुलगें रडतां राहिना । दूधपाणी घेईना । ज्वर मुळींच सोडीना । पाहा तयाच्या तनूतें ।।४७।। वैद्य म्हणती रतनसासी । आतां औषध न देईं यासी । हा तुझ्या हातासी । लागणें आहे अशक्य ।। ४८ ।। शक्याशक्य विचार । सुज्ञें करावा निरंतर । उगीच पूल सागरावर । बांधावया जाऊं नये ? ।। ४९ ।। ऐसें ऐकून रतनसा । रडूं लागला ढसढसां । शेवटीं विचार त्यानें ऐसा । केला आपुल्या मानसीं ।।१५०।। येवींतेवीं मरतें पोर । माझें आतां साचार । पाहूं करून एकवार । उपाय हा शेवटचा ।। ५१ ।। दिनकराचा अंतकाळ । आला होता अति जवळ । घरचीं माणसें सकळ । लागलीं श्रोते रडावया ।। ५२ ।। हातपाय गार झाले । नेत्रतेज मंदावलें । मनगटाचें सोडिलें । ठिकाण पाहा नाड्यांनीं ।। ५३ ।। ऐशा स्थितिमाझारी । रतनसानें पुत्र करीं । घेऊन ठेविला असे द्वारीं । नेऊनिया समर्थांच्या ।। ५४ ।। आणि केला त्यांसी नवस । पुत्र माझा उठल्यास । शेरणी वांटीन तुम्हांस । मी पांच रुपयांची ।।५५।। तुम्ही पावले अवघ्यांला । त्याचा अनुभव द्यावा मला । मीही आहे आपुला । माझी उपेक्षा करूं नका ।।५६।। माझें मूल द्वारांत । तुझ्या जरी झालें मृत । तरी अवघ्या वऱ्हाडांत । तुझी होईल नाचक्की ।। ५७ ।। अमृतापरी तुझे चरण । आले सांगत आम्हां जन । हे स्वामी गजानन । कृपा करा या बाला ।।५८ ।। पुत्र न माझा उठला जरी । मी डोकें फोडीन पायांवरी । तुझ्या आज निर्धारीं । ऐसा निश्चय मनींचा ।।५९।। अमृततुल्य तुझी दृष्टि । त्याची करावी आज वृष्टि । नको करूंस मला कष्टी । महापुरुषा गजानना! ।। १६० ।। त्यास कांहीं वेळ झाला । तों प्रकार ऐसा घडून आला । मूल हातापायांला । हालवावया लागलें ।।६१।। नाडी आली ठिकाणीं । रुदन करूं लागलें जाणी । तो प्रकार पाहूनी । लोक सारे आनंदले ।। ६२ ।। समर्थकृपा झाल्यावर । राहिल कोठून त्या दर ? । सूर्याचिया समोर । तमाचा तो पाड नसे ।। ६३ ।। दिनकर थोडे दिवसांत । होता झाला पूर्ववत् । नवस असला श्रद्धायुक्त । तो फळे हा न्याय असे ।। ६४ ।। दादा कोल्हटकरांचा । पुत्र राजा नांवाचा । आहे प्रसाद समर्थांचा । संतकृपा अमोल खरी ।। ६५ ।। कन्या रामचंद्र पाटलाची । चंद्रभागा नांवाची । ज्वान अठरा वर्षांची । लाडेगांव सासर जिचें ।। ६६ ।। ही असतां गरोदर । प्रसंग आला दुर्धर । प्रसूतीची वेळ फार । कठीण स्त्रीजातीला ।। ६७ ।। लाडेगांवाहून माहेरीं । चंद्रभागा आली खरी ।

प्रसूतीस्तव निर्धारी। जनरीतीप्रमाणें ।। ६८ ।। मोठ्या कष्टानें प्रसूती। झाली तिची निश्चिती । तोंच चंद्रभागेवरती। ज्वरें अंमल बसविला ।। ६९ ।। तो होता नवज्वर। थकून गेले डॉक्टर । औषधउपचार केले फार । आपुल्या मुलीस पाटलांनीं ।। १७० ।। थोडाबहुत गुण आला । व्याधि तितक्यापुरता दबला । परी नव्हता मुळींच झाला । नामशेष देहांतूनी ।। ७१ ।। चंद्रभागा आजारी । पडूं लागली वरच्यावरी । एकदां अकोल्या नेलें खरी। औषध तिला द्यावया।। ७२ ।। वैद्य विधानें नाना करिती। कोणी नळसंग्रहणी बोलती । कोणी वैद्य ऐसें म्हणती। क्षय झाला मुलीस या ।। ७३ ।। मेळ एकाचा एकाला । नाहीं मुळीं लागला। मग पाटलानें विचार केला । आतां वैद्य गजानन ।। ७४।। तारो अथवा मारो इसी । अंगारा लावा प्रतिदिवसीं । तीर्थ द्यावें प्यावयासी। समर्थांच्या पायांचें।। ७५ ।। पिता मोठा निष्ठावंत। समर्थांवरी अवघा हेत । हळुंहळूं त्या पोरीप्रत । गुण येता जाहला ।। ७६।। तिला उठवत नव्हतें शय्येसी । तीच आली दर्शनासी । पायीं चालत मठासी। हें महत्त्व अंगाऱ्याचें ।। ७७ ।। निष्ठावंत ज्याचा भाव । तयाशीं पावे देव । उपास्यापदीं भाव। उपासकें ठेवावा।। ७८ ।। रामचंद्राची अंगना । जानकाबाई सुलक्षणा। परी दैवयोग सुटेना। तो भोगल्यावांचुनी ।। ७९ ।। वाताचा झाला विकार। जानकाबाईस साचार। पोट दुखे वरच्यावर। कांही उपाय चालेना ।। १८०।। औषध देतां दबे वात । पुनः उठे पूर्ववत्। ऐसा क्रम दिवस बहुत। चालला होता श्रोते हो ।।८१।। त्या वाताची अखेरी । होती झाली मस्तकावरी। मेंदु बिघडला निर्धारी। गेली जाणीव मावळून ।। ८२ ।। वेड्यापरी करावें । वाटेल तें बोलावें। कधीं उपाशी निजावें। कधीं बसावें जेवत ।। ८३ ।। कोणी म्हणती लागलें भूत । कोणी म्हणती रोग सत्य। कांहीं वदूं लागले तेथ । हा करणीचा प्रकार असे ।। ८४ ।। कां कीं जितके असती जमेदार । त्यांचें असतें वांकडे फार। दुबळा आपुला दावी जोर । चेटूककरणी करुनिया ।। ८५ ।। औषध उपाय बहुत केले। जाणतेही आणविले । गंडे बहुत बांधिले। करीं जानकाबाईच्या ।। ८६ ।। पाटील घरचा श्रीमंत। तो सांपडला अडचणींत । म्हणून येतां झाला ऊत । अवघ्यां त्या दांभिकांना।। ८७ ।। कोणी अंगांत आणावें । वेडाचें निदान करावें। कांही तरी सांगावें । धनास्तव पाटलाला ।। ८८।। तो बिचारा सारें करी । कांता बरी न होय परी । विचार त्यानें अखेरीं । ऐशा रीतीं ठरविला ।। ८९ ।। वैद्य आतां गजानन । जाणता आतां गजानन । देव ऋषि आतां गजानन । तो जें वाटेल तें करो।। १९० ।। माझी बायको सून त्याची । ही भावना माझी साची । आतां अन्य उपायांची । गरज नाहीं आम्हांला ।। ९१ ।। तूं उद्यांपासून । प्रातःकाळीं करी स्नान। मठामाजीं जाऊन। घाली प्रदक्षिणा समाधीसी

।। ९२ ।। तें तिनें पतीचें वचन । सर्वथैव केलें मान्य । समर्थ समाधी लागून । घालूं लागली प्रदक्षिणा ।।९३।। गेल्या न त्या मात्र वायां । दया आली सद्गुरुराया । वातविकार जाऊनियां । निर्दोष ती जाहली ।। ९४ ।। खऱ्या खऱ्या संतांची । सेवा न जाई वांया साची । परी निष्ठा मानवाची । जडणें तेथे अशक्य ।। ९५ ।। समर्थांच्या नंतर । बाळाभाऊ गादीवर । बसले त्यांचे चमत्कार । कांहीं थोडे जाहले ।।९६।। हे वैशाख वद्य षष्ठीसी । शेगांवी गेले वैकुंठासी । त्यांच्यामागून गादीसी । बसले येऊन नारायण ।।९७।। बाळाभाऊ जेव्हां गेले । तेव्हां नारायणासी स्वप्न पडलें । नांदूरें ग्रामीं भलें । तें थोडें सांगतों ।। ९८ ।। हे माळी नारायणा । तूं शेगांवास करी गमना । रक्षण्या भाविक जनांना । ऐसें मला वाटतें ।।९९।। ऐसें स्वप्नीं सांगून । निघून गेले गजानन । म्हणून आले नारायण । शेगांवामाझारीं ।। २०० ।। कांहीं दिवस यांनींही । अधिकार चालविला ते ठायीं । यांची समाधि झाली पाही । चैत्र शुद्ध षष्ठीला ।।१।। पूर्वसुकृतावांचून । संतसेवा न घडे जाण । संतसेवेचें महत्पुण्य । त्या पुण्या पार नसे ।।२।। श्रीगजाननलीलेचा । पार कधीं न लागायाचा । अंबरीच्या चांदण्यांचा । हिशेब कोणा न लागे कधीं ।। ३ ।। मी अज्ञान पामर । मति नाहीं तिळभर । मग हा लीलासागर । मुखीं केवीं वर्णू हो ! ।।४।। त्यानें जें जें वदविलें । तें तें मीं कथित केलें । लेखणीनें अक्षर लिहिलें । परी तें न तिचें सामर्थ्य ।। ५ ।। ती लेखणी ज्याच्या करीं । तोच अक्षरें काढी सारीं । निमित्ताकारण होते खरी । लेखणी ती लिहावया ।।६ ।। तैसेंच येथे झालें । मी लेखणीचें काम केलें । लिहिते लिहविते स्वामी भले । श्रीगजानन महाराज ।।७।। त्यांच्या कृपेंकरून । मी हें केलें लेखन । येथें माझें मोठेंपण । कांहींच नाहीं विबुध हो ! ।। ८ ।। स्वस्ति श्रीदासगणूविरचित । हा श्रीगजाननविजय नामें ग्रंथ । आतां आला कळसाप्रत । कळसाध्याय पुढें असे ।। २०९ ।। शुभं भवतु ।। श्रीहरिहरार्पणमस्तु ।।

।। इति श्रीगजानन विजय ग्रंथस्य विंशोऽध्यायः समाप्तः ।।

# अध्याय एकविसावा प्रारंभ

श्रीगणेशाय नमः ।। जयजयाजी अनंतवेषा । जयजयाजी अविनाशा । जयजयाजी परेशा । ब्रह्मांडाधीशा नमो तुशीं ।। १ ।। देवा ! तूं आपणांस । पतितपावन नाम खास । सर्वदा आहे धरिलेंस । याचा विचार करी गा ।। २ ।। पाप्यावरीं प्रेम अमित । तुझें देवा असतें सत्य । पापी जनांनी तुजप्रत । महत्त्व आणिलें कृपाळा ।। ३ ।। म्हणून माझ्या पातकासी । पाहूं नका हो हृषीकेशी । धुणें येतें जलापासीं । स्वच्छ होतें म्हणून ।। ४ ।। म्हणून पतितांचा कंटाळा । करूं नको रे घननीळा । काय भूमीनें सांवरिला । दिले आहे टाकून ।। ५ ।। तूंच पतितपावन । तूंच पुण्यपावन । या दोन्ही दोषांपासून । तुम्ही अलग सर्वदा ।। ६ ।। सूर्य नाशी तमाप्रत । म्हणून कां तो कष्टी होत । कांहीं न करावें लागत । तम नासण्या रवीशीं ।। ७ ।। तम जों जों भेटण्या येई । तों तों तेथें प्रकाश होई । अंधारत्व अवघें जाई । त्याचें तमाचें नारायणा ।। ८ ।। पापपुण्याची वासना । तूंच उपजविशी नारायणा । आपला रक्षण्या मोठेपणा । पापी तूंच निर्मिशी ।। ९ ।। कांही असो आतां तरी । चिंतारहित मजला करी । दासगणू हा घ्यावा पदरीं । हेंच आहे मागणें ।। १० ।। तुझ्यावांचून मजप्रत । नाहीं वशिला जगतांत । अवघेंच तुझ्या हातांत । आहे कीं रे पांडुरंगा ! ।। ११ ।। श्रोते आतां सावधान । हा कळसाध्याय परिसा पूर्ण । तुमचें भाग्य धन्य धन्य । संतकथा ऐकतसां ।। १२ ।। एकविधा निष्ठा ज्याची । जडली गजाननपदीं साची । त्याच्या दुःखसंकटांची । होळीच होते निःसंशय ।। १३ ।। बांधीत असतां मंदिर । काम करीत शिखरावर । एक होता मजूर । हाताखालीं गवंड्यांच्या ।। १४ ।। तो धोंडा देतां मिस्तरीला । एकाएकी झोंक गेला । तीस फुटांवरून पडला । खालीं घडीव दगडावर ।। १५ ।। तो पडतां लोकांनी पाहिला । जन म्हणती मेला मेला । उंचावरून खालीं पडला । आतां कशाचा वांचे तो ? ।। १६ ।। परी घडलें अघटित । कोठें न लागलें त्याप्रत । जैसा चेंडू झेलितात । तैसें त्याचें जाहलें ।। १७ ।। सोपानसाह्यें ज्यापरी । जन उतरती भूमिवरी । तेथें झालें त्याचपरी । त्या मजुराकारणें ।। १८ ।। मजुर म्हणे लोकांला । माझा जेव्हां झोक गेला । तेव्हां एकानें धरलें मला । पडतां पडतां करास ।। १९ ।। पाय भूमीसी लागतां क्षणीं । तो न दिसला मजलागुनी । हें वृत्त ऐकूनी । लोक अवघे आनंदले ।। २० ।। अभिश्राप कोणाचा । समर्थ ना घेती साचा । हा योग पडण्याचा । दैवानेंच आला तुज ? ।। २१ ।। या तुझ्या पडण्यानें । स्पर्श केला

समर्थानें । तुझ्या कराकारणें । ऐसें भाग्य कोणाचें ? ।। २२ ।। असो एक बाई रजपुताची । जयपुराहून आली साची । बाधा होती भूताची । तया अबलेकारणें ।। २३ ।। तिसी जयपूर ग्रामाला । दत्तात्रयांचा दृष्टान्त झाला । तूं या रामनवमीला । जाईं शेगांवाकारणें ।। २४ ।। तेथे संत जागती ज्योत । श्रीगजानन सद्गुरुनाथ । ते या तुझ्या पिशाच्याप्रत । मुक्ति देतील नि:संशयें ।। २५ ।। या दृष्टान्तेंकरून । आपुल्या दोन मुलांसी घेऊन । रामनवमीसाठीं जाण । बाई आली शेगांवा ।। २६ ।। प्रतिपदेपासून भला । उत्सवासी आरंभ झाला । अफाट समुदाय मिळाला । नवमीस श्रोते शेगांवीं ।। २७ ।। काम सभामंडपाचें । चाललें होतें तेथ साचें । खांब मोठमोठे दगडाचे । उभे केले असती ।। २८ ।। दीड फूट जाडीचा । पांच फूट लांबीचा । प्रत्येक खांब दगडाचा । ऐसे होते किती तरी ।। २९ ।। उत्सवाच्या निमित्त भलें । काम भक्तांनीं बंद केले । खांब होते बसविलेले । नुसते मात्र ते ठाईं ।। ३०।। श्रीरामाचा जन्म झाला । प्रसादासाठीं लोटला । जनांचा तो समुदाय भला । तो न मसी वर्णवे ।। ३१ ।। त्या गर्दीत ही बाई । उभी खांबास एक्या पायीं । होती तिला सोसली नाहीं । गर्दी ती यत्किंचित् ।। ३२ ।। म्हणून खांबाच्या आश्रया । गेली निर्भय व्हावया । गर्दी ती चुकवावया । परी झालें विपरीत ।। ३३ ।। तोंच खांब कोसळला । तिच्या शरीरा पडला । तो पाहतां लोकांला । ऐसें वाटूं लागले ।। ३४ ।। तिचा बहुतेक गेला प्राण । ही बाई कोठील कोण ? । लहान मुलें दिसती दोन । खांबाखालीं येधवां ।। ३५ ।। दहावीस जणांनी । खांब काढिला अंगावरूनी । पाणी मुखांत घालोनी । लोबोकडे पाठविले ।। ३६ ।। ही लोबो डॉक्टरीण । शस्त्रविद्येंत अति प्रवीण । ही जातीनें ख्रिश्चन । भक्त येशू ख्रिस्ताची ।। ३७ ।। तिनें या रजपुतीणीला । रीतीप्रमाणें उपचार केला । लोबो म्हणे ना लागला । मार इला कोठेंच ।। ३८ ।। हें आश्चर्य खरोखर । खांब दगडाचा होता थोर । त्याच्या खालीं शरीर । सुरक्षित रहावें कसें ? ।। ३९ ।। आश्चर्य वाटलें लोकांला । प्राण बाईचा वांचला । हा जो कांहीं प्रकार झाला । तो घडला इतुक्यास्तव ।। ४० ।। खांब पाडून अंगावरी । भूत जें होतें शरीरीं । त्या भुतास मुक्ति खरी । दिधली त्या गजाननें ।। ४१ ।। बाई होऊन पूर्ववत् । गेली जयपूर शहराप्रत । नांदूं लागली आनंदांत । ऐसा प्रभाव स्वामींचा ।। ४२ ।। ऐसेंच एका उत्सवासी । नाईक नवऱ्याच्या मस्तकासी । सोडीत असतां मंडपासी । लाकडी गोल पडला हो ।। ४३ ।। तोही गोल थोर होता । परी स्वामींची अगाध सत्ता । कोठेंही ना आघात होतां । नाईक नवरा वांचला ।। ४४ ।। पुत्र कृष्णाजी पाटलाचा । रामचंद्र नांवाचा । परमभक्त समर्थांचा । एक असे शेगांवीं ।। ४५ ।। एके दिवशी त्याच्या घरीं । येते

झालें साक्षात्कारी । ऐन दुपारच्या अवसरीं । गोसाव्याच्यारूपानें ।। ४६ ।। भूक लागली मला देखा । अन्न कांहीं देतां कां ? । ऐसें म्हणून मारिली हांका । रामचंद्र पाटलातें ।। ४७ ।। पाटील मूळचा भाविक । त्यासी वाटलें कौतुक । गोसाव्याची ऐकून हांक । दारामाजीं पातला ।। ४८ ।। निरखून पाहातां गोसाव्यासीं । तों ते असावे पुण्यराशी । स्वामी गजानन निश्चयेसी । ऐसें त्याला वाटलें ।। ४९ ।। गोसाव्याचा धरून हात । आला घेऊन घरांत । दिला बसण्यास पाट । पूजा केली पायांची ।। ५० ।। गोसावी म्हणे पाटलाला । आज मी मुद्दाम आलों मुला । कांही तुज सांगण्याला । तें तूं ऐके मनापून ।। ५१ ।। कर्जाची न चिंता करी । तें फिटून जाईल निर्धारीं । अरे उन्हाळ्यांत गोदावरी । थोडी कोरडी पडतसे ।। ५२ ।। तैसाच हाही प्रकार । संपन्नतेचा येईल पूर । कृपाघन वर्षल्यावर । श्रीहरीचा समज हें ।। ५३ ।। उष्टें माझें जें ठायीं । पडेल बापा ते ठायीं । कशाचेंही कधीं कांहीं । कमी नाही पडणार ।। ५४ ।। आण ताट वाढून । सुग्रास देई भोजन । मर्जी असल्या पांघरूण । घाल एखादें अंगावरी ।। ५५ ।। पूजा अन्न दक्षिणा । याचकांसी दिल्या जाणा । तें पावतें नारायणा । येविषयीं शंका नसे ।। ५६ ।। परी तो याचक । आधीं पाहिजे शुद्ध देख । त्यावांचून हे कौतुक । होणार नाहीं कधींही ।। ५७ ।। आणलें ताट वाढूनी । गोसावी जेवला प्रेमानीं । पांच रुपये पाटलांनी । दक्षिणा ठेविली त्याच्या करां ।। ५८ ।। तैं गोसावी म्हणाला । ही दक्षिणा नको मला । तूं पाहिजे कारभार केला । गजाननाच्या मठांत ।। ५९ ।। तीच दक्षिणा मागण्यासी । मी आलों तुझ्यापासीं । ती आनंदे देईं मसी । म्हणजे कल्याण होईल ।। ६० ।। समर्थसेवेची दक्षिणा । देऊन तुष्टवी माझ्या मना । योग्य मनुष्य तुझ्याविणा । कोणी न येथें सांप्रत ।। ६१ ।। तुझी कांता आजारी । वरचेवरी पडते जरी । तीही होईल बापा बरी । ही दक्षिणा दिल्यानें ।। ६२ ।। बोलाव तुझ्या पुत्राप्रत । त्याच्या कंठी एक ताईत । बांधितो म्हणजे चेटूकभूत । याची न बाधा होय त्यासी ।। ६३ ।। कां कीं ही जमेदारी । कठीण आहे भूमिवरी । पाण्याशींच पाणी वैरी । ये ठाईं होत असे ।। ६४ ।। पाटीलकीचें तुझें वतन । हें वाघाचें पांघरूण । त्याचा उपयोग करणें जाण । अति जपून रामचंद्रा ।। ६५ ।। द्वेषी मन असूं नये । सन्नीतीला सोडूं नये । राजाविरुद्ध जाऊं नये । उगीच भलत्या कामांत ।। ६६ ।। साधु कोण संत कोण ? । हें पाहावें शोधून । दांभिकांच्या नादीं जाण । कदापिही लागूं नये ।। ६७ ।। ही व्रतें पाळल्यास । तुझा ऋणी श्रीनिवास । होईल या वचनास । असत्य माझ्या मानूं नको ।। ६८ ।। आय पाहून खर्च करी । दंभाचार कधीं न वरी । साधुसंत येतां घरीं । विन्मुख त्याला लावूं नये ।। ६९ ।। अपमान खऱ्या

संतांचा । झाल्या कोप ईश्वराचा । होतसे बापा साचा । संतचरणीं प्रेमा धरी ।। ७० ।। आपल्या वंशजांचे उणें । पाहूं नये कदा मनें । सोयऱ्याधायऱ्याकारणें । समयानुसार मान द्यावा ।। ७१ ।। कोप असावा बाह्यात्कारी । दया असावी अंतरीं । जैसें कां तें फणसावरी । कांटे, आंत गोड गरे ।। ७२ ।। मी तुझ्या पाठीस । आहे जाण रात्रंदिवस । ताईंत बांधून कंठास । गोसावी जाऊं लागला ।। ७३ ।। दाराबाहेर जातां भला । अंतर्धान पावला । पाहातां पाहातां झाला । दिसेनासा रस्त्यांत ।। ७४ ।। पाटील अवघ्या दिवसभर । मानसीं करी विचार । हा गोसावी कोणी इतर । नसावा ऐसें वाटतें ।। ७५ ।। श्रीगजानन स्वामी मला । आले उपदेश करायला । घेऊन गोसावीवेषाला । हें आतां उमजलें ।। ७६ ।। रात्रीं स्वप्नीं येऊन । संशय केला निरसन । ऐसें स्वामी गजानन । भक्तवत्सल खरोखरी ।। ७७ ।। श्रीगजानन चरित्र । तारक असोनी परमपवित्र । अनुभव येण्या मात्र । सबळ निष्ठा पाहिजे ।। ७८ ।। या ग्रंथाची अवतरणिका । देतों आतां ही तुम्ही ऐका । वेळ उगा दवडूं नका । पूर्ण व्हावें सावधान ।। ७९ ।। प्रथमाध्यायीं मंगलाचरण । देवगुरूचें वंदन । केलें पुढे निवेदन । गजाननाच्या पूर्वचरिता ।। ८० ।। माघमासीं सप्तमीसी । समर्थ आले शेगांवासी । देवीदासाच्या सदनापासी । दिसते झाले प्रथमत: ।। ८१ ।। बंकटलाल दामोदर । दोन होते चतुर नर । त्यांनी परीक्षा अखेर । केली गजाननाची ।। ८२ ।। कथा द्वितीयाध्यायांत । येणेंपरी आहे सत्य । गोविंदबुवाच्या कीर्तनांत । महाराज येऊन बैसले ।। ८३ ।। पितांबर शिंप्याला । रस्त्यांत चमत्कार दाविला । बंकटलालाच्या घराला । महाराज गेले शेवटीं ।। ८४ ।। कथा तृतीयाध्यायाला । गोसाव्यानें नवस केला । गांजाचा श्रीसमर्थांला । पाजण्याचा विबुध हो ।। ८५ ।। त्याची इच्छा पुरविली । प्रथा गांजाची पडली । तेथपासोनी भली । शेगांवचे मठांत ।। ८६ ।। जानराव देशमुखाचें । गंडांतर टाळिलें साचें । देऊन तीर्थ पायांचें । आपुलें तें स्वामींनीं ।। ८७ ।। मृत्यूचे तें प्रकार । तेथें कथिले सविस्तर । विठोबासी दिला मार । ढोंग करितो म्हणोनी ।। ८८ ।। कथा चतुर्थाध्यायाठायीं । येणें रीतीं असे पाहीं । जानकीरामें दिला नाहीं । विस्तव चिलमीकारणें ।। ८९ ।। किडे पडले चिंचवण्यांत । अन्न गेलें वाया सत्य । सोनारानें जोडून हात । केली विनंती समर्थांला ।। ९० ।। त्याचा अपराध क्षमा केला । पूर्ववत् केलें चिंचवण्याला । जानकीराम भक्त झाला । ते दिवसापासून ।। ९१ ।। होते दोन कान्होले । उतरंडीसी ठेविलेले । तेच समर्थें मागितलें । खाया चंदू मुकिंदासी ।। ९२ ।। चिंचोलीच्या माधवाला । यमलोक दावून मुक्त केला । शिष्याहातें करविला । थाट वसंतपूजेचा ।। ९३ ।। कथा पंचमाध्यायांत । महाराज पिंपळगांवांत । बसले शंकराच्या मंदिरांत । पद्मासन घालोनिया

।। ९४ ।। गुराख्यांनी पूजा केली । गांवची मंडळी तेथें आली । महाराजांसी घेऊन गेली । पिंपळगांवाकारणें ।। ९५ ।। हें कळलें बंकटलाला । तो पिंपळगांवास गेला । महाराजांसी आणण्याला । परत शेगांवाकारणें ।। ९६ ।। समर्थांसी आणिलें परत । कांहीं दिवस राहून तेथ । पुन्हां गेले अकोलींत । भास्करासी तारावया ।। ९७ ।। कोरड्या ठणठणीत विहिरीला । जिवंत झरा फोडिला । एका क्षणांत आणिलें जला । त्या कोरड्या विहिरीठायीं ।। ९८ ।। भास्कराची उडवली भ्रांती । घेऊन आले तयाप्रती । शेगांवास गुरुमूर्ति । ही कथा पंचमात ।। ९९ ।। षष्ठाध्यायीं ऐसी कथा । बंकटलालें सद्गुरुनाथा । मक्याचीं कणसें खाण्याकरितां । नेलें आपुल्या मळ्यांत ।। १०० ।। गांधीलमाशा उठल्या तेथ । लोक होऊन भयभीत । पळूं लागले असती सत्य । जीव आपुला घेऊनी ।। १ ।। बाधा गांधीलमाश्यांची । महाराजा न झाली साची । घेतली असे शिष्यत्वाची । परीक्षा बंकटलालाची ।। २ ।। नरसिंगजीस भेटण्याला । स्वामी गेले अकोटाला । जो नरसिंगजी होता भला । शिष्य कोतशा अल्लीचा ।। ३ ।। कांहीं दिवस राहिलें । अकोटामाजी भले । नरसिंगजीसी हितगुज केलें । बंधु आपुला म्हणून ।। ४ ।। चंद्रभागेच्या तीरीं । शिवरग्रामाभीतरीं । कृपा व्रजभूषणावरी । केली असे जाऊन ।। ५ ।। मारुतीच्या मंदिरांत । श्रावणमासाच्या उत्सवांत । समर्थ आले राहण्याप्रत । येथें षष्ठमाची पूर्तता ।। ६ ।। गांवीची पाटील मंडळी । अवघी आडदांड होती भली । हमेश होई बोलाचाली । त्यांची समर्थांबरोबर ।। ७ ।। हरी पाटलासवें भले । महाराज कुस्ती खेळले । मल्लविद्येचें दाविलें । प्रत्यंतर बहुतांला ।। ८ ।। ऊंसाचा चमत्कार । दाऊनिया साचार । अभिमानाचा परिहार । केला पाटील मंडळींच्या ।। ९ ।। भिक्यानामें दिला सुत । खंडू कडताजी पाटलाप्रत । आम्रभोजनाचें व्रत । चालवण्यास कथिलें पाटलाला ।। ११० ।। ऐशा कथा सप्तमाध्यायीं । कथन केल्या आहेत पाही । निष्ठा समर्थांच्या ठायीं । जडली पाटील मंडळींची ।। ११ ।। कथा आहे अष्टमांत । दुफळी पाटील देशमुखांत । अर्ज दिधला सरकारांत । महारांनीं विरुद्ध पाटलाच्या ।। १२ ।। खंडूवरी बालंट आलें । तें समर्थांनीं नासिलें । निर्दोष सुटते झाले । खंडू पाटील खटल्यांतून ।। १३ ।। तैलंगी ब्राह्मणाला । वेद म्हणून दाखविला । आपण कोण हा कळविला । सहज लीलेनें समाचार ।। १४ ।। कृष्णाजीच्या मळ्याशीं । महाराज राहिले छपरासी । मंदिराच्या सान्निध्यासी । चंद्रमौळी हराच्या ।। १५ ।। ब्रह्मगिरी गोसाव्याला । अभिमानरहित केला । ''नैनं छिन्दन्ति'' श्लोकाला । रहस्यासह सांगून ।। १६ ।। जळत्या पलंगाच्यावर । महाराज बसते झाले स्थिर । न जाळे वैश्वानर । केव्हांही खऱ्या संताला ।। १७ ।। कथा नवमाध्यायाला ।

द्वाड घोडा शांत केला । खूण नवस करणाराला । दिली असे गांजाची ।। १८ ।। दासनवमीचे उत्सवासी । समर्थ बाळापुरासी । घेऊन आपल्या शिष्यांसी । बाळकृष्णाच्या घरां गेले ।। १९ ।। बाळकृष्णालागून । करविलें समर्थांचें दर्शन । संशयरहित केलें मन । तया रामदास्याचें ।। १२० ।। दशमाध्यायीं सुरेख । उमरावतीचें कथानक । उपरति झाली पुरी देख । तेथें बाळाभाऊला ।। २१ ।। गणेश आप्पा चंद्राबाई । यांनीं अर्पिला संसार पायीं । भावभक्तीनें लवलाही । श्रीगजाननस्वामींच्या ।। २२ ।। गणेश दादा खापर्ड्याला । शुभ आशीर्वाद दिधला । छत्रीनें मारून बाळाला । परीक्षा त्याची घेतली ।। २३ ।। द्वाड गाय सुकलालाची । अति गरीब केली साची । दांभिक भक्ति घुड्याची । कशी ती कथन केली ।। २४।। एकादशाध्यायीं कथन । भास्करासी डसला श्वान । आले त्र्यंबकेश्वरीं जाऊन । गोपाळदासा भेटले ।। २५ ।। झ्यामसिंगाच्या विनंतीसी । देऊन मान अडगांवासी । येते झाले पुण्यराशी । श्रीगजाननमहाराज ।। २६ ।। निजधामा भास्कर गेला । त्याचा देह ठेविला । द्वारकेश्वरा सन्निध भला । सतीबाईंचे शेजारीं ।। २७ ।। आज्ञा केली कावळ्यांला । तुम्ही न यावें या स्थला । वांचविलें गणु जवऱ्याला । सुरुंग उडतां विहिरींत।। २८ ।। शेट बचुलालाची । कथा द्वादशाध्यायीं साची । मूर्ति निरिच्छपणाची । प्रत्यक्ष होते महाराज ।। २९ ।। स्वामींचें वस्त्र नेसला । पितांबर शिंपी कोंडोलीला । स्वइच्छेने येता झाला । परमभक्त होता जो ।। १३० ।। पितांबरानें कोंडोलीसी । बळिरामाच्या शेतासी । वठलेलिया आंब्यासी । पानें फळें आणविली ।। ३१ ।। पितांबर राहिला कोंडोलीत । तेथेंच झाला समाधिस्थ । नवा मठ झाला स्थापित । शेगांवी समर्थ इच्छेनें ।। ३२ ।। विचार करून मानसीं । बसून रेतीच्या गाडीसी । महाराज नव्या मठासी । आले जुन्या मठांतून ।। ३३ ।। झ्यामसिंगानें मुंडगांवाला । नेलें गजाननस्वामीला । पर्जन्यानें घोटाळा । भंडाऱ्याचा केला असे ।। ३४ ।। झ्यामसिंगानें आपुली । इस्टेट समर्था अर्पिली । पुंडलीकाची निमाली । गाठ प्लेगाची श्रीकृपें ।। ३५ ।। कथाभाग तेराव्याचा । महारोग गोसाव्याचा । हरण गंगाभारतीचा । केला असें गजाननें ।। ३६ ।। बंडुतात्यासी भाग्य आलें । भूमींत धन सांपडलें । कर्जापासून मुक्त केलें । समर्थानें निजकृपें ।। ३७ ।। नर्मदेच्या स्नानास । सोमवती अमावस्यास । नौका फुटतां छिद्रास । हात लाविला नर्मदेनीं ।। ३८ ।। विडा माधवनाथाला । शिष्याहातीं पाठविला । या कथा चवदाव्याला । वर्णिल्या असती साकल्यें ।।३९ ।। अध्याय तो पंधरावा । शिवजयंतीचा आहे बरवा । आलें अकोलें नामक गांवा । टिळक बाळ गंगाधर ।। १४० ।। भाकरी प्रसाद पाठविला । कोल्हटकराचे हस्तें भला । मुंबईत लोकमान्याला । ग्रहण

कराया कारणें ।। ४१ ।। श्रीधर गोविंद काळ्यास । करिते झालें उपदेश । नको जाऊं विलायतेस । येथेंच आहे सर्व कांहीं ।। ४२ ।। कथा ऐशा सोळाव्यासी । पुंडलीक अंजनगांवासी । जातां निवारिले त्यासी । येऊनिया स्वप्नांत ।। ४३ ।। पादुकांचा प्रसाद त्याला । झ्यामसिंगहस्तें पाठविला । कवराच्या भाजीभाकरीला । ग्रहण केलें आनंदें ।। ४४ ।। छरा तुकारामाचा । कानामधून पडला साचा । ह्या अशा कथांचा । समावेश सोळाव्यांत ।। ४५ ।। सतराव्यांत कथा सुरस । विष्णूसाच्या घरास । जाया मलकापुरास । समर्थ निघाले गाडींतून ।। ४६ ।। नग्न फिरती म्हणूनी । खटला भरला पोलिसांनीं । केवळ अहंपणानीं । सत्पुरुषासी त्रास द्याया ।। ४७ ।। महेताबशा सांईला । पाठवून दिलें पंजाबाला । हिंदुयवनांविषयीं केला । कळकळीचा बोध त्यासी ।। ४८ ।। बापुरावाच्या कांतेसी । भानामती न मानी साची । भेट गंगाभागीरथीसी । झाली अकोटीं विहिरींत ।। ४९ ।। कथा बायजा माळणीची । अठराव्यामाजीं साची । कवर डॉक्टराच्या फोडाची । कथा यांत ग्रंथित असे ।। १५० ।। महाराज गेले पंढरीला । घेऊन अवघ्यां लोकांला । तेथें बापुना काळ्याला । दर्शन हरीचें करविलें ।।५१ ।। कवठे बहादुरचा वारकरी । मरीनें झाला आजारी । त्यास घटकेमाझारीं । समर्थानें बरें केलें ।। ५२ ।। एक्या कर्मठ ब्राह्मणाला । श्वान उठवून मेलेला । दावून त्याचा गलित केला । कर्माभिमान श्रोते हो ।। ५३ ।। कथा एकोणविसाव्यासी । दिला काशीनाथपंतासी । आशीर्वाद तो अतिहर्षी । तो येतां दर्शना ।। ५४ ।। गोपाळ मुकिंद बुटी भला । नागपुरासी घेऊन गेला । श्रीगजाननस्वामीला । आपुल्या गेहाकारणें ।। ५५ ।। त्याच्या मनीं ऐसा हेत । महाराज ठेवावे नागपुरांत । परी हरि पाटलांनी परत । आणिले समर्थ शेगांवी ।। ५६ ।। धार कल्याणचे रंगनाथ । साधु आले भेटण्याप्रत । समर्थांसी शेगांवांत । ऐसें आणि कितीतरी ।। ५७ ।। श्रीवासुदेवानंद सरस्वती । जो कर्ममार्गाची प्रत्यक्ष मूर्ति । दृष्टादृष्ट होतां नुसती । आनंद झाला उभयतांतें ।। ५८ ।। तेव्हां बाळाभाऊला । जो कां होता संशय आला । तो समर्थांनी निवटिला । करूनिया उपदेश ।। ५९ ।। केलें खळ्याचें संरक्षण । गाढवांचेपासून । समर्था मारितां आलें मरण । नारायणासी बाळापुरी ।। १६० ।। गजाननाचें कृपे भलें । जाखड्याचें लग्न झालें । कपीलधारेसी दिधलें । दर्शन निमोणकराला ।। ६१ ।। तुकारामें आपुला । पुत्र समर्था वाहिला । नारायण नामें भला । सेवा करावयाकारणें ।। ६२ ।। पंढरीतें जाऊन । विठ्ठलातें विचारून । महाराज आले परतून । शेगांवाकारणें ।। ६३ ।। पुढें भाद्रपदमासासी । ऋषिपंचमीच्या पुण्य दिवशीं । आधुनिक कालाचा हा ऋषि । समाधिस्थ जहाला ।। ६४ ।। विसाव्यामाजीं इतर ।

श्रींची समाधी झाल्यावर । जे का घडले चमत्कार । त्यांचे वर्णन केलें असे ।। ६५ ।। जे जे भाविक भक्त कोणी । त्यांना त्यांना अजुनी । दर्शन देती कैवल्यदानी । त्यांच्या इच्छा पुरवून ।। ६६ ।। आतां हा एकविसावा । अवघ्या कथेचा कळस बरवा । हा अवघ्यांचा लेखावा । तुम्ही, सार श्रोते हो ।। ६७ ।। प्रत्यक्षापरी प्रकार । येथें होती वरच्यावर । म्हणून म्हणणें आहे सार । अवघ्यांचे या अध्याया ।। ६८ ।। वर्गणीच्या जोरें भलें । समाधीचें काम झालें । मनापासून भक्त झटले । वर्गणी गोळा कराया ।। ६९ ।। ऐसें भव्य सुंदर । काम कोठें न भूमिवर । धर्मशाळा चौफेर । चहुं बाजूंनीं बांधिल्या ।। १७० ।। या भव्य कामाला । बहुतांनीं हात लाविला । त्यांचीं नांवें तुम्हांला । सांगतां ग्रंथ वाढेल ।। ७१ ।। मुख्य जे होते त्यांतून । त्यांची नांवें करितों कथन । कुकाजीचा नंदन । हरी पाटील नाम ज्याचें ।। ७२ ।। सांगवी गांवचा बनाजी । उमरीचा तो गणाजी । बटवाडीचा मेसाजी । लाडेगांवचा गंगाराम ।। ७३ ।। भागु, नंदू, गुजाबाई । अकोल्याची बनाबाई । सुकदेव पाटलाची ती आई । यांनी हजारों रुपये दिले ।। ७४ ।। पाटील रामचंद्र कृष्णाजी । दुसरा दत्तु भिकाजी । पळसखेडचा सुखदेवजी । मार्तंड गणपती शेगांवचा ।। ७५ ।। बालचंदाचा रतनलाल । पंचगव्हाणचा दत्तूलाल । त्याच गांवींचा बिसनलाल । अंबरसिंग टाकळीचा ।। ७६ ।। किसन बेलमंडळेकर । विठोबा पाटील चावरेकर । हसनापुरचा राहणार । गंगाराम नाम ज्याचें ।। ७७ ।। या दानशूरांनी । मोठमोठ्या रकमा देऊनि । केली मठाची उभारणी । भक्तिस्तव समर्थांच्या ।। ७८ ।। कोठ्या कचेरी स्वैंपाकघरें । सोपे उत्तम प्रकारें । बांधिले असती साजिरे । समाधीच्या चौफेर ।। ७९ ।। लोकांनी ज्या देणग्या दिल्या । त्या बांधकामीं जिरून गेल्या । परी पुष्कळ गोष्टी राहिल्या । बांधण्याच्या अवशेष ।। १८० ।। त्यासाठीं युक्ति केली । वर्गणी जमवण्यासाठीं भली । योजना ती ऐशी झाली । ती ऐका विबुध हो ।। ८१ ।। बसविला शेतसाऱ्यावर । समर्थांचा धार्मिक कर । कोणासी न करतां जोर । रुपयामागें एक आणा ।। ८२ ।। तैशीच बाजारपेठेशीं । धान्य अथवा कपाशी । जी येईल विकायासी । पट्टी बसविली त्यावर ।। ८३ ।। गाडीमागें अर्धा आणा । हर्ष वाटे देतांना । कां कीं समर्थांच्याचरणां । निष्ठा होती सर्वांची ।। ८४ ।। समाधीपुढें स्वाहाकार । होऊन गेले अपार । परी त्यांतून मोठे चार । सर्वश्रुत जाहले ।। ८५ ।। शतचंडीचें अनुष्ठान । ब्राह्मणांच्या करवीं जाण । केलें आदरें करून । किसनलाल शेठजीनें ।। ८६ ।। अनुष्ठान शतचंडीचें । करणे अति अवघड साचें । अधिकन्यून ना खपायाचें । जगदंबे कालिकेस ।। ८७ ।। कांहीं चुकतां विधानांत । तात्काळ होतें विपरीत । काम्य अनुष्ठानाप्रत ।

भीति चहूं बाजूंनी ।। ८८ ।। वडील किसनलालाचा । बंकटलाल नांवाचा । भक्त होता समर्थांचा। एकनिष्ठ पहिल्यापून ।। ८९ ।। पूर्ण आहुतीच्या दिवशीं । त्या बंकटलाल भक्तासी । व्याधी उद्‌भवली शरीरासी । प्राणान्ताचा समय आला ।। १९० ।। लोक गेले घाबरून । म्हणती हें काय आलें विघ्न। शतचंडीचें अनुष्ठान । करतां विपरीत व्हावें कां ? ।। ९१ ।। बंकटलाल म्हणे पुत्रासी । भिऊं नकोस मानसीं । माझा तारिता पुण्यरासी। समाधीसी बसलासे ।। ९२ ।। तो अवघें करील बरें । नका होऊं बावरें। पूर्ण आहुतीचें काम सारें । घ्यावें सशास्त्र उरकून ।। ९३ ।। माझा स्वामी गजानन । येऊं न देई कदा विघ्न । भक्तांचें करण्या संरक्षण। मुळींच बसला येथें तो ।। ९४ ।। तेंच पुढें सत्य झालें। व्याधीचें स्वरूप मावळलें । एका बाईचें निमालें । भूत शतचंडीत या ।। ९५ ।। बनाजी तिडके सांगवीकर। यांनी केला स्वाहाकार। कसुऱ्याची राहाणार । गुजाबाई नाम जिचें ।।९६।। चापडगांवींचा वामन । शामरावाचा नंदन । यांनीही एक यज्ञ । केला समाधीच्यापुढें ।। ९७ ।। ऐसी धर्मकृत्यें किती तरी। झालीं समर्थांसमोरी। खरे खरेच साक्षात्कारी। श्रीगजाननमहाराज ।। ९८ ।। यावत् कालपर्यंत । लोक होते निष्ठावंत । तावत् कालपर्यंत। वऱ्हाड होता सुखी बहु ।। ९९ ।। जसजसी निष्ठा कमी झाली । तों तों विपन्न दशा आली। अवदसेनें घातली । माळ कंठी वऱ्हाडाच्या ।। २०० ।। विपुल पिकणें टाकिलें । काश्यपीनें पाहा भले । नवे वाहूं लागले । वारे सर्व वऱ्हाडांत ।। १ ।। वऱ्हाडाची ऐसी दैना । समर्थांसी पाहवेना। म्हणून घेतलें आपणां । कोंडोनीं त्यांनी जलांत ।। २ ।। तीस फुटांपासून । पाया आणिला भरून । तेथेंच कां हे जीवन । निर्माण व्हावें श्रोते हो ।। ३ ।। म्हणून ऐसें वाटतें। राग आला समर्थांतें । म्हणून त्यांनी जलातें । भोंवतीं केले निर्माण ।। ४ ।। सुखसंपन्न पहिल्यापरी । वऱ्हाड व्हावा निर्धारी । ऐसे चित्तांत असल्या जरी । या वऱ्हाडी जनांच्या ।। ५ ।। तरी त्या अवघ्या जनांनी । श्रीगजाननाच्या चरणीं । पूर्ववत् निष्ठा ठेवूनी । सुखालागीं अनुभवावें ।। ६ ।। ऐसें न जरी करतील । तरी याहीपेक्षां येईल। वऱ्हाडासी बिकट काळ । याचा विचार करा हो ।। ७ ।। गजाननपदीं निष्ठा ठेवा । सुख अनुभव सर्वदा घ्यावा। कुतर्कासी मुळीं न द्यावा । ठाव आपुल्या मानसीं ।। ८ ।। या गजाननरूप जमिनींत । जें जें कांहीं पेराल सत्य । तें तें मिळणार आहे परत । बहुत होऊन तुम्हांला ।। ९ ।। दाणे टाकिल्या खडकावरी। त्यांची न रोपें होतीं खरीं। याचा विचार अंतरीं । सर्व काळ करा हो ।। २१० ।। कंटाळा संतसेवेचा । ज्या ज्या प्रांता येत साचा। त्या त्या प्रांती दुष्काळाचा । प्रादुर्भाव होतसे ।। ११ ।। धर्मश्रद्धा ही वाघीण । गेल्या मनरूपी दरींतून। दुर्वासनेचे

कोल्हे जाण । येऊन बसतील ते ठायां ।। १२ ।। भक्ति शूचिर्भूत अंगना । अभक्ति ही वारांगना । तिच्या नादीं लागल्या जाणा । विटंबनाच सर्वत्र ।। १३ ।। सन्नीतीला सोडूं नका । धर्मवासना टाकूं नका । शत्रु ना माना एकमेकां । तरीच शक्ति वाढेल ।। १४ ।। ऐसें तुम्ही वागल्यास । येतील चांगले दिवस । या वऱ्हाड प्रांतास । हें कधींही विसरूं नका ।। १५ ।। एकदां तरी वर्षांतून । घ्यावें गजाननाचें दर्शन । एकदां तरी पारायण । करा गजाननचरित्राचें ।। १६ ।। हा एकवीस अध्यायांचा । श्रीगजाननविजय नांवाचा । नैवेद्य एकवीस मोदकांचा । गजाननासी अर्पा हो ।। १७ ।। वा हे अध्याय साचार । माना एकवीस दुर्वांकुर । पारायणरूपें निरंतर । वाहाव्या गजाननासी ।। १८ ।। सद्भाव जो मानवाचा । तोच दिवस चतुर्थीचा । प्रेमरूपी चंद्राचा । उदय झाला पाहिजे ।। १९ ।। मग या ग्रंथाचे अक्षर । एकेक हे दुर्वांकुर । अर्थ शब्दांचा साचार । मोदक समजा विबुध हो ।। २२० ।। ती अर्पून गजानना । पारायणरूपी पारणा । साधून घ्यावा करा ना । वेळ आतां थोडकाही ।। २१ ।। हा ग्रंथ ना कादंबरी । ती गजाननाची लीला खरी । येथें जो अविश्वास धरी । तो बुडेल नि:संशय ।। २२ ।। श्रीगजाननस्वामी–चरित । जो नियमें वाचील सत्य । त्याचे पुरतील मनोरथ । गजाननकृपेनें ।। २३ ।। हें गजाननचरित्र भागीरथी । कथा या तोय निश्चिती । महाराष्ट्र ओव्या तयावरती । लहरी समजा विबुध हो ।। २४ ।। वा कल्पवृक्ष हें स्वामीचरित । शाखा अध्याय तयाप्रत । पद्यरचना हीच सत्य । पालवी या वृक्षाची ।। २५ ।। जो या ग्रंथी ठेवील भाव । त्यासी पावेल स्वामीराव । संकटीं त्याच्या घेईल धांव । रक्षण त्याचें करावया ।। २६ ।। हा ग्रंथ केवळ चिंतामणी । चिंतिलें फळ देईल जाणी । दृढतर विश्वास असल्या मनीं । हें मात्र विसरूं नका ।। २७ ।। जेथें गजानन चरित्राचा । पाठ होईल नित्य साचा । तेथें वास लक्ष्मीचा । चिरकाल होईल हो ।। २८ ।। दरिद्र्यासी मिळेल धन । रोगीयासी आरोग्य जाण । साध्वी स्त्रीचें वांझपण । फिटेल त्याच्या वाचनें ।। २९ ।। निपुत्रिकासी होईल पुत्र । निष्कपटी मिळेल मित्र । चिंता न राहील अणुमात्र । या ग्रंथाच्या वाचका ।। २३० ।। दशमी एकादशी द्वादशीला । हा ग्रंथ जो वाची भला । अनुपम येईल भाग्य त्याला । श्रीगजाननकृपेनें ।। ३१ ।। गुरुपुष्य योगावरी । जो यांचें पारायण करी । बसून एक्या आसनावरी । राहूनिया शूचिर्भूत ।।३२ ।। त्याच्या अवघ्या मनकामना । खचित होतील पूर्ण जाणा । कसल्याही असोत यातना । त्या त्याच्या निरसतील ।। ३३ ।। जेथें हा राहील ग्रंथ । तेथें न कदा येई भूत । लाग न साधे यत्किंचित् । तेथे ब्रह्मसमंधाचा ।। ३४ ।। ऐसें याचें महत्त्व । ये भाविकाला प्रचीत । कुटिल दुष्टदुर्जनांप्रत । याचा

अनुभव येणें नसे ।। ३५ ।। मानसाची योजना । राजहंसासाठीं जाणा । तैसें हें संतसज्जनां । मानस स्वामीचरित ।। ३६ ।। पूर्वकालीं ज्ञानेश्वर । मीरा मेहता कबीर । नामा सावता चोखा महार । गोरा बोधला दामाजी ।। ३७ ।। उंबरखेडी ऐनाथ । सखाराम अमळनेरांत । वा देव मामलेदार यशवंत । वा हुमणाबादी माणिकप्रभू ।। ३८ ।। तेवींच ह्या वऱ्हाडांत । गजाननस्वामी सद्गुरुनाथ । फरक नाहीं यत्किंचित् । त्यांच्या यांच्या मधीं हो ।। ३९ ।। आतां हीच विनंती । तुम्हां अवघ्यां भाविकांप्रती । अत्यंत असूं द्यावी प्रीति । श्रीगजाननाचे चरणीं ।। २४० ।। म्हणजे तुमची येरझार । जन्ममृत्यूची साचार । होऊनिया व्हाल पार । दुस्तर भवामधूनी ।। ४१ ।। आतां स्वामी दयाघना ! । तुला येवो माझी करुणा । दासगणूच्या यातना । सकल निवारी कृपेनें ।। ४२ ।। मी तुझा झालों भाट । मार्ग दावी मला नीट । दुर्वासनेचा येवो वीट । चित्तामाजीं दयाळा ! ।। ४३ ।। आमरण वारी घडो । संतचरणी प्रेमा जडो । अक्षयीचा वास घडो । श्रीगोदेच्या तीराला ।। ४४ ।। प्रसंग याचना करण्याचा । मशीं नको आणूंस साचा । समर्था दासगणूचा । अभिमान वाहावा मानसीं ! ।। ४५ ।। मी सकल संतांचा चरणरज । माझी राखा तुम्ही लाज । हेंचि मागणें आहे आज । पदर पसरून तुम्हांते ।। ४६ ।। जैसी केलीस प्रेरणा । तैसेंच मी वदलों जाणा । हे स्वामी गजानना ! । तुझे चरित्र लिहितां कीं ।। ४७ ।। शेगांवाचे मठांत । कांही होते कागदपत्र । ते रतनसानें मजप्रत । आणूनिया दाखविलें ।। ४८ ।। त्यांच्या आधारे ग्रंथ लिहिला । कल्पनेचा ना उपयोग केला । म्हणून अधिक न्यूनाला । मी नाहीं कारण ।। ४९ ।। झालें असल्या अधिक न्यून । त्याची क्षमा गजानन । करो सर्वदा मजलागून । हीच आहे विनंती ।। २५० ।। शके अठराशे एकसष्ठांत । प्रमाथिनाम संवत्सरांत । चैत्रमासीं शुद्धांत । वर्षप्रतिपदेला ।। ५१ ।। हा ग्रंथ कळसा गेला । शेगांवनामे–ग्रामीं भला । तो गजाननांनीं पूर्ण केला । प्रथम प्रहरी बुधवारी ।। ५२ ।। स्वस्ति श्रीदासगणूविरचित । हा श्रीगजानन विजय नामें ग्रंथ । नौका होवो भाविकांप्रत । भवसिंधु तरावया ।। २५३ ।। शुभं भवतु ।। श्रीहरिहरार्पणमस्तु ।।

।। इति श्रीगजानन विजय ग्रंथस्य एकविंशोऽध्यायः समाप्तः ।।

।। पुंडलीक वरदा हरिविठ्ठल ।। ।। सीताकांतस्मरण जयजय राम ।। ।। पार्वतीपते हरहर महादेव ।।

**समाप्तः**

।। श्री शंकर प्रसन्न ।।

ह.भ.प. संतकवी श्री दासगणू महाराज कृत

# श्री गजानन विजय ग्रंथ

।। समाप्त ।।

Astro • Puja • Vastu

# FALIT JYOTISH AND VASTU SHASTRA CONSULTANT

## FOR ALL DHARMIK POOJA'S

SHRI GANESH PUJA

SHRI SATYANARAYAN PUJA

VASTU SHANTI

WEDDING | SAKHARPUDA | MUNJ

JANANA SHANTI | RUDRABHISHEK

SAPTASHATI PATH | HAVAN | ETC.

## HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

**SANPADA OFFICE**
Office No. 8, 1st Floor, Shiva Triveni Galleria CHS., Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai - 400705.

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai - 400043.

hariom astrologers | hariom astrologers | hariom_astrologers

hariomastrologers@gmail.com | www.hariomastrologers.com